**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छांबाबत**

**सभापती** : मी सदनाचे लक्ष वेधू इच्छितो की, आज जागतिक महिला दिन आहे. आपल्या सर्वांच्या वतीने जगातील सर्व महिला वर्गाला आपण शुभेच्छा देत आहोत. सदनात फक्त एकच महिला सन्माननीय सदस्या मला दिसत आहेत. आज सदनात एकच महिला सन्माननीय सदस्या उपस्थित आहेत. त्यामुळे त्यांना जर काही विचार व्यक्त करावयाचे असतील तर त्यांनी ते करावेत.

डॉ. मनिषा कायंदे : सभापती महोदय, आज आपणा सर्वांकडून सकाळपासून जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा प्राप्त होत आहेत. आज आनंदाचा दिवस वाटत आहे. वातावरण देखील थोडे वेगळे आहे. राज्य चौथे महिला धोरण आणत आहे याबाबत देखील येथे मी आनंद व्यक्त करते. पहिल्या तीन धोरणांमध्ये ज्या उणिवा राहिल्या असतील त्या आपण चौथ्या धोरणामध्ये भरुन काढू या. सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांच्या संमतीने मी या शुभेच्छा सर्व महिला वर्गाला देते. सन्माननीय सदस्या डॉ. प्रज्ञा सातव सभागृहात उपस्थित नाहीत. परंतु मला १-२ महिला अधिकारी दिसत आहेत. समोरच्या बाजूला देखील काही महिला आहेत. मी त्यांना देखील शुभेच्छा देते. सर्वांचे आभार मानते. धन्यवाद !

**सभापती** : आपण मत व्यक्त केल्याबद्दल आभारी आहे.

----

**पृ.शी./मु.शी.** : तोंडी उत्तरे

## राज्यातील खाजगी शाळांच्या शुल्क वाढीवर नियंत्रण ठेवण्याबाबत

**(१) * १२४४५ श्री.रविंद्र फाटक, डॉ.रणजित पाटील, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना काळात पालकांना शाळेचे शुल्क भरणे शक्य नसल्यामुळे शासनाने अध्यादेश काढत शैक्षणिक वर्ष सन २०२१-२०२२ मध्ये विद्यार्थ्यांना १५ टक्के शुल्क माफी देण्याचे निर्देश दिल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील खाजगी शाळांच्या अवाजवी शुल्क वाढीवर नियंत्रण ठेवण्यासाठी विभागीय शुल्क नियामक समिती व पुनर्रीक्षण समितीची मुदत सद्य:स्थितीत संपली असल्याने खाजगी स्वयं-अर्थसहाय्यीत आणि विनाअनुदानित शाळा अवाजवी शुल्क वाढ करण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(३) तसेच, सदर शुल्क माफीच्या आदेशाचे पालन इंग्रजी माध्यमाच्या शाळांकडून होत नसून काही शाळांनी शुल्क वाढ करुन शुल्क वसुलीसाठी पालकांना दररोज लघुसंदेश पाठवून शुल्क भरण्यास सांगत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू शैक्षणिक वर्ष संपत आले असतानाही राज्यातील अनेक शाळांनी उक्त निर्णयाची अंमलबजावणी न करता बहुतांश विद्यार्थ्यांच्या पालकांकडून संपूर्ण शैक्षणिक वर्षाचे शुल्क वसूल केल्याचे दिनांक ६ फेब्रुवारी, २०२२ रोजी निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू निर्णयाची अंमलबजावणी करुन शुल्कवाढीवर नियंत्रण ठेवण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच, राज्यातील खाजगी शाळांच्या अवाजवी शुल्क वाढीवर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्यात आजतागायत किती विभागात विभागीय शुल्क नियामक समिती व पुनर्रीक्षण समित्या गठीत करण्यात आल्या आहेत,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२४४५....

**श्री. बच्चू कडू, प्रा. वर्षा गायकवाड यांच्याकरिता :** (१) अंशत: खरे आहे, शासन निर्णय दिनांक १२ ऑगस्ट, २०२१ अन्वये १५ टक्के शुल्क कपात करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(२) शासन अधिसुचना दिनांक ७ जून, २०२१ अन्वये विभागीय शुल्क नियामक समित्यांचे व शासन अधिसुचना दिनांक २० फेब्रुवारी, २०२० अन्वये पूनर्रीक्षण समितीचे गठण करण्यात आले आहे.

(३) अंशत: खरे आहे.

(४) अंशत: खरे आहे.

(५) शुल्कवाढीवर नियंत्रण ठेवण्याकरीता महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येते. राज्यात मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर व औरंगाबाद या ५ विभागात विभागीय शुल्क नियामक समित्यांचे गठण करण्यात आले असून कोल्हापूर, अमरावती व लातूर या ३ विभागीय शुल्क नियामक समित्यांचा अतिरिक्त कार्यभार अनुक्रमे पुणे, नागपूर व औरंगाबाद या विभागीय शुल्क नियामक समित्यांकडे सोपविण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. रवींद्र फाटक : सभापती महोदय, गेल्या २ वर्षांपासून कोरोनाचे संकट असल्यामुळे शाळांतील मुलांना, पालकांना मोठ्या संकटाला तोंड द्यावे लागत आहे. सरकारने गेल्या वर्षी सन २०२१-२२ मध्ये विद्यार्थ्यांना १५ टक्के शुल्क माफी देण्याचे दिनांक १२ ऑगस्ट, २०२१ रोजी ठरविले होते आणि त्याबाबतची अधिसूचना देखील काढण्यात आली होती. माझे त्या अनुषंगाने २-३ प्रश्न आहेत. शासनाने महाराष्ट्रातील शाळांवर शुल्क वाढीवर नियंत्रण ठेवण्यासाठी विभागीय शुल्क नियामक समित्यांचे गठण केले होते, त्यांनी किती शाळांवर वाढीव फीच्या बाबतीत कारवाई केली होती, शाळांचे शुल्क कमी करण्याबाबत शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला होता तर त्याची अंमलबजावणी किती झाली ? महाराष्ट्रातील बहुतेक शाळांत शैक्षणिक वर्षांची पूर्ण फी घेण्यात आली होती. ज्या शाळांनी शासनाचा धोणात्मक निर्णय मान्य न करता विद्यार्थ्यांकडून पूर्ण वर्षाची फी आकारली असेल अशा शाळांवर शासनाने काय कारवाई केली आहे ?

ता.प्र.क्र.१२४४५....

श्री. बच्चू कडू : सभापती महोदय, आपण किमान १५ ते २० शाळांवर कारवाई केली. काही शाळा न्यायालयात गेल्यामुळे पुढील कारवाई करता आली नाही. न्यायालयाने ती कारवाई थांबविलेली आहे. ८४४७ शाळांनी १५ टक्के कपात केली आहे. आपल्या शासन निर्णयाच्या संदर्भाने योग्य पध्दतीने सहभाग घेऊन १५ टक्के माफीसंदर्भात एकूण ११११९२ शाळांपैकी ८७७४ शाळांनी माफी दिलेली आहे. आपण या बाबतीत बऱ्यापैकी कारवाई करीत आहोत. आपण १५ टक्के कपातीचा शासन निर्णय काढला आहे. मात्र बऱ्याच संस्था न्यायालयात गेल्यामुळे न्यायालयाने सांगितले की, कोणतीही कडक कारवाई करु नका. या संस्थांवर कारवाई केली तर .... तसे निर्बंध न्यायालयाने घातल्यामुळे आपल्याकडून ती कारवाई थांबविण्यात आली.

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी अतिशय सकारात्मक उत्तर दिले. त्यांनी त्यांच्या कार्यकाळात काम केले आहे. आमचे माननीय पालकमंत्री आहेत. आम्हाला माहीत आहे की, स्वत: फोन करुन देखील याबाबतीत त्यांनी दखल घेतलेली आहे. हा प्रश्न महत्त्वाचा आहे तसा आरटीई अंतर्गत २५ टक्के गरीब मुलांचे प्रवेश केले जातात हा प्रश्न देखील महत्त्वाचा आहे. या मुलांची राज्य व केंद्र शासनाकडून येणारी देयके असतात. केंद्र सरकारकडून ४० टक्के येतात आणि राज्य सरकार ६० टक्के त्याला कॉंट्रिब्युट करते.३ वर्षांपासून ही रक्कम शासनाकडे प्रलंबित आहे. आपण फी वाढीच्या बाबतीत बोलतो तेव्हा दुसरीकडे हेही पाहिले पाहिजे की, केंद्र शासनाचे किमान ४० टक्के आले आहेत ते तरी त्यांच्यापर्यंत जाऊ द्यावेत. आपले ६० टक्के राहिले तरी चालतील, उशिरा दिले तरी ते तर खरोखर दिले पाहिजेत. पण केंद्र सरकारचे ४० टक्के पैसे त्यांच्यापर्यंत पोहोचत नाहीत, ते आपण पोहोचविणार का ? जिल्ह्याच्या ठिकाणी असलेले एज्युकेशन ऑफिसर देखील त्यातील काही आपल्याला मिळेल का यासाठी तगादा लावतात. आलेले पैसे देखील त्यांच्यापर्यंत पोहोचू देत नाहीत. आपण यासाठी कडक निर्देश द्यावेत. शिक्षणाधिकारी व गट शिक्षणाधिकारी यांच्याबाबत बोलत आहे. आपण या शाळांमध्ये २५ टक्के गरीब मुलांना प्रवेश देतो तर बाकीच्या जिल्हा परिषदांतील आणि अनुदानित शाळांतील गरीब मुलांना आपण मध्यान्ह भोजन देतो, शिष्यवृत्तीची

ता.प्र.क्र.१२४४५....
डॉ. रणजित पाटील ....
मूभा देतो, क्रीडा अनुदान देतो. आपण सर्व लाभ या २५ टक्के गरीब विद्यार्थ्यांना बंधनकारक केले आहेत. इंग्रजी शाळांमध्ये शिकवा, काही आदिवासी जातील, काही बाकीची गरीब मुले जातील. २५ टक्के मुलांसाठी बाकीचे सर्व अनुदान या शाळांना देखील देणार का ? ते देण्यात यावे असा आमचा आग्रह आहे.

श्री. बच्चू कडू : सभापती महोदय, शेवटच्या प्रश्नाचा निश्चितच तसा विचार करता येईल. आपण ते निश्चितपणे पाहू. आपण म्हणत आहात की, ४० टक्के हिस्सा केंद्र सरकारचा आला तो दिला नाही. मात्र हे खरे नाही. आपण त्यामध्ये राज्य सरकारचा ६० टक्के हिस्सा टाकून मागच्या वर्षांपर्यंत हे सर्व अनुदान दिले आहे. आपल्याला त्या संदर्भातील लागली तर सर्व माहिती पटलावर ठेवता येईल.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, माननीय शालेय शिक्षण राज्य मंत्र्यांनी दिलेले उत्तर थोडेसे चुकीचे आहे असे म्हणत नाही, पण त्यामध्ये दुरुस्ती व्हावी अशी माझी विनंती आहे. इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये म्हणजे बिर्ला स्कूल अशा मोठ्या शाळांमध्ये देखील गरीब विद्यार्थ्यांना शिक्षण घेता यावे. मात्र त्यांची फी प्रचंड असते. आपल्याल देखील हे ज्ञात आहे. त्यामुळे आपलेच, आमचे आघाडी सरकार असताना माननीय श्री. राजेंद्र बाबू दर्डा या खात्याचे मंत्री होते, त्यांच्या कार्यकाळात मी, सन्माननीय सदस्य श्री. सतीश चव्हाण, आम्ही त्यांना विनंती केली होती, इतरही सन्माननीय सदस्यांनी विनंती केली होती, तेव्हा तो निर्णय झाला. दरवर्षी २५ टक्के राखीव जागा दिल्या जातात. परंतु त्याची फी रिईम्बर्समेंट शासनाने केली पाहिजे, ती ३-४ वर्षे होत नाही. आता आपण पाहिले आहे की, त्यांचे सर्व गणित कारोनोमुळे बिघडलेले आहे. २-४ कोटी रुपयांच्या इमारती उभ्या केल्या आहेत, इन्फ्रा उभे केले आहे. केरळ राज्यातून शिक्षण तेथे दिले जात आहे. आता सन २०२१-२२ सुरु आहे. सन २०२१-२२ अखेरपर्यंत राज्य सरकारकडून या शाळांना जे काही देणे आहे या विषयी मेष्टा संघटनेचे अध्यक्ष अनेक वेळा माननीय राज्यमंत्र्यांना भेटले, माननीय मंत्री प्रा. वर्षा गायकवाड यांना भेटतात, आम्हाला भेटतात. सन २०२१-२२ अखेरपर्यंत त्यांची देय रक्कम देण्यासंबंधीची कार्यवाही राज्य सरकार तातडीने पूर्ण करेल का ? आता सन्माननीय सदस्य डॉ. रणजित पाटील यांनी सूचना केली आहे, ती सूचना २५

ता.प्र.क्र.१२४४५....

श्री. विक्रम काळे ....

टक्के विद्यार्थ्यांसाठी नको. २ पोरांना जेवू घालणे आणि ४ मुलांना उपाशी ठेवणे योग्य होणार नाही. इंग्रजी शाळांमध्ये मुले शिकतात. मध्यान्ह भोजन दिले जाते. इंग्रजी शाळांतील देखील मुलांना ते देण्याबाबत राज्य शासन धोरणात्मक निर्णय घेईल का ?

नंतर श्री. खर्चे ....

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२४४५....

श्री.बच्चू कडू : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो शेवटचा प्रश्न विचारला त्याबाबत ते कसे देता येईल याचा निश्चित विचार करण्यात येईल. आतापर्यंत २५ टक्के अनुदान देय होते ते या वर्षात १५० कोटी रुपये देण्यात आले आहेत. अनुदान दिले नाही असे म्हणता येणार नाही.

**सभापती** : उर्वरित रक्कम कधी देण्यात येईल ते सांगावे.

श्री.बच्चू कडू : सभापती महोदय, उर्वरित रक्कम देण्याबाबत बजेटमध्ये जशी तरतूद होईल त्याप्रमाणे वितरीत करण्यात येईल.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, गरिबांच्या मुलांनी कॉन्व्हेंट व दर्जेदार शाळांमध्ये शिक्षण घ्यावे अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. त्या शाळांमधील शिक्षकांचे पगार व शाळांवर होणारा इन्फ्रास्ट्रक्चरल खर्च पाहिला तर काही शाळांमध्ये गरिबांच्या मुलांना शिकविणे अडचणीचे होते. तेथील फी त्यांना परवडत नाही. त्यांना अनुदान देण्याबाबत मंत्री महोदयांना निर्णय घ्यावा लागेल. आपण असे सांगत आहात की, आम्ही वेगवेगळया प्रकारच्या शिष्यवृत्त्या व अनुदान देतो. खाजगी शाळांमध्ये गरीब मुले शिक्षण घेत असतील व त्या शाळांचा किंवा त्या मुलांचा यामध्ये काहीही दोष नाही. महानगरपालिका, नगरपालिका व जिल्हा परिषदांच्या शाळांची गुणवत्ता वाढविली असती तर अशा खाजगी शाळांमध्ये ही मुले शिक्षणासाठी गेली नसती. त्यामुळे २५ टक्के गरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांना अनुदान किंवा शिष्यवृत्ती देणे आवश्यक आहे. या शाळांची नावे मोठी असतात यामध्ये कॉन्व्हेंट शाळा आहेत, तेथील शिक्षकांचा पगार अत्यल्प असतो. शाळेचे नाव मोठे, शाळा मोठी, प्रवेशासाठी मोठ्या प्रमाणात धडपड करण्यात येते. तेथे शिकविणाऱ्या शिक्षकाला किती पगार असतो याबाबत मंत्री महोदयांनी माहिती घ्यावी. त्यामुळे शिक्षकांची काळजी घेण्याची आवश्यकता आहे. ज्या शिक्षकांना अत्यल्प पगार आहे अशा शिक्षकांच्या आरोग्यासाठी त्यांचा समावेश महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजनेत करावा. जणेकरुन त्या शिक्षकांना आर्थिक हातभार लागेल व त्यांना मदत होईल.

ता.प्र.क्र.१२४४५....

श्री.बच्चू कडू : सभापती महोदय, २५ टक्के गरीब विद्यार्थ्यांना आपण खाजगी शाळेमध्ये पाठवितो. त्याप्रमाणे त्या शाळांना शासनाकडून अनुदान देण्यात येते. गरिबांच्या मुलांनी चांगल्या खाजगी शाळेत शिक्षण घेतले पाहिजे. हा प्रश्न राज्यातील सार्वत्रिक आहे. आपण विचार केला तर आमदार व खासदार यांची मुले जिल्हा परिषद व नगरपालिकांच्या शाळेत शिक्षण घेत नाहीत. जो शिक्षक त्या शाळेत शिकवितो त्याचेही मुले तेथे शिक्षण घेत नाहीत. या प्रचंड विषमतेची सुरुवात आपणच केली आहे. याबाबत आपण सर्वांनी पुढाकार घेतला पाहिजे. पहिले असे होते की, गावातील सरपंच व पुढाऱ्यांची मुले जिल्हा परिषद शाळेत शिकत होती. काही श्रीमंताची मुले त्याच शाळेत शिकत होती. त्यामुळे जिल्हा परिषद शाळांवर काही प्रमाणात सरपंच व गावातील पुढाऱ्यांचे नियंत्रण राहत होते. आता असे झाले आहे की, ज्याला कोणीच विचारीत नाही त्यांच्यासाठी जिल्हा परिषद व नगरपालिका शाळांची व्यवस्था गेल्या २५-३० वर्षापासून निर्माण झाली. त्यामुळे या सरकारी शाळांवरील संपूर्ण नियंत्रण सुटलेले आहे. आता काही खाजगी शाळा अतिशय चांगल्या आहेत. काही खाजगी शाळांनी शिक्षणाचा धंदा करुन ठेवला आहे. हे आपणा सर्वांना मान्य आहे. कशा पध्दतीने जनतेची पिळवणूक होते याची तपासणी केली तर त्यातून एक चांगला प्रयोग महाराष्ट्राला आपण देऊ शकू. शिक्षक आमदार सोडून एकाही आमदारांनी शाळेसाठी निधी दिला असे कोठेही दिसून येत नाही.(....अडथळा....) आपण निधी दिला नाही तर आपली मोठी पंचाईत होईल म्हणून तुम्हाला शाळेसाठी निधी द्यावाच लागतो.

सभापती महोदय, खाजगी शाळेत २५ टक्क्यांचा एक टप्पा राहील त्यांना वेगळी वागणूक दिली तर योग्य होणार नाही. ७५ टक्के मधील १० टक्के विद्यार्थी असे आहेत की, सूटबूट व मोठ्या मर्सीडिजमध्ये येणारे आहेत. त्यांना आपण मध्यांन्ह भोजनाची खिचडी देणे सुरु केली तर ते संयुक्तीक ठरेल किंवा कसे याबाबत तपासणी करावी लागेल. २५ टक्के गरीब विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येत आहे. खाजगी शाळेतील शिक्षकांना कमी मानधन असते. त्यासाठी किमान मानधन ठरविले पाहिजे.

ता.प्र.क्र.१२४४५....

श्री.बच्चू कडू......

त्याबाबत कायदा करुन निर्णय घेणे महत्वाचे आहे. एखादी संस्था शिक्षकाला चार हजार पगार देत असेल तर त्या संस्थेवर कारवाई होणे महत्वाचे आहे. ज्या शिक्षकांना चार ते पाच हजार रुपये असा अतिशय कमी पगार मिळत असेल अशा शिक्षकांना महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजनेचा लाभ देता येईल काय याबाबत तपासणी करण्यात येईल.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, मंत्री महोदय नेहमी चांगले प्रबोधन करतात. आमदारांनी कोणत्या शाळेत मुले घालावी याबाबत त्यांनी भाष्य केले. ते अतिशय चांगल्या प्रकारे या खात्याचे काम करीत आहेत. जे केले पाहिजे त्याबाबत आपण सांगत आहात याबाबत आमचे दुमत नाही. गरीब व वंचितांच्या प्रश्नांवर विचारणा केली तर आपण ते प्रश्न अतिशय जिव्हाळ्याने सोडवितात. त्या संदर्भातील निर्णय काय होतो याची मला माहिती नाही. आता आपण सभागृहात दोन निर्णय जाहीर करावेत. ज्या खाजगी शाळांमधील शिक्षकांना अतिशय कमी पगार आहे. सात ते आठ हजार रुपयांवर नोकरी करणारे शिक्षक आहेत. या सर्व खाजगी शाळांचा आढावा घेऊन या शाळांनी किमान किती वेतन द्यायला पाहिजे याबाबत शासनाने निर्णय करावा अशी माझी मागणी आहे त्याबाबता आपण घोषणा करावी की, त्याबाबत निर्णय करण्यात येईल. दुसरा प्रश्न असा आहे की, असा निर्णय होईपर्यंत ज्या शिक्षकांचा पगार कमी आहे त्यांना दुसरे कोणतेही उत्पन्न नाही अशा शिक्षकांचा समावेश महात्मा फुले जन आरोग्य योजनेत करणार काय ? हे दोन निर्णय घ्यावेत अशी माझी विनंती आहे.

श्री.बच्चू कडू : ज्या शिक्षकांना पगार कमी आहे त्यांना महात्मा फुले जन आरोग्य योजनेचा लाभ देण्यासाठी प्रस्ताव तयार करुन तो तातडीने आरोग्य विभागाकडे सादर करण्यात येईल. कोणती शाळा कमी पगार देते व त्यांना किती पगार दिला पाहिजे याबाबत पुढील अधिवेशनापर्यंत निर्णय घेण्यात येईल.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२४४५....

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, तांत्रिक अडचण अशी होऊ शकते की, कोणतीही शाळा पगार देतांना सही घेण्याची रक्कम वेगळी असते व प्रत्यक्षात मिळणारी रक्कम वेगळी असते. आपण सर्व सामान्य लोकांमध्ये वावरत असताना आपणा सर्वांना याबाबी माहिती आहेत. जवळपास ८ कोटी लोकांना महात्मा फुले जन आरोग्य योजनेचा लाभ देत आहोत. राज्यातील सर्व कॉन्व्हेंट येथील शाळेतील शिक्षकांची संख्या एक ते दीड लाखाच्या वर नसेल असा माझा अंदाज आहे. त्यामुळे यामध्ये ०.५ टक्के लोकांचा समावेश केला तर काही तोटा होणार नाही. त्यामुळे बिनशर्त या शिक्षकांना महात्मा फुले जन आरोग्य योजनेत समाविष्ट करुन घेणार आहात काय ?

श्री.बच्चू कडू : सभापती महोदय, मी या प्रश्नांचे उत्तर दिलेले आहे. मानधनाचा जो प्रश्न विचारण्यात आला त्याबाबत पुढील अधिवेशनापर्यंत निर्णय घेण्यात येईल.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, प्रश्न किमान वेतन कायद्याचा नसून समान वेतन कायद्याचा आहे. समान काम समान वेतन मिळाले पाहिजे. शुल्क नियंत्रणाच्या संदर्भात सरसकट कपात करण्याऐवजी समान वेतन गृहित धरुन शुल्क नियंत्रण झाले पाहिजे. अन्यथा संस्था चालणार नाही. त्यांना पगार कोठून देणार, शाळेची देखभाल दुरुस्ती शाळेला करता येत नाही. तेथे शिकणारी मुलेच आहेत. शुल्क नियंत्रण करताना शाळा लुटायला बसल्या आहेत असा विचार करु नका. ५ ते १० टक्के शाळा लुटायला प्रयत्न करीत असतील. इतर संस्था अतिशय चांगल्या सुरु आहेत. शुल्क नियंत्रणाच्या नावाखाली जी तलवार चालविण्यात येत आहे, त्यामुळे शिक्षकांच्या शोषणाला आपण परवानगी देत आहात. माझा प्रश्न असा आहे की, शुल्क नियंत्रण करीत असताना किमान वेतन नव्हे तर समान वेतनाचा मुद्दा लक्षात घेऊन शुल्क नियंत्रण केले पाहिजे. संस्थेला देखभाल दुरुस्ती करता आली पाहिजे. संस्थेला इतर खर्च आहेत त्यामध्ये लाईट बील आहे, हे सर्व खर्च गृहित धरुन शुल्क नियंत्रण झाले पाहिजे. म्हणून उच्च न्यायालयने सांगितले की, कारवाई करु नका. सरसकट कारवाई थांबविली नसल्यामुळे खालच्या पातळीवर त्रास सुरु झाला असून

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२४४५....

श्री.कपिल पाटील....

तो थांबविण्यात यावा. सर्व शिक्षकांना इतर ज्या सवलती द्यावयाच्या आहेत त्या सहजपणे देण्यात येतील काय ?

श्री.बच्चू कडू : सभापती महोदय, दोन्ही प्रश्न निधीशी संबंधित आहेत, असा निर्णय घेताना यासंदर्भातील प्रस्ताव मंत्रिमंडळा समोर सादर करुन पाठपुरावा करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेले प्रश्न अतिशय महत्वाचे आहेत. त्याबाबत तपासणी केल्याशिवाय होय उत्तर देणे योग्य वाटत नाही. या प्रश्नांची तपासणी करुन योग्य वेळी योग्य उत्तर देण्यात येईल.

श्री.अभिजीत वंजारी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रविंद्र फाटक यांनी जो प्रश्न विचारला त्याला थोडी बगल देण्यात आली आहे. हा प्रश्न दुसऱ्या ट्रॅकवर गेला आहे. मूळ प्रश्न महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम २०११ आपल्या राज्यात सुरु झाल्यापासून त्याची कार्यप्रणाली कशा पध्दतीने सुरु आहे त्याबाबत आहे. प्रश्न क्रमांक ५ मध्ये असे नमूद केले आहे की, शासनाने चौकशी करुन सदर निर्णयाची अंमलबजावणी करुन शुल्क वाढीवर नियंत्रण ठेवण्याकरिता कोणती कारवाई केली आहे.

या नंतर श्री.बोरले.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२४४५.......

श्री.अभिजीत वंजारी.......

तारांकित प्रश्नाच्या लेखी उत्तरात असे नमूद केले आहे की, "शुल्क वाढीवर नियंत्रण ठेवण्याकरिता महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येते. राज्यात मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर व औरंगाबाद या ५ विभागात विभागीय शुल्क नियामक समित्यांचे गठण करण्यात आले असून कोल्हापूर, अमरावती व लातूर या ३ विभागीय शुल्क नियामक समित्यांचा अतिरिक्त कार्यभार अनुक्रमे पुणे, नागपूर व औरंगाबाद या विभागीय शुल्क नियामक समित्यांकडे सोपविण्यात आला आहे." माझा प्रश्न असा आहे की, नागपूर येथील रेग्युलेटरी ॲथॉरिटीमध्ये ज्या व्यक्तीची नियुक्ती करण्यात आली ते अद्याप रुजू झालेले नाहीत. मागील अनेक महिन्यांपासून ते पद रिक्त आहे. अनेक शाळांच्या शुल्क वाढीचे प्रस्ताव प्रलंबित आहेत....

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.अभिजीत वंजारी यांनी विचारलेला प्रश्न मूळ प्रश्नाला धरुन नसला तरी राज्यमंत्री महोदयांनी त्यावर उचित कार्यवाही करावी.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अभिजीत वंजारी यांच्यावर अन्याय होईल. त्यांनी बरोबर प्रश्न विचारलेला आहे. त्यांचा प्रश्न कायदेशीर आहे आणि या तारांकित प्रश्नाशी निगडीत देखील आहे. त्यामुळे त्यांच्या प्रश्नाचे उत्तर मिळाले पाहिजे.

**सभापती** : ठीक आहे. राज्यमंत्री महोदयांनी त्यांच्या प्रश्नाचे उत्तर द्यावे.

श्री.बच्चू कडू : सभापती महोदय, आपण ५ समित्या गठित केलेल्या असून त्या समित्यांकडे तक्रारी देखील प्राप्त झालेल्या आहेत. मुंबई विभागीय समितीकडे २३ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यापैकी ८ तक्रारींवर निर्णय घेण्यात आला असून १५ तक्रारी प्रलंबित आहेत. सदर समितीचे काम कोर्टाप्रमाणे चालते, हे आपण लक्षात घेतले पाहिजे. प्राप्त झालेल्या तक्रारींची सुनावणी घेणे, संबंधिताना नोटीस पाठविणे आणि त्यांच्याकडून पुन्हा माहिती घेतल्यानंतर कार्यवाही करण्यात येते. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे की, कार्यभार थांबलेला आहे. परंतु तसे नाही. नागपूर विभागातील कार्यभार थांबलेला आहे असे आपले म्हणणे असेल तर आपण तुमच्यासह विभागीय समितीची बैठक घेऊन कार्यवाही करु.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२४४५.......

श्री.महादेव जानकर : सभापती महोदय, Association of the Management of Unaided Institutions of Rural India, शहर व तालुका स्तरावर काही संस्थांना शिष्यवृत्ती दिली जाते. परंतु ग्रामीण भागातील कॉलेज असेल तर शिष्यवृत्ती मिळत नाही. इतर मागासवर्गीय, सामाजिक व शैक्षणिक मागासवर्ग, भटक्या विमुक्त जाती या संदर्भातील शासन निर्णय आहे. ग्रामीण भागात कॉलेज असेल तर अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळत नाही, केवळ तालुका व जिल्ह्याच्या ठिकाणी शिष्यवृत्ती मिळते. शासन या संदर्भात धोरणात्मक निर्णय घेणार आहे काय ?

**सभापती** : मी आपल्याला सांगू इच्छितो की, सदर तारांकित प्रश्नावर चर्चा सुरु होऊन आता २० मिनिटे झालेली आहेत. आता आपण पुढील तारांकित प्रश्न चर्चेला घेऊ.

श्री.प्रवीण पोटे-पाटील : सभापती महोदय, संस्था चालकांचा विषय नेहमीच चर्चेत असतो. सर्वांना शिक्षण मिळाले पाहिजे यासाठी संस्था स्थापन करण्यात आलेल्या आहेत. संस्था कशासाठी विकसित झालेल्या आहेत ? संस्था चालक बदमाश आहेत, ते पगार देत नाही, लोकांची पिळवणूक करतात असे नेहमी ऐकावयास मिळते. संस्था चालक शासनाचे काम करतात. शाळा, कॉलेज विकसित करणे ही शासनाची औकात नाही. मी औकात शब्द वापरलेला आहे. आज संस्था मोठ्या प्रमाणावर विकसित होऊन मुलांना शिक्षण देत आहेत. माझे असे म्हणणे आहे की, संस्था चालक बदमाश आहेत असे आपल्याला वाटत असेल तर शासनाने आजच सर्व संस्था ताब्यात घेऊन सार्वजनिक बांधकाम विभागाप्रमाणे संस्थांना भाडे द्यावे, संस्थेत जेवढे शिक्षक कार्यरत आहेत त्यांना पगार द्यावा.

**सभापती** : आता आपण पुढील तारांकित प्रश्न चर्चेला घेऊ.

-------

## राज्यातील अंशतः अनुदानित शाळा व तुकड्यांवरील अतिरिक्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवा संरक्षित करणेबाबत

**(२) * १२४७७ श्री.किरण सरनाईक, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अंशतः अनुदानित शाळा व तुकड्यांवरील अतिरिक्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अन्य शाळेत समायोजित करुन सेवा संरक्षण देण्याबाबत कोणतीच कार्यवाही न झाल्याचे माहे जानेवारी, २०२२ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सेवासंरक्षण देण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्याप्रकरणी नागपूर विभागाच्या शिक्षक जनप्रतिनिधींनी शासनास दिनांक ०५/०५/२०२१, दिनांक २९/०९/२०२१ व दिनांक २१/१०/२०२१ रोजी निवेदन पाठवून मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार अंशतः अनुदानित शाळा व तुकड्यांवरील अतिरिक्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सेवा संरक्षण देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, सदरहू प्रकरणी केव्हापर्यंत शासन निर्णय निर्गमित करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बच्चू कडू, प्रा.वर्षा गायकवाड यांच्याकरिता :** (१) नाही.

(२) व (३) या संदर्भात मागणी करण्यात आलेली असून प्रस्तावाच्या अनुषंगाने शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.किरण सरनाईक : सभापती महोदय, राज्यातील अंशतः अनुदानित शाळा व तुकड्यांवरील अतिरिक्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सेवा संरक्षण, सेवा सातत्य देण्याबाबत अद्याप कोणतीही कार्यवाही न झाल्याच◌ी बाब माहे जानेवारी, २०२२ मधील पहिल्या सप्ताहात निदर्शनास आल◌ी हे खरे आहे काय, असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२४७७.......

श्री.किरण सरनाईक........

तद्नुसार अंशतः अनुदानित शाळा व तुकड्यांवरील अतिरिक्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सेवा संरक्षण, सेवा सातत्य, वेतन निश्चिती देण्यात येणार आहे काय ? मागील १५ वर्षानंतर त्यांना वेतन अनुदान मिळाले आहे, तेही अंशत: अनुदानित आहेत. बरेच शिक्षक सेवानिवृत्त होत असून त्यांच्या कुटुंबाची परवड होत आहे. विद्यादानाच्या पवित्र क्षेत्रात काम करणाऱ्या मंडळींना सेवा सातत्य, सेवा संरक्षण, वेतन निश्चिती देण्यात येणार आहे काय ?

श्री.बच्चू कडू : सभापती महोदय, पहिल्या दोन-तीन प्रश्नांचे उत्तर "हे खरे नाही" असे आहे. मी सांगू इच्छितो की, आयुक्त शिक्षण विभाग यांच्याकडून सेवा संरक्षण देण्याबाबत प्रस्ताव प्राप्त झालेला आहे. आपण त्या प्रस्तावावर १५ दिवसात कार्यवाही करणार आहोत.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सर्व प्रकारच्या स्टँडर्ड ऑपरेटिंग प्रोसिजर फॉलो करुन शासकीय कर्मचाऱ्याची नेमणूक होते. केवळ शिक्षण विभाग नाही तर इतर सर्व विभागात ज्यावेळी शासकीय कर्मचाऱ्याची नेमणूक होते त्यावेळी त्याला सेवा संरक्षण मिळणार आहे असे गृहीत धरले जाते. मग शिक्षकांसाठी हा नियम कसा काय लागू आहे की, पटसंख्या कमी झाली आणि शिक्षक अतिरिक्त ठरला तर त्याला सेवा संरक्षण मिळत नाही. हे कसे काय शक्य आहे ? आपण १५ दिवसात जो निर्णय घेणार आहात तो सकारात्मक असेल असे आपण सभागृहाला सांगावे.

**सभापती** : राज्यमंत्री महोदयांनी या संदर्भात सविस्तर उत्तर दिलेले आहे.

------

असुधारित प्रत

**राज्यातील विनाअनुदानित व अंशत: अनुदानित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी निवृत्तीवेतन योजना लागू करण्याबाबत**

**(३) * १२१२२ श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ.परिणय फुके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड, डॉ.रणजित पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील, श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सन २००५ पूर्वी नियुक्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत शासनाने विनाविलंब, विनाअट कार्यवाही करावी, या शिक्षक व शिक्षकेतर तसेच शिक्षक संघटनेकडून होत असलेल्या मागणीची अंमलबजावणी केली आहे काय,

(२) तसेच, राज्यातील दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पुर्वी सेवेत आलेल्या विनाअनुदान व अंशत: अनुदान परंतु, दिनांक १ नोव्हेंबर, २००५ नंतर १००% अनुदानावर आलेल्या शाळेतील शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत मा.शालेय शिक्षण मंत्री महोदयांच्या वेळोवेळी झालेल्या बैठकींमधील निर्देशानुसार सम्यक समितीने शासनास अहवाल सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी किती शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आहेत, याची माहिती एकत्रित करुन त्यासाठी आवश्यक असलेल्या निधीची छाननी करुन त्यानुसार निधीची तरतूद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सदरहू अहवालाच्या शिफारसी काय आहेत, तसेच दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पुर्वी शासन सेवेत आलेल्या शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत विचार पूर्ण झाला आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बच्चू कडू, प्रा.वर्षा गायकवाड यांच्याकरिता :** (१) व (२) राज्यातील सर्व अनुदानित, विनाअनुदानित, अंशत: अनुदानित पदांवर व तुकड्यांवर दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी नियुक्त झालेल्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२१२२.......
श्री.बच्चू कडू.......

पेन्शन योजना लागू करण्याबाबत, मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी शिक्षण विभाग, वित्त विभाग व विधी व न्याय विभागाचे सचिव यांची एक संयुक्त समिती गठीत करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार दिनांक २४ जुलै, २०१९ रोजी अपर मुख्य सचिव (शालेय शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली "संयुक्त समिती" गठीत करण्यात आली. या समितीने अहवाल शासनास सादर केला असून सदर समितीच्या अहवालातील शिफारस क्र.२ च्या अनुषंगाने आयुक्त (शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली "सम्यक विचार समिती" गठीत करण्यात आली आहे. सम्यक विचार समितीने अहवाल सादर केला आहे. तसेच शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, दिनांक २९ नोव्हेंबर, २०१० रोजीच्या शासन निर्णयाविरुध्द मा.उच्च न्यायालयात दाखल याचिकेस अनुसरुन मा.उच्च न्यायालयाच्या पूर्णपीठाने दिनांक ३०/०४/२०१९ रोजी मार्गदर्शक निर्णय दिला आहे. त्याविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये श्री.प्रदिप महल्ले व इतर यांनी विविध विशेष अनुमती याचिका दाखल केल्या आहेत. प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(३) व (४) सम्यक समितीने निरीक्षणे नोंदविलेली आहेत. सदर निरीक्षणे विचाराधीन आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.नागोराव गाणार : सभापती महोदय, सदर तारांकित प्रश्नाच्या लेखी उत्तरात दिलेली माहिती दिशाभूल करणारी आहे. दिनांक २ जुलै, २०१९ रोजी विधानसभेत या विषयावर लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून चर्चा झाली होती. त्यावेळी सुद्धा हेच उत्तर देण्यात आले होते. त्यावेळी मंत्री महोदयांनी जे उत्तर दिले होते त्यावर सध्याचे माननीय उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री श्री.अजित पवार आणि मानननीय श्री.विजय वडेट्टीवार यांनी जे विधान केले होते ते मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो. त्यांच्या विधानाची दखल त्यांच्या नेतृत्वातील शासनाने आज पर्यंत घेतली नाही

ता.प्र.क्र.१२१२२.......
श्री.नागोराव गाणार.......

याबद्दल मी प्रथम खेद व्यक्त करतो. त्यावेळी माननीय श्री.अजित पवार साहेब असे म्हणाले होते की, सरकारची निव्वळ पवाळ काढण्याची भूमिका आहे. उच्च न्यायालयाचे काही निर्णय दिल्यानंतर त्या संदर्भात मार्ग काढण्यासाठी या सभागृहाने कायदे बदलले, विधेयके आणली, नवीन अध्यादेश काढले आणि आता न्यायालयाच्या निर्णयाचा आधार घेऊन दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी अंशत: अनुदानित आणि विनाअनुदानित नियुक्त झालेल्या शिक्षक कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना नाकारली, नवीन पेन्शन योजना लागू केली. कारण, सरकारने शंभर टक्के अनुदान दिले नाही. त्या शिक्षक कर्मचाऱ्यांचा दोष काय आहे, असा प्रश्न माननीय अजित पवार साहेबांनी तत्कालीन सरकारला विचारला होता. मी आज तोच विचारत आहे.

यानंतर श्री.सांगळे....

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२१२२....

श्री.नागोराव गाणार....

माझा पहिला प्रश्न असा आहे की, अंशत: अनुदानित आणि विनानुदानित शाळांमध्ये दिनांक १ नोव्हेंबर, २०१५ पूर्वी नियुक्त झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शासनाने १०० टक्के अनुदान न दिल्यामुळे त्यांना जुन्या पेन्शन योजनेपासून वंचित रहावे लागले. त्यांना तातडीने जुनी पेन्शन योजना लागू करण्याचा निर्णय शासनाकडून आज जाहीर केला जाणार आहे का ? राजस्थान सरकारने दिनांक २४ फेब्रुवारी, २०२२ रोजी त्यांच्या राज्यातील सर्व शासकीय कर्मचारी व शिक्षक कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याचा निर्णय जाहीर घेतला. आपल्या राज्याचा अर्थसंकल्प दिनांक ११ मार्च, २०२२ रोजी सभागृहामध्ये सादर केला जाणार आहे. माझा दुसरा प्रश्न असा आहे की, शासनाने अर्थसंकल्प सादर करीत असताना त्यात याच प्रकारचा निर्णय घेऊन महाराष्ट्रातील शासकीय, निमशासकीय कर्मचारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याचा निर्णय घोषित केला जाणार आहे का ?

श्री.बच्चू कडू : सभापती महोदय, या संदर्भात सम्यक विचार समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीचा अहवाल शासनाकडे प्राप्त झालेला आहे. हा विषय फार मोठा आहे. दोन वर्षांचा कालावधी पाहिल्यास सरकारच्या बजेटबाबत आपल्या सर्वांना माहीत आहे. या गोष्टीचा शासनावर किती आर्थिक भार पडणार आहे ? सदर अहवाल शासनाच्या विचाराधीन आहे. या सर्व गोष्टींचा विचार करुन शासनाकडे प्राप्त झालेल्या अहवालानुसार पुढील कार्यवाही केली जाईल.

डॉ.सुधीर तांबे : सभापती महोदय, जुनी व नवी पेन्शन योजना किंवा अशंत: अनुदानित पेन्शन योजना असो, नवीन पेन्शन योजनेबाबत कर्मचाऱ्यांना कोणताही विश्वास वाटत नाही. याचे कारण असे आहे की, त्यामधील रक्कम शेअर बाजारामध्ये गुंतविण्यात येत आहे वगैरे. महत्त्वाची बाब अशी आहे की, सदर पेन्शन योजनेमये कुटुंब निवृत्तीवेतन योजनेची सुविधा नाही. या संदर्भात सम्यक समितीचा अहवाल शासनाकडे प्राप्त झालेला आहे. माझा मंत्री महोदयांना प्रश्न आहे की, मध्य मार्ग म्हणून

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२१२२....

डॉ.सुधीर तांबे....

केंद्र शासनाने दिलेल्या कुटुंब निवृत्ती वेतन आणि ग्रॅज्युएटी अशा २ गोष्टी राज्य शासनाकडून सदरहू कर्मचाऱ्यांना दिल्या जाणार आहे का ?

श्री.बच्चू कडू : सभापती महोदय, ही बाब तपासून निर्णय घेऊ.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, शासनाकडे सम्यक समितीचा अहवाल प्राप्त झालेला आहे. हा अहवाल गोपनीय स्वरुपाचा नाही की, तो सदनाला किंवा राज्याला समजता कामा नये. आम्हाला सुद्धा समजले पाहिजे की, सम्यक समितीच्या अहवालामध्ये काय आहे. सभापती महोदय, माझी अशी धारणा आहे की, सम्यक समितीचा अहवाल सकारात्मक आहे. एखादा कर्मचारी २००५ पूर्वी नियुक्त झाला आहे व आपल्याकडे अनुदान नसल्यामुळे आपण त्याला पेन्शनपासून वंचित ठेवले असे होऊ शकत नाही. ३-४ महिन्यांपासून हजारो शिक्षक उपाशी राहून आझाद मैदानावर आंदोलन करीत आहेत. २-३ आठवडयांपूर्वी सम्यक समितीचा अहवाल शासनाकडे प्राप्त झालेला आहे. राज्यातील सर्व शिक्षक अपेक्षेने वाट बघत आहेत की, सदर प्रकरणी या अधिवेशनामध्ये निर्णय झाला पाहिजे. सभापती महोदय, मी आपल्या मार्फत मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, मंत्री महोदयांना या बाबतीत सर्व माहीत असल्यामुळे त्यांनी याबाबत तातडीने निर्णय जाहीर करावा. शासनाने एसटी महामंडळाला याच कारणासाठी ५०० कोटी रुपये दिलेले आहेत. त्यामुळे शासनाने शिक्षकांसाठी अशा प्रकारे कार्यवाही करावी. याचे कारण असे आहे की, २-३ वर्षांमध्ये राज्यातील हजारो शिक्षक सेवानिवृत्त होणार आहेत. ही बाब विचारात घेता मंत्री महोदयांनी सदनामध्ये सकारात्मक निर्णय जाहीर करावा अशी मी त्यांना विनंती करतो.

श्री.बच्चू कडू : सभापती महोदय, मी थोडया वेळापूर्वी सदनाला सांगितले होते की, सदर अहवाल विचाराधीन आहे. आमचा विभाग या बाबतीत सकारात्मक आहे. आम्ही आपल्या भावनांशी निश्चितपणे सहमत आहोत.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२१२२...

**सभापती** : मंत्री महोदय, आपण अशा प्रकारे उत्तर देऊ नये. मी आपल्याला मार्गदर्शन करतो. आपल्या विभागाकडे सदर अहवाल सादर झाला असल्यास आज, उद्या किंवा पुढील आठवडयात हा अहवाल कॅबिनेटसमोर ठेवावा. त्यानंतर कॅबिनेटची परवानगी घेऊन त्याबाबत "होय" किंवा "नाही" असे सांगून तो अहवाल सादर करावा.

श्री.बच्चू कडू : सभापती महोदय, आपण दिलेल्या निदेशानुसार सदर कार्यवाही केली जाईल.

**सभापती** : ठीक आहे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, जुनी पेन्शन मिळावी हाच एक विषय आहे. आम्ही या बाबतीत आपल्याकडे वेळोवेळी आलो आहोत. आपण आम्हाला यासंबंधी खूप मदत केली आहे. मी त्याबद्दल आपले आभार व्यक्त करतो. यापूर्वी मी उपस्थित केलेल्या प्रश्नासंबंधी आपण आपल्या दालनात बैठक आयोजित केली होती. त्या अनुषंगाने शासनाने सम्यक समिती गठीत केली होती. आम्ही एक वर्षापासून यासंबंधी पुण्याला जाऊन पाठपुरावा करीत आहोत. सदर अहवाल लवकर प्राप्त व्हावा यासाठी आम्ही प्रयत्न केले आहेत.

**सभापती** : सन्माननीय सदस्य, हा प्रश्न आहे का ?

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, हा प्रश्न अतिशय महत्त्वाचा व गंभीर आहे. त्यामुळे मी आपले या प्रश्नाकडे लक्ष वेधतो. माझे अनेक सहकारी व सेवानिवृत्त झालेले शिक्षक साडेतीन महिन्यांपासून आझाद मैदानावर ऊनामध्ये व थंडीमध्ये बसलेले आहेत. मला त्यांच्याकडे बघवत नाही, डोळयात अश्रू उभे राहतात. अशा प्रकारे शिक्षक सेवानिवृत्त झाल्यावर त्याची काय अवस्था होत आहे हे दिसत आहे. आज त्यांना खोर-टोपलं घेऊन कामावर जावे लागत आहे. त्यामुळे आमची आपल्याला विनंती आहे की, आपण हा तारांकित प्रश्न राखून ठेवावा. तसेच आपल्या

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२१२२....

श्री.विक्रम काळे....

दालनामध्ये बैठक घेऊन आपल्याला हा प्रश्न सोडविण्यासाठी माननीय वित्त मंत्री व माननीय शिक्षण मंत्री यांची आवश्यकता लागणार आहे.

**सभापती** : मी मंत्री महोदयांना याबाबतचा अहवाल कॅबिनेटसमोर ठेवण्यासाठी सांगितलेले आहे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, या संदर्भात निर्णय होणे गरजेचे आहे. माझा असा प्रश्न आहे की, अधिवेशन संपण्यापूर्वी दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी सेवेत रुजू झालेल्या सर्व शिक्षक कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यासंबंधीचा धोरणात्मक निर्णय शासन घेणार आहे का ? माझा दुसरा असा प्रश्न आहे की, काही जिल्हयांमध्ये अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे व त्यांनी दिलेल्या तोंडी आदेशानुसार शिक्षकांच्या वेतनातून भविष्य निर्वाह निधीची होणारी कपात बंद करण्यात आली आहे. सर्वांना समान न्याय मिळण्याच्या दृष्टीने अशाप्रकारे ज्या जिल्हयांमध्ये शिक्षकांच्या वेतनातून भविष्यनिर्वाह निधीची होणारी कपात बंद केली आहे ती तातडीने सुरु करण्याबाबत मंत्री महोदय आज निर्णय जाहीर करणार आहेत का ?

श्री.बच्चू कडू : सभापती महोदय, ज्या अधिकाऱ्यांनी शिक्षकांच्या वेतनातून होणारी भविष्य निर्वाह निधीची कपात बंद केली आहे त्याबाबत माहिती घेऊन संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई केली जाईल.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, हा विषय अतिशय गंभीर असल्यामुळे आपण यासंबंधी दखल घेऊन निदेश दिलेले आहेत. सभापती महोदय, आपण निदेश दिल्यानंतर शासनाने सम्यक समिती गठीत केली होती. हा सर्व इतिहास आपल्या सर्वांना माहीत आहे. हजारो शिक्षक आझाद मैदानावर उपाषणाला बसून आंदोलन करीत आहेत. या संदर्भात शासनाने २ दिवसांमध्ये कार्यवाही करावे असे मंत्री महोदयांना सांगितलेले आहे.

ता.प्र.क्र.१२१२२....

**सभापती** : मी मंत्री महोदयांना असे सांगितलेले नाही. मंत्री महोदयांनी या संदर्भात योग्य वेळी कार्यवाही करावी असे मी सांगितलेले आहे.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, तो अहवाल तत्काळ यावा व त्यानंतर या बाबतीत शासनाने लवकर निर्णय घ्यावा याबाबत सदनामध्ये आपण निर्णय घ्यावा.

**सभापती** : मी मंत्री महोदयांना याबाबत स्पष्टपणे सांगितलेले आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, केंद्र शासनाने पेन्शन योजना बंद करण्याचा निर्णय घेतला होता का ? देशामध्ये किती राज्यांमध्ये पेन्शन योजना सुरु आहे ? हे सदनाला समजले पाहिजे. आपल्या राज्यात पेन्शन योजना सुरु करायची असल्यास केंद्र शासनाने जो निर्णय घेतला होता ती बाब खरी आहे का ?

श्री.बच्चू कडू : सभापती महोदय, ही माहिती सदनाच्या पटलावर ठेवू.

--------

असुधारित प्रत

**राज्यातील सहायक शिक्षक (परिविक्षाधीन) यांच्या नियमित वेतनश्रेणीबाबत**

(४) * १२५८९ श्री.कपिल पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रवीण दटके, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड, श्री.किरण सरनाईक, श्री.बाळाराम पाटील, श्री.किशोर दराडे : सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सहाय्यक शिक्षक पदावर कंत्राटी पध्दतीने शिक्षण सेवक नियुक्त करण्याचा शासन निर्णय माहे ऑक्टोबर, २००० मध्ये निर्गमित करण्यात आला असून प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण सेवकाला प्रथमत: अनुक्रमे रुपये ३०००/-, रुपये ४०००/-, रुपये ५०००/- इतके मानधन देय होते, त्यानंतर त्यात वाढ करून अनुक्रमे रुपये ६०००/-, रुपये ८०००, रुपये ९०००/- मानधन देय ठरविण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे जुलै, २०२१ मध्ये नियमावली १९८१ च्या तरतुदीत सुधारणा करुन शिक्षण सेवक ऐवजी सहाय्यक शिक्षक (३ वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी) असे पदनाम देण्यात आल्याने सदरहू शिक्षकांना मानधनाऐवजी नियमित वेतनश्रेणी देणे कायदेशीररित्या बंधनकारक आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील शिक्षण सेवकांच्या मानधनात वाढ करण्याबाबत अद्याप कोणतीच कार्यवाही झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२२ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले असून सहाय्यक शिक्षक परिविक्षाधीन (शिक्षण सेवक) कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी लागू करून सहाय्यक शिक्षक परिविक्षाधीन कालावधी कमी करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय, तसेच सहाय्यक शिक्षक परिविक्षाधीन (शिक्षण सेवक) कर्मचाऱ्यांच्या परिविक्षाधीन कालावधीमधील ३ वेतन वाढीची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२५८९....

श्री.कपिल पाटील.....

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार राज्यातील शिक्षण सेवकांच्या मानधनात वाढ करून सहाय्यक शिक्षकांना परिविक्षाधीन कालावधीसाठी मानधनाऐवजी नियमित वेतनश्रेणी देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बच्चू कडू, प्रा.वर्षा गायकवाड यांच्याकरिता** : (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) कोविड-१९ या संसर्गजन्य रोगामुळे राज्यात लागू केलेला लॉकडाऊन व त्यामुळे राज्याच्या महसूलात झालेली घट विचारात घेता, राज्याची आर्थिक परिस्थिती पूर्वपदावर येईपर्यंत, राज्यातील शिक्षण सेवकांच्या मानधन वाढीबाबतच्या प्रस्तावाचा विचार करता येणार नाही.

शिक्षण सेवक/ सहायक शिक्षक (परिविक्षाधीन) यांच्या परिविक्षाधीन कालावधीबाबत शासन निर्णय दिनांक ०७/०२/२०१९ अन्वये केलेल्या तरतुदींमध्ये सुधारणेची बाब तूर्तास शासनाच्या विचाराधीन नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी थोडया वेळापूर्वी असे सांगितले होते की, किमान वेतन कायद्याची अंमलबजावणी झाली पाहिजे. यापूर्वी राज्यातील कंत्राटी असलेल्या सहायक शिक्षक (परिविक्षाधीन) यांना शिक्षण सेवक असे म्हटले जात होते. त्यांना शासनाकडून दिले जात असलेले मानधन किमान वेतन कायद्यामध्ये बसत आहे का ? सदर मानधन किमान वेतन कायद्यामध्ये बसत नसल्यास त्यात किमान वेतन कायद्यानुसार वाढ केली जाणार आहे का ? सध्या

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२५८९....

श्री.कपिल पाटील.....

त्यांची नेमणूक "टीचर ऑन प्रोबेशन" म्हणून करण्यात आलेली आहे. त्यामुळे त्यांना स्केल लागू करणार आहात का ?

श्री.बच्चू कडू : सभापती महोदय, तिन्ही प्रश्नांमागील मूळ उद्देश असा आहे की, त्यांना सध्या मिळत असलेले मानधन अतिशय कमी आहे. मी या गोष्टीला सहमत आहे. त्यांना साधारणत: ६ हजार रुपये, ८ हजार रुपये, ९ हजार रुपये मानधन मिळत आहे. एखादा शिक्षक इतर जिल्हयामध्ये नोकरी करण्यासाठी गेल्यास त्या रकमेतून त्याचे भाडे देखील त्यातून निघू शकत नाही. या बाबतीत सर्व विचार करुन सन २०२१ मध्ये प्राथमिक शिक्षकांकरिता १० हजार रुपये, माध्यमिक शिक्षकांकरिता ११ हजार रुपये आणि उच्च माध्यमिक शिक्षकांकरिता १२ हजार रुपये मानधन वाढविण्यासंबंधीचा सुधारित प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठविण्यात आला होता.

असुधारित प्रत

यानंतर श्री.गागरे......

ता.प्र.क्र. १२५८९...

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, किमान वेतन कायद्याचा आग्रह मी पहिल्या प्रश्नापासून धरला होता. माझा प्रश्न असा होता की, कंत्राटी शिक्षकांना, कथाकथीत शिक्षण सेवकांना खरे तर टिचर ऑन प्रोबेशन असे म्हटले पाहिजे. यांचे मानधन किमान वेतन कायद्यात बसते का, हा पहिला प्रश्न आहे. ते बसत नसेल तर शासनाने भूमिका स्पट करावी.

**सभापती** : किमान वेतन कायद्यात शिक्षकांचे किंवा कंत्राटी शिक्षकांचे पगार येतील का, असा तुमचा प्रश्न आहे, पण जरी किमान वेतन कायद्यात हे पगार येत नसतील तर तेवढी रक्कम देण्याबाबत शासनाला विचार करायला सांगा.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, किमान वेतन कायद्यानुसार प्राथमिक शिक्षकांना २१ हजार रुपये द्यावे लागतील, ते तुम्ही देणार आहात का. कायद्यातील तरतूदीप्रमाणे ही रक्कम वेतनश्रेणीप्रमाणे मिळाली पाहिजे. १०-१२ हजार म्हणजे अर्ध्या पेक्षा कमी रक्कम तुम्ही देणार आहात.

श्री.बच्चू कडू : सभापती महोदय, अशा शिक्षकांना शासन वेतन देत नसून आपण मानधन देत आहे. तुम्ही म्हटल्याप्रमाणे त्यांना किमान वेतन देत आहोत की नाही हे तपासून पाहिले जाईल. त्याची माहिती तुम्हाला देऊ. आपण चांगला निर्णय घेत आहोत. मानधनावर त्यांची नियुक्ती असल्याचे तपासणे फार गरजेचे आहे. आजच्या आज याचे उत्तर मिळेल अशी अपेक्षा आपण करु नये. तरीसुध्दा मी सांगतो की, शिक्षण सेवकाला ६ हजार, ८ हजार असे देण्यात येत असलेले मानधन त्याला परवडणारे नाही. मानधन वाढविण्यासाठी आपण निश्चित प्रयत्न करु, आपणही सोबत राहावे. येत्या १-२ महिन्यात कशी वाढ करता हे याचा आम्ही प्रयत्न करु.

श्री.नागोराव गाणार : सभापती महोदय, हा विषय चुकीच्या पध्दतीने चर्चेला आणण्यात आला आहे. शासनाने आर्थिक अडचणीमुळे ऑक्टोबर २००० मध्ये शिक्षण सेवक ही कंत्राटी पध्दत आणली. त्यानंतर सेवाशर्ती नियमावली १९८१ मध्ये सुधारणा झाली. आता कंत्राटी शिक्षण सेवक नसून नियमित सहायक शिक्षक परिविक्षाधीन कालावधीकरीता नियुक्त केला जातो, म्हणून माझा प्रश्न आहे की,

ता.प्र.क्र. १२१२२.....

श्री.नागोराव गाणार.....

नियमावलीतील तरतुदीनुसार जो तीन वर्षाच्या परीविक्षाधीन कालावधीकरीता नियुक्त होतो, त्यांना वेतनश्रेणी लागू केली जाईल का ?

श्री.बच्चू कडू : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितले आहे की, वेतन नसून ते मानधनावर आहे, म्हणून आपण त्यांचे मानधन वाढविण्याचा प्रयत्न करीत आहोत.

-----------

असुधारित प्रत

## राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजना लागू करणेबाबत

**(५) * १२७२९ श्री.सुरेश धस, श्री.कपिल पाटील, श्री.किरण सरनाईक, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांना १०, २०, ३० वर्षाची आश्वासित प्रगती योजना लागू करण्यात आली, परंतु शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी १०, २०, ३० वर्षाची आश्वासित प्रगती योजना लागू करणे बाबत अद्याप कोणतीच कार्यवाही झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२२ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, राज्यातील प्राथमिक शिक्षक वगळता माध्यमिक शिक्षकांसह इतर सर्व कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजना (१०, २०, ३०) लागू करण्यात आली असून सदरहू योजना जिल्हा परिषद शाळेतील प्राथमिक शिक्षकांना लागू करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आश्वासित प्रगती योजना सातव्या वेतन आयोगातील तरतुदीप्रमाणे जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांना तसेच राज्यातील इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लागू करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बच्चू कडू, प्रा.वर्षा गायकवाड यांच्याकरिता :** (१) व (२) हे खरे नाही. अद्यापपर्यंत खाजगी शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना १०, २०, ३० वर्षाची आश्वासित प्रगती योजना लागू करण्यात आलेली नसून, त्याबाबतची कार्यवाही चालू आहे.

(३) खाजगी व्यवस्थापनेच्या शाळेतील शिक्षक कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजना लागू करणे व इतर बाबींच्या अनुषंगाने गठित अभ्यास गटाचा प्राप्त अहवाल तपासण्यात आला असून अहवालातील काही मुद्द्यांवर आयुक्त (शिक्षण) यांच्याकडून माहिती मागविण्यात आली आहे. तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांबाबतचा प्रस्ताव वित्त विभागास सादर केला असता, त्यांनी काही त्रुटी काढल्या आहेत. त्रुटींची पूर्तता करुन वित्त विभागास सादर करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
ता.प्र.क्र.१२७२९.....

श्री.सुरेश धस : सभापती महोदय, माझ्या तारांकित प्रश्न क्रमांक १२७२९ होता त्याबाबत एकच म्हणणे आहे की, प्रश्न क्लब करीत असताना माझा प्रश्न जिल्हा परिषदेच्या शिक्षकांच्या बाबतीत विचारला होता. सन्माननीय सदस्य कपिल पाटील यांनी वेगळा प्रश्न विचारला असेल. जिल्हा परिषद वगळून टाकले तर माझे काही म्हणणे नाही. खाजगी शिक्षण संस्थेच्या शिक्षकांबरोबर जिल्हा परिषदेच्या शिक्षकांनासुध्दा शासनाने सोळंके साहेबांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली आहे, तिचा अहवाल आलेला आहे. जिल्हा परिषदेच्या शिक्षकांनासुध्दा १०-२०-३० आश्वासीत प्रगती योजना लागू करण्याचा सरकारचा विचार आहे का, ते केव्हा लागू करणार.

श्री.बच्चू कडू : सभापती महोदय, तीन लाभांची योजना आहे. सुधारीत योजनेंतर्गत आश्वासीत प्रगती योजना १०-२०-३० अशा प्रकारची आहे. हा प्रस्ताव आपण वित्त विभागाला सादर केलेला आहे. वित्त विभागाचे मत आल्यावर पुढे जाणे महत्वाचे आहे. आपणास माहिती आहे की, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नासंबंधी हा प्रस्ताव आहे. यावर वित्त विभागाचे मत घेतल्याशिवाय पुढे जाता येत नाही असे मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो. या सर्व विभागांचा राजा म्हणजे वित्त विभाग आहे. राजा जशी मंजूरी देईल तसे आपण पुढे जाऊ.

श्री.जयंत आसगावकर (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, शासकीय कर्मचाऱ्यांना १०-२०-३० आश्वासीत प्रगती योजना लागू झाली. परंतु शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांना ही योजना लागू केली गेली नाही. मंत्री महोदयांनी सांगितले की, वित्त विभागाची परवानगी मिळाल्यानंतर लागू होईल. त्यासाठी लागणारे प्रशिक्षण सध्या ऑनलाईन सुरु आहे, दोन हजार शुल्क घेऊन हे प्रशिक्षण सुरु करणारहोते पण ते प्रशिक्षण अद्यापही चालू झालेले नाही. केवळ माध्यमिक विभाग नव्हेतर वरिष्ठ महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांना सुध्दा प्रशिक्षण दिले गेलेले नाही. ही बाब या अधिवेशनात मंजूर होईल का ?

श्री.बच्चू कडू : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नावर तातडीने कार्यवाही केली जाईल.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२७२९.....

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, राज्यमंत्री महोदयांनी अतिशय उत्त्र दिलेले आहे, त्याबद्दल मी स्वागत करतो व अभिनंदन करतो. फक्त तुम्ही माननीय वित्त मंत्री महोदयांकडून १०-२०-३० योजन मंजूर करुन घ्यावी अशी विनंती. तोपर्यत १२-२४ ची निवडश्रेणी व वरिष्ठ श्रेणी आहे. प्रशिक्षण घेतल्याशिवाय त्या मिळत नाहीत. याचे हजारो प्रस्ताव सध्या राज्य शासनाकडे पडून आहेत. कोविड काळामुळे प्रशिक्षण झालेले नाही. बक्षी कमिटीने कोणत्याही प्रशिक्षणाशिवाय आश्वासीत प्रगती योजना मिळते हे स्पष्टपणे शिक्षण विभागाला सुनावणीच्या वेळी ऐकवले होते हे खरे आहे का, असे असेल तर कोणत्याही प्रशिक्षणाशिवाय तातडीने प्रलंबित प्रस्ताव मंजूर कराल का, हा तिसरा प्रश्न आहे.

श्री.बच्चू कडू : सभापती महोदय, प्रशिक्षण झाले नसेल शिक्षण विभागाकडून थांबले असेल तर त्यावर तातडीने करण्याचा प्रयत्न करु.

श्री.कपिल पाटील : अनेक लोक सेवानिवृत्त झाले आहेत पण त्यांना मिळालेले नाही, ही शिक्षकांची चूक नसून प्रशासनाची चूक आहे.

श्री.बच्चू कडू : सभापती महोदय, जे सेवानिवृत्त झालेले आहेत त्यांचे प्रशिक्षण घेऊ नये. परंतु जे सेवेत आहेत त्यांच्या प्रशिक्षणाच्या तारखा देण्यात येतील.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी आश्वासीत प्रगती योजना लवकर लागू करण्याबाबत सांगितले आहे. श्री. कपिल पाटील यांनी सांगितलेली बाब सत्य आहे की, राजयात असे अनेक शिक्षक आहेत की, जेसेवानिवृत्त झालेले आहेत किंवा निवृत्तीच्या काठावर आहेत. त्यांना १२ वर्षाची वरिश्ठ श्रेणी योजना मिळाली काही लोकांना ती देखील मिळाली नाही. यांना अटी घालता येतील, २४ वर्षानंतर शिक्षकास निवडश्रेणी मिळत नसेल तर, शासन प्रशिक्षणही आयोजित करीत नसेल तर त्याला डिम्ड मिळाले हे तुम्ही गृहीत का धरत नाही. नकाशावर नगर रचनाकाराने वेळेवर परवानगी दिली नाही तर बांधकाम करा व डिम्ड समजावे असे शासनाचे धोरण आहे. तसेच निवडश्रेणीसाठी २४ वर्षानंतर डिम्ड

मिळाली पाहिजे. १०-२०-३० होईल तेव्हा होईल. जे वेटींगवर आहेत, जे प्रतिक्षेत आहेत, त्यांना डिम्ड देण्यासाठी सकारात्मक उत्तर मंत्री महोदयांनी द्यावे.

ता.प्र.क्र.१२७२९.....

श्री.बच्चू कडू : सभापती महोदय, याबाबत टाईम बाऊंड कार्यक्रम निश्चित करुन देण्यात येईल. तशा प्रकारच्या सूचना संबंधितांना देण्यात येतील.

--------

यानंतर श्रीमती नाफडे .....

असुधारित प्रत

**भंडारा जिल्ह्यातील राज्य परिवहन महामंडळाची बससेवा पूर्ववत सुरु करण्याबाबत**

**(६) * १२४२५ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळातील कार्यरत कर्मचाऱ्यांच्या संपामुळे भंडारा जिल्ह्यातील प्रवाशांचे हाल झाले असून प्रवाशांना शारिरिक, मानसिक व आर्थिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे तसेच शालेय विद्यार्थ्यांनाही एसटी बंद असल्यामुळे खाजगी वाहनातून खर्चिक व असुरक्षित प्रवास करावा लागत असल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोठणगाव, संजयनगर, बोंडगाव, सुरबन, करांडली, तुकुमनारायण, केळवद, गवर्रा, परसटोला, अरततोंडी, इळदा या गावावरुन केशोरी येथे येणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांना एसटी सेवा बंद असल्यामुळे आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भंडारा जिल्ह्यातील राज्य परिवहन महामंडळाच्या आगारातील सर्व बससेवा सुरु करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी व प्रवासी नागरिक व विद्यार्थ्यांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन भंडारा जिल्ह्यातील राज्य परिवहन महामंडळाची बससेवा पूर्ववत सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब :** (१) व (२) परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या संपामुळे प्रवाशांना व विद्यार्थ्यांना त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

(३) होय.

(४) व (५) उपलब्ध मनुष्यबळानुसार जिल्ह्यातील वाहतूक सुरु आहे. काही कर्मचारी हजर झाल्याने भंडारा विभागातील ८४ बसेसद्वारे ३०५ फेऱ्या चालविण्यात येत आहेत.

अप्रकाशित प्रत

ता.प्र.क्र.१२४२५......

डॉ.परिणय फुके : सभापती महोदय, राज्य पहिवहन महामंडळाच्या संपामुळे मागील अनेक दिवसांपासून भंडारा जिल्हयासह संपूर्ण महाराष्ट्रात बस सेवा बंद आहे. बस सेवा बंद असल्यामुळे भंडारा जिल्हयात केवळ ३०५ फेऱ्या होत आहेत. पूर्वी या फेऱ्यांची संख्या २४०० इतकी होती. यामुळे स्थानिक विद्यार्थ्यांना शाळा-कॉलेजमध्ये जाण्यासाठी त्रास होत आहे. हा प्रवास त्यांना खर्चिक व असुरक्षित आहे. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, बस सेवा नियमित सुरु होईपर्यंत शासन या विद्यार्थ्यांना शाळा-कॉलेजमध्ये येण्याजाण्याकरिता भत्ता देणार का ? तसेच, बसेसच्या या २४०० फेऱ्या पुर्ववत कधी सुरु होणार आहेत ?

ॲड अनिल परब : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.परिणय फुके यांनी जी वस्तुस्थिती मांडलेली आहे, ती खरी आहे. त्याचे कारण असे आहे की, दिनांक २८.१०.२०२१ पासून राज्य पहिवहन मंडळाचे कर्मचारी बेमुदत संपावर गेलेले आहेत. यामुळे एसटी बसेसची सेवा बऱ्याच अंशी विस्कळित झालेली आहे. सन्माननीय सदस्यांनी ज्या गावांचा उल्लेख केलेला आहे, या गावांमधून जे विद्यार्थी शाळांमध्ये जातात, कर्मचारी कामावर येत नसल्यामुळे एसटीची सेवा त्या विभागात देण्याकरिता आम्ही कुठेतरी कमी पडत आहोत. परंतु हळूहळू एसटीचे कर्मचारी कामावर येत आहेत. मी सूचना केलेली आहे की, एसटीच्या ज्या आता थोडयाफार सेवा सुरु झालेल्या आहेत, याच्यात ज्या बसेस शाळांसाठी द्यायच्या आहेत, त्यांना प्राधान्याने सुरु करण्यात येईल, हळूहळू बसेस सेवा पुर्ववत करण्याचा प्रयत्न चालू आहे. आता जवळपास या विभागामध्ये १५५० कर्मचारी कार्यरत होते. परंतु सध्या केवळ २७ चालक, ३७ चालक-वाहक, ७५ यांत्रिकी कर्मचारी एवढाच १४३ कर्मचारी वृंद कामावर येत आहे. मी आता सर्व अधिकाऱ्यांची बैठक घेऊन त्यांना रुट अलाईनमेंट बदलायला सांगितलेली आहे. शाळांच्या बसेसना प्राधान्य देण्यात येणार आहे. शाळेत मुलांना पोहोचविण्याकरिता ज्या बसेस आहेत, त्यांना त्याप्रमाणे रुट अलाईनमेंट चेंज देखील करण्याकरिता प्राधान्य देण्यात येणार आहे. मुलांना

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२४२५......

ॲड अनिल परब.....

शाळांकरिता बसेस कशा पध्दतीने उपलब्ध करुन देता येतील, याकरिता आमचा प्रयत्न चालू आहे, मला वाटते या प्रयत्नांना काही दिवसात यश येईल.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, सन्माननीय परिवहन मंत्रीमहोदयांनी येथे प्रवाशांची गैरसोय होते, फेऱ्या होत नाहीत, हे कबूल केलेले आहे. गैरसोय कशामुळे होते,तर एसटी कर्मचाऱ्यांचे आंदोलन सुरु आहे. हे आंदोलन अजूनही अर्धनग्न अवस्थेत आजही सुरु आहेच. मला वाटते विलिनीकरण आणि इतर जो काही विषय आहे, त्यातून सामोपचाराने मार्ग काढून हा विषय संपविण्याची आवश्यकता आहे. कारण शासन एका बाजूने एसटी चालू करण्याचा प्रयत्न करीत आहे, दुसऱ्या बाजूला त्याकरिता अत्यंत तोकडा प्रतिसाद मिळत आहे. लोकांना आजही त्यांच्या आंदोलनामुळे कर्मचाऱ्यांबाबत सहानुभूती आहे. माझी विनंती अशी आहे की, या ठिकाणी जी काही वस्तुस्थिती आहे, त्या संदर्भात शासनाने जर निवेदन या एसटीच्या आंदोलनासंदर्भात केले तर बरे होईल. शासन याबाबत नेमके काय करणार आहे, हे स्पष्ट झाले पाहिजे. कर्मचारी आंदोलन थांबवायला तयार नाही. प्रवाशांचे हाल होत आहेत. शासन आपल्या भूमिकेवर ठाम आहे. यातून काहीतरी सुवर्णमध्य काढणे आवश्यक आहे.

ॲड अनिल परब : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते यांनी हा जो मुद्दा मांडलेला आहे, त्याबाबत शासनाची भूमिका मी वारंवार जाहीर केलेली आहे. तरी देखील सभागृहाच्या पटलावर शासनाची अधिकृत भूमिका यावी, याकरिता मी हे बोलत आहे. दिवाळीच्या अगोदर ज्यावेळी एसटी कर्मचाऱ्यांनी आम्हाला आंदोलन आणि बेमुदत उपोषण करणार, अशी नोटीस दिली होती. ही नोटी एक लाख कर्मचाऱ्यांच्या ज्या १९ युनियन्स आहेत, त्या युनियन्सच्या कृती समितीने दिली होती. याच्यामध्ये त्यांचे जे मूळत: प्रश्न होते की, मागील जो त्यांचा करार झालेला आहे, या करारामध्ये ज्या अटींची पुर्तता झालेली नाही, त्या अटींची पुर्तता करण्यात यावी, असे त्यांना म्हटले होते. मी त्याच दिवशी त्यांच्यासमवेत पूर्ण दिवस बसून

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२४२५......

ॲड अनिल परब......

चर्चा करुन त्यांचे जे मूलत: तीन प्रश्न होते, ज्याच्यामध्ये त्यांचा जो डी.ए.होता, जो शासनाच्या डी.ए.बरोबर शासनाचा डी.ए.जेवढा असावा, तेवढा डी.ए.कर्मचाऱ्यांना मिळावा, अशी प्रमुख मागणी होती. ज्यावेळी शासनाचा डी.ए.१७ टक्के होता, त्यावेळी एसटी कर्मचाऱ्यांचा डी.ए. १२ टक्के होता. त्यापूर्वी या बैठकीच्या एक आठवडापूर्वी शासकीय कर्मचाऱ्यांच्या डी.ए.मध्ये वाढ होऊन तो डी.ए.२८ टक्के इतका झाला होता. आम्ही त्या बैठकीमध्ये १२ टक्क्यांवरुन तो डी.ए.सरळ २८ टक्कयांवर आणला, ती तफावत दूर करुन टाकली होती. दुसरी तफावत होती, ती म्हणजे तो त्यांच्या इन्क्रीमेंटबाबत होती. दोन आणि तीन टक्के शासकीय कर्मचाऱ्यांना इन्क्रीमेंट मिळत होते, त्याप्रमाणे दोन –तीन टक्के इन्क्रीमेंट शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे केलेले आहे. याच बरोबर त्यांचे जे दुसरे भत्ते होते, या भत्त्याच्या बाबत देखील शासकीय कर्मचाऱ्यांच्या हाऊसरेण्टचा जो विषय होता, तोही एसटी कर्मचाऱ्यांच्या एचआरएप्रमाणे करण्यात आलेला आहे. हे तीनही मुद्दे त्या कृती समितीच्या बैठकीमध्ये आम्ही त्या दिवशीच सोडविले होते. परंतु ऐन दिवाळीच्या दिवशी एका युनियन ने आम्हाला नोटीस दिली की, आम्ही संपावर जात आहोत. ऐन दिवाळीत लोकांचे हाल होऊ नये, सर्व मागण्या मान्य झालेल्या असताना लोकांचे हाल होऊ नये आम्ही सरकार म्हणून कोर्टात गेलो. कोर्टाने सांगितले की, आपल्याला बेमुदत संपावर जाता येणार नाही. परंतु ज्यावेळी कोर्टात आम्ही हा प्रश्न मांडून कंटेम्प्टकरिता गेलो होतो. त्यांनी नोटीस दिलेली आहे. कोर्टाने आदेश देऊनही हे लोक संपावर जात आहेत. अशा स्थितीत हा विलीनीकरणाचा मुद्दा ज्यावेळी आला, त्यावेळी सर्व कामगारांनी त्या विलीनीकणाच्या मुद्दयाला उत्स्फुर्त प्रतिसाद देऊन हळूहळू दिवाळीपासून डेपो जसे बंद होत गेले होते. सुरुवातीला ५० डेपो बंद झाले, त्यानंतर ही संख्या १५० वर गेली. त्यानंतर २५० डेपो पूर्णपणे ठप्प झाले. यावेळी सर्व आंदोलन आझाद मैदानावर एकवटले होते. विलीनीकरणाच्या मुद्दयावर त्यांची मागणी जोर धरायला लागली, अशा वेळी त्यांच्या मागणीचे, त्या आंदोलनाचे नेतृत्त्व

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२४२५......

ॲड अनिल परब......

आपल्या सदनाचे सन्माननीय सदस्य श्री. सदाभाऊ खोत, सन्माननीय सदस्य श्री.गोपीचंद पडळकर यांनी केलेले आहे. ज्यावेळी हा मुद्दा कोर्टाच्या समोर गेला, त्यावेळी कोर्टाने असा निर्णय दिला की, या मुद्दयाच्या बाबत विलीनीकरणाचा मुद्दा हा काही एका दिवसात सोडविता येणारा नाही. याकरिता या मुद्दयावरती राज्य शासनाने त्रिसदस्यीय समिती नेमावी, जेणेकरुन त्यांनी १२ आठवडयाच्या आतमध्ये विलीनीकरण शक्य आहे की नाही याबाबतीतील आपली भूमिका माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या मान्यतेसकट कोर्टाला सादर करावी. १२ आठवडे हा कालावधी जास्त असल्यामुळे, हा कालावधी जवळपास ३ महिन्यांचा होतो. ज्यावेळी आम्ही आंदोलकांशी चर्चा करीत होतो, त्यावेळी उपरोल्लेखित सन्माननीय सदस्यांशी देखील आम्ही चर्चा करुन आम्ही एक फॉर्म्यूला तयार केला. जोपर्यंत विलीनीकरणाचा मुद्दा निश्चित होत नाही, तोपर्यंत या कामगारांना एक वाढ द्यायची, अशा प्रकारचा निर्णय त्या बैठकीत घेण्यात आला. ती वाढ कोणत्याही प्रकारचा करार न होता, परंतु ती वाढ मूळ त्यांचया वेतनामध्ये समाविष्ट करण्यात येईल. ज्या कामगारांना एक ते दहा वर्षे झालेली आहेत, त्यांना ५ हजार रुपये, ज्या कामगारांना दहा-ते वीस वर्षे झालेली आहे, त्यांना ४ हजार रुपये, ज्या कामगारांना वीस व त्यापेक्ष अधिक वर्षे झालेली आहेत, त्यांना २.५ हजार रुपये इतकी वाढ त्यांना देण्यात आलेली आहे. सुरुवातीची वाढ आणि ही आताची वाढ धरुन दोन टप्प्यात त्यांना वाढ देण्यात आलेली आहे. त्यांच्या पगारामध्ये त्यांची जी काही वाढ अपेक्षित होती, बऱ्याचशा वेळी पहिल्या टप्प्यात जे कामगार होते, त्यांच्यामध्ये जास्त असंतोष होता. कारण बाहेर जे चित्र सांगण्यात येत होते की, या कामगारांना १२ हजार रुपये पगार आहे. तसे नसून या कामगारांना पगार १८००० रुपये पगार असून १२००० रुपये त्यांचा बेसिक होता. या बेसिकमध्ये वाढ करुन बाकीच्या राज्यांमध्ये जेवढा पगार मिळतो, त्या राज्यांच्या बरोबरीने आणण्याची भूमिका आम्ही त्या मिटींगमध्ये घेतली होती. त्या बैठकीमध्ये साधारणत: बाकीची राज्ये, त्यापेक्षाही काही इतर राज्यांपेक्षा

ता.प्र.क्र.१२४२५......

ॲड अनिल परब.......

जास्त देण्याची अशी भूमिका घेतली होती. आता ही जी वाढ देण्यात येत आहे, आता या विलिनीकरणाच्या मुद्दयाचे काय होत आहे, हे पाहून बैठका घेऊन आपण संप मागे घेतल्यानंतर यातील प्रश्न सोडविता येतील, अशी भूमिका शासनाने घेतली होती. परंतु कर्मचाऱ्यांनी विलिनीकरणाच्या मुद्दयावर कर्मचाऱ्यांनी हेकेखोरीची भूमिका घेतलेली आहे. त्यांनी संप मागे घेतलेला नाही. राज्यातील जनतेला त्रास होत आहे, त्याकरिता वारंवार मी त्यांच्यापुढे अपील करीत आहे. आमच्यासमोर गेल्या काही दिवसांपासून एक प्रश्न पुढे आलेला आहे. ज्यावेळी हा संप कोर्टाने बेकायदेशीर ठरविलेला आहे. संपाच्या बाबतीत सर्व कोर्टाने त्यांच्या विरोधात निकाल दिलेला आहे, असे असताना देखील संप बेकायदेशीर रित्या चालू आहे. याकरिता मोठया प्रमाणात एसटी कर्मचाऱ्यांवर कारवाई झालेली आहे. काही दिवसांपूर्वी माझ्याकडे अशी मागणी केली गेली की, या कारवाईमुळे कर्मचारी कामावर येत नाहीत,आपण ही सर्व कारवाई मागे घ्यावी. यापूर्वी चार वेळा मी कर्मचाऱ्यांवरील कारवाई मागे घेतो, अशा प्रकारचे आश्वासन देऊन देखील कर्मचारी कामावर आलेले नाहीत. दोन दिवसांपूर्वी मी वेगवेगळया सर्व कर्मचाऱ्यांवर कारवाई झालेली आहे, त्यांच्यावर म्हणजेच ज्या कर्मचाऱ्यांवर कारवाई झालेली नाही, त्यांनी कामावर यावे. ज्या कर्मचाऱ्यांवर निलंबित केलेले आहे, त्यांचे निलंबन मी मागे घेतलेले आहे, ज्या कर्मचाऱ्यांना बडतर्फीची नोटीस गेलेली आहे, परंतु त्यांना बडतर्फ केलेले नाही. अशा लोकांवरील केसेस देखील मी मागे घेतलेल्या आहेत. प्रश्न असा आहे की, ज्यांची सेवा समाप्त झालेली आहे, त्यांच्या बाबतीत मी असे सांगितलेले आहे की, आमच्याकडे त्यांना अपील करावे लागते.

यानंतर श्री.सोनावणे......

ॲड. अनिल परब....

त्या अपिलाच्या माध्यमातून त्यांना पुनश्च कामावर घेतले जाईल.

**सभापती :** प्रश्नोत्तराच्या तासाचे महत्व लक्षात घेऊन प्रश्नोत्तराच्या तासाची वेळ ५ मिनिटांसाठी वाढविण्यात येत आहे.

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, राज्य शासनाचे सर्व कर्मचाऱ्यांप्रती सहानुभूतीचे धोरण आहे. परिवहन विभागाकडून एकाही कर्मचाऱ्याचे नुकसान केले जाणार नाही. कर्मचारी विलिनीकरणाच्या मार्गावर ठाम आहेत. विलिनीकरणाचा निकाल आलेला आहे. विलिनीकरणाचा रिपोर्ट शुक्रवार, दिनांक ११ मार्च, २०२२ रोजी माननीय न्यायालयाला सादर करणार आहोत. सदरहू अहवाल विधिमंडळाच्या पटलावर ठेवला जाणार आहे. वेगळ्या पध्दतीने चर्चेसाठी आम्ही तयार आहोत. सर्व लोकांशी चर्चा केली जात आहे. या विषयाच्या अनुषंगाने राज्य शासनाने एक समिती नेमली होती. त्यांनी अहवाल दिलेला असून, त्यामध्ये असे म्हटले आहे की, विलिनीकरण शक्य नाही. कर्मचाऱ्यांनी लवकरात लवकर कामावर यावे, असे माझे सर्व कर्मचाऱ्यांना कळकळीचे आवाहन आहे. मी कारवाईच्या बाबतीत त्यांना सांगितले आहे. त्यांच्या काही मागण्या आहेत. शिस्तआवेदन पध्दत आहे. त्यावर चर्चा केली जाणार आहे. कर्मचाऱ्यांच्या पगारामध्ये तफावत आहे. दोन कामगारांना दिल्या जाणाऱ्या पगारामध्ये तफावत आहे, अशा प्रकारची मानसिकता निर्माण झालेली आहे. यासंदर्भात चर्चेअंती कोणावरही अन्याय होणार नाही, अशा पध्दतीचा मार्ग काढला जाणार आहे. कर्मचारी कामावर आला तर त्यांना नोटीसेस दिल्या जातील, त्यांना कामावरुन कमी केले जाईल, त्यांचे इन्क्रीमेंट कमी केले जाईल किंवा पहिल्या ग्रेडवर कामावर घेतले जाईल अशा प्रकारच्या अफवा पसरविल्या जात आहेत. अशा पद्धतीची राज्य परिवहन मंडळाची कोणतीही भूमिका नाही. पुनश्च एकदा माननीय सभापती महोदयांच्या माध्यमातून मी राज्यातील सर्व एसटी कर्मचाऱ्यांना कळकळीचे आवाहन करतो की, जनतेचे, विद्यार्थ्यांचे, महाविद्यालयात

ॲड. अनिल परब....

जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे फार मोठे नुकसान होत असल्यामुळे त्यांनी कामावर येऊन चर्चा करावी आणि प्रश्न सोडवावेत. याबाबतीत कोणीही आपल्यापैकी कर्मचाऱ्यांचे नेतृत्व करुन जबाबदारी घेत असेल आणि त्यांना कामावर घेण्याची तयारी असेल तर... माझी तयारी आहे.

**सभापती** : सदरहू प्रश्न राज्याच्यादृष्टीने अतिशय महत्वाचा आहे. याचा त्रास विद्यार्थ्यांना आणि वयोवृध्द लोकांना होत आहे. सणासुदीचे दिवस आहे. आपण सर्व लोकप्रतिनिधी ग्रामीण भागातून येत आहोत. हा प्रश्न सुटला पाहिजे. या विषयासंदर्भात सन्माननीय सदस्य सर्वश्री गोपीचंद पडळर, सदाभाऊ खोत यांनी पुढाकार घेतल्याचे मी पाहिले आहे. हा प्रश्न सोडविण्यासाठी विधानसभा आणि विधानपरिषदेतील सन्माननीय सदस्यांची एकत्रितपणे कमिटी नेमण्याची गरज आहे. कमिटीने कामगार प्रतिनिधींची भेट घ्यावी किंवा त्यांना भेटण्यासाठी आमंत्रण द्यावे आणि हा प्रश्न मार्गी लावावा अशी माझी प्रामाणिक अपेक्षा आहे.

श्री. सदाभाऊ खोत : सभापती महोदय, एका बाजूला शासनाकडून असे सांगितले जाते की, कर्मचाऱ्यांनी कामावर हजर व्हावे आणि दुसऱ्या बाजूला एक परिपत्रक काढलेले आहे. त्या परिपत्रकात असे म्हटले आहे की, बेकायदेशीर संपात सहभागी असलेल्या राज्य परिवहन कर्मचाऱ्यांना हजर करुन घेऊन राज्य परिवहन मंडळाची वाहतूक पूर्ववत झाल्यावर पुढील कारवाई करण्यात यावी. कामावर आल्यानंतर कारवाई केली जाणार आहे. असे गोपनीय पत्र आहे. मला यासंदर्भात माननीय परिवहन मंत्री महोदयांना अशी विनंती करावयाची आहे की,....

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री.सदाभाऊ खोत यांना सांगू इच्छितो की, हे पत्र बनावट स्वाक्षरीने निर्गमित झालेले आहे. याचा खुलासा महामंडळाने केलेला आहे.

श्री. प्रवीण दरेकर : सभापती महोदय, मी आपला मनापासून आभारी आहे. विद्यार्थ्यांच्या प्रवासी वाहतुकीच्या विषय असतानाही त्याच्या अनुषंगिक

श्री. प्रवीण दरेकर.....

कर्मचाऱ्यांच्या संपाबद्दल तपशीलवार उत्तर देण्यासाठी माननीय परिवहन मंत्री महोदयांना वेळ दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे. विलिनिकरण होणारच नाही. माननीय न्यायालयाने सांगितले आहे. यासंदर्भात लवकरच सभागृहाच्या पटलावर

अहवाल सादर केला जाणार आहे. त्यानुसार त्यावर चर्चा केली जाणार आहे. परंतु, आज या विषयाच्या अनुषंगाने मार्ग तरी काढला पाहिजे, असे मला सांगावयाचे आहे.

**सभापती :** माननीय विरोधी पक्षनेत्यांना सांगू इच्छितो की, कमिटी नियुक्त केली जाणार आहे.

श्री. प्रवीण दरेकर : सभापती महोदय, कमिटी होऊ... रोज माणसे मरत आहेत.

**सभापती** : माननीय परिवहन मंत्री महोदयांनी लवकरात लवकर कमिटी नेमावी अशी माझी सूचना आहे.

श्री. प्रवीण दरेकर : सभापती महोदय, कमिटी केव्हा नियुक्त केली जाणार आहे.

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, माझी तर तयारी आहे. यासंदर्भात माननीय विरोधी पक्षनेत्यांनी पुढाकार घ्यावा, अशी माझी त्यांना विनंती आहे. माझी केव्हाही तयारी आहे.

**सभापती** : मी या विषयाच्या अनुषंगाने निर्देश देत नाही. शासनाने माझ्या सूचनेचा विचार करावा. विधानसभेतील २८८ सन्माननीय सदस्य अधिक

असुधारित प्रत

विधानपरिषदेतील ७८ सन्माननीय सदस्यांची भावना आहे. कमिटी नियुक्त करावी. दोन्ही सदनातील सन्माननीय सदस्यांची एकत्रितपणे कमिटी नेमावी.

श्री. गोपीचंद पडळकर : सभापती महोदय, सदनातील सर्व सन्माननीय सदस्यांसमवेत चर्चा करुन हा प्रश्न सामुहिकपणे सोडविला पाहिजे. या विषयाच्या अनुषंगाने २६ नोव्हेंबर, २०२१ रोजी माननीय सभापती महोदयांसमवेत चर्चा केलेली आहे.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

----------

## नियम २८९ अन्वये दिलेल्या सूचनांसंबंधी

**सभापती** : आज मंगळवार, दिनांक ८ मार्च, २०२२ रोजी सर्वश्री प्रवीण दरेकर, विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ. परिणय फुके, सर्वश्री सुरेश धस, प्रसाद लाड, सदाभाऊ खोत, विनायकराव मेटे, गोपीचंद पडळकर, ॲड. निरंजन डावखरे, डॉ. रणजित पाटील, सर्वश्री निलय नाईक, नागोराव गाणार, प्रवीण दटके, रमेश पाटील, वि.प.स. यांनी सकाळी ९.३४ वाजता "शेतकऱ्याने विष प्राशन करुन केलेली आत्महत्या" या विषयाबाबत म.वि.प. नियम २८९ अन्वये सूचना दिलेली असून, त्यावर चर्चा झालेली असल्यामुळे मी ही सूचना अमान्य करीत आहे.

यानंतर आज मंगळवार, दिनांक ८ मार्च, २०२२ रोजी सर्वश्री प्रवीण दरेकर, विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ. परिणय फुके, सर्वश्री सुरेश धस, सदाभाऊ खोत, प्रसाद लाड, सर्वश्री विनायकराव मेटे, डॉ. रणजित पाटील, सर्वश्री निलय नाईक, गोपीचंद पडळकर, नागोराव गाणार, रमेश पाटील, प्रवीण दटके, वि.प.स. यांनी सकाळी १०.१४ वाजता "ओबीसी आरक्षण" या विषयाबाबत म.वि.प. नियम २८९ अन्वये सूचना दिलेली असून, त्यावर चर्चा झालेली असल्यामुळे मी ही सूचना अमान्य करीत आहे.

यानंतर आज मंगळवार, दिनांक ८ मार्च, २०२२ रोजी सर्वश्री प्रवीण दरेकर, विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ. परिणय फुके, सर्वश्री सुरेश धस, प्रसाद लाड, सदाभाऊ खोत, विनायकराव मेटे, डॉ. रणजित पाटील, सर्वश्री निलय नाईक, नागोराव गाणार, ॲड. निरंजन डावखरे, सर्वश्री गोपीचंद पडळकर, रमेश पाटील, प्रवीण दटके, वि.प.स. वि.प.स. यांनी सकाळी १०.५३ वाजता "१९९३ च्या बाम्बस्फोटाबाबत" या विषयाबाबत म.वि.प. नियम २८९ अन्वये सूचना दिली आहे. आजच्या दिवसाची कामकाजपत्रिका पाहता विरोधी पक्षाकडून याच विषयाच्या अनुषंगाने म.वि.प. नियम २६० अन्वये स्वीकृत झालेला प्रस्ताव कामकाजपत्रिकेत दर्शविण्यात आलेला आहे. या प्रस्तावावरील चर्चेत सन्माननीय सदस्यांना आपले विचार मांडता येतील. त्यामुळे सदरहू सूचना अमान्य करीत आहे.

-----

असुधारित प्रत

## <u>ई-कुबेर प्रणालीद्वारे वेतनाचे प्रदान करण्याबाबत करावयाची घोषणा</u>

**सभापती** : सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की, वित्त विभागाच्या दिनांक ११ मार्च, २०२० रोजीच्या शासन निर्णयानुसार आहरण व संवितरण अधिकारी यांच्याकडून सेवार्थ प्रणालीतून सादर होणाऱ्या वेतन देयकांची तसेच, अन्य देयकांची प्रदाने ई-कुबेर बल्क पेमेंट प्रणालीद्वारे थेट माननीय सदस्य, त्यांचे स्वीय सहाय्यक व वाहनचालक यांच्या बँक खात्यात जमा करावयाची आहे.

सदर निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता आवश्यक फॉर्म व कागदपत्रे सादर करण्याबाबत सर्व सन्माननीय सदस्यांना परिपत्रकाद्वारे कळविण्यात आलेले आहे. तरीही काही सन्माननीय सदस्यांनी अद्यापही हे फॉर्म भरुन दिलेले नाहीत. कृपया सन्माननीय सदस्यांनी परिपत्रकासोबतचा फॉर्म भरुन त्यात नमूद आवश्यक कागदपत्रांसह या सचिवालयातील ह-१ ( माननीय सदस्यांचे वेतन व भत्ते ) कक्षाकडे लवकरात लवकर सादर करावेत. जेणेकरुन ई-कुबेर प्रणालीद्वारे त्यांच्या वेतनाचे प्रदान करणे शक्य होईल.

--------

असुधारित प्रत

**पृ.शी./मु.शी.** : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

**सभापती** : आजच्या कामकाजपत्रिकेत अनुक्रमांक-२ वर "कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे" या शीर्षकांतर्गत दर्शविण्यात आलेली पुढील कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे मी घोषित करतो.

१) "मुंबई लोखंड व पोलाद कामगार मंडळ यांचे सन २०१६-२०१७, सन २०१७-२०१८ व सन २०१८-२०१९ या वर्षांचे अनुक्रमे सत्तेचाळीसावा, अठ्ठेचाळीसावा व एकोणपन्नासावा वार्षिक अहवाल"

२) "लातूर आणि उस्मानाबाद जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा एकोणतीसावा वार्षिक अहवाल"

३) "कापड बाजार व दुकाने मंडळ यांचे सन २०१६-२०१७ व सन २०१७-२०१८ या वर्षांचे अनुक्रमे सेहेचाळीसावा व सत्तेचाळीसावा वार्षिक अहवाल"

४) "अहमदनगर माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा वार्षिक अहवाल"

५) "नाशिक माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ यांचे सन २०१६-२०१७ व सन २०१७-२०१८ या वर्षांचे अनुक्रमे बत्तीसावा व तेहतीसावा वार्षिक अहवाल"

६) "क्लिअरिंग ॲण्ड फॉरवर्डिंग असंरक्षित गोदी कामगार मंडळ यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा अठ्ठावीसावा वार्षिक अहवाल"

७) "जळगाव माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ यांचे सन २०१७-२०१८, सन २०१८-२०१९ व सन २०१९-२०२० या वर्षांचे वैधानिक लेखापरिक्षण व कामकाज अहवाल"

८) "किराणा बाजार व दुकाने मंडळ यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा एकावन्नावा वार्षिक अहवाल"

असुधारित प्रत

९) "जालना जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ यांचा सन २०१७-२०१८ या वर्षाचा एकोणतीसावा वार्षिक अहवाल"

**सभापती.......**

१०) "सोलापूर जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ यांचे सन २००९-२०१०, सन २०१०-२०११, सन २०११-२०१२, सन २०१२-२०१३, सन २०१३-२०१४, सन २०१४-२०१५, सन २०१५-२०१६, सन २०१६-२०१७, सन २०१७-२०१८, सन २०१८-२०१९, सन २०१९-२०२० व सन २०२०-२०२१ या वर्षांचे अनुक्रमे एकवीसावा, बावीसावा, तेवीसावा, चोवीसावा, पंचवीसावा, सव्वीसावा, सत्तावीसावा, अठ्ठावीसावा, एकोणतीसावा, तीसावा, एकतीसावा व बत्तीसावा वार्षिक अहवाल"

११) "पुणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा सोळावा वार्षिक अहवाल"

१२) "रत्नागिरी जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ यांचे सन २०१४-२०१५, सन २०१५-२०१६ व सन २०१६-२०१७ या वर्षांचे वार्षिक अहवाल"

१३) "औरंगाबाद जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ यांचे सन २०११-२०१२, सन २०१२-२०१३, सन २०१३-२०१४, सन २०१४-२०१५, सन २०१५-२०१६, सन २०१६-२०१७, सन २०१७-२०१८ व सन २०१८-२०१९ या वर्षांचे अनुक्रमे दहावा, अकरावा, बारावा, तेरावा, चौदावा, पंधरावा, सोळावा, सतरावा वार्षिक अहवाल"

१४) "धुळे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ (अंतर्गत जळगाव, धुळे व नंदूरबार जिल्हे) यांचे सन २०१६-२०१७, सन २०१७-२०१८ व सन २०१८-२०१९ या वर्षांचे वैधानिक लेखापरिक्षण व कामकाज अहवाल" सभागृहासमोर ठेवतो.

असुधारित प्रत

-----

**पृ.शी./मु.शी.** : आश्वासनांची यादी तसेच आश्वासनांवरील शासकीय कार्यवाहीचे विवरण सभागृहासमोर ठेवणे.

श्री. संजय बनसोडे ( संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "विधानपरिषदेच्या सन २०२१ च्या तिसऱ्या (हिवाळी) अधिवेशनात दिनांक २२ डिसेंबर, २०२१ ते दिनांक २८ डिसेंबर, २०२१ या कालावधीत माननीय मंत्री/माननीय राज्यमंत्री महोदयांनी विधानपरिषद सभागृहात दिलेल्या एकूण ३३ आश्वासनांची यादी, तसेच सन २०२१ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर, पूर्तता करण्यात आलेल्या एकूण ६३ आश्वासनांच्या पूर्ततेची विवरणपत्रे यादीसह" सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : आश्वासनांच्या पूर्ततेची विवरणपत्रे यादीसह सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

(प्रेस : येथे आश्वासनांची यादी व विवरणपत्र छापावे.)

-----

असुधारित प्रत

**पृ.शी./मु.शी. :** नियम ९३ अन्वये सूचना

**सभापती :** आज माझ्याकडे मंगळवार, दिनांक ८ मार्च, २०२२ रोजी म.वि.प. नियम ९३ अन्वये ४ सूचना प्राप्त झालेल्या आहेत. त्या मी अमान्य करीत आहे.

------

असुधारित प्रत

**पृ. शी.** : राज्याच्या हक्काचे पाणी अन्य राज्याला देण्याबाबत विरोध करावा अशी सर्वत्र होत असलेली मागणी

**मु. शी. :** राज्याच्या हक्काचे पाणी अन्य राज्याला देण्याबाबत विरोध करावा अशी सर्वत्र होत असलेली मागणी या संबंधी सर्वश्री विक्रम काळे, शशिकांत शिंदे अमोल मिटकरी, सतिश चव्हाण, अब्दुल्लाखान दुर्राणी, अनिकेत तटकरे, संजय दौंड, अरुण लाड, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय जलसंपदा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"विपुलतेच्या खोऱ्यातून तुटीच्या खोऱ्यात दुष्काळी भागात पाणी वळविणे हे नदी जोड प्रकल्पाचे मुख्य तत्व असल्याचे मानले जाणे, त्यासाठी दुष्काळी भाग एकाच राज्यातील राज्यांतर्गत असो किंवा दोन राज्यातील असो तथापि, या तत्वाला केंद्र शासनाने तिलांजली देऊन फक्त दोन किंवा जास्त राज्यातील पाणी वळविण्यात येणार असेल तर, नदी जोड प्रकल्पांना केंद्र शासनाकडून निधी दिला जाईल अशी भूमिका केंद्र शासनाने घेतली असल्याचे दिनांक १ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास येणे, त्यानुसार पार-तापी-नर्मदा या नदीजोड प्रकल्पाला केंद्र शासनाने निधी देण्याची तयारी दर्शविणे, परंतु पार-तापी-नर्मदा लिंक प्रकल्पात महाराष्ट्र राज्याच्या नार-पार खोऱ्यातील १५ टीएमसी पाणी गुजरातमध्ये १२०० कि.मी.अंतरावर उत्तरेकडे वळविण्यात येणार असल्याचे निदर्शनास येणे, तसेच महाराष्ट्र राज्याच्या याच पाण्यावर गुजरात मध्ये मुंबईच्या धर्तीवर धोलेरा नावांचे

असुधारित

आंतरराष्ट्रीय शहर उभारुन त्याचा आकार परदेशातील शांघाय शहराच्या पाचपट

श्री. विक्रम काळे....

आणि दिल्लीच्या दुप्पट करण्याची भूमिका तसेच देशभरातील संपूर्ण उदयोग व व्यापार याच भागात केंद्रीत करण्याचा मानस असल्याचे निदर्शनास येणे, त्यासाठी हातभार लावण्यास कोणाचाही विरोध नसणे, परंतु महाराष्ट्राने पार-तापी-नर्मदा लिंक प्रकल्पासाठी पाण्याचा हक्क अन्य राज्याला दिल्यास गिरणा खोऱ्यातील कळवण,सटाणा, देवळा, मालेगाव, नांदगाव, चांदवड, येवला आणि जळगाव जिल्हा कायमस्वरुपी दुष्काळी राहण्याची शक्यता असणे, महाराष्ट्राच्या हक्काचे पाणी अन्य कि देणार का, असा निर्माण झालेला प्रश्न त्यामुळे राज्याच्या हक्काचे पाणी अन्य राज्याला देण्याबाबत विरोध करावा अशी सर्वत्र होत असलेली मागणी, त्यामुळे राज्याच्या हिताचा निर्णय घेण्याची आवश्यकता व त्याबाबत शासनाची भूमिका."

श्री. जयंत पाटील ( जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

यानंतर श्री. बोर्डे....

असुधारित प्रत

**सभापती** : लक्षवेधी सूचनांवर चर्चा सुरु होण्यापूर्वी मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, आपण प्रश्न जास्त डेव्हलप करु नका. माननीय जलसंपदा मंत्री बुद्धीमान आहेत. त्यामुळे आपण पॉईंटेड प्रश्न विचारावा. तसेच विधानसभा आणि विधानपरिषदेच्या नियमात १० मिनिटांच्या वर किंवा दोन-तीन प्रश्नांपुरतीच लक्षवेधी सूचनेवर चर्चा करता येते. त्यामुळे आपण मर्यादित वेळेत प्रश्न विचारावेत.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, राज्याच्या जलसंपदा विभागाला अतिशय चांगले मंत्री महोदय लाभलेले आहेत. मी त्यांचे मनापासून अभिनंदन करतो. राज्याच्या इतिहासामध्ये पहिल्यांदाच अशा प्रकारचे माननीय जलसंपदा मंत्री लाभलेले आहेत. त्यांनी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात जाऊन आपल्या विभागाच्या अंतर्गत जे प्रकल्प सुरु आहेत त्यांचा सविस्तर आढावा घेतला. जे प्रकल्प वर्षानुवर्षे पूर्ण झालेले नाहीत ते पूर्ण करण्याच्या दृष्टीने काय पावले उचलता येतील या बाबतीत महाराष्ट्रात पहिल्यांदा कृती आराखडा तयार करण्याचे काम माननीय जलसंपदा मंत्री श्री.जयंत पाटील यांनी केल्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, मराठवाड्याला सातत्याने दुष्काळाला सामोरे जावे लागते. आपल्याला माहीत आहे की, लातूर येथे रेल्वेने पाणी आणावे लागले होते. या वर्षी त्या भागात चांगला पाऊस झाला आहे. मराठवाड्यातील आम्हा लोकांची सातत्याने २१ टीएमसी पाण्याची मागणी आहे. कालच आमचे नेते माननीय श्री.शरदचंद्रजी पवार साहेब उस्मानाबाद तालुक्याच्या दौऱ्यावर आले होते. त्यांनी तेथून माननीय जलसंपदा मंत्र्यांना फोन करुन, या २१ टीएमसी पाण्याचा कधी निर्णय होणार आहे आणि हे पाणी कधीपर्यंत मिळणार या बाबत विचारणा केली. हा प्रकल्प मराठवाड्याची अस्मिता असलेला प्रकल्प आहे. माझे वडील स्व.वसंतराव काळे यांनी अनेक पाणी परिषदा घेतल्या. त्या काळात हे पाणी आणण्यासाठी प्रयत्न झाले होते. परंतु मुळात तुटीच्या खोऱ्यातील पाणी सुद्धा आपल्याच राज्याला मिळाले पाहिजे, अशी माझी मागणी आहे. माझा या लक्षवेधी सूचनेतील मुख्य गाभा असा आहे की, राज्य सरकारने हे पाणी गुजरात राज्याला देण्याचा जो घाट घातलेला आहे ती अत्यंत खेदजनक बाब आहे. आपल्या शेजारी गुजरात राज्य असले तरी

श्री.विक्रम काळे....

आपल्याकडे जास्त पाणी असेल तरच दुसऱ्या राज्याला पाणी देण्यास हरकत नाही. मी स्पेसिफिक विचारतो की, आपल्या राज्य सरकारने गुजरात राज्याला पाणी देण्याचा निर्णय घेतला आहे काय, असल्यास, किती टीएमसी पाणी देण्यात येणार आहे ? या राज्याचा नागरिक म्हणून राज्य सरकारने हे पाणी देऊ नये, या दृष्टीने राज्य सरकार कोणता धोरणात्मक निर्णय घेणार आहे, तसेच तुटीच्या खोऱ्यातील पाणी महाराष्ट्रातील विविध प्रदेशात आणण्याच्या दृष्टीने जो प्रकल्प अहवाल तयार झाला आहे त्याची अंमलबजावणी राज्य सरकार कधी करणार आहे ?

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, गुजरात राज्याबरोबर २०१७-१८ च्या दरम्यान या विषयी चर्चा करण्यात आली होती. गुजरात राज्याची दमणगंगा-पिंजाळ ही पहिली आंतरराज्य योजना आपल्याकडे आहे. तसेच दुसरी पार-तापी-नर्मदा योजना आहे. पार-तापी-नर्मदा योजनेंतर्गत महाराष्ट्राच्या कार्यकक्षेत एकच धरण असून, उर्वरित चार धरणे गुजरात राज्यात आहेत. हा एकूण ४७ टीएमसीचा प्रकल्प आहे. महाराष्ट्रातील १५ टीएमसी आणि गुजरात राज्यातील ३२ टीएमसी पाणी घेऊन झरी येथे धरण बांधण्याचे प्रस्तावित आहे. हे सर्व पाणी त्यांना नर्मदेच्या नेटवर्कमध्ये ऊकाई धरणात नेण्याचा गुजरात राज्याचा प्रस्ताव आहे. त्या प्रस्तावानुसार आपल्या राज्याच्या १५ टीएमसीचा वाटा आंतरराज्य प्रकल्पात देता येईल. त्यांनी ऊकाई धरणातून वरच्या भागात १५ टीएमसी पाणी उपलब्ध करुन द्यावे, असे राज्य सरकारने त्यांना सांगितले आहे. परंतु त्यावर कोणतेही एकमत झालेले नाही. मुळात राज्य सरकारने कोणतेही पाणी गुजरात राज्याला देण्याची तयारी दाखविली नाही आणि दाखविणार सुद्धा नाही. आपला प्रयत्न हाच आहे की, आंतरराज्य प्रकल्प मंजूर झाला तर १५ टीएमसी पाणी तापीच्या तुटीच्या खोऱ्यात नेता येईल. त्यांचे जे नेटवर्क आहे त्यातून ऊकाई धरणापर्यंत पाणी नेले तर ऊकाई धरणातून आपल्या हिश्श्याचे पाणी महाराष्ट्राला परत द्यावे, असे सुचविले होते. परंतु गुजरात राज्याने त्यास तयारी दाखविली नाही. यावर नंतर कोणतीही चर्चा झालेली

श्री.जयंत पाटील.....

नाही. त्यामुळे आपल्या राज्याने गुजरात राज्याला प्रस्ताव देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

सभापती महोदय, दुसरी योजना दमणगंगा-पिंजाळ आहे. महाराष्ट्र आणि गुजरात राज्याच्या सीमेवर भूगड धरण करुन त्या धरणातून ७ टीएमसी पाणी खारगील येथे आणावयाचे आहे. खारगीलचे १३ टीएमसी पाणी पुन्हा बेरीज करुन पिंजाळला आणायचे प्रस्तावित आहे. पिंजाळचे पुन्हा ११ टीएमसी असे एकूण ३१ टीएमसी पाणी भूगड, खारगील, पिंजाळ या धरणांना जोडून मुंबईपर्यंत आणण्याची दमणगंगा-पिंजाळ योजना आहे. भूगड धरणाच्या सेंटरला पाण्याचे डिव्हीजन आहे. एका बाजूला गुजरात आणि दुसऱ्या बाजूला आपले महाराष्ट्र राज्य आहे. त्यातील पाणी खाली दक्षिणेला आणण्याचा आपल्या राज्याचा प्रस्ताव आहे. ती नदी जोड योजना असावी असा आपला प्रयत्न होता. परंतु पुढे या अनुषंगाने फारशी काही प्रगती झालेली नाही.

श्री.अंबादास दानवे : सभापती महोदय, माननीय जलसंपदा मंत्री श्री.जयंत पाटील यांनी दिनांक १५/१०/२०२० रोजी एक बैठक घेतली होती. माझ्या माहितीप्रमाणे पार-गोदावरी वळण योजना क्रमांक-३ आणि ४ च्या बाबतीत साडेसात वर्षे उलटून देखील अद्यापपर्यंत त्याचा डीपीआर तयार झाला नाही. मराठवाड्याला द्यावयाचे ३ टीएमसी आणि अतिरिक्त मिळू शकणारे ४.५ टीएमसी अशाप्रकारे एकूण ७.५ टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यास मिळण्यासाठी पाठपुरावा सुरु होता. वास्तविक पाहता हा आंतरराज्य प्रकल्प आहे. पार-गोदावरीला पाणी देण्याऐवजी या ठिकाणी तुटीच्या तापी खोऱ्याचा उल्लेख केला गेला आहे. गोदावरी खोऱ्याचे अतिरिक्त पाणी देण्याच्या बाबतीत शासन सातत्याने अनेक आश्वासने आणि वचने देते. परंतु अजूनपर्यंत गोदावरी खोऱ्यात पाणी येऊ शकलेले नाही. या अनुषंगाने सरकार योग्य ती कार्यवाही करणार काय ?

नंतर श्री.कांबळे......

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न योग्य आहे. राज्य सरकारने या प्रकल्पांचा प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी दिल्लीच्या शासकीय संस्थेला काम दिले होते. त्यांचा अहवाल अंतिम टप्प्यात आहे. आता आपण पार, गोदावरी नदी जोड योजनेचा डीपीआर तयार होऊन एसएलटीसीकडे तपासणीसाठी दिलेला आहे. एसएलटीसीच्या तपासणीनंतर पार, गोदावरी नदी जोड प्रकल्पातून इकडे गोदावरी खोऱ्यात पाणी वळविण्याचे काम आहे, त्याच्या योजना आपल्याला सुरु करता येतील. एसएलटीसीचा अहवाल झाल्यावर मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी हा प्रस्ताव येईल आणि त्यानंतर त्याची पुढील पावले पडतील. आमच्या सरकारने या सर्व म्हणजे विशेषत: गोदावरी खोऱ्यामध्ये पाणी आणण्याच्या सर्व योजनांना प्रचंड गती दिलेली आहे. वळण योजनेचे बरेसचे प्रकल्प वन भागांत होते, त्यांना देखील गती दिलेली आहे. नागपूरच्या वन कार्यालयात देखील बरेच प्रयत्न करुन तेथील परवानग्या आणत आहोत. त्याचबरोबर या प्रकल्पातून गोदावरी खोऱ्यामध्ये पाणी वळविण्यासाठी वैतरणा, मुकणे यामध्ये एक भिंत, धरण बांधायचे होते. त्यामध्ये पूर्वी एक टीएमसी पाणी ट्रान्सफर करण्याची योजना धरुन तेथे डॅमचे डिझाईन केले होते. आमचे सरकार आल्यानंतर ते सर्व रद्द करुन ११ टीएमसी पाणी ट्रान्सफर करण्याची ॲबिलिटी असणाऱ्या धरणाचे डिझाईन करुन घेतले. आता त्याचे टेंडर निघालेले आहे. मला खात्री आहे की, पुढच्या वर्ष-दीड वर्षांत आपण वैतरण, मुकणे यामधील भिंत, धरण बांधू शकलो तर आपल्याला ११ टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यात डायव्हर्ट करण्याची ॲबिलिटी येईल. परंतु मुंबई शहराच्या पाण्याची त्यातील कमिटमेंट आहे. मुंबई शहर रिसायकलिंगचे प्रयोग वाढवित नाही आणि रिसायकलिंग करुन मुंबई शहराची पाण्याची गरज कमी होत नाही तोपर्यंत आपल्याला ते सर्व पाणी डायव्हर्ट करता येणार नाही. कारण धरण एकदाच होत असते. त्यामुळे डिझाईन करुन आता त्याच्या बांधकामाला लवकर सुरुवात होत आहे. हे एक आमच्या महाविकास आघाडीचे मेजर ॲचिव्हमेंट आहे. पुढील दीड-दोन महिन्यांत ते काम सुरु होईल. ते लहान आहे. पुढील वर्ष-दीड-दोन वर्षांत आम्ही ते काम पूर्ण करु. त्यावेळी गोदावरी खोऱ्यात आमची १० ते ११

असुधारित प्रत

श्री. जयंत पाटील ....

टीएमसी पाणी डायव्हर्ट करण्याची ॲबिलिटी असली तरी किमान सुरुवातीला आम्ही ४ टीएमसी पाणी, जे मुंबईच्या गरजेला सोडून आहे ते, आम्ही इकडे डायव्हर्ट करणार आहोत.

**सभापती** : खूप चांगले आहे.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, एसएलटीसीचा मंत्रिमंडळाचा प्रस्ताव आला की कदाचित या महिन्या-दीड महिन्यांत आम्ही मंत्रिमंडळाची मान्यता घेतली की त्याचे टेंडर किंवा काम सुरु करण्याचे काम करु. महाराष्ट्र सरकारने तापी खोऱ्यात, खासकरुन गोदावरी खोऱ्यात पाणी डायव्हर्ट करुन पूर्वेकडे वळविण्याचे काम महत्त्वाचे मानले आहे. आमच्या सरकारने, माननीय मुख्यमंत्र्यांनी विशेष बैठक यासाठी घेतली आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी देखील आदेश दिले आहेत की, कोणत्याही परिस्थितीत वळण बंधाऱ्यांना प्राधान्य द्यावे. मोठ्या प्रमाणात पाणी वळविण्यासाठी आपण हे करावे. दमणगंगा, पिंजाळ धरण योजना पूर्ण झाल्यावर आपल्याला १० टीएमसी पाणी वैतरणेतून गोदावरी खोऱ्यात .... मी मघाशी सांगितले आहे. वैतरणेत खालून लिफ्ट करुन पाणी आणत आहोत. त्यामुळे मला खात्री आहे की, याला मोठ्या प्रमाणात गती येईल. दमणगंगा, पिंजाळ हा प्रकल्प राज्य निधीतून घेणार आहोत. पार, तापी, नर्मदा या गुजरात राज्याच्या नदीजोड प्रकल्पांना १५ टीएमसी पाणी देण्याचा प्रश्न उद्भवत नाही. जर ते काहीच करीत नसतील तर शेवटी जे झरीचे धरण आहे ते बांधून तेथे १५ टीएमसी पाणी, जे तिकडे जात आहे, त्याचा वेगळा विनियोग करण्याचा भविष्यात आपल्याला विचार करावा लागेल. गुजरातला आपण सांगितले आहे की, १५ टीएमसी पाणी तुम्हाला देऊ शकत नाही. आम्ही तुमच्या नदीजोड योजनेत सहभागी झालो तर केंद्र सरकारचे गुजरातला देखील भरपूर पैसे मिळणार आहेत आणि त्यामुळे १५ टीएमसी पाणी आम्हाला त्यांनी उकाई धरणातून द्यावे, ही आपली सातत्याने भूमिका आहे.

असुधारित प्रत

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी दिलेले उत्तर मी येथे २० वर्षांपासून ऐकत आहे. माझी हरकत आहे. मुंबईला पाणी पाहिजे. आम्ही सभागृहात अनेक वेळा बोललो होतो की, चिपळूणचे पाणी उचलून मुंबईमध्ये आणावे. फक्त दीडशे कि.मी. पाईपलाईन टाकायची आहे. ते पाणी आणले तर बाकी मुंबईला येणारे पाणी तुम्ही मराठवाड्याला द्यावे. आम्ही हे अनेक वर्षे येथे बोलत आहोत. त्याचा अभ्यास त्यांनी करावा. माननीय मंत्री त्याचे उत्तर देत नाहीत. माननीय मंत्री याचा विचार करतील काय ? चिपळूणचे लाखो लिटर पाणी जात आहे, ते येथे आणावे.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, कोकणातून खालून पाणी मुंबईपर्यंत आणण्याचा आपला प्रस्ताव आहे. आपल्याल ग्रॅव्हिटीने जे पाणी येईल ते जास्त किफायतशीर होईल, कायम स्वरुपाचे होईल. वरुन येणारे पाणी हे ग्रॅव्हिटीने टनेलच्या माध्यमातून येणार आहे. आपण जो प्रस्ताव सांगत आहात तो प्रस्ताव आपल्याकडे इतका ॲडव्हान्स स्टेजला गेलेला नाही, जेवढ्या ॲडव्हान्स स्टेजला हे प्रकल्प गेले आहेत. मराठवाड्याला पाणी कमी पडू न देता यातील पाणी मराठवाड्याला देणे असे सर्व पर्याय खुले आहेत. फक्त आपल्याला तेथे धरणे बांधून पाणी अडविले पाहिजे. धरणे अस्तित्वात नाहीत. तेथे धरणे बांधली पाहिजेत. ते मोठे प्रकल्प आहेत आणि ते करण्यासाठी ....

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, तुमची भावना आहे. तुम्ही बोगदा टाकलेला आहे. ते उचलून तेथे लावावे.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, तुम्ही खालच्या बाजूचे म्हणत आहात. मी वरच्या बाजूचे म्हणत आहे. दमणगंगा, पिंजाळबाबत म्हणत आहे.

श्री. सतीश चव्हाण : सभापती महोदय, मी माननीय मंत्री श्री. जयंत पाटील यांचे अभिनंदन करतो. हा करार गुजरात सरकारबरोबर करावा असा भारत सरकारचा देखील दबाव आहे. बरोबर आहे का ? गुजरात सरकार देखील दबाव आणत आहे. राज्य शासनाने निर्णय घेतला आहे की, आपण करारातून बाहेर पडायचे आहे. आपण

श्री. सतीश चव्हाण ....

गोदावरीमध्ये किती पाणी जाणार आहे हे सांगितले आहे. माझे फक्त दोन प्रश्न आहेत. प्रस्तावित दोन योजना आहेत. मुंबईला व गोदावरीला पाणीपुरवठा अशा त्या दोन्ही योजनांचा खर्च किती आहे ? डीपीआर तयार झाल्यानंतर हजारो कोटी रुपये याला लागणार आहेत. किती वर्षांत पूर्ण होणार आहे असे आपण नंतर म्हणणार आहोत. कारण २१ टीएमसी पाण्याचा प्रश्न मागच्या २५ वर्षांपासून प्रलंबित आहे. आपण २१ टीएमसी पाणी उचला होण्यासाठी तरतूद करीत आहोत. मात्र किती वर्षे लागणार आहेत हे अजून माहीत नाही. त्यामुळे याही प्रस्तावाचे तसेच होणार का अशी मला भीती आहे. त्यामुळे आपण या दोन्ही योजनांना विशेषत: नार व गोदावरीमध्ये पाणी येणार आहे यासाठी एकूण खर्च किती होणार आहे या संदर्भात अंदाजे सांगावे. आपण ते काम किती वर्षांत पूर्ण करणार आहात ?

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, या दोन योजनांचे पाणी नाशिक जिल्ह्यातील डोंगराच्या खाली बरेच आहे. तेथून पाणी उचलणे आणि आपल्याला पूर्वेकडे वळविणे यासाठी मोठा खर्च आहे. सरकारने त्यासाठी वळण बंधारे ज्यातून फक्त पाणी डायव्हर्ट करणे आणि सोप्यारित्या ग्रॅव्हिटीने येणे याला प्राधान्य दिले आहे. आपण कोणत्याही परिस्थितीत पहिल्यांदा त्याला प्राधान्य दिले आहे. बरेचसे बंधारे आता पूर्णत्वाला आले आहेत किंवा कामे सुरु करीत आहोत. दमणगंगा, पिंजाळ हा आंतरराज्य प्रकल्प आहे, त्याचा साधारणपणे अंदाजित खर्च ३१ अब्ज घनफूट पाण्यासाठी ३८६७ कोटी रुपये आहे. नार, पार, गिरणा यासाठी ५६०४ कोटी रुपये आहेत. साडे दहा अब्ज घनफूट पाणी आहे. पार, गोदावरी यासाठी २७४४ कोटी रुपये आहेत. ३.४२ टीएमसी पाणी आहे. दमणगंगा, वैतरणा, गोदावरी ७.१३ टीएमसी पाणी आहे. ३२९२ कोटी रुपये खर्च आहे. दमणगंगा, एकदरे, गोदावरी ५ टीएमसी पाणी असून ७८५कोटी रुपये खर्च आहे. साधारणपणे असे मोठे आकडे आहेत.

नंतर श्री. खर्चे ....

श्री.जयंत पाटील......

सभापती महोदय, यासाठी प्राधान्य देणे आवश्यक आहे, मराठवाड्यासाठी पाण्याची किंमत किती आहे हे आपणाला मोजण्याची आवश्यकता आहे. मराठवाड्यात पाण्याचे मोठे दुर्भिष्य आहे. वळण बंधाऱ्याबाबत वैतरणा व मुकणे धरणाबाबत मी सांगितले आहे. सहजासहजी पाणी वळवू शकतो असे प्रकल्प करण्यात आले आहेत. मांजरपाळा हा वळणबंधारा अतिशय चांगला झाला आहे. पांजरपाळा वळण बंधारा सक्सेसफूल झाला असून त्यांचा खूप फायदा झाला आहे. पाणी वळविण्यासाठी वळण बंधारे उपयुक्त आहेत. एकधरे डॅमधून पाणी लिफ्ट करणे तेथून ते वाघाड डॅम किवा आळंदी डॅममध्ये वळविणे. तसेच गंगापूरपर्यंत पाणी आणावयाचे असेल तर हे पाणी लिफ्ट करुन वळविण्यात येत आहे. त्यामुळे किंमत वाढणार यामध्ये दुमत नाही. जे सोपे व स्वस्त आहे ते पाणी अगोदर वळविण्यासाठी राज्य सरकार प्राधान्य देत आहे. जसे प्रोजेक्ट डेव्हलप होतीत तसे ते हातात घेऊन पाणी वळविणे गरजेचे आहे.

श्री.अमरनाथ राजूरकर : सभापती महोदय, मी सर्वप्रथम माननीय मंत्री श्री जयंत पाटील यांचे अभिनंदन करतो. मराठवाड्यासाठी माननीय मंत्री श्री.जयंत पाटील, माननीय मंत्री श्री.अशोक चव्हाण व माननीय मंत्री श्री.धनंजय मुंडे यांनी महत्वाची बैठक घेतली. पैनगंगेमध्ये ४० टीएमसी पाणी व गोदावरीमध्ये २४ टीएमसी पाणी उपलब्ध करुन दिले त्यामुळे मी मंत्री महोदयांचे प्रथम अभिनंदन करतो. अशा प्रकारे एकूण ६४ टीएमसी पाणी उपलब्ध करुन दिले. या पाण्यातून पैनगंगा नदीवर सात बंधारे बांधण्यात येणार आहे असे मंत्री महोदयांनी सांगितले आहे. गोदावरी खोऱ्यावर २२ बंधारे बांधण्यात येणार आहोत. मराठवाड्याच्या बाभळी बंधाऱ्यातून हजारो टीएमसी पाणी तेलंगणा राज्यात वाहून जाते त्यामुळे असा निर्णय घेण्यात आला. मंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, ६४ टीएमसी पाण्याचे पाणी उपलब्धता प्रमाणपत्र कधी देण्यात येईल व हे प्रकल्प कधीपर्यंत सुरु करण्यात येतील ?

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, या प्रकल्पांसाठी पाणी उपलब्धतेच्या प्रमाणपत्रा संदर्भात माननीय मंत्री श्री. अशोक चव्हाण व माझी चर्चा परवा झाली

श्री.जयंत पाटील....

आहे. त्याची प्रोसेस सुरु आहे. कदाचित पुढील आठ ते दहा दिवसात आपण निष्कर्षाप्रत येऊ. त्यानंतर ते प्रकल्प लवकर सुरु करावेत असा शासनाचा प्रयत्न आहे. नांदेड व हिंगोली जिल्ह्यातील प्रकल्पांना गती मिळाली तर तेथील लोकांना खूप मोठ्या प्रमाणात दिलासा मिळणार आहे.

श्री.संजय दौंड : सभापती महोदय, नार-पार खोऱ्यातील १५ टीएमसी पाणी गुजरातमध्ये १२०० किलोमीटर अंतरावर उत्तरेकडे वळविण्यात येणार यासंदर्भात ही लक्षवेधी सूचना सन्माननीय सदस्यांनी मांडली आहे. माझा प्रश्न असा आहे की, गुजरात सरकारची दिल्लीमध्ये स्वतंत्र यंत्रणा आहे.  केंद्र सरकारकडून नदीजोड प्रकल्पांचे प्रस्ताव तयार करणे, त्याचा पाठपुरावा करणे, यासाठी दिल्लीत अधीक्षक अभियंता स्तरावर स्वतंत्र कार्यालय उभारण्यात आले आहे. त्या मार्फत पाठपुरावा करुन तेथील प्रकल्प मार्गी लावण्यात येत आहेत. सबब महाराष्ट्र शासनाने दिल्लीमध्ये स्वत:ची सरकारी स्वतंत्र यंत्रणा दिल्लीत स्थापन करावी जेणेकरुन राज्यातील प्रकल्प लवकर पूर्ण होतील.

सभापती महोदय, पार नदी महाराष्ट्रातून उगम पावून गुजरात राज्यात जाते व तेथून समुद्राला जाऊन मिळते. या नदीचे एकूण पाणलोट क्षेत्र १६४८ चौरस किलोमीटर असून त्यापैकी महाराष्ट्राचे पाणलोट क्षेत्र ७७३ चौरस किलोमीटर आहे. गुजरात राज्याचे ८७५ चौरस किलोमीटर आहे. चितळे आयोगानुसार महाराष्ट्रात ५० टीएमसी पाणी व गुजरात राज्याला ५६.६ टीएमसी पाणी मिळायला हवे असे असताना महाराष्ट्राच्या वाट्याचे पाणी लगतच्या तापी व गोदावरी खोऱ्यात न वळविता अन्य राज्याकडे केंद्र सरकारच्या खर्चातून वळविण्यात येते हे योग्य आहे काय ? दुसरा प्रश्न असा आहे की, महाराष्ट्र जलसंपदा विभागाने उपसा क्रमांक ३ व ४ हा डीपीआर तयार करुन ३.५ टीएमसी पाण्याचा उपसा करुन गोदावरी खोऱ्यात वळविण्याची व्यवस्था केली असून ही योजना सुधारित केल्यास ८ ते ९ टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यात पार खोऱ्यातून आणणे शक्य असूनही त्याबाबत महाराष्ट्र शासन तातडीने कारवाई का करीत नाही ?

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, ३ टीएमसी ऐवजी ९ टीएमसी पाणी होऊ शकते असा दावा केला आहे. त्यामध्ये वेगवेगळ्या धरणातून जेवढे पाणी लिफ्ट करु तेवढे ते वाढणार आहेत. त्यामुळे कमीत कमी उंचीवरुन लिफ्ट करण्याची क्षमता आहे व कमीत कमी खर्चात जी कामे होतील ते तीन ते साडेतीन टीएमसी पाणी आहे. खालून आणखी पाणी उचलले तर खालच्या स्तरावर जास्त धरणे तयार करु शकतो व तेथून पाणी उचलू शकतो. फिजिबिलीटी रिपोर्ट पाहून निर्णय घेणे आवश्यक आहे.

---------

असुधारित प्रत

**पृ.शी.** : अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे नागपूर जिल्ह्यातील विविध तालुक्यातील शेतपिके व फळबागांचे झालेल्या नुकसानीची भरपाई मिळणे

**मु.शी.** : अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे नागपूर जिल्ह्यातील विविध तालुक्यातील शेतपिके व फळबागांचे झालेल्या नुकसानीची भरपाई मिळणे यासंबंधी श्री.चंद्रशेखर बावनकुळे, वि.प.स.,यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (नागपूर स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यात नुकत्याच अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे नागपूर जिल्ह्यातील काटोल, सावनेर, कळमेश्वर, रामटेक, पारशिवनी आदी तालुक्यात सुमारे ६ हजार ४५ हेक्टर क्षेत्रावरील शेतपिके व फळबागाचे नुकसान झालेले असुन त्यामध्ये ८१७९ शेतकऱ्यांचा समावेश असणे, संपूर्ण नुकसानभरपाईपोटी शासनाकडे ५ कोटी ६६ लक्ष रुपये इतक्या निधीची मागणी करण्यांत आलेली असणे, सोबतच वर्धा जिल्ह्यातील ८ हजार हेक्टर क्षेत्र बाधित झाल्याने जवळपास ३ कोटी ७७ लक्ष रूपयांची मागणी केलेली असणे, सोबतच रस्ते व पुलांच्या दुरूस्तीबद्दल झालेल्या बैठकीत निर्देश दिलेले असणे, मात्र अद्यापही शासनाने मदतीबाबत कुठलीही कार्यवाही केलेली नसणे, नागपूर जिल्ह्यातील नैसर्गिक आपत्ती संदर्भातील ३ लक्ष ४९ हजार ५८२ शेतकऱ्यांचे २ लक्ष ८४ हजार हेक्टर क्षेत्र बाधित झालेले असणे त्यात २२६ कोटी ६३ लक्ष रूपये नुकसान भरपाईचा समावेश असणे, हा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असणे, शासन या संदर्भातील प्रस्तावाला मंजुरी प्रदान करणार की नाही असा संभ्रम निर्माण होत असणे, त्यामुळे शेतकऱ्यांना नुकसानीपोटी आत्महत्यांशिवाय पर्याय उपलब्ध नसणे, बैठक घेऊन ही प्रश्न निकाली निघत नसणे, याबाबत ठोस कार्यवाहीची आवश्यकता असणे, त्यामुळे मागील व नवीन नुकसान

श्री.चंद्रशेखर बावनकुळे....

भरपाई प्रस्तावाला मंजुरी देऊन निधी उपलब्ध करण्याची आवश्यकता व त्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.विजय वडेट्टीवार ( मदत व पुनर्वसन मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत

श्री.चंद्रशेखर बावनकुळे (नागपूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, पूर्व विदर्भातील पाच जिल्ह्यासंदर्भात ही लक्षवेधी सूचना असून त्याबाबत माझी एक चूक झाली आहे. २२६ कोटी ६३ लक्ष रुपये अशी रक्कम नमूद केली आहे. त्याऐवजी १३२० कोटी रुपये नमूद करायला पाहिजे होते. अशा प्रकारे लक्षवेधी सूचनेमध्ये ही सुधारणा करायची आहे. पूर्व विदर्भात गारपीट व अवकाळी पावसामुळे १३२० कोटी रुपयांचे नुकसान झाले. माझ्याकडे विभागीय आयुक्त यांचे १ ते ६५ पत्र आहेत. ही माहिती मी मंत्री महोदयांना आपल्या माध्यमातून पाठवितो. पूर्व विदर्भातील शेतकऱ्यांना नुकसान भरपाईचे १३२० कोटी रुपये किती दिवसात वितरीत करण्यात येतील. येणाऱ्या बजेटमध्ये याविषयी तरतूद करण्यात येईल काय ? किती दिवसात हा निधी उपलब्ध करुन देण्यात येईल याबाबत मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे यांनी पूर्व विदर्भातील अवकाळी पावसामुळे शेतीचे नुकसान झाले त्यासंदर्भात लक्षवेधी सूचना मांडलेली आहे. राज्यामध्ये विविध ठिकाणी अवकाळी पाऊस झाला. आपणा सगळयांना माहिती आहे की, या सर्व मदतीसाठी एसडीआरएफचे निकष ठरलेले असतात त्या निकषाप्रमाणे ती मदत देण्यात येते. मध्यंतरी ३ जून २०२१ रोजी निसर्ग चक्रीवादळामुळे व अवकाळी पावसामुळे सन २०२०-२१ मध्ये झालेल्या नुकसानीसाठी १४० कोटी रुपये देण्यात आले. नागपूर विभागात पूर आला होता, त्यावेळी १२२ कोटी रुपये शेतकऱ्यांना दिले. जून ते ऑक्टोबर, २०२० मध्ये अतिवृष्टी झाली ६५ मिलीमीटर पेक्षा जास्त पाऊस पडला त्यामुळे ४३७४ कोटी रुपयांची मदत त्यावेळी करण्यात आली. फेब्रुवारी ते मे २०२० मध्ये गारपीट व अवेळी पाऊस झाला त्यावेळी एसडीआरएफच्या निकषानुसार २४७ कोटी रुपयांची मदत करण्यात आली. सन २०२०-२१ मध्ये शेतकऱ्यांना एकूण ४८८४ कोटी रुपयांची मदत करण्यात आली. सन २०२१-२२ मध्ये तोक्ते चक्री वादळ आले,अवेळी पाऊस येऊन गारपीट झाली. जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यात अतिवृष्टी झाली त्यावेळी नुकसान भरपाईसाठी एकूण ५४९६ कोटी रुपयांची मदत

श्री.विजय वडेट्टीवार....

करण्यात आली. अशा प्रकारे १०,३८१ कोटी रुपयांची मदत शेतकऱ्यांना प्रत्यक्ष मिळाली आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे यांचे असे म्हणणे आहे की, हा प्रस्ताव आयुक्तांनी पाठविला आहे. या विषयाबाबत मंत्रिमंडळात चर्चा झाली व असे प्रस्ताव स्थानिक पातळीवरुन मागविण्याचा निर्णय झाला. त्यामुळे प्रत्येक विभागवार प्रस्ताव आले आहेत. नागपूर विभागाकडून १२०४ कोटी रुपयांचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे. अमरावती विभागाकडून २५६ कोटी अशा प्रकारे एकूण १४६० कोटी रुपयांचे प्रस्ताव आले आहेत. महाराष्ट्राचा विचार केला तर मराठवाड्यात ४८ लाख हेक्टरवरील सोयाबीन पिकाचे नुकसान झाले होते. त्यांना देखील २६०० कोटी रुपयांची मदत उपलब्ध करुन देण्यात आली होती. सन्माननीय सदस्य सांगत आहेत तो प्रस्ताव आमच्याकडे आला आहे. एसडीआरएफच्या निकषात तो प्रस्ताव मोडत नाही. मंत्रिमंडळ बैठकीत याबाबत चर्चा झाली आहे. त्यावेळी पेंडामिक परिस्थिती होती. राज्यावर दोन वर्षे कोरोनाचे सावट असताना शेतकऱ्यांना निकषात बसतात, त्यापेक्षा अधिक निधी देण्यासाठी निकष बदली करुन मदत केली.

या नंतर श्री.बोरले....

असुधारित प्रत

श्री.विजय वडेट्टीवार.......

आम्ही पूर्वीच्या निकषात वाढ करुन जवळपास १०,३८१ कोटी रुपयांची शेतकऱ्यांना प्रत्यक्ष मदत दिली. मागील दोन वर्षात शेतीसाठी ही मदत देण्यात आलेली आहे. सदर प्रस्ताव आल्यानंतर जी रक्कम निकषात बसेल ती मदत करण्यात येईल आणि एसडीआरएफच्या निकषाच्या बाहेर असेल तर मात्र मदत करणे कठीण आहे, हे मी स्पष्टपणे सांगू इच्छितो. आम्ही बघू, पाहू वगैरे उत्तर देण्यापेक्षा जे निकषात बसेल ती रक्कम शेतकऱ्यांना दिली पाहिजे. आम्ही त्या दृष्टीने निश्चितपणे सकारात्मक निर्णय घेऊ.

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, विभागीय आयुक्त एसडीआरएफच्या निकषात बसत नसेल तर प्रस्तावच पाठवू शकत नाहीत. विभागीय आयुक्त महाराष्ट्र शासनाच्या एसडीआरएफच्या नियमाप्रमाणेच प्रस्ताव पाठवितात. मी मंत्री महोदयांना साधा, सरळ प्रश्न विचारलेला आहे. मंत्री महोदयांनी या संदर्भात जी आकडेवारी दिली त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. शासनाने शेतकऱ्यांना मदत केली, मंत्री महोदय शेतकऱ्यांना मदत करण्याची भूमिका घेत आहेत. मंत्री महोदय व आम्ही पूर्व विदर्भात राहतो. शेतकऱ्यांचे १३२० कोटी रुपये थकीत असतील तर आपण त्यासाठी आग्रही भूमिका घेतली पाहिजे. विभागीय आयुक्तांनी जे प्रस्ताव पाठविले ते एसडीआरएफच्या निकषात बसणारे आहेत. त्यापैकी एकही प्रस्ताव एसडीआरएफच्या निकषाच्या बाहेरचा नाही. विभागीय आयुक्तांनी "एसडीआरएफच्या निकषात बसणारे प्रस्ताव" असे नमूद केले आहे. माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, आपण पुढील ३ महिन्यात, २ महिन्यात, १ महिन्यात, ३० जुलै, ३० मे, १५ ऑगस्ट जी तारीख सांगावयाची आहे ती सांगावी. कोणत्या तारखेच्या आत १३२० कोटी रुपये मदतीचे वाटप करण्यात येणार आहे ?

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, आमच्याकडे सर्व विभागाकडून प्रस्ताव प्राप्त झालेला आहे. अवेळी आणि संततधार पडलेल्या पावसामुळे जे नुकसान झाले त्या संदर्भातील तो प्रस्ताव आहे. परंतु एसडीआरएफचे निकष काय आहेत ?

श्री.विजय वडेट्टीवार.......

६५ मी.मी. पेक्षा जास्त पाऊस असे एसडीआरएफचे निकष आहेत. आम्ही या

असुधारित प्रत

संदर्भात माहिती घेतलेली आहे. ३,३९९.४० हेक्टरचे नुकसान झालेले आहे. अधिवेशन संपल्याबरोबर शेतकऱ्यांना जवळपास २९ कोटी ९० लाख रुपये उपलब्ध करुन देण्यात येतील. हे निकषात बसत आहे. मी सांगू इच्छितो की, जानेवारी २००० मध्ये जो पाऊस झाला आणि एसडीआरएफच्या निकषात बसणारा जो निधी आहे तो अधिवेशन संपल्याबरोबर किंवा त्यापूर्वी सुद्धा उपलब्ध करुन देण्यात येईल. आम्ही फाईल मागविलेली आहे. सदर फाईलवर स्वाक्षरी करुन ती रक्कम शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी वळती करण्यात येईल. आपण घरांचे नुकसान वगैरेसाठी मदत देत आहोत. आम्ही पुन्हा तपासणी करु. तुम्ही विदर्भातील आहात, मी सुद्धा विदर्भातील आहे. विदर्भापेक्षा शेतकऱ्यांना मदत मिळत आहे. जिराईत, बागायती, फळबाग यासाठी एसडीआरएफच्या निकषाची जी अट आहे त्यामध्ये वाढ व्हावी यासाठी आम्ही केंद्र शासनाकडे पाठपुरावा करीत आहोत. प्रत्येक पंचवार्षिक योजनेत यामध्ये वाढ होणे अपेक्षित आहे. मागील १० वर्षांपासून यामध्ये वाढ झालेली नाही. यामध्ये वाढ झाली तर आपण निश्चितपणे शेतकऱ्यांना अधिकची मदत देऊ शकतो. मी सांगितल्याप्रमाणे ३० कोटी रुपये त्वरित देण्यात येतील. उर्वरित निधीबाबत तपासणी करुन हे निकषात बसते, हे निकषात बसत नाही याबाबत आपल्याला लेखी कळविण्यात येईल. आम्ही जे निकषात बसते तो निधी महिन्याभरात उपलब्ध करुन देऊ.

श्री.शशिकांत शिंदे : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात असे नमूद केले आहे की, "सदर बैठकीमध्ये पावसामुळे रस्त्यांच्या नुकसानीबाबत माहिती उपलब्ध नसल्याचे संबंधितानी मा.मंत्री (मदत व पुनर्वसन) यांच्या निदर्शनास आणले होते. तसेच, रस्ते व पुलांच्या दुरुस्तीबाबतचा कोणताही प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबित नाही." मी मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, ज्याप्रमाणे विदर्भात पाऊस पडला त्याप्रमाणे राज्यातील अनेक जिल्ह्यात पाऊस पडला होता. माननीय गृह राज्यमंत्री श्री.शंभुराज देसाई सभागृहात उपस्थित आहेत. सातारा

श्री.शशिकांत शिंदे........

जिल्ह्यातील पाटण, वाई, महाबळेश्वर भागात मोठ्या प्रमाणावर पाऊस पडला होता. पावसामुळे रस्ते खरडून गेले, पुलाची हानी झाली. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी त्या भागाचा दौरा केला होता. पावसामुळे जमिनी खरडून गेलेल्या आहेत. त्यावेळी माननीय उप मुख्यमंत्री सातारा जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. त्यांनी शासनाच्या

वतीने ग्वाही दिली होती की, या संदर्भातील प्रस्ताव आमच्याकडे प्राप्त झाल्यानंतर आम्ही त्वरित निधी उपलब्ध करुन देऊ. परंतु अद्याप रस्ते व इतर प्रस्तावासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला नाही. आपल्याकडे अशा प्रकारचा प्रस्ताव प्राप्त झालेला आहे काय आणि असल्यास त्यासाठी तत्काळ निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे काय ?

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे यांना सांगू इच्छितो की, मागील वेळी अतिवृष्टीमुळे जे रस्ते खराब झाले त्या प्रस्तावानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाला निधी उपलब्ध करुन देण्यासाठी आम्ही येणाऱ्या अर्थसंकल्पात तरतूद करीत आहोत. खरे म्हणजे निधी दिल्यानंतर तो बाधित रस्त्यांच्या कामासाठी खर्च केला पाहिजे. परंतु पुरामुळे जे रस्ते बाधित झाले त्या व्यतिरिक्त देखील रस्त्यांचे प्रस्ताव पाठविले जातात. त्यामुळे गफलत होते. सदर निधी आमच्या विभागाच्या माध्यमातून वितरीत करण्यात यावा, अशी मी उप मुख्यमंत्री महोदयांकडे विनंती केलेली आहे. तो प्रस्ताव आल्यानंतर तपासून घेण्यात येईल आणि त्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

**सभापती :** मंत्री महोदय, मी स्वत: सातारा जिल्ह्यातील आहे. माझी आपल्याला सूचना आहे. सातारा जिल्ह्यातील दोन सन्माननीय सदस्य सभागृहात उपस्थित आहेत. पाटण, वाई व महाबळेश्वर भागात अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. मलाही या संदर्भात कल्पना आहे. सन्मानीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे यांनी या संदर्भात प्रश्न उपस्थित केल्यामुळे मी आपल्या सोईनुसार माझ्या दालनात बैठक आयोजित करतो. आपण वित्तमंत्री महोदयांना देखील

**सभापती.......**

बैठकीसाठी निमंत्रित करु. कारण तरतूद झाल्याशिवाय पुढील कार्यवाही होणार नाही. मी आपल्याला उदाहरण देतो. महाबळेश्वर-पोलादपूर रस्ता अतिवृष्टीमुळे वाहून गेला होता. माझ्या माहिती प्रमाणे आता त्या रस्त्याचे काम पूर्ण झालेले आहे. आपण आता हा विषय येथेच थांबवू.

श्री.प्रवीण दटके : सभापती महोदय, विभागीय आयुक्तांनी जो प्रस्ताव पाठविलेला आहे तो एसडीआरएफच्या नियमाप्रमाणे पाठविलेला आहे. १३२० कोटी रुपयांपैकी केवळ ३०-४० कोटी रुपये मिळणार असतील तर ते शेतकऱ्यांच्या

तोंडाला पाने पुसण्यासारखे आहे. आपल्याला वस्तुस्थिती माहिती आहे. आपण या संदर्भात बैठका घेतलेल्या आहेत. यावर्षी धानासाठी बोनस मिळाला नाही. यावर्षी अतिवृष्टी झाली, धान खराब झाले. अवकाळी पाऊस पडल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. विभागीय आयुक्तांनी पाठविलेला प्रस्ताव एसडीआरएफच्या नियमाप्रमाणे बरोबर असल्यामुळे मंत्री महोदयांनी निधी उपलब्ध करुन देण्यासाठी वित्तमंत्री महोदयांना विनंती करावी. तसेच, सदर प्रस्ताव एसडीआरएफच्या नियमाप्रमाणे नसेल तर विभागीय आयुक्तांवर कारवाई करण्यात येणार आहे काय ?

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, आपण सूचना केल्याप्रमाणे या संदर्भात आपल्या दानात बैठक आयोजित करण्यात यावी. आम्ही यावेळी अर्थसंकल्पाच्या माध्यमातून रस्त्यांच्या कामासाठी ३ हजार कोटी रुपयांची मागणी केलेली आहे आणि ती मागणी मान्य होईल, असा मला विश्वास आहे. मी सांगू इच्छितो की, जानेवारी महिन्यात पाऊस पडला होता. भाताचे पीक नोव्हेंबर महिन्यात निघते. भाताचे पीक बाधित झालेले नसून रब्बी पीक बाधित झालेले आहे. जानेवारी २०२२ मध्ये अवकाळी, अवेळी व संततधार पाऊस पडल्यामुळे रब्बी पिकांचे जे नुकसान झाले त्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रश्न उपस्थित केलेला आहे. यामध्ये धान उत्पादकांचे नुकसान झालेले नाही. कारण

श्री.विजय वडेट्टीवार.......

खरीपाचे पहिले पीक साधारणत: ऑक्टोबर ते नोव्हेंबर महिन्यात निघते. मी सभागृहाचा जास्त वेळ घेत नाही. एसडीआरएफच्या निकषात बसत असेल तर शंभर टक्के मदत देण्यात येईल.

श्री.अभिजीत वंजारी : सभापती महोदय, अतिवृष्टीमुळे नागपूर जिल्ह्यातील १३ तालुक्यांमध्ये जास्त नुकसान झालेले आहे. १० हजारापेक्षा जास्त शेतकऱ्यांचे हजारो हेक्टर शेतीचे नुकसान झालेले आहे. त्यामुळे १३२० कोटी रुपयांची मागणी रास्त आहे. सदर मागणी मान्य करण्यात यावी, अशी आमची सभागृहाच्या वतीने विनंती आहे.

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, तपासून कार्यवाही करण्यात येईल.

-------

असुधारित प्रत

**पृ.शी.** : बीड जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था बिघडलेली असणे.

**मु.शी.** : बीड जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था बिघडलेली असणे यासंबंधी सर्वश्री विनायक मेटे, प्रवीण दरेकर, विजय ऊर्फ भाई गिरकर, प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.विनायक मेटे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय गृहमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"बीड जिल्हयामध्ये कायदा व सुव्यवस्था संपूर्णपणे बिघडलेली असणे, पोलिसांचा आणि कायद्याचा कोणताही धाक राहिलेला नसणे, बीड जिल्हा पोलीस अधिक्षक यांचे पोलीस यंत्रणेवर कोणतेही नियंत्रण नसणे, परिणामी बीड जिल्हयामध्ये गँगवॉर भडकणे, जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये सत्ताधारी लोकांनी गोळ्या झाडणे, मारामारी करणे, जिवे मारण्याचा प्रयत्न करणे, यामध्ये माजी मंत्री व विद्यमान लोकप्रतिनिधी यांच्या कुटुंबामध्ये आप-आपसात गँगवॉर भडकणे, त्यामुळे दोन इसमांना गोळ्या घालून जखमी करणे, त्यामुळे ते औरंगाबाद येथे रुग्णालयामध्ये उपचार घेत असणे, यामुळे संपूर्ण बीड जिल्हयामध्ये दहशत, भिती निर्माण होणे, या प्रकरणाकडे पोलिस यांनी बघ्याची भूमिका घेणे, जिल्हा पोलीस अधिक्षक यांनी तपास व्यवस्थित न करणे, दोन्ही बाजूच्या गुन्हेगारांना वाचवण्याचा प्रयत्न करणे आणि अटकेपासून त्यांना वाचवणे व कायद्याचा अनादर करणे, कोणतेही पुरावे न शोधणे आणि जिल्हाधिकारी यांनी या प्रकरणाबाबत काहीही प्रतिक्रिया न देणे आणि जिल्हाधिकारी कार्यालयामधील CCTV चालू आहेत की नाही याकडे जाणिवपूर्वक दुर्लक्ष करणे, सर्व बीड जिल्हा निराधार आणि राम भरोसे होणे, त्याचबरोबर दररोज बीड शहरामध्ये दिवसा गोळ्या झाडण्याचे प्रकार वाढणे, खून बलात्कार, दरोडे, चोऱ्या मारामारी वाढत जाणे आणि बीड जिल्हयामध्ये सत्ताधारी पक्षाचेच लोक क्लब

श्री.विनायक मेटे.......

चालवत असणे, गुटखा, मटका दारु असे अवैध धंदे करणे, काही पदाधिकारी क्रिकेटवर सट्टा लावत असणे, बुकी म्हणून राजसरोसपणे धंदा करत असणे, या अवैध धंदयांवर पोलीसांचे कोणतेही नियंत्रण नसणे, राजरोजसपणे पोलीस यंत्रणा मोठ्याप्रमाणात भ्रष्टाचारामध्ये गुंतणे, गुन्हेगारांना, अवैध धंदेवाल्यांना साथ देणे, काही लोकांच्या मर्जीप्रमाणे वागत राहणे, यामुळे बीड जिल्ह्याची कायदा व सुव्यवस्था संपूर्णपणे ढासळलेली असणे, याबाबत जनतेमध्ये भीती पसरणे, यांची गंभीर दखल शासनाने घेऊन यावर त्यावर शासनाने तात्काळ करावयाची कारवाई व उपाययोजना."

श्री.शंभुराज देसाई (गृह राज्यमंत्री (ग्रामीण)) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो/ठेवते.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----------

असुधारित प्रत

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, सदर लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून सत्ताधारी मंडळी कायदा व सुव्यवस्था कशा प्रकारे मोडीत काढण्याचे काम करीत आहे हे मी सांगू इच्छितो.

यानंतर श्री.सांगळे.......

असुधारित प्रत

श्री.विनायक मेटे ...

सभापती महोदय, सदर लक्षवेधी सुचनेला धातूरमातूर उत्तर दिलेले आहे. बीडमध्ये कोठेही गँगवार नाही....

**सभापती :** मी सदर लक्षवेधी सूचना वाचली आहे. मी विधानसभेच्या कामकाजावर लक्ष ठेवून असतो. बीड जिल्हयातील कायदा व सुव्यवस्था या विषयासंबंधी मंत्री महोदयांनी काल विधानसभेमध्ये सविस्तर उत्तर दिलेले आहे. त्यामुळे त्या व्यतिरिक्त आपल्याला दुसरा प्रश्न विचारावयाचा असल्यास आपण तो विचारावा.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, काल विधानसभेमध्ये यासंबंधी चर्चा झाली त्यावेळी सन्माननीय आमदार महोदया....

**सभापती :** आपण या संदर्भात कोणाच्याही नावाचा उल्लेख करु नये.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, या संदर्भात सन्माननीय आमदार महोदया कशा प्रकारे असुरक्षित आहेत ? त्यावरुन मोठा गदारोळ झाला. सभापती महोदय, सत्ताधारी पक्षामध्ये कार्यरत असलेल्या एका कुटुंबामुळे संपूर्ण बीड जिल्हा व शहर दहशतीखाली आहे. २५ तारखेला सदर घटना घडली. त्या घटनेसंबंधी सर्व वर्तमानपत्रांमधून हेड लाईन्समध्ये बातम्या आलेल्या आहेत.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण जे प्रकरण सांगण्याचा प्रयत्न करीत आहात, माझ्या बेस्ट ऑफ नॉलेजप्रमाणे सदर प्रकरणी मंत्री महोदयांनी बीड जिल्हयातील पोलीस अधीक्षकांना रजेवर पाठविलेले आहे. तसेच मंत्री महोदय या संदर्भात बैठक देखील घेणार आहेत. त्यामुळे आपण या बाबतीत सदनाचा जास्त वेळ घेऊ नये.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, मूळ विषय असा आहे की, एखाद्या व्यक्तीवर जबाबदारी दिल्यानंतर तो व्यक्ती जबाबदारीपासून पळ काढून त्याच्या विरोधात वागत असल्यास आपण कोणाकडे बघायचे ? माजी लोकप्रतिनिधीच्या कुटुंबातील लोक दिवसाढवळया जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये गोळीबार करीत

असुधारित प्रत

श्री.विनायक मेटे.......

आहेत. तेथे सीसीटीव्ही नाहीत. सदर प्रकरणी १७-१८ लोकांचा समावेश असताना त्यापैकी फक्त एका व्यक्तीला अटक करण्यात आली. सदर प्रकरणी भा.द.वि. कलम ३०७ समवेत अनेक कलमे लावण्यात आली आहेत. दोन्ही बाजूच्या तक्रार अर्जदारांनी तक्रारीमध्ये असे नमूद केलेले आहे की,....

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी स्पेसिफिक प्रश्न विचारावा. नियमानुसार सन्माननीय सदस्यांना २ उप प्रश्नांपेक्षा जास्त उप प्रश्न विचारता येत नाहीत.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, आपण येथे मला थांबवू शकतात. परंतु बीड जिल्हयामधील लोकांची भीती कोण घालवणार ? जे लोक दिवसाढवळया दरोडे घालत आहेत, खुन करायला लागले आहेत, मारामाऱ्या व बलात्कार करायला लागले आहेत......

**सभापती** : सन्माननीय सदस्य, आपण प्रश्न विचारणार आहात की नाही ?

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, फक्त जमिनीच्या घरगुती कारणावरुन तेथे गोळीबाराची घटना घडली आहे. त्यात १६ ते १७ लोकांचा समावेश आहे. त्यापैकी फक्त एकाच व्यक्ती अटक करण्यात आली. उर्वरित सर्व लोकांना अटक केली जाणार आहे का ? सभापती महोदय, बीडमध्ये महिलेवर चाकू हल्ला, तलवारबाजी, खंडणी, बळी अशा विविध घटना घडत आहेत. राजकीय पक्षाचे प्रमुख लोक क्लब, मटके तसेच बुकी चालवित आहेत. त्यासंबंधी लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये कोणताही उल्लेख करण्यात आलेला नाही. आपण त्यांच्यावर कोणती कारवाई करणार आहात ? तसेच उक्त प्रकरणी उर्वरित राहिलेल्या लोकांना कधी अटक केली जाणार आहे ?

श्री.शंभुराज देसाई : सभापती महोदय, बीड शहरामध्ये सदर घटना घडली आहे. एकाच कुटुंबातील दोन व्यक्तींमध्ये जमीन खरेदी-विक्रीच्या व्यवहारामधून हा वाद झाला आहे. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये संबंधितांवर कोणत्या कलमाअंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे याबाबत सविस्तर उत्तर दिलेले आहे. सदर प्रकरणी दोन्ही बाजूने एकमेकांविरुध्द तक्रार करण्यात आली आहे. सदर प्रकरणी ज्या

असुधारित प्रत

श्री.शंभुराज देसाई....

व्यक्तीने प्रत्यक्ष गोळीबार केला होता त्याला पोलिसांनी अटक केली आहे. इतर आरोपींचा शोध सुरु आहे. जिल्हाधिकारी कार्यालय येथील मुद्रांक कार्यालयाच्या परिसरामध्ये हा गुन्हा घडला. तेथील सीसीटीव्ही फुटेज पोलिसांना मिळत नाही. तेथील सीसीटीव्ही फुटेज पोलिसांच्या ताब्यातील नाही. सदर सीसीटीव्ही फुटेज महसूल यंत्रणेच्या ताब्यात असून त्यांच्या परिसरामधील आहे. तरी सुध्दा आमचा असा प्रयत्न सुरु आहे की, सदर परिसरातील उपस्थित असलेले काही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार याबाबत माहिती सांगू शकतात. दोन्ही बाजूने तक्रार केली जाते तेव्हा दोन्ही बाजूने तक्रारींमध्ये काही नावे जाणीवपूर्वक नमूद केली जातात. याबाबत खात्री करण्याचे काम सुरु आहे. सभापती महोदय, आपण सांगितल्याप्रमाणे या विषयी माननीय गृह मंत्री यांनी विधानसभेमध्ये सविस्तर उत्तर दिलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी ज्या प्रकरणाचा उल्लेख केला आहे त्यात जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये दोन परिवारांमध्ये घडलेल्या वादासंबंधी १५ दिवसांमध्ये वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून चौकशी केली जाईल. त्यात जे कोणी दोषी आढळून येतील त्यांच्यावर कारवाई करु असे माननीय मंत्री महोदयांनी विधानसभेमध्ये उत्तर देताना सांगितलेले आहे. तेच मी या ठिकाणी सांगतो. सदर प्रकरणी चौकशी केली जाईल. सभापती महोदय, सदर प्रकरणी विधानसभेमध्ये ज्या सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला होता त्यांच्या समवेत माननीय गृह मंत्री स्वत: बैठक घेणार आहेत. या सदनामधील ज्या सन्माननीय सदस्यांनी सदर लक्षवेधी सूचना मांडलेली आहे त्याबाबत माननीय गृह मंत्री यांना विनंती करुन आपल्याला देखील सदर बैठकीच्या वेळी चर्चेला बोलाविले जाईल. अशा प्रकारे दोन्ही सदनामधील ज्या सन्माननीय सदस्यांनी लक्षवेधी सूचना मांडलेली आहे अशा सन्माननीय सदस्यांसमवेत माननीय गृह मंत्री यांच्याकडून बैठक घेतली जाईल.

श्री.सुरेश धस : सभापती महोदय, माननीय गृह मंत्री यांनी बीड जिल्हयातील पोलीस अधीक्षकांना रजेवर जाण्यास सांगितले. पोलीस खात्यामधील किती विविध प्रकार असावेत याचे उत्तम उदाहरण बीड जिल्हयामध्ये आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी स्पेसिफिक प्रश्न विचारावा. आपल्याला ही लक्षवेधी सूचना लवकरात लवकर पूर्ण करायची आहे.

श्री.सुरेश धस : सभापती महोदय, ही घटना एकाच पोलीस स्टेशनमध्ये घडलेली नसून बीड जिल्हयातील अनेक ठिकाणी असे प्रकार घडले आहेत. सुवर्णकार समाजाच्या दुकांनामध्ये जाऊन एखाद्या आरोपीला पकडायचे व त्यांना सांगायचे की, ५० तोळे, ५५ तोळे सोने दे. दुकानदारांनी त्यास नाही म्हटले तर तुला उचलून गुन्हयामध्ये टाकतो. पोलीस अधीक्षकांना रजेवर पाठविण्यावर आमचे समाधान झालेले नाही. बीड जिल्हयामध्ये अशा प्रकारे विविध घटना घडलेल्या आहेत. या संदर्भात माननीय राज्य मंत्री यांनी चौकशी करावी. तशी चौकशी केली जाणार आहे का ?

**सभापती :** सन्माननीय सदस्यांनी याबाबत स्पेसिफिक नावासह तक्रार करावी. त्याची चौकशी करण्यात येईल.

श्री.शंभुराज देसाई : सभापती महोदय, होय.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, सदर कुटुंबातील गोळीबाराच्या निमित्ताने बीड जिल्हयात गुन्हेगारांनी हैदोस घातला आहे. याबाबत पोलीस प्रशासन हतबल झाले आहे. साटेलोटे केले जात असून वसुली सुरु आहे. त्यामुळे बीड जिल्हयातील पोलीस अधीक्षकांना सक्तीच्या रजेवर पाठविण्यात आले. याबाबत विधानसभेमध्ये माननीय मंत्री यांनी उत्तर दिलेले आहे. सभापती महोदय, आपले वरिष्ठांचे सभागृह आहे. माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, सदर प्रकरणी पोलीस अधीक्षकांना फक्त रजेवर पाठवून चालणार नाही. सन्माननीय सदस्य श्री.सुरेश धस यांनी वर्णन केलेली गुन्हेगारी आज देखील राजरोसपणे सुरु आहे. त्यामुळे सदर प्रकरणी त्यांना निलंबित केले पाहिजे अशी आमची मागणी आहे. सदर प्रकरणी कोणाचा समावेश आहे याबाबत आम्हाला काही देणेघेणे नाही. दोन्ही गटांमधील संबंधित आरोपींची चौकशी करुन त्यांना टाईमबाऊंड किती दिवसांमध्ये अटक करणार आहात ? सभापती महोदय, मंत्री महोदय राज्य शासनाच्या वतीने सदनामध्ये उत्तर देत असतात. मंत्री महोदयांनी उत्तरात असे सांगितले की, तेथील सीसीटीव्ही फुटेज पोलिसांच्या

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर....

ताब्यातील नाही. ही महसूल यंत्रणेची जबाबदारी असल्यामुळे आपण त्यांच्याकडे विचारणा करावी. सदर प्रकरणी महसूल मधील जबाबदार लोकांविरुध्द कारवाई झाली पाहिजे.

यानंतर श्री.गागरे....

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर .....

सभापती महोदय, बीड जिल्हयात राजरोसपणे चालू असलेल्या अवैध धंद्यांना पायबंद घालण्यासाठी एखादी टीम स्थापन करुन तेथील गुन्हेगारी नष्ट करण्यासाठी काय उपाययोजना करणार आहात ?

श्री.शंभुराज देसाई : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते यांनी सीसीटीव्ही फुटेज कसे उपलब्ध करणार आहात याबाबत प्रश्न विचारला आहे. परंतु महसूल यंत्रणेकडून सीसीटीव्ही फुटेज मिळण्यासाठी पोलिसांनी खूप प्रयत्न केला आहे हे मी सांगू इच्छितो. पण तांत्रिक अडचणीमुळे त्यांच्याकडे ते उपलब्ध नाही. तपास अधिकाऱ्याकडून प्रत्यक्षदर्शी लोकांचा जाबजबाब घेऊन यामध्ये दोन्ही बाजूचे किती लोक सहभागी होते, याचे व्हेरीफिकेशन करण्याचे काम सुरु आहे. माननीय विरोधी पक्ष नेते व सन्माननीय सदस्य श्री.सुरेश धस यांनी अशा गैरप्रकाराबाबत सांगितले आहे.

**सभापती** : याबाबत स्पेसिफिक तक्रारी घेण्यात याव्यात.

श्री.शंभुराज देसाई : सभापती महोदय, तशी तक्रार घेतल्यानंतर चौकशीच करु. पण वेगळा ड्राईव्ह बीड जिल्हयात गृह विभागाकडून घेतला जाईल. सर्व एसडीपीओला तशा सूचना दिल्या जातील. गैरव्यवहारासंदर्भात वेगळा ड्राईव्ह तातडीने घेतला जाईल.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, किती दिवसात अटक करणार, नेमके या प्रश्नाचे उत्तर मंत्री महोदयांनी दिलेले नाही. मी अजून काही प्रश्नही विचारणार आहे.

**सभापती** : आपण केवळ प्रश्न लवकर विचारावेत.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, मुळात तेथे जिल्हाधिकारी कार्यालय व रजिस्ट्री कार्यालयात शेकडो लोक असताना सीसीटीव्ही फुटेज का मिळत नाही, अनेक लोक तुम्हाला का मिळत नाही. याचा अर्थ तुम्हाला लुपहोल्स ठेवायचे आहेत, गुन्हेगार का मिळत नाहीत हा पहिला प्रश्न आहे. दुसरा प्रश्न विचारु इच्छितो की, या लोकांवर कलम ३०७ अन्वये व अन्य सर्व गुन्हे आहेत, ज्यांवर गुन्हे दाखल आहेत

असुधारित प्रत

श्री.विनायक मेटे .....

त्यांना तुम्ही किती दिवसात अटक करणार. तिसरा प्रश्न असा आहे की, अवैध धंद्यामध्ये वाळुचे ठेकेदार आहेत, माजी लोकप्रतिनिधींनी वाळुचे अवैध धंदे चालू केलेले आहेत यामुळे किमान १०-१२ लोक मृत झाले आहेत. वाळूबाबतही आपण स्पेशल ड्राईव्ह घेणार का?.

श्री.शंभुराज देसाई : सभापती महोदय, मी उत्तर दिले आहे की, सर्व अवैध व्यवसायाबाबत स्पेशल ड्राईव बीड जिल्हयात घेतला जाईल. यामध्ये वाळूचाही समावेश केला जाईल. परंतु वाळू बाबत पोलीस व महसूल यंत्रणा यांचेकडून संयुक्त कार्यवाही करावी लागते. तशी संयुक्त टीम करुन त्याबाबतही कारवाई केली जाईल. त्यांची अटक पोलीस टाळत आहेत अशातला भाग नाही. परंतु सकृतदर्शनी पुरावा असला पाहिजे. प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांकडून आम्ही व्हेरीफिकेशन करीत आहोत. एवढयावरुन सदस्यांचे समाधान होत नसेल तर विभागाच्या एसडीपीओ यांना या केसमध्ये स्वत: मॉनीटर करण्याच्या सूचना दिल्या जातील. जे कोणी यामध्ये सहभागी असतील त्यांची निश्चितपणे चौकशी करुन लवकरात लवकर कारवाई केली जाईल.

**सभापती** : मी सभागृहाला सांगू इच्छितो की, लक्षवेधी सूचना क्रमांक ४ वरील चर्चा राहिलेली आहे, त्याबाबत दुपारी निर्णय घेऊ. लक्षवेधी सूचना क्रमांक ५ व ६ पुढे ढकलत आहे.

आता सभागृहाची बैठक दुपारी ३.०० वाजेपर्यत मध्यंतरासाठी स्थगित होत आहे.

(दुपारी ०२.०४ ते दुपारी ३.०० वाजेपर्यत मध्यंतर.)

---------

**(मध्यंतरानंतर)**

**( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.विक्रम काळे )**

**तालिका सभापती :** सर्व सन्माननीय सदस्यांना माझी सूचना आहे की, सभागृहापुढे भरपूर कामकाज असल्यामुळे कोणत्याही विषयावर आपले म्हणणे मांडतांना ते "टू दि पॉईंट "अशाच प्रकारे मांडून सर्व सन्माननीय सदस्यांनी सभागृहाचे सर्व कामकाज पार पाडण्यास सहकार्य करावे.

**<u>मच्छिमार सोसायटया व मच्छिमार संघातील मच्छिमारांचा आझाद मैदान, मुंबई येथे मोर्चा आल्याबाबत</u>**

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे. संपूर्ण महाराष्ट्रातून मच्छिमार सोसायटी व संघातील लोक आज आझाद मैदानावर आलेले आहेत. सध्या जिल्हयातील सागरी किनारपट्टीवर मच्छिमार विविध वादळे, टाळेबंदी, मत्स्यदुष्काळ आदिमुळे भरडला जात आहे. याबाबत असलेल्या ज्या जाचक अटी व शर्ती आहेत, त्यामुळे मच्छिमार अडचणीत आलेला आहे. शासनाने लागू केलेल्या जाचक अटी व शर्तींमुळे १२० पेक्षा उच्च अश्वशक्ती असलेल्या नौकांचा डिझेल कोटा मंजूरीस स्थगिती दिलेली असल्यामुळे त्यांना शासनाकडून डिझेल परतावा मिळत नाही. अशा विविध मागण्यांसाठी आज दिनांक ०८ मार्च,२०२२ रोजी आझाद मैदान,मुंबई येथे भव्य धरणे त्यांनी धरलेले आहे. शासनाने त्याकडे लक्ष द्यावे, ही मी या निमित्ताने विनंती करीत आहे.

**तालिका सभापती :** शासनाने याची नोंद घ्यावी.

श्री.उदय सामंत : ठीक आहे. होय.

----------------

असुधारित प्रत

**पृ.शी.** : राज्यात सर्रासपणे सुरु असलेल्या बोगस पॅथॉलॉजी लॅब्स विरुध्द कडक कारवाई करण्याची नितांत आवश्यकता

**मु.शी.** : राज्यात सर्रासपणे सुरु असलेल्या बोगस पॅथॉलॉजी लॅब्स विरुध्द कडक कारवाई करण्याची नितांत आवश्यकता यासंबंधी डॉ.मनिषा कायंदे,श्री राजहंस सिंह,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.मनिषा कायंदे ( विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, मी नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

मुंबई शहरामध्ये बोगस पॅथॉलॉजी प्रयोगशाळांची झपाटयाने वाढत चाललेली संख्या, मध्यंतरीच्या काळात पॅथॉलॉजी प्रयोगशांमधील गैरप्रकारांना आळा घालाण्याकरिता महाराष्ट्र वैद्यक परिषदेने कडक भूमिका घेऊन अनेक पॅथॉलॉजी प्रयोगशाळांची नोंदणीही रद्द केली होती परंतु या धडक कारवाईमुळे गैरप्रकार करणाऱ्या पॅथॉलॉजी प्रयोगशाळांना शहरात आणि राज्यातही चाप बसेल अशी अपेक्षा असणे, परंतु प्रत्यक्षात आजही मुंबईमध्ये पदवी अर्हता नसलेल्या वैद्यकीय तज्ञांच्या अनुपस्थितीमध्ये अनेक पॅथॉलॉजी लॅब चालविल्या जात असल्याचे निदर्शनास येत असणे, राज्यभरात सुमारे १३ हजार पॅथलॅब असून यातील ८ हजार पॅथलॅब अवैध असणे, मुंबई आणि आजुबाजुच्याच परिसरातील सुमारे दीड हजार पॅथलॅब अवैधपणे चालविले जात असल्याबाबतची माहिती महाराष्ट्र असोसिएशन ऑफ प्रॅक्टिसिंग पॅथॉलॉजिस्ट ॲण्ड मायक्रोबायोलॉजिस्ट असोसिएशने देणे, काही लॅब या पॅथॉलॉजिस्ट नसताना सुरु असणे हे रुग्णांच्या दृष्टीने अत्यंत धोकादायक असणे, राज्यात करोनासारख्या महामारीत या पॅथॉलॉजी लॅबने गरज नसतांना रुग्णांच्या अनेक चाचण्या केलेल्या असणे, रुग्णांच्या कोणत्या चाचण्या कराव्यात यावर कुणाचेही नियंत्रण नसणे, प्रमाणित लॅबची पालिकेकडे आजही नोंद नसणे, मुंबई परिसरात बेकायदा लॅबची संख्या

असुधारित प्रत

झपाटयाने वाढून दीड हजारांवर जाणे, रुग्णांच्या जीवाशी खेळ करणाऱ्या बोगस पॅथॉलॉजीबाबत सखोल चौकशी होणे गरजचे असणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालून राज्यात सर्रासपणे सुरु असलेल्या बोगस पॅथॉलॉजीलॅब्स विरुध्द कडक कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका.

श्री.राजेंद्र पाटील यड्रावकर ( सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----------

असुधारित प्रत

डॉ.मनिषा कायंदे : सभापती महोदय, सामान्य रुग्णांच्या जीवाशी संबंधित असलेली ही लक्षवेधी सूचना आहे. या लक्षवेधी सूचनेचा विषय गंभीर आहे. या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून मी सभागृहाला अवगत करु इच्छिते की, पूर्ण महाराष्ट्रात खासकरुन मोठया शहरांमध्ये आणि छोटया शहरांमध्ये देखील बोगस पॅथॉलॉजी लॅबॉरेटरीजचे जाळे फोफावलेले आहे. त्यामध्ये अर्धवट शिकलेले, कोणी डिप्लोमाधारक, कोणी साधारण सर्टिफिकेट धारक, तसेही नसलेले, जे ऑथॉराईज्ड सिग्नेटरी आहेत, असे देखील व्यक्ती तेथे उपस्थित नसताना अशा प्रकारच्या पॅथॉलॉजी लॅबॉरेटरीज चालविल्या जातात. खासकरुन कोरोनाचे संकट तीव्र असताना वाटेल तशा भावाने सगळया चाचण्या सर्वसामान्य रुग्णांना करायला लावणे, असे प्रकार घडत होते. अमुक चाचणी करावी, तमुक चाचणी करावी, असा आग्रह धरणे हे देखील घडत होते. यामध्ये हजारो रुपये गरीब नागरिकांकडून लुबाडले जात होते. या सर्व चाचण्यांचे जे रिपोर्ट आहेत, त्याच्यामध्ये देखील संदिग्धतता असणारच ! कारण लॅबच जर बोगस आहे, तर त्या रिपोर्टवर तरी कसा विश्वास ठेवणार, हा रिपोर्ट घेऊन डॉक्टरांकडे रुग्ण जातो, त्यावेळी डॉक्टर तरी त्यावर काय निदान करुन औषधोपचार करणार ?

सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना दिनांक ०५ मार्च,२०२० रोजी देखील या सभागृहात आली होती. त्यावेळी आश्वासन दिले होते की, यावर पूर्णपणे कंट्रोल आणला जाईल. संबंधित लोकांवर गुन्हे दाखल होतील. मागील वेळेसची लक्षवेधी सूचना व त्यावरील चर्चा आणि उत्तरे लेखी स्वरुपात माझ्याकडे आहेत. आज रोजी या लक्षवेधीला दोन वर्षे पूर्ण झालेली आहे, तरीही यावर शासन कोणताही अंकुश

असुधारित प्रत

आणू शकलेले नाही. माझा प्रश्न असा आहे की, या लेखी उत्तरामध्ये समिती स्थापन झाल्याचे लिहिलेले आहे. आता ही समिती स्थापन झालेली आहे, ही समिती कधी स्थापन झाली ? या समितीचा अहवाल कधी येणार आहे ? ज्याप्रमाणे शासन डॉक्टरवर देखील बोगस असल्यास त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करते, त्याप्रमाणे या बोगस पॅथॉलॉजी लॅबवर फौजदारी गुन्हे दाखल केली जात आहेत का ? असतील तर अशी किती संख्या आहे की, त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करुन त्यांच्याकडून दंड वसूल करुन त्यांना गजाआड टाकलेले आहे का ?

श्री.राजेंद्र पाटील-यड्रावकर : सभापती महोदय, सद्य:स्थितीत राज्यात पॅथॉलॉजी लॅबची नोंदणी कुठेही करण्यात येत नाही. पॅथॉलॉजी लॅबची नोंदणी केली असली पाहिजे. परंतु पॅथॉलॉजी लॅबची नोंदणी शॉप ॲक्टअंतर्गत होत असते. त्यामुळे शासन सार्वजनिक आरोग्य विभागाच्या माध्यमातून २९ जुलै,२०२१ रोजी वैद्यकीय प्रयोगशाळेचे नियंत्रण आणि नियमन करण्यासंदर्भात मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्यासाठी आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती नेमलेली आहे. येणाऱ्या तीन महिन्यांमध्ये या समितीचा अहवाल आल्यानंतर कारवाई केली जाईल.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, सन २०२० मध्ये ही लक्षवेधी सूचना मांडली गेली होती, असे सन्माननीय सदस्यांनी सांगितलेले आहे. मागील आठ वर्षापासून मी देखील यावर आवाज उठवित आहे. पूर्वी ज्यावेळी काँग्रेसचे सरकार असताना माननीय श्री.पृथ्वीराज चव्हाण हे मुख्यमंत्री महोदय होते. या बोगस लॅबसंदर्भात त्यावेळीही उत्तर आले होते की, आम्ही त्यावर कारवाई करु, आम्ही परवानगी देऊ. याकरिता परवानगी दिली जात नाही. डॉ.शिंदे नावाचे व्यक्ती त्यावेळी होते, त्यावेळी याबाबत मी लक्षवेधी सूचना सभागृहात उपस्थित केली होती. तो डॉ.शिंदे २०० ठिकाणी सहया देत होता. डिजिटल सही देऊन ते रिपोर्ट दिले जात होते. यामध्ये एकाला चुकून एड्स दाखविला गेला होता. त्याने पुर्नचाचणी केली असता त्यामध्ये आढळून आले की, त्याला एड्स नव्हता. दरम्यान जीव देण्यापर्यंत त्याच्यावर वेळ आली होती. ही गंभीर बाब आहे. माझी विनंती आहे की, हे जे काही आहे, त्यावर आठ वर्षांपासून यावर कारवाई का झाली नाही ? या बोगस पॅथॉलॉजी

लॅबची लॉबी आहे, ही लॉबी प्रभावशाली आहे. आपण येथे कितीही याबाबत चर्चा केली तरी त्याचा काही उपयोग होत नाही. अजून दोन वर्षांनी जरी हा विषय उपस्थित झाला तरीही हेच उत्तर येईल. माझी शासनाला विनंती आहे की,

सभापती महोदय, मी याबाबत तीन प्रश्न विचारतो की, या लॅबची नोंदणी केव्हा करण्यात येईल ? नोंदणी केली जात नाही, असे शासनच म्हणते म्हणजे शासनच याबाबत हतबल आहे. शासन म्हणते की, या लॅबची नोंदणी शॉप ॲक्टअंतर्गत नोंदणी होते. याबाबत कायदा केव्हा करण्यात येणार आहे ? जोपर्यंत यावर फौजदारी कारवाई होत नाही, त्यांना शासन होत नाही, तोपर्यंत याला आळा बसणार नाही. ज्याप्रमाणे बोगस डॉक्टरांवर कारवाई केली जाते, त्याचप्रमाणे महापालिका आणि पोलीस यांच्या मार्फत कायदा करुन बोगस लॅब बंद केल्या पाहिजेत. याकरिता कायदा केव्हा करण्यात येणार आहे ? समितीचा रिपोर्ट वगैरे सर्व ठीक आहे. याकरिता परवानगी दिल्याशिवाय अशा प्रकारच्या बोगस चाचण्या करता येणार नाही, असे निश्चित केले पाहिजे. कोणीही डीएमएलटीचे सर्टिफिकेट घेतले की, त्यांना रिपोर्ट देता येते. कोरोना काळात तर या लॅब्ज वाल्यांनी सर्वसामान्यांना लुटण्याचे काम केलेले आहे. यावर कायदा केव्हा करण्यात येणार आहे ? यावरील कायदा करुन बोगस लॅब कधी बंद करण्यात येणार आहे ?

**तालिका सभापती :** मला वाटते की, हा विषय संवेदनशील आहे. माननीय मंत्रीमहोदय श्री.राजेश टोपे हे सर्व सन्माननीय सदस्यांचे म्हणणे ऐकून एकदाच सविस्तर उत्तर देतील.

श्री.अभिजित वंजारी : सभापती महोदय, परंतु केवळ महाराष्ट्र असोसिएशन ऑफ प्रॅक्टीसिंग पॅथॉलॉजिस्ट ॲण्ड मायक्रोबायोलॉजिस्ट असोसिएशन यांच्यावर जबाबदारी देऊन चालणार नाही. माननीय मंत्रीमहोदयांनी जे उत्तर दिलेले आहे की, याबाबत एक समिती गठित केलेली आहे. माझे असे म्हणणे आहे की, त्याच्यामध्ये रॅण्डमली फ्लाईंग स्क्वॉडसारखी अरेंजमेंट करायला पाहिजे. कारण एकाच व्यक्तीने एका वेळी दोन वेगवेगळया लॅबॉरेटरीजमध्ये दोन वेगवेगळया एजन्सीला बोलावून चाचणी केली तर त्याचे रिपोर्ट वेगवेगळे येतात. म्हणून अशा प्रकारचे बोगस रिपोर्ट

आल्यानंतर त्याचे चुकीचे निदान होते. मुंबई,पुणे, नागपूर, औरंगाबाद या व तत्सम मोठमोठया शहरांमध्ये बोगस सर्टिफिकेट इश्यू होत आहेत. यावर आळा घालण्याकरिता आपले जे नॅशनल मेडीकल कौन्सिल आहे, ते पहिले मेडिकल कौन्सिल ऑफ इंडिया होत,त्याची देखील प्रत्येक शहरामध्ये शाखा आहे, त्यांच्या माध्यमातून त्यांचे फ्लाईंग स्क्वॉड असले तर त्यांच्यावर नियंत्रण राहील आणि त्याच्यावर आळा बसेल.

श्री.अनिकेत तटकरे : सभापती महोदय, हा प्रश्न रुग्णांचा जिव्हाळयाचा आहे. कोविडच्या कालखंडामध्ये आरोग्य विभागाने चांगले काम केलेले आहे. जरुर काही पॅथॉलॉजी लॅब वा हॉस्पिटलने अतिरिक्त चार्ज केलाही असेल, मात्र सर्वांनाच एका मापदंडामध्ये तोलून चालणार नाही.

असुधारित प्रत

श्री. अनिकेत तटकरे......

ऑनलाईन पध्दतीने आता औषधे किंवा वैद्यकीय सुविधा दिल्या जातात. याच धर्तीवर ऑनलाईन पध्दतीने मेडिकल रिपोर्ट तयार केले जातात. यासंदर्भात नियमावली किंवा निकष ठरविले जाणार आहेत काय ? कोविडची आरटीपीसीआर चाचणी केल्यानंतर त्याचा रिपोर्ट पॉझिटिव्ह असलेल्या पेशंटला निगेटिव्ह असल्याचा रिपोर्ट मिळत होता आणि निगेटिव्ह असलेल्या पेशंटला पॉझिटिव्ह असल्याचा रिपोर्ट मिळत होता. याचा अनुभव काही सन्माननीय सदस्य तसेच माननीय तालिका सभापती महोदयांना देखील आलेला आहे. ऑनलाईन पध्दतीने धोरण अवलंबिले जाईल किंवा कसे असा माझा प्रश्न आहे.

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, सदरहू लक्षवेधी सूचना अतिशय महत्वाची आहे. राज्यात ज्या ठिकाणी मोठी हॉस्पिटल्स आहेत, अशा ठिकाणी सॅम्पल कलेक्शन सेंटर्स आहेत. त्या ठिकाणी पॅथॉलॉजिचा बोर्ड दिसत नाही. त्या ठिकाणी कलेक्शन सेंटर्स आहेत. हे कलेक्ट केलेले सॅम्पल कोणत्या लॅबला जाते आणि कोठून रिपोर्ट येतात याचा ठावठिकाणा नसतो. सन्माननीय सदस्य श्री. भाई गिरकर यांनी यासंदर्भात माहिती दिलेली आहे. डीजीटल स्वाक्षरीवर एखादा महत्वाचा रिपोर्ट म्हणजे हिस्टो पॅथॉलॉजीचा रिपोर्ट जर कॅन्सर आहे किंवा नाही याचा रिपोर्ट जर तुम्हाला डीलीटल स्वाक्षरीने मिळत असेल तर शासनाकडून रेग्युलटरी ॲथॉरिटचे काम कुठे तरी कमी पडत आहे असे मला वाटते. ज्या ठिकाणी जबाबदारी निश्चित करायची ठरली तर केवळ कोणाकडे परवाना होता की नव्हता यापेक्षा त्याची जबाबदारी निश्चित करण्यासाठी संबंधित व्यक्तीच सापडणार नाही, अशी परिस्थिती उद्भवूनये म्हणून दिनांक २९ जुलै, २०२१ रोजी समिती स्थापन झाली होती. या समितीला त्यांचे काम करण्यासाठी भरपूर वेळ दिलेला आहे. त्यामध्ये कमीत कमी स्केल्टंन तरी करुन देण्याची गरज होती. सदरहू लक्षवेधी सूचना चर्चेला आल्यामुळे आणि त्याची अपॉर्चिनिटी घेत ताबडतोब याच्या रेग्युलरीटी ॲथॉरिटीच्या गाईडलाईन तयार केल्या जातील काय असा माझा प्रश्न आहे.

डॉ. मनिषा कायंदे : सभापती महोदय, सदरहू लक्षवेधी सूचना अतिशय महत्वाची आहे. मी स्वत: डीएमएलटीधारक आहे. टेक्निशिअला स्वाक्षरी करण्याचा अधिकार नसतो. ज्यांनी एमडी पॅथॉलॉजी केलेले आहे, त्यांनाच स्वाक्षरी करण्याचा अधिकार असतो. आज कोणीही कोठेही प्रयोगशाळा सुरु करीत आहे. हा विषय अत्यंत गंभीर आहे. सोनोग्राफी सेंटर्सला लायसन्स लागते. तुम्ही कोणती तपासणी करित आहात, त्यासाठी कोणते लायसन्स लागते, यासाठी लायसन्स लागते किंवा कसे या ठिकाणाहून सुरुवात होते. समिती करुन तीन महिन्यांचा कालावधी उलटून गेलेला आहे. त्यांचा अहवाल आलेला नाही. सदरहू लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने मंत्री महोदय कायदा आणतील काय ?

**तालिका सभापती ( श्री. विक्रम काळे )** : मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, सदरहू लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने सर्व सन्माननीय सदस्यांच्या भावना अतिशय तीव्र आहेत. सदरहू लक्षवेधी सूचना अतिशय महत्वाची आहे. कोविडच्या काळात अनेक ठिकाणी धंदा सुरु झालेला होता. रिपोर्टबाबत बोलून मी सदनाचा बहुमूल्य वेळ घेऊ इच्छित नाही. या विषयाच्या अनुषंगाने समिती स्थापन केलेली आहे. आपल्या यंत्रणेशिवाय आणि माननीय मंत्री महोदय जे नॉर्म्स निश्चित करणार आहेत त्याचे पालन संबंधित लॅब करते किंवा कसे आणि त्यांच्याकडे आवश्यक ती पायाभूत सोयी सुविधा आहेत की नाही यासंदर्भात मापदंड निश्चित करण्याची गरज आहे. यानंतरच संबंधित लॅबला परवानगी दिली जावी अशा प्रकारचे धोरण राज्यात आणले जाईल काय अशी माझी सूचना आहे.

श्री. भाई गिरकर : सभापती महोदय, सदरहू लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने मंत्री महोदय कायदा आणतील काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. मनिषा कायंदे, सन्माननीय सदस्य सर्वश्री अभिजित वंजारी, भाई गिरकर, डॉ. रणजित पाटील, माननीय तालिका सभापती आणि इतर सन्माननीय सदस्यांनी त्यांचे मौलिक विचार,

असुधारित प्रत

काही सूचना आणि काही प्रश्न विचारले आहेत. यासंदर्भात मी सदनाला सविस्तरपणे माहिती देणार आहे.

श्री. राजेश टोपे....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. मनिषा कायंदे आणि सन्माननीय सदस्य श्री. भाई गिरकर यांनी महत्वपूर्ण अशी लक्षवेधी सूचना उपस्थित केलेली आहे. ही लक्षवेधी सूचना अतिशय गंभीर असून, त्याबद्दल कोणताही वाद नाही. मी सुध्दा या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने ब्रिफिंग घेताना विचार करीत होतो की, एवढ्या वर्षात आपण त्याची रेग्युलरीटी बॉडी का केली नाही किंवा का झाली नाही आणि ती करायलाच पाहिजे. आज शॉप ॲक्टखाली कोणीही पॅथॉलॉजीच्या लॅब उघडू शकतो. याचे रजिस्ट्रेशन व्हायला पाहिजे, अशी सर्वांची अपेक्षा आहे. लॅबमध्ये काम करणारे कोण असतात ? लॅबमध्ये पॅरामेडिकलचा स्टाफ असतो. लॅब असिस्टंट, टेक्निशिअन्स, इक्युपमेंटला प्रोसेस करण्यासाठी मशिन असते. आपले सॅम्पल प्रोसेस करणारी यंत्रणा असते. डीएमएलटीचे कर्मचारी असतात आणि ते प्रोसेस व्यवस्थितपणे करतात किंवा कसे, त्यानंतर जो रिपोर्ट येतो त्याला सिग्निचर करताना इंटरप्रिटेशन प्रॉपर करुन एमडी पॅथॉलॉजीच्याच कर्मचाऱ्यांनी स्वाक्षरी केली पाहिजे, अशी कार्यपध्दती आहे. माननीय सर्वोच्च न्यायालयाने यासंदर्भात निर्णय दिलेला आहे. एमडी पॅथॉलॉजी किंवा डिप्लोमा झालेले पोस्ट ग्रॅज्युएशनच्या लोकांनीच रिपोर्टवर स्वाक्षरी केली पाहिजे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. रणजित पाटील असे म्हणाले की, कोणत्याही परिस्थितीत डीलीटल स्वाक्षरी चालत नाही. मुंबईत राहून एक एमडी पॅथॉलॉजीने त्यांचा रिपोर्ट जालन्यात पाठवून संबंधित रिपोर्टरवर स्वाक्षरी करावी. पण असे चालत नाही आणि ते चालू नये अशा माननीय सर्वोच्च न्यायालयाने सूचना दिलेल्या आहेत. नियंत्रण आणि सनियंत्रण करण्यासाठी कोणताही विषय नाही. प्रायव्हेट लॅब मुश्रुमींग म्हणतो मग कसेही आणि कोठेही त्या सुरु आहेत. त्यामुळे प्रायव्हेट लॅब मोठ्या पध्दतीने निर्माण होत आहे. दराच्या बाबतीत कोणीही कसा

आकारित आहे. इक्युपमेंट वापरले जाते. वाहनाचे आयुष्य हे साधारणपणे दहा वर्षे असते. पण या इक्युपमेंट कधी कधी खूप जुन्या होऊन जातात. त्या कॅलिब्रेटेड नसतात. म्हणजे त्यांच्याकडून राँग इन्फॉर्मेशन येऊ शकते. या गोष्टीवर देखील कोणाचेही नियंत्रण नाही. हे खरे आहे. या सर्व गोष्टींवर तातडीने आणि तत्परतेने लक्ष

श्री. राजेश टोपे.....

देण्याची गरज आहे. या विषयाच्या अनुषंगाने कमिटी निर्माण केलेली असून, त्यांना स्पष्ट सूचना दिलेल्या आहेत. याबाबत माननीय राज्य मंत्री महोदयांनी माहिती दिलेली आहे. मी त्यांना एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी देणार नव्हतो. पण त्यांनी विनंती केली की, आम्हाला तीन महिन्यांचा कालावधी दिला तर आम्ही परफेक्ट करु. तर आजपासून तीन महिन्याच आत मी स्वत: याबाबतचा आढावा घेत यासंदर्भातील संपूर्ण रेग्युलटरी फंक्शनींग म्हणजे त्याला सनियंत्रण करणारी, नियंत्रण करणारी पूर्ण कार्यपध्दती तयार करण्याची आवश्यकता आहे. सर्व सन्माननीय सदस्यांनी कायदा करावा म्हणून आग्रही भूमिका घेतलेली आहे. या विषयाच्या अनुषंगाने दोन कायदे आज अस्तित्वात आहे. सन्माननीय सदस्य डॉ. रणजित पाटील यांना केंद्र शासनाचा कायद्याची इथ्यंभूत माहिती आहे. क्लिनिकल एस्टाब्लीशमेंट ॲक्ट आहे. हा केंद्राने कायदा केला असून, सर्व राज्यांनी तो जसाच्या तसा अंमलात आणावा म्हणून विनंती केली होती. पण अनेक दवाखान्यांना तो मान्य केला नाही. यामध्ये खूपच जाचक अटी आहेत. यामध्ये अमुकच दर घेण्यात यावे, दर दर्शनी भागावर लावण्यात यावेत, दोन खाटांमधील अंतर किती हवे अशा अटी आहेत. यामध्ये फार बारकाईने लक्ष देऊन अटी तयार केलेल्या आहेत. क्लिनिकल एस्टाब्लीशमेंट ॲक्टच्या संदर्भात दोन ते तीन बैठका झालेल्या आहेत. पण तो जसाच्या तसा स्वीकारु नये असे अनेक मोठ्या आणि लहान हॉस्पिटल आणि नर्सिंग होमचे म्हणणे आहे. महाराष्ट्र राज्याचा बॉम्बे नर्सिंग होम ॲक्ट आहे. बॉम्बे नर्सिंग होम ॲक्टच्या संदर्भात दवाखान्याच्या संदर्भात सनियंत्रण आहे. त्यामध्ये सनियंत्रण करण्यासाठी पॅथॉलॉजीचा चॅप्टरचा अंतर्भाव करता आला तर तत्परनेतेन काम करता येईल आणि जून महिन्याच्या अखेरीपर्यंत अमेंडमेंट आणून ते करता येऊ शकेल. तत्पूर्वी आम्ही जीआरच्या

माध्यमातून कार्यवाही करु किंवा आवश्यकता वाटली तर अधिसूचना निर्गमित केली जाईल. यासंदर्भातील सनियंत्रण त्वरित व्हावे अशी शासनाची मानसिकता आहे. सन्माननीय सदस्य डॉ. मनिषा कायंदे या डीएमएलटीधारक आहेत. डीएमएलटीचे कोर्सेस सुरु करणाऱ्या अनेक संस्था आहेत. म्हणजे फॅक्टरी आहेत. पॅरामेडिकल कॉन्सील मी मेडीकल एज्युकेशन मंत्री असताना सुरु केले होते. एमएमसीमध्ये

श्री. राजेश टोपे....

डॉक्टरांचे रजिस्ट्रेशन होते. राज्यात प्रत्येक एमबीबीएस डॉक्टर किती आहेत, त्यांचा रजिस्ट्रेशन नंबर असतो आणि त्याशिवाय तो प्रॅक्टिस करु शकत नाही.

असुधारित प्रत

यानंतर श्री. बोर्डे....

श्री.राजेश टोपे....

तशाचप्रकारे कोणी कोणत्याही संस्थेतून डीएमएलटी केल्यास त्याचे रजिस्ट्रेशन पॅरामेडीकल कौन्सिलमध्ये झालेच पाहिजे. रजिस्टर पॅरामेडीकल कौन्सिलमध्ये नोंदणी केलेल्या लॅब टेक्निशीयन यांनाच लेबॉरेटरीमध्ये काम करण्यास संधी दिली पाहिजे. नववी, दहावी शिकलेला मुलगा ब्लड सॅम्पल घेऊन त्या इक्विपमेंटवर काम करण्यास लागला तर ते योग्य नाही. अशा प्रकारे पॅरामेडीकल स्टाफची नोंदणी व्हावी. त्या ठिकाणी नोंदणीकृत असलेल्या लोकांनीच पॅथॉलॉजी लेबॉरेटरीमध्ये काम करावे. जे इक्विपमेंट वापरायचे आहेत त्या संदर्भात प्रॉपर कॅलिब्रेशन असावे, ते आऊटडेटेड कधी होतील, ऑब्सोल्युट कधी होतील ते ठरवावे. त्याचे पूर्ण नियंत्रण व संनियंत्रण करावे. तसेच जो कोणी चुकेल त्याच्यावर त्वरित कारवाई व्हावयास पाहिजे. या दृष्टिकोनातून पॅरामेडीकल कौन्सिलमध्ये रजिस्टर असलेल्या टेक्निशीयनवर कारवाई करु शकते, परंतु जे रजिस्टर नाहीत त्यांच्यावर कारवाई करण्याचा कौन्सिलला अधिकार नाही. रजिस्टर नसलेल्या डॉक्टरांवर देखील कारवाई करण्याचा अधिकार एमएमसीला नाही. त्यामुळे या बाबतीत कारवाई करण्यासाठी या सर्व गोष्टी करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, लेबॉरेटरीच्या दरांमध्ये सुसूत्रीकरण असणे गरजेचे आहे. खाजगी लॅबमध्ये कोणी काहीही दर मागू शकतात. ए, बी आणि सी प्रकारच्या तीन पॅथॉलॉजी लॅब असतात. पहिल्या प्रकारच्या लॅबमध्ये ब्लड, युरीन तपासण्यात येते. दुसऱ्या प्रकारच्या लॅबमध्ये हार्मोन्सची तपासणी करण्यात येते. तसेच तिसऱ्या ॲडव्हान्स पॅथॅलॉजी लॅबमध्ये कॅन्सर किंवा हिस्टोपॅथॉलॉजीचे रिपोर्ट देण्यात येतात. अशाप्रकारे या तीन पॅथॉलॉजी लॅबची वेगवेगळी नियमावली असू शकते. या सर्व बाबतीत काम करणे गरजेचे आहे. शासनाने आयुक्त, आरोग्य विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समिती घटित केली असून त्यामध्ये १८ सदस्य आहेत. या समितीमध्ये डीएमएलटीची संघटना, एमडी पॅथॉलॉजीस्टची संघटना, मायक्रो बॉयलॉजीअसोसिएशनची इत्यादी विविध संघटनांना प्रतिनिधित्व दिलेले आहे. सर्वांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर आयुक्त, आरोग्य विभाग तीन महिन्यांच्या आत या

श्री.राजेश टोपे....

संदर्भातील अहवाल सादर करतील. या अनुषंगाने काहीच काम झालेले नाही असे नाही. या विषयी प्राथमिक अहवाल प्राप्त झालेला आहे. परंतु त्या अहवालावरुन सभागृह, लोकप्रतिनिधी आणि जनतेला जो परिणाम पाहिजे तो मिळणार नाही. त्यामुळे तीन महिन्यात या अनुषंगाने सर्व गोष्टी परिपूर्ण केल्या जातील. गरज पडली तर बॉम्बे नर्सिंग होम ॲक्टमध्ये एक स्वतंत्र चॅप्टर टाकून व सुधारणा करुन त्यास कायद्याचे स्वरुप दिलेच जाईल. तत्पूर्वी अध्यादेश किंवा शासन निर्णयाच्या रुपाने तीन महिन्याच्या आत कायदा लागू करता येईल, हे मी आश्वासित करु इच्छितो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अभिजीत वंजारी यांनी फ्लाईंग स्क्वॉड स्थापन करण्याबाबत चांगली सूचना केली आहे. कारण या गोष्टींवर स्क्वॉडच्या माध्यमातून सतत लक्ष दिले पाहिजे. त्यामुळे फ्लाईंग स्क्वॉडच्या बाबतीत सजेशन फॉर ॲक्शन एवढेच सांगतो. सन्माननीय सदस्य डॉ.रणजित पाटील यांनी उपस्थित केलेल्या डिजीटल सिग्नेचर आणि रेग्युलेटरी ऑथॉरिटीच्या बाबतीत मी भाष्य केले आहे. तसेच सन्माननीय सदस्या डॉ.मनिषा कायंदे यांनी कायदा करण्याबाबत मागणी केली. मी या बाबतीत सुद्धा भाष्य केले आहे. या अनुषंगाने अद्याप गुन्हे दाखल झालेले नाहीत. या कायद्याची भिती वाटावी आणि कोणीही मनुष्याच्या जीवनाशी व आरोग्याशी खेळू नये म्हणून, आवश्यक त्या सर्व बाबी त्यामध्ये अंतर्भूत होतील. या सर्व बाबी आम्ही निश्चितपणे करु हे खात्रीपूर्वक सांगतो.

**तालिका सभापती** : या लक्षवेधी सूचनेला मंत्री महोदयांनी सविस्तर उत्तर दिलेले आहे. परंतु मी एक सूचना करु इच्छितो की, तीन महिन्यानंतर समितीचा अहवाल येणार आहे. अहवाल आल्यानंतर ज्या सन्माननीय सदस्यांनी या लक्षवेधी सूचनेच्या चर्चेत भाग घेतला आहे त्यांच्या समवेत माननीय सभापतींच्या दालनात एक बैठक आयोजित करावी. जेणेकरुन सन्माननीय सदस्यांच्या सूचना घेऊन पुढे जाता येईल.

असुधारित प्रत

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, आपली सूचना मान्य आहे. या सभागृहाच्या सन्माननीय सदस्यांची एक बैठक आयोजित करण्यात येईल. त्या बैठकीत ज्यांना इनपुटस् द्यायचे असतील ते देतील.

-----------

असुधारित प्रत

## विशेष उल्लेखाच्या सूचनांबाबत

**तालिका सभापती** : आज मंगळवार, दिनांक ८ मार्च, २०२२ रोजी मान्य केलेल्या म.वि.प.१०१-अ अन्वये विशेष उल्लेखाच्या सूचना सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे मी घोषित करीत आहे.

-----------

असुधारित प्रत

**पृ.शी./मु.शी.** : सन २०२१-२०२२ च्या खर्चाच्या पुरवणी विवरणपत्रावर चर्चा

**तालिका सभापती (श्री.विक्रम काळे)** : पूरक मागण्यांवरील चर्चेचा आजचा दुसरा व शेवटचा दिवस आहे. कार्यक्रमपत्रिकेवर दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पूरक मागण्यांवर आज चर्चा घेण्यात येईल. पूरक मागण्या आणि त्याखालील बाबी यासंबंधी माहिती सदस्यांना पत्रक भाग-दोन द्वारे वेगळी प्रसृत करण्यात आली आहे. प्रत्येक सदस्याने भाषण करताना बाब क्रमांक आणि पूरक विवरणपत्राचा पृष्ठ क्रमांक सांगण्याची कृपा करावी. चर्चा संबंधित बाबी पुरतीच मर्यादित असून मूळ मागणीवर चर्चा करता येणार नाही हे आपणास विदित आहे. कार्यक्रम पत्रिकेवरील दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पूरक मागण्यांवरील चर्चा व उत्तर आजच पूर्ण करावयाचे आहे हे सदस्यांनी कृपया ध्यानात घ्यावे.

**शीर्षक :** विविध मंत्र्यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या.

**तालिका सभापती :** खालील मंत्र्यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या एकत्रितपणे चर्चेस घेण्यात येतील:-

१) उद्योग, खनिकर्म, मराठी भाषा मंत्र्यांच्या विभागाच्या पुरवणी मागण्या क्रमांक - के-७, झेडएफ-२

२) जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्र्यांच्या विभागाची पुरवणी मागणी क्रमांक - आय-५

३) ऊर्जा मंत्र्यांच्या विभागाच्या पुरवणी मागण्या क्रमांक - के-६, के-११

४) नगर विकास मंत्र्यांच्या विभागाच्या पुरवणी मागण्या क्रमांक - एफ-२, एफ-५

**५)** इतर मागास बहुजन कल्याण, खार जमिन विकास, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्र्यांच्या विभागाच्या पुरवणी मागण्या क्रमांक - सी-५, सी-६, झेडजी-२, झेडजी-३

असुधारित प्रत

**तालिका सभापती.....**

६) वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्य मंत्र्यांच्या विभागाच्या पुरवणी मागण्या क्रमांक - एस-१, झेडडी-२

७) उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांच्या विभागाच्या पुरवणी मागण्या क्रमांक - डब्ल्यू-२, डब्ल्यू-३

८) पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्र्यांच्या विभागाची पुरवणी मागणी क्रमांक - वाय-२

९) आदिवासी विकास मंत्र्यांच्या विभागाची पुरवणी मागणी क्रमांक - टी-५

१०) वस्त्रोद्योग, मत्स्यव्यवसाय बंदरे मंत्र्यांच्या विभागाची पुरवणी मागणी क्रमांक - डी-९

११) महिला व बालविकास मंत्र्यांच्या विभागाची पुरवणी मागणी क्रमांक - एक्स-१

आता सन्माननीय सदस्य श्री.प्रवीण दटके यांनी भाषणास सुरुवात करावी.

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दटके (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन २०२१-२०२२ च्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी संधी दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे.

सभापती महोदय, नगर विकास विभागाची बाब क्रमांक-१२ व १३, पृष्ठ क्र.१२ व १३ वर मी बोलत आहे. नागपूर महानगरपालिकेच्या कामांसाठी जवळपास ७०० कोटी रुपयांची मागणी करण्यात आली होती. मी माननीय नगर विकास मंत्र्यांच्या निदर्शनास आणून देतो की, नागपूरला उप राजधानीचा दर्जा असल्यामुळे नागपूर महापालिका क्षेत्रात मूलभूत सोयीसुविधा निर्माण करण्यासाठी विधानसभेचे विद्यमान माननीय विरोधी पक्ष नेते श्री.देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री असताना दरवर्षी नागपूर महानगरपालिकेला किमान ५० कोटी रुपये मिळत होते. परंतु मागील दोन वर्षात ते मिळाले नाहीत. दरवर्षी शासनाकडून १०० कोटी रुपये, एनआयटीकडून १०० कोटी रुपये आणि नागपूर महानगरपालिकेकडून १०० कोटी रुपयांचा सिमेंट रोडचा प्रस्ताव असायचा. परंतु हा प्रस्ताव सुद्धा दोन वर्षात झालेला नाही. माझी माननीय नगर विकास मंत्र्यांना विनंती आहे की, त्यांनी पुरवणी मागण्यांमध्ये हा निधी अंतर्भूत करावा.

माननीय श्री.देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री होते तेव्हाची १५७ कोटी रुपयांची कामे अद्याप प्रलंबित आहेत. त्या कामांचे वर्क ऑर्डर झाले असून ती कामे अर्धवट स्थितीत आहेत. ही कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करणे आवश्यक आहे. यामध्ये नाले, नाल्याच्या भिंती, रस्ते, भूमिगत नाले इत्यादी कामांचा समावेश आहे. परंतु निधी प्राप्त न झाल्यामुळे ही कामे अर्धवट स्थितीत आहेत. या कामांसाठी सुद्धा पुरवणी मागणीत तरतूद करावी, अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार हे नागपूरला आले होते. त्यांनी नागपूर येथील सर्व पक्षाच्या लोकप्रतिनिधींना आश्वासन दिले होते. ते नागपूरच्या प्रश्नांबाबत दोन बैठका घेणार होते, परंतु कोविड परिस्थितीमुळे त्या बैठका होऊ शकल्या नाहीत. माननीय उप मुख्यमंत्र्यांनी नागपूर येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या इमारतीचे नवीन बांधकाम करण्यात येईल असे

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दटके.....

आश्वासन दिले होते. परंतु ते अजून पूर्ण झालेले नाही. माननीय उपमुख्यमंत्री हे शब्दाचे धनी आहेत. मी आपल्या माध्यमातून त्यांना विनंती करतो की, नागपूरच्या जिल्हाधिकारी कार्यालयाच्या इमारतीचे बांधकाम त्वरित पूर्ण करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करावी.

सभापती महोदय, मागणी क्र.५, बाब क्र.४३ वर मी बोलत आहे. विदर्भात गोंडवाना प्राणी संग्रहालय उभारण्यात आल्याची आपल्या सर्वांना कल्पना आहे. त्या प्राणी संग्रहालयाला हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे नाव दिले आहे. माननीय मुख्यमंत्री श्री.उद्धवजी ठाकरे यांनी नामकरण कार्यक्रमात घोषणा केली होती की, सदरहू प्राणी संग्रहालयात गोंडवाना थीम पार्कचे काम सुरु करण्यात येईल. परंतु अजूनपर्यंत या थीम पार्कचे कोणतेही काम सुरु झालेले नाही. या कामासाठी बजेट अलोकेट झाले नाही. नागपूर हे आदिवासी लोकांचे प्रमुख ठिकाण आहे. नागपूर हे गोंड राजाची राजधानी आहे, तेथे बुलंदशहांचा वाडा आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी गोंडवाना प्राणी संग्रहालयाच्या नामकरण कार्यक्रमात जो शब्द दिला होता तो ते निश्चित पूर्ण करतील, असा मला विश्वास आहे. माझी संबंधित मंत्री महोदयांना विनंती आहे की, या कामासाठी पुरवणी मागण्यांमध्ये निधीची तरतूद करावी.

सभापती महोदय, आदिवासींचे दैवत बिरसा मुंडा यांचा ५० फूट पुतळा त्या ठिकाणी उभारला जाणार होता. परंतु त्या पुतळ्यासाठी पुरवणी मागण्यांमध्ये कुठेही तरतूद नाही. माझी विनंती आहे की, भगवान बिरसा मुंडा यांच्या पुतळ्यासाठी पुरवणी मागण्यांमध्ये तरतूद करावी.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाची पुरवणी मागणी क्र.१७, बाब क्र.१६ वर मी बोलत आहे. शासकीय निवास इमारत बांधकामासाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे. आपल्या राज्याचे माजी मुख्यमंत्री स्व.वसंतराव नाईक यांच्या शतकपूर्ती निमित्त त्यांच्या नावे नागपूर शहरात भव्य सभागृह बांधण्यासाठी त्यावेळी २० कोटी रुपयांचे ॲलोकेशन झाले होते. नंतर श्री.कांबळे.....

असुधारित प्रत

श्री. प्रवीण दटके ....

आपण श्रध्दांजली, आदरांजली म्हणून ते एक मोठे सभागृह वसंतराव देशपांडे सभागृहाच्या धर्तीवर युनिव्हर्सिटीच्या जागेवर बांधणार होतो. आजपर्यंत २० कोटी रुपये आले, ते पुन्हा गेले. एका महान नेत्याला श्रध्दांजली म्हणून या २० कोटी रुपयांच्या व्यतिरिक्त अजून काही निधी लागणार असेल तर तो या पुरवणी मागण्यांमध्ये अंतर्भूत करुन स्व. मुख्यमंत्री माननीय वसंतराव नाईक यांच्या नावाचे सभागृह झाले पाहिजे.

सभापती महोदय, वैद्यकीय शिक्षण व आरोग्य विभाग बाब क्रमांक ४१, पृष्ठ क्रमांक ३६ - जनऔषधी हा एक विषय आहे. केंद्र व राज्य सरकार यांनी मोठ्या प्रमाणात याची प्रचलित पध्दतीप्रमाणे मोठे काम करण्याची व्यवस्था केली आहे. पण जनऔषधी केंद्र सर्व वैद्यकीय दवाखान्यांमध्ये, शासनाच्या दवाखान्यांमध्ये, मेडिकल कॉलेजमध्ये अजुनपर्यंत त्याप्रमाणे सुरु झालेले नाहीत. शासकीय रुग्णालयांत जनऔषधी केंद्र सुरु करण्याकरिता वैद्यकीय शिक्षण विभागाने निविदा क्रमांक २०५५, दिनांक २ मार्च, २०१९ ला काढली होती. कोविड काळात जनऔषधी केंद्रांच्या माध्यमातून गोरगरीब रुग्णांना दिवसरात्र सेवा उपलब्ध झाली. जनऔषधी केंद्रांमुळे राज्यातील आंतररुग्ण व बाह्यरुग्ण रुग्णालयांच्या आवारातच औषधे अत्यंत स्वस्त दरात मिळत होती. केंद्र सरकार वैद्यकीय शिक्षण विभाग, संशोधन संचालनालयामार्फत मोठ्या प्रमाणात शासनाचे हे ध्येय राबविण्याचा प्रयत्न करीत आहे. माझी या संदर्भात आपल्याला विनंती आहे. सभागृहात माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्री उपस्थित आहेत. त्यांनी त्यांच्या सर्व मेडिकल कॉलेजमध्ये जनऔषधी केंद्रांच्या बाबतीत तरतूद करावी एवढीच माझी विनंती आहे.

सभापती महोदय, ऊर्जा विभागाचा एक विषय आहे. ऊर्जा विभाग बाब क्रमांक २१, पृष्ठ क्रमांक २१ - कृषीपंप ग्राहकांना वीज शुल्कामध्ये सवलत देण्याकरिता ४९० कोटी १५ लाख रुपयांची अतिरिक्त तरतूद कण्यासाठी पुरवणी मागणी करण्यात आली होती. ती या कोणत्याही पुरवणी मागण्यांमध्ये दिसत नाही.

श्री. प्रवीण दटके ....

हा शेतकऱ्यांवर अन्याय आहे. गोरगरीब शेतकरी अतिवृष्टी वगैरे या गोष्टींमुळे आधीच त्रासला आहे. आता कनेक्शन कापण्याचे काम सुरु आहे. आत्महत्या होत आहेत. आपल्यासारख्या सजग माननीय सभापतींच्या माध्यमातून शासनाला विनंती आहे की, ही पुरवणी मागणी त्यांनी त्यामध्ये अंतर्भूत करावी. आपण मला बोलण्यास संधी दिल्याबाबत मी आपला आभारी आहे. धन्यवाद !

----

असुधारित प्रत

श्री. नरेंद्र दराडे (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन २०२१-२०२२ च्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, उद्योग विभाग, बाब क्रमांक २५, पृष्ठ क्रमांक २३ - येवले शहरामध्ये पैठणीचे गाव आहे. मी आज महिला दिनानिमित्त सांगू इच्छितो की, हे पैठणीचे शहर असल्यामुळे तेथे लहान लघू उद्योग आहेत. त्यांना रेशमाचा पुरवठा चेन्नई व मद्रास येथून होतो. माझी विनंती आहे की, त्या शहरात ५० एकर जमीन घेऊन या संदर्भातील उद्योग सुरु करावा. शासनाने ज्या जमिनी संपादित केल्या आहेत, त्याचा मोबदला लवकरच मिळावा.

सभापती महोदय, नगरविकास विभाग, बाब क्रमांक १३, पृष्ठ क्रमांक १३ – नगररचनेच्या संदर्भातून येवले शहर फार मागासलेले आहे, तरी त्यासाठी अर्थसंकल्पात ५०० कोटी रुपयांची तरतूद करुन तेथे सुशोभीकरण, गटारी व रस्ते सुविधा करण्यासाठी दुरुस्ती करावी.

सभापती महोदय, माननीय पाणीपुरवठा मंत्री उपस्थित आहेत. पाणीपुरवठा विभाग, बाब क्रमांक ५०, पृष्ठ क्रमांक ४७ – करंजवन ते येवला या गावांना पाटाद्वारे पाणी येते. त्या पाटांमुळे पाण्याचे जास्त जिरण होते. त्यामुळे आम्हाला ८-१५ दिवस पाणी मिळत नाही. आपल्या माध्यमातून आम्हाला ही योजना मिळाली तर बरे होईल अशी मी विनंती करतो आणि मला बोलण्यास संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून मी माझे भाषण पूर्ण करतो.

----

असुधारित प्रत

श्री. अमोल मिटकरी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन २०२१-२०२२ च्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, नगरविकास विभाग, बाब क्रमांक १२, पृष्ठ क्रमांक १२ - राज्यात अकोला महानगरपालिका देखील अत्यंत महत्त्वाची महानगरपालिका समजली जाते. मागच्या काळात १३९ बेकायदेशीर ठराव घेतले होते, त्यासाठी सभागृहात अकोला महानगरपालिकेविरुध्द वारंवार लक्षवेधी सूचना माजी सन्माननीय सदस्य श्री. गोपीकिसन बाजोरिया यांनी लावली होती. सभागृहाने या प्रकाराला देखील थोडे गांभीर्याने घ्यावे. फौजदारी प्रकरण दाखल करण्याचा शासनाचा आदेश असताना देखील शासनाच्या आदेशाला केराची टोपली दाखविण्याचे काम वारंवार अकोला महानगरपालिका आयुक्तांकडून होत आहे. ५२ ओपन स्पेसचा अहवाल आहे. संस्थाचालकांना ५२ ओपन स्पेस दिले गेले, ज्यांवर व्यवसाय शिकवणी वर्ग लावले गेले. मी विनंती करीत आहे की, ५२ ओपन स्पेस बेकायदेशीररित्या दिले आणि १३९ बेकायदेशीर ठराव घेतले, यावर गांभीर्याने कारवाई व्हावी.

सभापती महोदय, वैद्यकीय शिक्षण विभाग, बाब क्रमांक ४१, पृष्ठ क्रमांक ३६ - अकोला येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आहे. विलासराव देशमुख साहेब मुख्यमंत्री असताना लातूरनंतर अकोला येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची स्थापना झाली होती. आता त्यामध्ये प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, प्रयोगशाळा तंत्रज्ञ आदी पदे भरण्याबाबत कार्यवाही व्हावी. विविध शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांचा पुरवठा व सामग्री यावरील खर्चासाठी शक्य असेल ते, जी काही मागणी आहे ती .... पुरक मागणी या निमित्ताने मी करीत आहे. अकोला येथे पंतप्रधान आरोग्य सुरक्षा योजनेंतर्गत सुपरस्पेशालिटी रुग्णालयाच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण करुन त्यामध्ये डॉक्टर, नर्स व इतर कर्मचारी यांची भरती देखील व्हावी अशी माझी पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून विनंती आहे.

श्री. अमोल मिटकरी ....

सभापती महोदय, पाणीपुरवठा विभाग, बाब क्रमांक ५०, पृष्ठ ४७ - महाराष्ट्र शासनाने कोरोनाच्या काळात देखील पाणीपुरवठा विषय गांभीर्याने घेतला आहे. अकोला जिल्ह्यामधील अकोट तालुक्यातील ६४ खेडी पाणीपुरवठा योजना असेल किंवा खांबोऱ्याची ६० गाव पाणीपुरवठा योजना असेल यावर देखील माननीय पाणीपुरवठा मंत्री श्री. गुलाबराव पाटील यांनी गांभीर्यपूर्वक लक्ष द्यावे अशी मागणी मी करतो.

सभापती महोदय, जलसंपदा विभाग, बाब क्रमांक १९, पृष्ठ क्रमांक १९ - महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळांतर्गत पूर नियंत्रण प्रकल्पाच्या १३ कामांसाठी निधी मंजूर करण्याची मागणी या पुरवणी मागण्यांद्वारे मी करीत आहे. मौजे पोही, तालुका मुर्तिजापूर, जिल्हा अकोला गावच्या शंभर टक्के पुनर्वसनाबाबत पोही ग्रामपंचायत यांनी निवेदनासोबत ठराव सादर केलेला आहे. सदर गावचे अंशत: ऐवजी पूर्णत: पुनर्वसन करण्याचा प्रस्ताव कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांच्या दिनांक ३०.१०.२०१८ च्या पत्रान्वये शासनास प्राप्त झाला आहे. शासनाने पोही गावच्या शंभर टक्के पुनर्वसनाच्या प्रस्तावाला तातडीने मान्यता द्यावी अशी मी मागणी करीत आहे.

सभापती महोदय, मदत व पुनर्वसन विभाग, पृष्ठ क्रमांक ५, बाब क्रमांक ५ - राज्यात माहे जून ते सप्टेंबर, २०२० पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना त्या नुकसानाच्या संदर्भात नुकसानभरपाई अद्याप मिळालेली नाही. त्यामुळे मी पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने विषय मांडत आहे. अकोला जिल्ह्यातील गारपीटग्रस्त शेतकरी आहे. बुलढाणा, वाशिम, अमरावती, वर्धा, भंडारा, गोंदया या विदर्भातीलच शेतकऱ्यांना नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना आपले सरकार या माध्यमातून दिलासा देईल असे मला प्रामाणिकपणे वाटत आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभाग, पृष्ठ क्रमांक १६, बाब क्रमांक १६ – अकोला जिल्ह्यातील अकोट-अकोला ४५ कि.मी. महामार्गाचे गेल्या ४

असुधारित प्रत

श्री. अमोल मिटकरी ....

वर्षांपासून काँक्रिटीकरण संथ गतीने सुरु आहे. देव्हरी फाटा ते रंव्हदाळा, अडसूळ फाटा, चौथा बाजार, बळेगाव फाटा, पाटसूल रेल्वे येथे रस्त्यांची दुरवस्था झाली असल्याने अनेक अपघात वारंवार घडत आहेत. अकोला-हैद्राबाद राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६१ चे काम करण्यात आले आहे. परंतु महामार्ग प्राधिकरणाने सांडपाणी वाहून नेण्याकरिता कोणतीही उपाययोजना केलेली नाही. मी या सर्व पुरवणी मागण्यांवरील विचार आपल्या सहमतीने मांडत आहे. मला बोलण्यास वेळ दिल्याबाबत धन्यवाद मानतो आणि येथेच थांबतो.

----

नंतर श्री. खर्चे ....

असुधारित प्रत

श्री.चंद्रशेखर बावनकुळे (नागपूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन २०२१-२२ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, ऊर्जा विभागाच्या बाब क्रमांक २१,२२,२३,२४ व २५ वर मी बोलणार आहे. हा मी एकच विषय मांडणार आहे कारण इतर अनेक सन्माननीय सदस्यांना बोलायचे आहे. काल मी सभागृहात हा विषय मांडला होता. शेतकऱ्यांचे वीज कनेक्शन कापण्यासाठी आरोप प्रत्यारोप होत आहेत. शेतकऱ्यांमुळे वीज कंपन्या डबघाईस आल्या. शेतकऱ्यांकडे विजेची देयके थकीत असल्यामुळे आमच्या कंपन्या डुबत आहेत. शेतकऱ्यांकडून वसुली करावीच लागेल. सभापती महोदय, मी काही आकडेवारी सादर करणार आहे. या आकडेवारीवरुन आपल्या लक्षात येईल. सन २०१४ पर्यंत माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार हे ऊर्जा मंत्री होते. त्यावेळी १४ हजार कोटी रुपयांची थकित रक्कम शेतकऱ्यांकडे होती. भारतीय जनता पक्षाचे सरकार आल्यावर त्यावेळी विरोधी पक्षात असलेल्या माननीय श्री.अजित पवार, माननीय श्री.दिलीप वळसे-पाटील, माननीय श्री.सुनील तटकरे यांनी सर्वांनी खालच्या व वरच्या सभागृहात विनंती केली होती की, शेतकरी अडचणीत आहे, मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्रातील शेतकऱ्यांकडे मोठ्या प्रमाणात थकबाकी आहे व ती आता वसूल केली तर प्रचंड अडचणी निर्माण होतील म्हणून वसूली करण्यात आली नाही व ४२ हजार कोटी रुपये थकीत झाले. १४ हजार कोटी रुपयांवरुन ही थकबाकी ४२ हजार कोटी रुपयांपर्यंत गेली. माननीय मंत्री श्री. गुलाबराव पाटील यांचा नेहमी आग्रह असायचा की, जळगांव जिल्ह्यात कोणाच्याही शेतावर वीज कर्मचारी येणार नाही याची काळजी घ्यावी. ४४ लक्ष शेतकऱ्यांना पाच वर्षे वीज देऊन एकाही शेतकऱ्यांचे वीज कनेक्शन कापण्याचे काम आमच्या सरकारने केले नाही. सन २००५ ते २०१५ या काळात उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ व मराठवाडा या भागातील शेतकऱ्यांनी जवळपास पाच लाखापेक्षा जास्त शेतकऱ्यांनी डिमांडचे पैसे भरले होते तरी त्यांना वीज कनेक्शन मिळत नव्हती. सन २००५ ते २०१५ या काळातील पाच लक्षापेक्षा जास्त शेतकऱ्यांना वीज कनेक्शन देण्याचे काम आमच्या सरकारच्या काळात करण्यात आले. आता असे सांगण्यात येते की, मागील सरकारच्या चुकीमुळे व मागच्या सरकारने शेतकऱ्यांकडून

श्री.चंद्रशेखर बावनकुळे...

पैसे वसूल न केल्यामुळे या कंपन्या डबघाईस आल्या. त्यामुळे शेतकऱ्यांकडून आम्ही विजेची देयके वसूल करीत आहोत.

सभापती महोदय, १४ हजार कोटी रुपयांवरुन ४२ हजार कोटी रुपयांपर्यंत थकबाकी गेली. महापारेषण कंपनीचा ताळेबंद मी वाचून दाखवितो. सन २०१७-१८ मध्ये ८१५ कोटी रुपयांचा नफा या कंपनीला झाला होता. सन २०१८-१९ मध्ये ७४५ कोटी रुपयांचा नफा झाला होता. सन २०१९-२० मध्ये आमचे सरकार गेले व महाविकास आघाडीचे शासन आले त्यावेळी ४९३ कोटी रुपयांचा नफा या कंपनीला झाला होता. मी आता महाजनको जनरेशन कंपनीची माहिती देतो. सन २०१७-१८ मध्ये जनरेशन कंपनीला ७०० कोटी रुपयांचा नफा झाला होता. सन २०१८-१९ मध्ये ३३४ कोटी रुपयांचा नफा झाला होता. सन २०१९-२० मध्ये १२६ कोटी रुपयांचा नफा झाला होता. महावितरण कंपनीचा आता खूप गवगवा करण्यात येत आहे. सदर कंपनी डुबली व ती आम्हाला सुरु ठेवणे कठीण झाले आहे. आता राज्य अंधारात जाणार, शेतकऱ्यांकडे खूप मोठी थकबाकी शिल्लक आहे. शेतकऱ्यांमुळे कंपन्या डुबल्या हे नेहमीची वाक्य आता बंद करावे लागतील. प्रगत महाराष्ट्राला अशी वाक्ये शोभत नाहीत. वीज कंपन्यांनी कसा कारभार केला पाहिजे ते मी सांगतो. महावितरण ही कंपनी आहे. माननीय मंत्री श्री. अब्दुल सत्तार यांना विचारु इच्छितो की, आमच्या सरकारच्या पाच वर्षाच्या काळात आपल्या मतदारसंघातील शेतकऱ्यांचे वीज कनेक्शन कधी कापण्यात आले होते काय ? १४ हजार कोटी रुपयांवरुन ४२ हजार कोटी रुपये थकीत झाले होते. शेतकऱ्यांना वीज दिल्यामुळे कधीही कंपन्या डुबत नाहीत. शेतकऱ्यांना वीज दिल्यावर राज्याचा जीडीपी वाढतो, राज्याचे उत्पन्न वाढते, राज्य नफ्यात येते. शेतकऱ्यांची वीज कनेक्शन तोडण्याचा आता आग्रह सुरु आहे. विधानसभेत काल असे सांगण्यात आले की,हे मागील सरकारचे पाप आहे. हे कोणाचेही पाप नाही. कंपन्या कधीही शेतकऱ्यांमुळे डुबत नाहीत. या कंपन्या भ्रष्टाचारामुळे डुबत आहेत. या कंपन्यामधील भ्रष्टाचार थांबवा. पुढील काळात कोठे काय सुरु आहे याची सविस्तर माहिती मी मंत्री महोदयांना देणार आहे.

असुधारित प्रत

श्री.चंद्रशेखर बावनकुळे...

तुमचे सीएमडी २३ ते २४ मोबाईल कार्ड कसे वापरतात ते मी मोबाईलच्या कार्ड व नंबरसह सांगणार आहे. महावितरण कंपनीबाबत आमचा चांगला अभ्यास आहे. सन २०१७ मध्ये महावितरण कंपनीने शेतकऱ्यांना वीज पुरवठा केला होता. त्यावर्षात या कंपनीने ४४२ कोटी रुपये नफा कमविला होता. सन २०१८-१९ मध्ये ही कंपनी ८४६ कोटी रुपये नफ्यात होती. सन २०१९-२० मध्ये सदर कंपनी २०८ कोटी रुपये नफ्यात होती. या तिन्ही कंपन्याचा हा परफार्मन्स आहे.

सभापती महोदय, हे शासन शेतकऱ्यांच्या नावाने बोटे मोडत आहे, सोलापूर जिल्ह्यात २००० कोटी रुपये थकीत आहेत. सातारा जिल्ह्यात ३००० कोटी रुपये थकीत आहेत. काही मार्गदर्शन लागले तर आम्ही करण्यास तयार आहोत. माझा असा दावा आहे की, शेतकऱ्यांना या सरकारने नागवू नये, पंढरपूर सारख्या आत्महत्या होऊ देऊ नका. महावितरण कंपनीमुळे आत्महत्या झाली असे आपणाला शोभणारे नाही. हा ताळेबंद मी मंत्री महोदयांना सभापती महोदयांच्या माध्यमातून पाठवून देतो. सरकारला माझी विनंती आहे की, आघाडी सरकारच्या काळात १४ हजार कोटी रुपये थकबाकी होती. आमच्या सरकारच्या काळात ४२ हजार कोटी रुपयांची थकबाकी होती असे सांगून सरकार चालत नाही. पुरवणी मागण्यावरील उत्तराच्या वेळी असे जाहीर करा की, यानंतर आम्ही शेतकऱ्यांची वीज कनेक्शन कापणार नाही. या कंपन्या आमच्या सरकारच्या काळात नफ्यात होत्या. या कंपन्या चांगल्या नफ्यात चालवाव्या. यासाठी चांगले तज्ज्ञ नियुक्त करा. या कंपन्या नफ्यात आणून पुन्हा शेतकऱ्यांना वीज द्या. माझा दावा आहे की, एकही पैसा शेतकऱ्यांकडून घेतला नाही व पूर्ण पाच वर्षे शेतकऱ्यांना वीज दिली तरी कंपन्या डुबत नाहीत, कंपन्यामधील भ्रष्टाचार बंद करा. शेतकऱ्यांचे जेवढे कनेक्शन कापण्यात आले तेवढे आजच्या आज पुन्हा जोडण्यात यावेत. यानंतर वीज कर्मचाऱ्याला शेतावर जाऊ देऊ नका. परवा काही शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या तसा प्रकार पुन्हा होऊ नये याची काळजी सरकारने घ्यावी. पुरवणी मागण्याच्या निमित्ताने मी ही मागणी करतो.

------

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) सभापती महोदय, सन २०२१-२२ च्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक ३९ पान क्रमांक ४३ वर मी बोलणार आहे. गडचिरोली जिल्ह्यातील सुजागडसह संपूर्ण जिल्ह्यातील आदिवासी लोकांना हद्दपार करण्यात येत आहे. त्यामुळे आदिवासी लोकांचा पारंपारिक रोजगार कशा प्रकारे वाचविणार ते सांगा ? गडचिरोली जिल्ह्यांसाठी पाचवी अनुसूची लागू आहे. येथे पेसा कायदा आहे. पेसा कायद्याने ग्रामसभेला भरपूर अधिकार दिले आहेत. तेथील ग्रामपंचायती व स्थानिक आदिवासी जनतेला वन उत्पन्नातून भरपूर पैसा मिळतो. अशा स्थितीत जवळपास १४९८० हेक्टर ही खाण पूरक कामासाठी व २० हजार हेक्टर म्हणजे एक लाख एकरपेक्षा जास्त जमिनीवरील जंगल तोडले जाणार आहे. एकीकडे आपण म्हणतो की, जंगल कमी आहे, त्यामुळे खाजगी जागेवर ३५ कलम लावून ती जमीन संपादित करतो. गडचिरोली हा भाग नक्षलवादी व आदिवासी आहे. तेथे असलेल्या आदिवासी माणसाचे उत्पन्न बंद करुन शासकीय यंत्रणेचा वापर करुन आदिवासी समाजाला हद्दपार करुन गावातून बाहेर काढण्यात येत आहे. अशा प्रकारे मोठ्या प्रमाणात आदिवासी लोकांवर अन्याय होत आहे.

या नंतर श्री.बोरले...

असुधारित प्रत

श्री.जयंत प्र.पाटील.........

माझे सहकारी श्री.जराते यांच्या नेतृत्वाखाली आदिवासी लोकांनी त्यासाठी विरोध केला. उत्पन्न चांगले असताना ते केव्हा मिळेल हे आम्हाला माहिती नाही. तेथील शासकीय यंत्रणेने ज्यांनी आंदोलन केले त्यांच्यावर खोट्यानाट्या केसेस करुन गुन्हे दाखल केलेले आहेत. गडचिरोली शहरात देखील तीच परिस्थिती आहे. गडचिरोली शहरातील रस्त्यांच्या रुंदीकरणाचे काम सुरु आहे. तेथील छोटी-मोठी दुकाने काढण्यासाठी आमचा विरोध नाही. परंतु पलीकडे असलेले पक्के बांधकाम तसेच ठेऊन छोटे गाळे काढण्याचे काम होत आहे. या निमित्ताने माझी आहे की, प्रथम तेथील पक्के बांधकाम काढावे आणि त्यानंतर झोपड्या हटविण्यात याव्यात. गडचिरोली नगरपालिकेकडे बरीच सरकारी जागा आहे. त्यांना पर्यायी जागा देण्यात यावी, अशी माझी मागणी आहे. त्यासाठी विरोधी केला तर संबंधितावर केसेस दाखल केल्या जातात. शासनाने यामध्ये लक्ष घालावे, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, खार जमीन विकास विभागाच्या पृष्ठ क्र.५वरील बाब क्र.३ वर मी बोलणार आहे. मी रायगड जिल्ह्यातील गंभीर बाब सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. मी आपल्याकडे रेकॉर्ड देतो. माझे सहकारी श्री.सत्यविजय शंकर पाटील यांनी ही माहिती गोळा केलेली आहे. जवळपास ८०० कोटी रुपयांची खोटी बिले काढण्यात आलेली आहेत. त्यांची नावे, बिले काढल्याचे रेकॉर्ड उपलब्ध आहे. सभापती महोदय, मी मघाशी आपल्या मार्फत मंत्री महोदयांसमवेत चर्चा केली. त्यांनी सांगितले की, आपण सदर विषय सभागृहाच्या रेकॉर्डवर मांडावा. मी आपल्या माध्यमातून ती माहिती मंत्री महोदयांकडे देतो. या प्रकरणाची एसआयटी मार्फत चौकशी झाली पाहिजे. शासनाकडे खार जमीन विकासाठी निधी नाही. माननीय श्री.दिवाकर रावते साहेब मंत्री होते. खार जमीन विकासासाठी आवश्यक तो निधी दिला जात नाही. समुद्राचे पाणी शेतात शिरते. संबंधितानी काम न करता ८०० कोटी रुपयांची बिले काढलेली आहेत. सदर कामे सातत्याने ४-५ कंपन्यांनाच देण्यात आलेली आहेत. या प्रकरणी चौकशी करण्यात यावी, अशी माझी मागणी आहे.

श्री.जयंत प्र.पाटील.........

सभापती महोदय, नगरविकास विभागाच्या पृष्ठ क्र.१४ वरील बाब क्र.१४ वर मी बोलणार आहे. मी मागील ७-८ वर्षांपासून अलिबाग नगरपालिकेतील मुस्लिम समाजाच्या सामाजिक सभागृहाचे आरक्षण काढण्याची मागणी करीत आहे. ती फाईल नगरविकास विभागाकडे गेलेली आहे. मी नगरविकास मंत्री महोदयांची अनेक वेळा भेट घेतली. तेथे छोटी उर्दू शाळा आहे. आम्ही त्या शाळेचे समाज मंदिरात रुपांतर करण्यासाठी प्रयत्न करीत आहोत. ती शाळा बाजारपेठेत आहे. तेथे लोक अवैध धंदा करीत आहेत. त्यामुळे त्या परिसरातील वातावरण चांगले राहत नाही. मी स्वत: १०-१२ वेळा फाईल घेऊन मंत्रालयात फिरलो. परंतु अद्याप त्याचा निकाल लागत नाही. या संदर्भात न्याय मिळेल, अशी मला अपेक्षा आहे.

सभापती महोदय, आपण एमएमआरडीएमध्ये अलिबाग, पेण, खालापूर, कर्जत क्षेत्राचा समावेश केलेला आहे. त्यासाठी निधीचे वाटप कशा प्रकारे करण्यात येणार आहे ? जो नवीन भाग समाविष्ट झालेला आहे तेथे पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी एमएमआरडीएच्या धर्तीवर प्रयत्न केले पाहिजेत. सम प्रमाणात नाही परंतु तेथे किमान २५ ते ३० टक्के निधीचे वाटप झाले पाहिजे. आता आम्ही एमएमआरडीए क्षेत्रात आलेलो आहोत असे तेथील जनतेला वाटले पाहिजे.

सभापती महोदय, बंदरे किास विभागाच्या पृष्ठ क्र.८ वरील बाब क्र.८वर मी बोलणार आहे. मुरुड तालुक्यातील मौजे भिऊर येथे मच्छिमार जेट्टी बांधण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात यावा, अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, मी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या बाब क्र.४७ व ५० वर बोलणार आहे. विभागाकडे निधी उपलब्ध आहे. केंद्र शासनाकडून देखील मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध होतो. १० टक्के लोकवर्गणीची अट आहे. रायगड जिल्हा परिषदेने लोकवर्गणी नंतर भरण्यासाठी मुभा दिलेली आहे. जनतेने प्रथम लोकवर्गणी भरुन ती डिपॉझीट केली पाहिजे. लोकवर्गणीची रक्कम मेंटेनन्ससाठी ठेवण्यात आलेली आहे. सदर योजना केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून

श्री.जयंत प्र.पाटील.........

राबविण्यात येते. पाईप लाईनच्या कामासाठी निधी घेतला जातो. पाईप लाईन टाकली जाते. परंतु पुढील काम केले जात नाही. त्यामुळे पैसे वाया जातात. शासनाने या संदर्भात चौकशी करावी. शासनाने लोकवर्गणी घेतल्याशिवाय काम सुरु करण्यासाठी परवानगी देऊ नये. मी सविस्तर बोलत नाही. मी मंत्री महोदयांना व्यक्तिश: भेटून माहिती देईन. अशा प्रकारे कोणीही बेकायदेशीर काम करु नये. लोएस्ट काम असताना हाईस्टसाठी परवानगी दिली असेल तर ते चुकीचे नाही. मी कॉन्ट्रॅक्टच्या भानगडीत पडत नाही. तुमचे व माझे संबंध चांगले असल्यामुळे मी तुम्हाला भेटून माहिती देणार आहे. ते रेकॉर्डवर येता कामा नये. मी मंत्री महोदयांच्या आदेशानुसार रेकॉर्डवर आणले. परंतु मुख्य कार्यकारी अधिकारी ते चुकीचे असल्याचे सांगत होते, असे होता कामा नये. मध्यंतरी चक्रीवादळामुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. मुख्यमंत्री महोदयांनी स्वत: पाहणी नुकसानग्रस्त भागाची केली होती. आम्ही सुद्धा तुमच्या बरोबर होतो. चक्रीवादळामुळे पडलेली झाडे व कचरा आपण अद्याप उचलू शकलो नाही. विभागाकडे स्वच्छतेसाठी निधी आहे. मुख्यमंत्री महोदयांची प्रकृती ठीक नसल्यामुळे मी जास्त बोलणार नाही. शासनाने यामध्ये लक्ष घालून केंद्र शासनाकडून प्राप्त झालेला निधी कशा प्रकारे खर्च होईल यासाठी प्रयत्न करावा. शासनाकडे निधी नाही अशी परिस्थिती नाही.

सभापती महोदय, अलिबाग येथे मोठ्या प्रमाणावर पर्यटक येतात. मुंबई येथे आल्यानंतर परदेशी पर्यटक अलिबाग येथे येतात. अलिबागला पर्यटनाचा "ब" दर्जा देण्यात यावा. तेथील पर्यटनाचा ओघ विचारात घेऊन तेथे प्राथमिक सुविधा कशा प्रकारे उपलब्ध करुन देता येतील यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत.

सभापती महोदय, मी खार लँड संदर्भातील भ्रष्टाचाराचा मुद्दा मांडलेला आहे. शासनाने या मुद्याची दखल घ्यावी. मी या संदर्भातील कागदपत्रे आपल्या माध्यमातून शासनाकडे देतो. या प्रकरणी उच्च स्तरीय चौकशी करुन पुन्हा असे होणार नाही याची काळजी घ्यावी, अशी मागणी करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

------

श्री.अभिजित वंजारी (नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन २०२१-२२ च्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मुख्यमंत्री महोदय सभागृहात उपस्थित आहेत. मी मुख्यमंत्री महोदयांचा जास्त वेळ घेणार नाही. मुख्यमंत्री महोदयांनी पाच मिनिटे थांबावे, अशी माझी विनंती आहे. मी आपल्याला विनंती करु इच्छितो की,.....

श्री.उद्धव बाळासाहेब ठाकरे : सभापती महोदय, मला महत्वाची बैठक आहे. आपण मला त्या बैठकीसाठी उपस्थित राहण्याची परवानगी द्यावी. आपण सर्वच मला सहकार्य करीत आहात त्याबद्दल मी आपला आभारी आहे.

श्री.अभिजीत वंजारी : सभापती महोदय, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या पृष्ठ क्र.७ वरील बाब क्र.४ वर मी बोलणार आहे. राज्यातील विविध विभागात अनेक कर्मचारी वेगवेगळ्या पदावर काम करतात. राज्यात ३६ हजारांपेक्षा जास्त वाचनालये आहेत. गाव, शहर, तालुका स्तरावर वाचनालये आहेत. आपण नियमाप्रमाणे "अ", "ब", "क", "ड" अशा प्रकारे वाचनालयांची वर्गवारी करतो. वाचनालयात काम करणारी व्यक्ती ६ तास काम करते. एखाद्या व्यक्तीने ६ तास काम केल्यानंतर त्याला किती पगार मिळाला पाहिजे ? राज्यातील ग्रंथालयात ग्रंथपाल संवर्गाचे पद आहे.

यानंतर श्री.सांगळे.......

असुधारित प्रत

श्री.अभिजीत वंजारी....

"अ" ग्रेडमधील वाचनालयामध्ये काम करणाऱ्या व्यक्तीला दरमहा ३ हजार रुपये पगार आहे. "ब" ग्रेडमधील वाचनालयामध्ये काम करणाऱ्या व्यक्तीला २६६७/- रुपये पगार आहे. "क" ग्रेडमधील वाचनालयामध्ये काम करणाऱ्या व्यक्तीला २ हजार रुपये पगार आहे आणि "ड" ग्रेडमधील वाचनालयामध्ये काम करणाऱ्या व्यक्तीला १२५०/- रुपये इतका पगार आहे. सदनामध्ये होत असलेल्या चर्चेच्या माध्यमातून अनेक वेळा किमान वेतन कायद्याचा उल्लेख केला जातो. रोजंदारीवर काम करणाऱ्या व्यक्तीला देखील एका महिन्यामध्ये ९ ते १० हजार रुपये मिळत असतात. परंतु अनेक वर्षांपासून राज्यात असलेल्या ग्रंथालयांमध्ये काम करण्याची ज्या व्यक्तीवर जबाबदारी दिली आहे त्याला आपण उपाशी ठेवले आहे. "ड" ग्रेडमधील वाचनालयामध्ये काम करणारा व्यक्ती १२५०/- रुपयांच्या पगारामध्ये आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करु शकेल ? याबाबत आपण सर्वांनी विचार करावा अशी माझी मागणी आहे. सभापती महोदय, माझे अनेक मुद्दे आहेत. परंतु पुरवणी मागण्यांवर अनेक सन्माननीय सदस्यांना आपापले विचार व्यक्त करायचे असल्यामुळे मी त्यावर जास्त बोलणार नाही.

सभापती महोदय, ऊर्जा विभाग, बाब क्रमांक २१ ते २५ मध्ये सर्वसामान्य व्यक्ती व शेतकऱ्यांकरिता शासनाने अनेक योजना घेतल्या आहेत. या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे यांनी उल्लेख केला आहे. नागपूरसारख्या अनेक शहरांमध्ये अनेक वर्षांपासून रस्त्यांवर विजेचे खांब असल्यामुळे वाहतुकीला मोठा अडथळा होतो. परिणामी अनेकवेळा अपघात होत असतात. रस्त्यांवरील विजेचे खांब इतरत्र हटविण्यासाठी सदनामधील अनेक सन्माननीय सदस्यांनी विशेष अनुदान मिळण्यासंबंधी मागणी केली होती. परंतु अद्याप तो प्रश्न प्रलंबित आहे. मी माननीय मंत्री यांना विनंती करतो की, त्यांनी या संदर्भात तरतूद करावी.

सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागासंबंधी सांगायचे झाल्यास...

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य, आजच्या पुरवणी मागण्यांमध्ये शालेय शिक्षण विभागाचा समावेश नाही.

असुधारित प्रत

श्री.अभिजीत वंजारी : सभापती महोदय, ठीक आहे. नगरविकास विभाग, बाब क्रमांक - १२, पृष्ठ क्रमांक - १२ संबंधी मी सांगू इच्छितो की, पुरवणी मागण्यांमध्ये महापालिका क्षेत्रांमध्ये पायाभूत विकासांच्या सुविधांकरिता ७०० कोटी रुपये, नगरपरिषदांना वैशिष्टयपूर्ण कामाकरिता विशेष अनुदान देण्यासाठी ५०० कोटी रुपये तसेच नव्याने स्थापन झालेल्या नगर पंचायतींना नागरी सुविधा पुरविण्यासाठी २०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. माझी या निमित्ताने विनंती आहे की, एखाद्या विधानसभा क्षेत्रात किंवा शहरामध्ये काम करीत असताना विधानसभा क्षेत्रनिहाय किंवा वॉर्ड निहाय न्याय मिळाला पाहिजे. अन्यथा सौंदर्यीकरण किंवा नाविन्यपूर्ण योजनांसाठी एखाद्या विधानसभा क्षेत्रासाठी संपूर्ण निधी दिला जातो व उर्वरित विधानसभा क्षेत्र उपेक्षित राहतात. त्यामुळे ज्या शहरांमध्ये अशी योजना मंजूर झाली आहे त्याच ठिकाणी विधानसभा क्षेत्रनिहाय निधीचे वाटप झाले पाहिजे अशी माझी मागणी आहे. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

------------

असुधारित प्रत

श्री.अनिकेत तटकरे (रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था): सभापती महोदय, सन २०२१-२०२२ च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, जलसंपदा विभाग, पृष्ठ क्रमांक – १९, बाब क्रमांक – २० संबंधी मी सांगू इच्छितो की, महाड येथील कुंभे व कोथेरे प्रकल्प तसेच पोलादपूर येथील कालीवली, धारिवली हे प्रकल्प अद्याप अपूर्ण आहेत. तसेच रत्नागिरी जिल्हयातील खेड तालुक्यामधील पोईनार प्रकल्प अपूर्ण आहे. सदर प्रकल्प पूर्ण होण्यासाठी शासनाने निधीची तरतूद करावी अशी माझी आपल्यामार्फत शासनाला विनंती आहे.

सभापती महोदय, महाड व पोलादपूर येथे झालेल्या अतिवृष्टीमुळे नद्यांमधील गाळ काढण्यासाठी जलसंपदा विभागाने निधी दिला आहे. मी त्याबद्दल जलसंपदा विभागाचे विशेष आभार मानतो. ही बाब फक्त महाड व पोलादपूरपुरती मर्यादित नाही तर कोकणामधील पूर रेषेमध्ये येणाऱ्या गावांमध्ये असलेल्या नद्यांमधील गाळ काढण्यासंबंधी शासनाने विचार करुन त्याकरिता निधी उपलब्ध करुन द्यावा अशी मी शासनाला विनंती करतो.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभाग, बाब क्रमांक - १६ च्या संदर्भात मी सदनाला सांगू इच्छितो की, आज जागतिक महिला दिन आहे. आपण नेहमी राजमाता जिजाऊ यांचा आदर्श घेऊन काम करीत असतो. रायगडला स्वराज्याची राजधानी संबोधले जाते. अनेक शिवभक्त, शंभूभक्त, गडांची माहिती असलेले तज्ज्ञ व महनीय व्यक्ती रायगडला वर्षाकाठी भेट देत असतात. सभापती महोदय, मी आपल्या मार्फत शासनाचे एका गोष्टीकडे लक्ष वेधू इच्छितो. तेथे शासकीय विश्रामगृह नाही. शासनाने रायगडकरिता शासकीय विश्रामगृहासाठी मान्यता देऊन त्याकरिता निधी उपलब्ध करुन द्यावा अशी मी शासनाकडे मागणी करतो.

श्री.अनिकेत तटकरे...

सभापती महोदय, नगरविकास विभाग, बाब क्रमांक – १२, पृष्ठ क्रमांक - १२ च्या संदर्भात मी सदनाला सांगू इच्छितो की, सुधागड ही नव्याने नगरपंचायत निर्माण झाली आहे. परंतु तेथे प्रशासकीय इमारत नाही. तेथील प्रशासकीय इमारतीसाठी व अधिकारी वर्गाकरिता आवश्यक असलेल्या सुविधांसाठी नगरविकास विभागाने निधीची उपलब्धता करावी अशी मी शासनाला विनंती करतो.

सभापती महोदय, मुरुड नगरपालिका जवळपास १०० वर्षांपूर्वीची आहे. ही नवाबकालीन नगरपालिका आहे. तेथे नगरपालिकेची जागा आहे. नगरपालिकेने तेथे महिलांसाठी कार्यशाळा बांधली होती. परंतु १५ वर्षांमध्ये त्या कार्यशाळेची दुरावस्था झाली आहे. आम्ही त्यासंबंधी नव्याने आराखडा तयार करीत आहोत. त्याकरिता ५० लाख रुपयांच्या निधीची आवश्यकता आहे. माझ्या मुस्लीम भगिनींसाठी शासनाने सदर निधी उपलब्ध करुन द्यावा अशी मी विनंती शासनाला करतो.

सभापती महोदय, कौशल्य विकास, रोजगार विभाग, बाब क्रमांक – ५१, पृष्ठ क्रमांक - ४८ च्या संदर्भात मी सदनाला सांगू इच्छितो की, अलीकडच्या काळात रायगड व रत्नागिरी जिल्हे हे उद्योग व कारखानदारीसाठी नावारुपाला येत आहेत. परंतु तेथे काही बेसिक गोष्टी आवश्यक आहेत. आयटीआयसंबंधी विचार करता तेथे इलेक्ट्रीक, मॅकेनिक तसेच वेल्डर अशा प्रकारे फक्त ३-४ जुने ट्रेड सुरु आहेत. तेथे नव्याने बंदरे होत आहेत, मोठया प्रमाणात कारखानदारी होत आहे. अशा परिस्थितीत तेथील उद्योगांना स्कील डेव्हलपमेंटच्या दृष्टीने कशा प्रकारची गरज लागणार आहे ? ही बाब विचारात घेऊन तेथे आणखी ट्रेड वाढविण्यासंबंधी शासनाने विचार करावा अशी मी शासनाला विनंती करतो.

सभापती महोदय, मुरुड तालुक्यात अंजुमन इस्लाम नावाची संस्था जवळपास १०० वर्षांपासून कार्यरत आहे. तेथे आयटीआय प्रशिक्षण केंद्र आहे. तेथील इमारत पडीक अवस्थेत आहे. शासनाने त्याकरिता निधी उपलब्ध करुन द्यावा अशी मी आपल्या मार्फत शासनाला विनंती करतो.

श्री.अनिकेत तटकरे...

सभापती महोदय, आपण मला पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो, धन्यवाद.

-----------

असुधारित प्रत

श्री.अंबादास दानवे (औरंगाबाद तथा जालना स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन २०२१-२०२२ च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मी माझे मुद्दे थोडक्यात मांडणार आहे. महसूल व वन विभाग, बाब क्रमांक – ३ संबंधी मी वारंवार मागणी करीत आहे की, मराठवाडयातील वन्य प्राण्यांना हाताळण्यासाठी रॅपिड रेस्क्यु युनिटची आवश्यकता आहे. विविध गावांमध्ये चित्ते, वाघ व अन्य वन्य जनावरे येत असतात. अनेक गावांमधील विहिरींमध्ये वन्य प्राणी पडत असतात, तेथून त्यांना बाहेर काढत असताना त्यांच्या जिवाला मोठा त्रास होत असतो. त्यामुळे नागपूरच्या धर्तीवर मराठवाडयात एक रॅपिड रेस्क्यु युनिट असावे अशी मी आपल्यामार्फत शासनाकडे मागणी करतो.

सभापती महोदय, संभाजी नगर येथे करोडीला क्रीडा विद्यापीठ निर्माण झाले आहे. शासनाने त्याकरिता निधीची तरतूद करावी अशी मी मंत्री महोदयांना विनंती करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक १६ ते १८ च्या संदर्भात मी सदनाला सांगू इच्छितो की, संभाजी नगर येथे ३ बाजूने रिंग रोड झाला आहे. परंतु उत्तर बाजूच्या हरसूल सावंगी ते दौलताबाद रिंग रोडचे काम अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. पुरवणी मागण्याच्या माध्यमातून शासनाने त्याकरिता तरतूद करावी अशी मी शासनाला विनंती करतो.

सभापती महोदय, उद्योग विभाग, बाब क्रमांक २० व २१ च्या संदर्भात मी सदनाला सांगू इच्छितो की, संभाजी नगर शहरामध्ये चिखलदारा एमआयडीसी एरिया आहे. सदर एमआयडीसी एरियामध्ये ३० वर्षांपासून नवीन रस्ते झालेले नाहीत. शासनाने त्याकरिता तरतूद करावी. सौर ऊर्जा प्रकल्पाला मोठया प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. परंतु सौर ऊर्जा प्रकल्पांची आवश्यक तेवढी संख्या नाही. शासनाने सौर ऊर्जा प्रकल्पासाठी जास्तीत जास्त तरतूद करणे आवश्यक आहे.

श्री.अंबादास दानवे...

सभापती महोदय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, बाब क्रमांक ४५ च्या संदर्भात मी सदनाला सांगू इच्छितो की, दिनांक २२ सप्टेबर, १९२३ रोजी मराठवाडयात सर्वप्रथम संभाजी नगरमध्ये ज्ञान व विज्ञान महाविद्यालयाची स्थापना झाली होती.

यानंतर श्री.गागरे......

असुधारित प्रत

श्री.अंबादास दानवे ......

मराठवाडा मुक्तीसंग्रामातील हे ऐतिहासिक ठिकाण आहे. मराठवाडयातील अनेक विद्यार्थी येथे शिक्षण घेण्यासाठी येत असतात. त्याला मुगलकालीन ऐतिहासिक वारसा लाभला आहे. परंतु या इमारतीला १०० वर्षे पूर्ण झालेले आहेत. सातत्याने या इमारतीसाठी सरकारच्या वतीने सहकार्य केले पाहिजे ही भूमिका सातत्याने मांडली आहे. या बाबीमध्ये उच्च शिक्षण विभागाचे ग्रंथालय येतात. यांच्या अनुदानात कित्येक वर्षापासून वाढ झालेली नाही. मला असे वाटते की, हा प्रश्न आपण चांगल्या प्रकारे जाणता. ग्रंथालयाचे अनुदान अतिशय नाममात्र आहे. ३० हजार, ९६ हजार असे अनुदान आहे., ब वर्ग, क वर्ग, ड वर्ग यामध्ये दर्जावाढ झाली पाहिजे व अनुदानात वाढ झाली पाहीजे अशी आपल्यामार्फत विनंती करतो.

सभापती महोदय, सांस्कृतिक कार्य मंत्री महोदय सभागृहात उपस्थित आहेत. मी आपल्यामार्फत त्यांना विनंती करतो की, मोठा वेरुळ महोत्सव दरवर्षी होत होता. या निमित्ताने ७-८ वर्ष हिंदुस्थानात परदेशी पर्यटक मोठया प्रमाणावर येत होते. हा वेरुळ महोत्सव नव्याने सुरु करण्यात यावा. यासाठी पुरवणी मागण्यांमध्ये तरतूद करावी अशी विनंती आहे. जयहिंद, जयमहाराष्ट्र.

-------

असुधारित प्रत

श्री.रमेशदादा पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन २०२१-२२ च्या पुरवणी मागण्यांवर मी बोलत आहे. मत्स्यव्यवसाय विभाग, बाब क्रमांक ९ मध्ये मागणी क्रमांक डी ९, पान क्रमांक ९ मध्ये मत्स्यव्यवसाय शिर्षक क्रमांक २४०५ लेखाशीर्षाखाली अपुऱ्या स्वरुपाचे आहे. कोकण किनारपट्टीवर सात जिल्हे आहेत. चक्रीवादळामुळे मच्छिमार बांधवांचे खूप मोठया प्रमाणावर नुकसान झालेले आहे. वादळामुळे मच्छिमारांची जाळी, बोटी, घरे, सुकी मासळी असे यांचे खूप मोठया प्रमाणावर नुकसान झालेले आहे. कारण गेल्या दोन वर्षात तीन मोठमोठी वादळे येऊन गेली. निसर्ग चक्रीवादळ, क्वार वादळ, तौक्ते वादळ येऊन गेले. परंतु तुटपुंजी मदत मच्छिमार बांधवांना केली गेली. खरे म्हणजे २१०० कोटीची मदत आम्ही मागितली होती. पण मत्स्यव्यवसाय विभागाने केवळ ६५ कोटी रुपये फक्त दिलेले आहेत. आमच्याकडे सुमारे २० हजार मच्छिमार नौका समुद्रात मासेमारी करीत असतात. त्यामुळे दिलेली ही मदत अपुरी आहे. आमचे म्हणणे आहे की, येत्या अर्थसंकल्पात जास्त तरतूद करुन द्यावी. जेणेकरुन मच्छिमारांचे प्रश्न सुटतील.

सभापती महोदय, केंद्र शासनामार्फत शेतकऱ्यांकरीता किसान क्रेडीट कार्ड योजना बिगरव्याजी राबविली जाते. त्याचप्रमाणे मच्छिमारांना त्याच धर्तीवर किसान क्रेडीट कार्ड मिळाले पाहिजे. हे कार्ड दिले तर २-३ महिन्याच्या दुष्काळात तात्पुरती मदत मिळेल. परंतु मत्स्यव्यवसाय विभाग व मंत्री महोदयांमार्फत मच्छिमारांना क्रेडीट कार्ड मिळत नाही. या विभागाने बँकांकडे सांगितले तर आम्हाला निश्चित फायदा होईल. आमची विनंती आहे की, केंद्र सरकारच्या धर्तीवर या मच्छिमारांना देखील हे कार्ड मिळाले पाहिजे. याकरीता मंत्री महोदयांनी जास्त प्रयत्न करावेत. मच्छिमार बांधवांना जून व जुलै या दोन महिन्याच्या मासेमारी बंदी कालावधीत तामिळनाडू व आंध्रप्रदेश राज्याच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यात प्रत्येक मच्छिमार बांधव व भगिनिंना पाच हजार रुपये खावटी योजना चालू करावी. ही खावटी योजना अनेक वर्षांपासून तामिळनाडू, मध्यप्रदेश व आंध्रप्रदेशमध्ये आहे. मत्स्यव्यवसाय मंत्री महोदयांना अनेकदा सांगून व पत्र देऊन अजूनपर्यत खावटी योजना येथे चालू केलेली नाही, आपणास विनंती आहे की, ही खावटी योजना त्वरीत महाराष्ट्रात चालू करावी. नाही तर मच्छिमार बांधव व भगिनींना उपासमारीची वेळ येते, या योजनेतून त्यांना निश्चित

अग्रिम प्रत

श्री.रमेशदादा पाटील.....

मदत होईल. मच्छिमार बांधवांना ३०० कोटी रुपयापेक्षा मोठया प्रमाणात डिझेल परतावा पाहिजे आहे, याकरीता आम्ही वर्षानुवर्षे झगडत असतो. अलिबागच्या लोकप्रतिनिधींकडे आम्ही याबाबत पाठपुरावा करतो, याबाबत तरतूद केली पाहीजे. मंत्री महोदयांनी आता याकरीता ७०० कोटीची तरतूद करावी यामुळे मागील थकबाकी व पुढील काळात याचा उपयोग होईल. महाराष्ट्रात ओएनजीसी व मत्स्यव्यवसाय विभागामार्फत मागील १० वर्षापासून सेसेमिक सर्व्हे सुरु झालेला आहे. हा सेसेमिक सर्व्हे म्हणजे खोल समुद्रात जाऊन ओएनजीसी तेल शोधण्याकरीता ड्रिल करते. या ड्रीलमुळे आजूबाजूचे मासे नष्ट होतात. मच्छिमार बांधवांना मासेमारी करता येत नाही. यामुळे मागील १० वर्षे आमचे मोठया प्रमाणावर नुकसान झालेले आहे. आम्ही वारंवार केंद्र व राज्य शासनाला याबाबत सांगितले आहे परंतु दोन्ही सरकार लक्ष देत नाही. केंद्र सरकार सांगते की, महाराष्ट्राच्या हद्दीत मत्स्यउद्योग सुरु आहे, त्यामुळे आपण त्यांना सांगावे. आम्ही वारंवार सांगतो. आमचे जवळपास ५० कोटीचे नुकसान झालेले आहे, आम्ही नेहमीच त्यांना विनंती करीत आहोत. प्रत्येक जिल्हयात मत्स्यव्यवसाय विभागासाठी जिल्हा नियोजन विभागामार्फत मच्छिमारांना आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी जास्तीत जास्त आर्थिक तरतूद करावी. शेतकऱ्यांना आपण ज्याप्रमाणे ३३ हजार कोटी कर्ज माफ केले, त्याचप्रमाणे मत्स्यशेतीसाठी एनसीडीसी कडून आम्ही कर्ज घेतो व होडया बांधतो. या होडयांवर कर्ज आहे, शेतकऱ्यांप्रमाणे आमच्या होडयावरील कर्ज माफ करावे अशी विनंती आहे.

सभापती महोदय, राज्य शासनाकडे मुंबई कोळीवाडा मच्छिमार भवन उभारण्याची विनंती केलेली आहे, अनेक वर्षे विनंती करुनही आम्हाला जागा मिळाली नाही. मी आपणास सांगू इच्छितो की, आदिवासी विकास विभागाची बाब क्रमांक ४३, टी ५ पान क्रमांक ३९, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमातीच्या बांधवाच्या खावटी योजनेसाठी वाढीव आर्थिक तरतूद करण्यात यावी. आदिवासी पाडे याकरीता असलेल्या आदिवासी जमाती समितीचे आम्ही सदस्य आहोत. संपूर्ण महाराष्ट्रात

श्री.रमेशदादा पाटील .....

आम्ही फिरलो आहे, सर्व्हे केला आहे. आदिवासीसाठी फक्त २५ टक्के खावटी मंजूर केलेली आहे. टीएसपी व ओटीएसपीच्या लोकांना खावटी मिळत नाही. अजून ७५ टक्के लोकांना खावटी मिळाली नाही. आमची विनंती आहे की, ही खावटी मिळविण्यासाठी येत्या आर्थिक वर्षात त्याची तरतूद करावी. एवढे बोलून मी थांबतो.

----------

असुधारित प्रत

श्री.अरुण लाड (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, कौशल्य विकास विभागाच्या पुरवणी मागण्यांवर मी बोलू इच्छितो. या विभागाकरीता निधी कमी आहे. आपल्या देशात फक्त २० टक्के कौशल्ययुक्त आहेत व ८० टक्के कौशल्य नसलेल्यांची संख्या आहे. त्यांच्यामध्ये कौशल्य आणण्यासाठी ३ महिने ते ९ महिन्यांपर्यंत प्रशिक्षण देण्याबाबत व ३ ते ९ हजार रुपये पगार किंवा मानधन देण्याबाबत मागील अधिवेशनात सांगितले होते पण यावर कोणतीही कार्यवाही झाली नाही. कौशल्य विकासासाठी अजून काही झालेले नाही. शासकीय तंत्रनिकेतन देण्याबाबत सांगितले जाते पण त्यास कमी निधी दिला जातो. एवढया निधीत तुम्ही फक्त पुस्तकी कौशल्य आणू शकता पण प्रॅक्टीकल कौशल्य आणण्यासाठी त्याला टेक्नीकल नॉलेज व प्रॅक्टीकल दिले पाहिजे. कौशल्यमुक्त असलेल्यांना कौशल्ययुक्त करण्यासाठी थोडी धडपड केली केली पाहिजे. याकरीता कमी निधी आहे, गावोगावी किंवा विभागवार कार्यशाळा उपलब्ध केल्या पाहिजेत. प्रॅक्टीकल्स करुन घेतली पाहिजेत यातून त्यांच्यामध्ये कौशल्य येऊ शकते.

सभापती महोदय, एखाद्या वकीलाकडे स्टेनोग्राफर काम करीत असेल तर २० मिनिटाच्या कामाला ३ हजार रुपये पेमेंट घेतो. कौशल्याचे शिक्षण घेतल्याशिवाय कौशल्य प्राप्त होत नाही. म्हणून याकरीता जास्त निधीची तरतूद करण्यात यावी. तसेच विभागवार तंत्रशिक्षणाच्या शाळा निघाव्यात अशी माझी विनंती आहे, धन्यवाद.

--------

श्री.सदाभाऊ खोत (विधानसभेने निवडलेले): सभापती महोदय, सन २०२१-२०२२ च्या पुरवणी मागण्यांवर बोलण्याकरिता मी उभा आहे.

सभापती महोदय, मी पाणीपुरवठा विभागावर माझे विचार मांडणार आहे. सभागृहात पाणीपुरवठा मंत्री उपस्थित आहेत. लेखाशीर्ष क्रमांक २२१५, बाब क्रमांक ५०, पृष्ठ क्रमांक ४७, पुरवणी मागणी क्रमांक वाय-२ यावर मी बोलणार आहे.

सभापती महोदय, पाणीपुरवठा विभागामध्ये ज्या ०५ कोटी रुपयांपर्यंतच्या ज्या योजना आहेत, त्या जिल्हापरिषद स्तरावर मंजूर करण्याबाबतचा निर्णय घेतलेला आहे. परंतु यामध्ये लोकवर्गणीची अट दहा टक्क्यांची आहे. या कोरोनाच्या काळात ग्रामपंचायती दहा टक्क्यांची लोकवर्गणी गोळा करु शकत नाही. ग्रामपंचायतीमध्ये तेवढी दहा टक्के लोकवर्गणी गोळा होत नाही. सर्व सदस्य या मताशी सहमत होतील, अशी मला आशा आहे. लोकवर्गणीची अट रद्द केली तर या पाणीपुरवठा योजना पूर्ण होतील. दुसऱ्या बाजूला ज्या योजना पूर्वी मंजूर केलेल्या आहेत. किंवा दोन महिन्यांपूर्वी मंजूर झालेल्या आहेत, त्या योजनांच्या एस्टीमेटला नव्याने मंजूरी द्यावी लागेल कारण स्टीलचे भाव आता जवळ जवळ ९०,०००च्या आसपास गेलेले आहेत. आपल्या पूर्वीच्या अंदाजपत्रकामध्ये ४५,००० रुपये स्टीलचा भाव गृहित धरलेला आहे, त्यामूळे त्या योजना अपूर्ण राहण्याचा धोका निर्माण झालेला आहे. पाईपचे भाव वाढलेले आहेत. दुसरा महत्त्वाचा मुद्दा असा आहे की, आपण स्वच्छ मिशन अंतर्गत शंभर दिवसांचा धडक कार्यक्रम ग्रामीण स्वच्छता विभागाने राज्यात राबविलेला आहे. बीड,औरंगाबाद, नांदेड, सोलापूर अशा इतर दहा जिल्हयांमध्ये जवळ जवळ ८६ टक्के कामे झालेली नाहीत. याबाबत योग्य त्या सूचना संबंधितांना देऊन ती कामे पूर्ण करुन घेणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, जलसंपदा विभाग, लेखाशीर्षक ४७११, बाब क्रमांक १९, पृष्ठ क्रमांक १९ याबाबत मला एक महत्त्वाची सूचना करायची आहे. या राज्यात पाणी वापर संस्था मोठया प्रमाणात स्थापन झालेल्या आहेत. या संस्थांच्या माध्यमातून कॅनॉलचे पाणी देण्यात येते, त्या ठिकाणी अनेक बोगस पाणी वापर संस्था

असुधारित प्रत

श्री.सदाभाऊ खोत.....

देखील स्थापन झालेल्या आहेत, यामुळे पाणीवापराबाबत शेतकऱ्यांवर अन्याय होत आहे. आपण या ठिकाणी योग्य त्या सूचना द्याव्यात, अशी मी विनंती करतो.

दुग्धविकास विभाग, लेखाशीर्ष २४०४, बाब क्रमांक ७, पृष्ठ क्रमांक ७ यामध्ये ऊसाच्या एफआरपीप्रमाणे राज्याच्या दुध उत्पादकाकरिता एफआरपीचा कायदा लवकर आणण्यात येईल, त्याबाबत समिती गठित केलेली होती, तरीही याबाबतचा कायदा अद्याप झालेला नाही. दुध उत्पादक शेतकऱ्यांच्या दृष्टीने तो कायदा होणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

ऊर्जा विभाग, लेखाशीर्षक २८० बाब क्रमांक २१ यावर मी सविस्तर बोलणार नाही. कारण की, सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे यांनी सविस्तर मांडणी केलेली आहे. राज्यात कशा पध्दतीने शेतकऱ्याला वीज माफी देता येऊ शकते, कोरोनाच्या काळात मदत करता येऊ शकते कारण या सर्व कंपन्या पूर्वी नफ्यात होत्या. आता लगेच दोन वर्षात त्या कंपन्या तोटयात का गेल्या ? त्याचे कारण भ्रष्टाचार हेच आहे. आता ऐन उन्हाळा सुरु झालेला आहे. पीके वाळायला लागलेली आहेत. चारा-टंचाई निर्माण होण्याचा धोका आहे. अशा काळात शेतकऱ्यांना दिलासा देणे गरजेचे आहे. कोणत्याही शेतकऱ्याची वीज कापण्यात येऊ नये. कोरोना काळातील दोन वर्षाची तरी शेतकऱ्याला वीज बिल माफी देणे गरजेचे आहे. ऊर्जा राज्यमंत्री महोदय सभागृहात उपस्थित आहेत. त्यांनी याबाबतचे शासनाचे धोरण जाहीर केले तर बरे होईल. शासन शेतकऱ्याचे वीज बिल कनेक्शन तोडणार नाही, हा संदेश आपण जर महाराष्ट्रातील जनतेला दिला तर आम्ही आपले निश्चिपणे अभिनंदन करु. मला कळत नाही की, सरकारला याचे गांभीर्य का वाटत नाही ? विरोधात होता त्यावेळी आपण मोर्चेच मोर्चेच काढत होता ! आपण त्यावेळी असेही सांगत होता की, शेतकऱ्यांचे यांना काही कळत नाही. आता आपण सत्तेवर आलेला आहात. आपल्याला कळायला लागले की प्रत्येकाने एण्डोसल्फान पिऊनच मेले पाहिजे. आता कुठेतरी थोडी आपल्याला दया-माया येऊ दे ! ऊर्जा राज्यमंत्री महोदय, या अनुषंगाने हा जरी बाहेरचा प्रश्न असला तरीही त्यावर लक्ष द्यावे.

श्री.सदाभाऊ खोत......

जयसिंगपूरमध्ये कंत्राटी वीज कर्मचारी शिरोळ तालुक्यामध्ये कामावर असताना विजेचा शॉक लागून मरण पावला. तो वरच अडकून पडला होता. त्याचे कुटुंब याकरिता आंदोलन करीत आहे. गेली दीड वर्षापासून त्याच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई मिळालेली नाही. याबाबतची तपशीलवार माहिती मंत्रीमहोदयांना देतो. याबाबत शासनाने योग्य तो निर्णय घ्यावा.

सभापती महोदय, इतर मागास व बहुजन कल्याण विभाग, लेखाशीर्ष २२२५, बाब क्रमांक २५, पृष्ठ क्रमांक ५२ वर मी बोलत आहे. धनगर समाजासाठी अनेक योजना पूर्वीच्या सरकारने जाहीर केलेल्या होत्या. त्याकरिता मोठया प्रमाणात निधी दिलेला होता. आता त्या सर्व योजना बंद आहेत. त्यांच्या शेळी-मेंढी महामंडळाला मोठा निधी दिला नाही. त्या समाजाच्या मुलांना चांगल्या शाळांमध्ये इंग्रजी माध्यम, नामांकित शाळांमध्ये प्रवेश देण्याकरिता शासनाने योजना आणलेली आहे. ती योजना फसलेली आहे. कारण नामांकित शाळांमध्ये ७०-७५ हजार रुपयांमध्ये ॲडमिशन देऊ शकत नाही. कारण या शाळांचा खर्च जास्त आहे. नामांकित रेसिडेन्शियल स्कूलमध्ये त्यांना ७०-७५ हजार रुपयांमध्ये ॲडमिशन देणे परवडत नाही. कारण जेवण, शाळा, कपडे, शिक्षण, राहणे त्यांना इतक्या पैशांमध्ये त्या नामांकित शाळांना परवडत नाही. शासनाने ही रक्कम वाढविणे आवश्यक आहे. नामांकित शाळांऐवजी इतर शाळांमध्ये त्यांना प्रवेश मिळाला तर त्यांना चांगले शिक्षण मिळणार नाही. याबाबत शासनाने योग्य निर्णय घ्यावा.

सभापती महोदय, दुसरा मुद्दा असा आहे की, इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या माध्यमातून ज्या आश्रम शाळा चालविल्या जातात, भटक्या विमुक्त जातीच्या आश्रम शाळा देखील चालविल्या जातात. तेथे स्वयंपाकी, महिला अधीक्षक, चौकीदारांच्या जागा रिक्त आहेत. या महत्त्वाच्या जागा आहेत, त्या तातडीने भरणे गरजेचे आहे. त्याबाबत योग्य ती कारवाई व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो.

---------

असुधारित प्रत

श्री.संजय दौंड (विधानसभेने निवडलेले): सभापती महोदय, सन २०२१-२०२२ च्या पुरवणी मागण्यांवर बोलण्याकरिता मी उभा आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक ३५, पान क्रमांक ३९ वर मी बोलणार आहे. राष्ट्रीय पशुधन विमा योजनेकरिता १,२८,९३,००० रुपये एवढी तरतूद केलली आहे. ही तरतूद अत्यंत तुटपूंजी आहे. राज्यातील गाई, म्हशी, शेळया,मेंढया यांची संख्या बघता राज्यातील बळीराजाच्या पशुधनाला जीवनाची हमी देण्याकरिता राष्ट्रीय पशुधन योजनेत आर्थिक तरतुदीची वाढ करुन कमीत कमी पाच कोटी रुपयांची तरतूद करावी, एवढी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक ४७, बाब क्रमांक ५० यावर मी बोलणार आहे. राज्याचे पाणीपुरवठा मंत्री महोदय सभागृहात उपस्थित आहेत. मी जवळपास १५ वर्षे जिल्हापरिषदेमध्ये काम केलेले आहे. पाणीपुरवठा योजनेंतर्गत वेगवेगळी नावे देऊन योजना मंजूर करतो. जलस्वराज्य, जलजीवन योजना राष्ट्रीय पेय जल, विशेष घटक योजनेंतर्गतही अनेक पाणीपुरवठा योजना मंजूर केल्या जातात. परंतु आजही ग्रामीण भागात जर पाहिले तर तेथे पाण्याची अवस्था दयनीय आहे. गाव तेच, योजना अनेक विविध नावांखाली योजना मंजूर केल्या जातात. तरीही आजही गावं, वाडया, तांडे तहानलेली आहेत. माझी शासनाला नम्र विनंती आहे की, शासनाने याबाबत ऑडिट केले पाहिजे. ज्या गावांमध्ये अशा अनेक योजना मंजूर झाल्या, त्याचे कामही पूर्ण झालेले आहे, असे असताना त्या संबंधित गावांना पाणी का मिळत नाही, यामध्ये शासनाने गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे.

यानंतर श्री.सोनावणे......

श्री. संजय दौंड....

शासनाकडून योजना मंजूर केल्या केल्यानंतर सामान्य प्रशासन विभागाकडून प्रमाणपत्र घेतले जाते. परंतु, अनेक ठिकाणी अनेक वेळा संबंधित अधिकारी चुकीचा स्पॉट निवडतात आणि सांगतात की, या ठिकाणी सोर्स चांगला आहे. अशा प्रकारे कोणाच्या तरी आग्रहाखातर योजना राबविल्या जात आहेत. त्यामुळे माझी अशी विनंती आहे की, या योजना चांगल्या पध्दतीने राबविल्या पाहिजेत आणि शासनाचा निधी अनाठायी खर्च होता कामा नये, एवढीच माझी प्रामाणिक अपेक्षा आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक-२४, पृष्ठ क्रमांक-२२. मराठवाडा आणि विदर्भातील कृषी पंपांना वीज जोडणी देणे. सभागृहात माननीय ऊर्जा मंत्री उपस्थित नाहीत.

सभापती महोदय, एचयुडीएस योजनेंतर्गत माननीय मंत्री महोदयांनी अनेक वेळा निधी दिलेला आहे. या योजनेची कामे पूर्ण झालेली नाहीत. सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले की, आमचे शासन असताना शेतकऱ्यांना वीज कनेक्शन मिळाले. मी त्यांना सांगू इच्छितो की, ही योजना आपल्याच काळात मंजुर झालेली आहे. आजही संबंधित ठेकेदार कामे करीत नाहीत. बीड, औरंगाबाद किंवा मराठवाड्यामध्ये या योजनेंतर्गत कामे पूर्ण झालेली नाहीत. आम्हाला रात्री उशिरापर्यंत थांबून ट्रान्सफॉर्मर घ्यावे लागले आहेत. एचयुडीएस योजनेंतर्गत संबंधित ठेकेदार काम पूर्ण करीत नसल्यामुळे त्याला काळ्या यादीत टाकावे अशी विनंती करीत आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक-२७, पृष्ठ क्रमांक-२४. सौर ऊर्जेची योजना आहे. शेतकऱ्यांना सौरपंप बसविण्यासाठीची योजना मागील सरकारच्या सुरु झाली होती. आपल्याला वीज मिळत नाही. ही योजना पुनश्च सुरु करण्याची गरज आहे आणि त्यासाठी अधिकच्या निधीची तरतूद करुन शेतकऱ्यांना सौरपंप बसवून देण्यासाठीचा निर्णय घ्यावा, अशी मी विनंती करीत आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक-५४, पृष्ठ क्रमांक-५१. विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग, विशेष मागासप्रवर्गातील घटकांना वित्तीय सहाय्य देणे. यासाठी २० कोटी २५ लक्ष रुपयांची तरतूद केलेली आहे. मी यवतमाळ जिल्ह्यात

श्री. संजय दौंड....

दौरा केला होता. त्या ठिकाणी अनेक लोकांना घरे नसल्याचे त्यावेळी माझ्या निदर्शनास आले होते. त्यामुळे २० कोटी २५ लक्ष रुपयांऐवजी ३० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करावी, अशी माझी विनंती आहे. एवढे बोलून मी माझे पुरवणी मागण्यांवरील भाषण संपवितो. धन्यवाद.

------

असुधारित प्रत

श्री. रणजित सिंह पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन २०२१-२०२२ च्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, नगरविकास विभाग. बाब क्रमांक-१२, पृष्ठ क्रमांक-१२. गेल्या ५ वर्षाच्या काळात अनेक नवीन नगरपंचायती आणि नगरपरिषदा निर्माण करण्यात आलेल्या आहेत. या अनुषंगाने "अ" वर्ग नगरपालिकेतील रस्त्यांसाठी ७५ लाख रुपये, "ब" वर्ग नगरपालिकेतील रस्त्यांसाठी ५० लाख रुपये, "क" वर्ग नगरपालिकेतील रस्त्यांसाठी ३० लाख रुपये आणि नगरपंचायतीमधील रस्त्यांसाठी २५ लक्ष रुपयांची तरतूद केलेली असून, या तरतुदीमध्ये वाढ करावी, अशी माझी आग्रही मागणी आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक-१४, पृष्ठ क्रमांक-१४. नाविन्यपूर्ण योजनेसाठी ५ ते ७ कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. सन २०११ मध्ये जनगणना झालेली आहे. त्यानंतर जनगणना झालेली नाही. यामध्ये वाढ करावी, अशी माझी मागणी आहे. त्यामध्ये सरकार पक्ष आणि विरोधी पक्ष असा भेदभाव न करता सर्वच नगरपरिषदा आणि नगरपालिकांना भरघोस अनुदान द्यावे अशी माझी विनंती आहे. राज्यात गेल्या ५ ते ७ वर्षात १५० पेक्षा अधिक नगरपालिका स्थापन झालेल्या आहेत. त्यांचा विकास आराखडा लवकरात लवकर करुन घ्यावा जेणेकरुन आज त्या ठिकाणी अतिक्रमण होणार आणि भविष्यात त्यासाठी रिझर्व्हेशन केले जाणार आणि त्यानंतर पुन्हा ते निष्कासित करावे लागणार असल्यामुळे असे उद्योग करीत बसण्यापेक्षा त्यांचा विकास आराखडा लवकरात लवकर व्हावा अशी अपेक्षा आहे. यामध्ये ग्रामपंचायत टू नगरपालिका किंवा नगरपरिषदेत रुपांतर झालेले आहे अशा संबंधित कर्मचाऱ्यांना देखील सामावून घ्यावे अशा प्रकारची विनंती करीत आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक-१३, पृष्ठ क्रमांक-१४. सोलापूर शहराला पाणी मिळावे म्हणून उजनी पाणी पुरवठा योजना राबविली जात आहे. हे काम अद्यापी अपूर्ण आहे. ते काम पूर्ण करण्यासाठी अजून ४८ कोटी रुपयांची आवश्यकता आहे.

असुधारित प्रत

सभापती महोदय, बाब क्रमांक-१२, पृष्ठ क्रमांक-१२. माळशिरस तालुक्यातील नवीन स्थापन झालेल्या माळुंगश्रीपुर, अकलूज, नातेपुते नगरपालिका व नगरपंचायतीच्या कामासाठी भरघोस निधीची तरतूद करावी, अशी माझी मागणी

श्री. रणजित सिंह पाटील....

आहे. करमाळा नगरपरिषदेची इमारत डबघाईला आलेली आहे. त्यासाठी देखील भरघोस निधीची तरतूद करावी, अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, बाब क्रमांक-२५, पृष्ठ क्रमांक-२३. करमाळा तालुक्यातील करमाळा शहरातील एमआयडीसीला पाणी, रस्त्यांची अवस्था अतिशय दयनीय झालेली आहे. या मूलभूत सुविधा देण्याची आवश्यकता आहे. जेणेकरुन त्या ठिकाणी उद्योग व कामगार वाढीला चालना मिळण्यास एक प्रकारे मदतच होणार आहे. हायवेला टेंभुर्णी नावाचे एक गाव आहे. त्या ठिकाणी एमआयडीसी स्थापन झालेली आहे. त्या ठिकाणी उद्योग येत आहेत. पण त्या ठिकाणी जागा कमी पडण्याची शक्यता निर्माण झाल्यामुळे नवीन जागा कशी आरक्षित करता येईल याबाबत शासनाने विचार करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक-४, पृष्ठ क्रमांक-६. बार्शी तालुक्यात नाझरी व भोगावती नदीमध्ये अतिवृष्टी झाली होती. त्या दोन्ही गावालगत असलेल्या जमिनी अक्षरश: खरडून गेलेल्या आहेत. तेथील संबंधित लोकांना अद्यापही नुकसानभरपाई मिळाली नाही. त्यांना नुकसानभरपाई मिळावी अशी आमची आग्रही मागणी आहे. एवढे बोलून मी माझे पुरवणी मागण्यांवरील भाषण संपवितो. धन्यवाद.

------

श्री. बाळाराम पाटील (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन २०२१-२०२२ च्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, नगरविकास विभाग. बाब क्रमांक-१३, पृष्ठ क्रमांक-१३. पनवेल तालुका क्षेत्रातील सिडको परिसरात कळंबोली, खारघर, कामोठे, खांदा कॉलनी, नवीन पनवेलमध्ये गेल्या २० ते २५ वर्षापासून ५२५ ते ५५० कर्मचाऱ्यांनी साथीच्या आजाराच्या काळात अखंडपणे आपली सेवा नियमितपणे बजावलेली आहे. सन २०१८ साली पनवेल महानगरपालिकेकडे या संबंधित कर्मचाऱ्यांना सिडकोन हस्तांतरित केले होते. त्यांना अद्यापही कायस्वरुपी सेवा करण्याची संधी मिळाली नाही. स्वच्छता, सफाई, घंटागाडी आणि स्मशानभूमित काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना पनवेल महानगरपालिकेत कायमस्वरुपी नोकरी देण्यात यावी, अशी माझी मागणी आहे. अशा कर्मचाऱ्यांना समान काम आणि समान वेतन या कायद्याच्या अनुषंगाने लाभ द्यावा अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक-१४, पृष्ठ क्रमांक-१४. राज्यातील महत्वाचे प्रोजेक्ट पनवेल, ऊरण आणि नवी मुंबई, रायगडच्या पट्टयात आहेत. त्यामुळे हजारो कोटी रुपयांचे प्रकल्प त्या ठिकाणी सुरु केले जाणार आहेत. पण तेथील शेतकऱ्यांनी वर्षानुवर्षे आपल्या जमिनी कसलेल्या आहेत, सांभाळून ठेवलेल्या आहेत. त्यांच्या जमिनी त्या प्रकल्पासाठी संपादित करीत असताना शासनाकडून जमिनींच्या रेडी रेकनरचा दर हा निम्म्यापेक्षा कमी आणून एका बाजूला नागरी सुविधा उभ्या करायच्या आणि दुसऱ्या बाजूला वर्षानुवर्षे ज्या शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी जतन केलेल्या आहेत, अशा शेतकऱ्यांच्या जमिनी कवडीमोल भावात या प्रकल्पासाठी घेतलेल्या आहेत. विकास व्हावा याबद्दल कोणाचेही दुमत नाही. विकास होत असताना शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचे निर्धारित मूल्य मिळाले पाहिजे अशी मी पुरवणी मागणीच्या दृष्टीकोनातून शासनाला विनंती करीत आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक-२६, पृष्ठ क्रमांक-२३. खनीकर्म विभाग. सद्य:स्थितीत रायगड जिल्ह्यातील सिडकोबाधित स्थानिक प्रकल्प करताना खान व्यावसायीकांना गौन खनीज पट्टा मंजुर करीत असताना नवीन नियमामध्ये ५ वर्षाचा कालावधी आहे.

असुधारित प्रत

यानंतर श्री. बोर्डे....

असुधारित प्रत

श्री.बाळाराम पाटील....

सिडको प्रकल्पग्रस्तांनी या खदानींच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांचे कर्ज अंगावर घेऊन उद्योग स्थापित केलेला आहे. १९८१-८४ च्या शेतकरी लढ्याच्या आंदोलनात जे हुतात्मे झाले त्यांच्या हौतात्म्यातून हे खनीकर्म महामंडळ देण्याचा निर्णय झाला. परंतु पाच वर्षांच्या कालावधीत त्या शेतकऱ्यांचा व्यवसाय बाजूला राहीला असून, उलट त्यांच्या अंगावर कोट्यवधी रुपयांचे कर्ज होत आहे. माझी विनंती आहे की, या लोकांना विशेष बाब म्हणून ही कालमर्यादा ५ वर्षांऐवजी २० वर्षे करुन द्यावी.

सभापती महोदय, आदिवासी विकास विभागाची बाब क्र.४३, पृष्ठ क्र.३९ वर मी बोलत आहे. आश्रमशाळेतील शिक्षक, शिक्षकेतर संवर्गाचे वेतन चार ते पाच महिने उशिराने होत असल्यामुळे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांना खूप हालअपेष्टांना सामोरे जावे लागत आहे. माझी विनंती आहे की, लेखाशीर्ष १९४८ अंतर्गत येणाऱ्या शाळांचे वेतन हे वेळेवर करण्यासाठी वार्षिक वेतनाची तरतूद करण्यात यावी. तसेच चार महिन्यांपासून थकीत असलेले वेतन देण्याची व्यवस्था करण्याच्या दृष्टिकोनातून त्यांना प्लॉन टु नॉनप्लॅनमध्ये वर्ग करावे, अशी मी या पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, आदिवासी विकास विभागाची बाब क्र.३९, पृष्ठ क्र.४३ वर मी बोलत आहे. आदिवासी विद्यार्थ्यांना फीची प्रतिपूर्ती देण्यात येते. वास्तविक पाहता ही प्रतिपूर्ती जून महिन्यात मिळणे क्रमप्राप्त आहे. जेणेकरुन त्या आश्रमशाळा आणि विद्यार्थ्यांना त्या फीचा उपयोग वर्षभरासाठी होऊ शकेल. परंतु ही प्रतिपूर्ती विद्यार्थ्यांना मार्च महिन्याच्या अखेरीस प्राप्त होते. त्यामुळे त्यांना त्या रकमेचा वापर योग्यप्रकारे करता येत नाही. माझी मागणी आहे की, ही तरतूद जून महिन्यामध्ये प्राप्त करुन देणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, उच्च व तंत्रशिक्षण विभागाची बाब क्र.४५, पृष्ठ क्र.४२ वर मी बोलत आहे. वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांना सातवाा वेतन आयोग लागू करुन दोन वर्षे होत आहेत. परंतु याच महाविद्यालयामध्ये कार्यरत असलेल्या

असुधारित प्रत

असुधारित प्रत

श्री.बाळाराम पाटील....

अर्धवेळ प्राध्यापकांच्या बाबतीत शासनाने अजून कोणताही निर्णय घेतलेला नाही. तरी वरिष्ठ महाविद्यालयातील अर्धवेळ प्राध्यापकांना सातवा वेतन आयोग लागू करण्यासाठी निधीची तरतूद करण्यात यावी, अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, मुंबई विद्यापीठ हे देशातील मोठे विद्यापीठ आहे. परंतु दुर्दैवाची बाब अशी की, या विद्यापीठांतर्गत असलेल्या बहुतांश महाविद्यालयांना क्रीडा शिक्षक किंवा क्रीडा संचालकांची तरतूद नाही. माझी या चर्चेच्या निमित्ताने विनंती आहे की, उच्च व तंत्रशिक्षण विभागाने या बाबीची दखल घेत मुंबई विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात क्रीडा संचालकांच्या जागा त्वरित भरण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करावी.

सभापती महोदय, बाब क्र.५३, पृष्ठ क्र.५० वर मी बोलत आहे. १९६० साली महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली तेव्हा मुंबईमध्ये मराठीचा टक्का ५२ टक्के होता. परंतु आज ४० वर्षानंतर राज्याच्या राजधानीमध्ये मराठीचा टक्का २२ टक्क्यांवर आला आहे. देशातील सर्व भाषिकांचे भाषा भवन मुंबई किंवा नवी मुंबई परिसरात आहे. परंतु दुर्दैवाने आजपर्यंत महाराष्ट्राच्या राजधानीमध्ये मराठी भाषा भवन स्थापन झालेले नाही. मराठी भाषा भवनाचे उद्घाटन झाले हे खरे असले तरी या कामाला पाहिजे तेवढी गती मिळालेली नाही. या कामाला गती मिळणे आवश्यक आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी राज्य सरकारचे मोठ्या प्रमाणावर प्रयत्न सुरु आहेत. आपल्या सर्वांच्या दृष्टीने ही आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे. परंतु मराठी भाषेचे संवर्धन, जतन ज्या मराठी माध्यमांच्या शाळांच्या माध्यमातून होते त्या मराठी माध्यमांच्या शाळांना मात्र पुरवणी मागण्यांमध्ये कुठेही स्थान दिल्याचे दिसून येत नाही. मराठी भाषा आणि तिचे संवर्धन व्हावे, तिची उन्नती व्हावी, भविष्यात तिची वाढ व्हावी म्हणून मराठी भाषेचे शिक्षण सक्षमरित्या देण्यासाठी राज्यात कार्यरत असलेल्या मराठी माध्यमाच्या शाळांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्यासाठी पुरवणी मागण्यांत तरतूद केली नसली तरी

श्री.बाळाराम पाटील....

किमान येत्या अर्थसंकल्पामध्ये या शाळांना आसरा द्यावा, एवढीच मागणी मी पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या माध्यमातून करतो.

धन्यवाद.

----------

असुधारित प्रत

श्री.राजहंस सिंह (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन २०२१-२०२२ च्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, नगर विकास विभागाची बाब क्र.१२, पूरक मागणी क्रमांक-२ वर मी बोलत आहे.

सभापति महोदय, मुंबई महानगरपालिका एशिया की सबसे बड़ी महानगरपालिका है जिसका बजट ४५ हजार करोड़ रुपये है. इस ४५ हजार करोड़ रुपये की महानगरपालिका में भ्रष्टाचार की नदियां बह रही है. पिछले २५ सालों से केवल पूरे मुंबईकर को ही नहीं, केवल महाराष्ट्र को ही नहीं तो पूरे देश को यह बात पता है कि आज वहां पर किसकी सत्ता है. वहां पर शिवसेना की सत्ता है.

(सत्ताधारी बाजूचे काही सन्माननीय सदस्य खाली बसून एकाच वेळी बोलतात.)

सभापती महोदय, आपण मला संरक्षण द्यावे. पिछले २५ सालों में २१ हजार करोड़ रुपये के रास्ते बने. पूरे मुंबई शहर में २ हजार किलोमीटर के रास्तों के लिए २१ हजार करोड़ रुपये २५ सालों में खर्च किए गए है. तरी सुद्धा मुंबईत पाऊस पडला की त्या रस्त्यावर खड्डे पडतातच. पाऊस पडल्यानंतर संपूर्ण मुंबई तुंबते. मी मराठीत बोलू शकतो. आपण माझे म्हणणे एकावे. मुंबई में जब वर्षा होती है तो सारी मुंबई पानी से लबालब भर जाती है. ब्रिमस्टोवॅड योजना लायी गई.

(सत्ताधारी बाजूचे काही सन्माननीय सदस्य खाली बसून एकाच वेळी बोलतात.)

श्री राजहंस सिंह : सभापति महोदय, मैं नगर विकास विभाग की बाब क्रमांक १२ पर बोल रहा हूं. मुंबई महानगरपालिका को पूरक मांग में कितनी रकम चाहिए उसके बारे में मैं आगे अपनी बात कहने वाला हूं.

**तालिका सभापति** : सम्माननीय सदस्य श्री राजहंस सिंह जी, आप बाब क्रमांक और पृष्ठ क्रमांक बताईए.

श्री. राजहंस सिंह : सभापती महोदय, बाब क्र.१२, पूरक मागणी क्रमांक-२ वर मी बोलत आहे. हे मी सुरुवातीलाच सांगितले आहे.

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.राजहंस सिंह यांनी पुरवणी मागण्यांवर बोलताना सुरुवातीलाच नगर विकास विभागाच्या बाब क्रमांकांवर बोलत असल्याचे सांगितले. त्यांना सभागृहाचा अनुभव आहे. त्यांनी २०-२५ वर्षे मुंबई महानगरपालिकेत विरोधी पक्ष नेते म्हणून काम केलेले आहे. त्यामुळे कृपया त्यांच्या भाषणात व्यत्यय आणता कामा नये. मुंबई महानगरपालिकेचा विषय आल्यानंतर सत्ताधारी बाजूला एवढे व्यथित होण्याचे काही कारण नाही. सन्माननीय सदस्यांना त्यांची भूमिका मांडू द्यावी. उत्तराच्या भाषणात त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांवर राज्य सरकारने स्पष्टीकरण द्यावे. माझी आपल्याला विनंती आहे की, आपण सन्माननीय सदस्य श्री.राजहंस सिंह यांना संरक्षण द्यावे.

श्री.गुलाबराव पाटील : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जे नमूद केले त्या अनुषंगाने एवढेच सांगतो की, सन्माननीय सदस्य श्री.राजहंस सिंह यांनी विषय मांडावेत. परंतु सध्या पुरवणी मागण्यांवर चर्चा सुरु आहे. पुरवणी मागण्यांवर बोलत असताना सन्माननीय सदस्य श्री.राजहंस सिंह यांनी सरकारला मार्गदर्शक सूचना कराव्यात. मला माहीत आहे की, ते २५ वर्षे मुंबई महापालिका सभागृहात काँग्रेस पक्षाचे नेते होते. परंतु आता ते पवित्र होऊन भाजपामध्ये आलेले आहेत. मला सर्व माहीत आहे. आपल्याकडे पवित्र करण्याची मशीन आहे.

(विरोधी बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

सभापती महोदय, मी चांगलेच बोललो. मी काहीच वाईट बोललो नाही.

नंतर श्री.कांबळे.....

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. गुलाबराव पाटील ....

वाईट काहीच नाही.

**तालिका सभापती** : माननीय मंत्र्यांनी खाली बसावे. सन्माननीय सदस्यांनी भाषण सुरु ठेवावे.

श्री. गुलाबराव पाटील : सभापती महोदय, २० वर्षे त्यांनी आम्हा दोघांना विरोध केला.

श्री राजहंस सिंह : सभापति महोदय, "ये तो अभी झांकी है." इनका भ्रष्टाचार इतना बड़ा है कि सबकी पीड़ा बहुत तेज होगी. मुंबई में बरसात हुई तो मुंबई में पानी भर गया. अब तक नाले सफाई के नाम पर इस मुंबई शहर में ३ हजार करोड़ रुपये के भ्रष्टाचार हुए. नाले सफाई के नाम पर ब्रिमस्टोवॅड नामक एक प्रोजेक्ट आया. १,२०० करोड़ रुपये का प्रोजेक्ट आज ५ हजार करोड़ रुपये का बन गया. लेकिन अभी तक मुंबई के नाले पूरे नहीं बने. उसके कमिशन के पैसे कहां गए? अब लोगों को पीड़ा होती है. लोगों को दर्द होने लगता है. मुंबई महानगरपालिका जिसका बजट ४५ हजार करोड़ रुपये है, उसके नाले की सफाई और नाले बनने में.........

(सत्ताधारी पक्षातील काही सन्माननीय सदस्य बसून बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

सभापती महोदय, किती पैसे लागणार आहेत ? नंतर मुंबई महानगरपालिकेला गरज आहे. मी त्याबाबत बोलणार आहे. मी सुरुवातीला काय झाले आहे ते बोलत आहे तर तुमचे पोट कशासाठी दुखत आहे ?

श्री. अभिजित वंजारी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी स्पेसिफिक बोलावे.

(सत्ताधारी पक्षातील काही सन्माननीय सदस्य बसून बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

असुधारित प्रत

श्री. प्रवीण दरेकर : सभापती महोदय, आपण सन्माननीय सदस्यांना संरक्षण द्यावे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे.

श्री राजहंस सिंह : सभापति महोदय, कोरोना काल में इन लोगों ने अपने लोगों को जम्बो कोरोना सेंटर देने का काम किया. ६,४०० करोड़ रुपये इन्होंने बिगर अस्थायी समिति के अनुमति के कोरोना काल में, दो साल में निकालने का काम किया. ६,४०० करोड़ रुपये का भ्रष्टाचार है. अगर शासन इनकी इन्क्वॉयरी करें तो अच्छे से अच्छा जेल जाएगा. और आगे सुनिए. अस्थायी समिति अध्यक्ष के घर पर इन्कम टैक्स की रेड चल रही है. उसके बावजूद ३५ भ्रष्ट कॉन्ट्रैक्टर के यहां पर रेड चल रही थी. उसके दो दिन के बाद दिनांक ७ मार्च को महानगरपालिका में प्रशासक बैठने वाला था. दिनांक २ मार्च को ढ़ाई हजार करोड़ रुपये का प्रस्ताव लाया गया. साधक-बाधक चर्चा किए बिना उसे पास करने का काम किया गया. उसके बाद दिनांक ७ मार्च को साढ़े तीन हजार करोड़ रुपये का प्रस्ताव लाकर आधे घंटे में उसे पास करने का काम किया गया है. मैं आपके माध्यम से सरकार से कहना चाहूंगा कि इसकी पूरी इन्क्वॉयरी की जाए. पुरक मागणीवर किती पैसे लागणार आहेत हे मी नंतर सांगणार आहे. आता हे ऐकावे. महानगरपालिकेला पैसे द्यावे लागणार आहेत. सभापति महोदय, इसकी पूरी इन्क्वॉयरी होनी चाहिए.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. अनिकेत तटकरे यांनी बोलावे.

श्री. अनिकेत तटकरे : सभापती महोदय, आपण मला वेळ दिल्याबद्दल मी आभारी आहे.

श्री. प्रवीण दरेकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. राजहंस सिंह यांना बोलू द्यावे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांना भाषणासाठी १० मिनिटे दिली आहेत.

श्री. अनिकेत तटकरे : सभापती महोदय, ज्येष्ठ निरुपणकार, महाराष्ट्र भूषण परमपूज्य नानासाहेब धर्माधिकारी यांचे शतक महोत्सवी वर्ष आपण साजरे करीत आहोत. दिनांक १ मार्च, २०२२ पासून त्यांचे शतक महोत्सवी वर्ष ....

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, आमचा वेळ देखील सन्माननीय सदस्यांना द्यावा.

**तालिका सभापती** : मी त्यांना संधी देतो.

श्री. अनिल तटकरे : सभापती महोदय, ज्येष्ठ निरुपणकार, परमपूज्य नानासाहेब धर्माधिकारी यांचे शतक महोत्सवी वर्ष आहे.

श्री. प्रवीण दरेकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. राजहंस सिंह यांचे बोलणे झाल्यावर सन्माननीय सदस्यांना संधी द्यावी.

**तालिका सभापती** : सर्वांना वेळ दिला आहे. आपण बोलल्यामुळे मी त्यांना पुन्हा वेळ दिला आहे. ठीक आहे. आता एकदा सन्माननीय सदस्यांनी बोलावे.

श्री. राजहंस सिंह : सभापती महोदय, आपण वेळ दिल्याबद्दल मी आभारी आहे. कोरोना काळात ८ हजार कोटी रुपयांचा भ्रष्टाचार केला आहे. मास्क, फेसशिल्ड, कोविड सेंटर सर्व पास करुन घेतले. ....(अडथळा).... मला संरक्षण द्यावे. हॉटेल व्यावसायिकांना .... हॉटेल वालों को प्रॉपर्टी टैक्स पचास प्रतिशत माफ किए. मुंबई शहर की जनता को, मराठी माणसे असे म्हणत आहेत, त्या मराठी माणसाला एकाही पैशाची मदत नाही. सारे फाईव्ह स्टार होटेल को पचास प्रतिशत प्रॉपर्टी टैक्स माफ करने का काम किया. लेकिन जो मुंबई की जनता... मराठी जनतेच्या नावावर हे निवडून आले आहेत, त्यांना एक पैशाचाही प्रॉपर्टी टॅक्स माफ केलेला नाही. एक पैसे का भी टैक्स माफ नहीं किया. फाईव्ह स्टार होटलों को प्रॉपर्टी टैक्स माफ किया गया. मराठी, मराठी की बात करते है. हे लोक मराठी माणसाची कधीही मदत करीत नाहीत. सभापति महोदय, ये ३३०० बस खरीद रहे है.

असुधारित प्रत

(सत्ताधारी पक्षातील काही सन्माननीय सदस्य बसून बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. गुलाबराव पाटील : सभापती महोदय, हे काय आहे, आता आम्हाला देखील बोलू द्यावे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. सन्माननीय सदस्य श्री. अनिकेत तटकरे यांनी बोलावे.

श्री. अनिकेत तटकरे : सभापती महोदय, ज्येष्ठ निरुपणकार, महाराष्ट्र भूषण, परमपूज्य नानासाहेब धर्माधिकारी यांचे ....

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आपण पुरवणी मागण्यांवर चर्चा करीत आहेत, त्यामध्ये बाब क्रमांक सांगतो. बाब क्रमांक कामाकरिता असते. पुरवणी मागण्यात तरतूद असते, त्या तरतुदीमध्ये काही कमतरता असेल, मागणी असेल, एखाद्या भागात त्या संदर्भातील काम झाले नसेल ....

श्री. गुलाबराव पाटील (बसून) : ***

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. प्रवीण दरेकर : सभापती महोदय, आमचा आक्षेप आहे. सभागृहातील सन्माननीय सदस्य आहेत. मुंबई महानगरपालिकेतील नगरसेवकांनी त्यांना निवडून मुंबईकरांचे प्रतिनिधीत्व दिले आहे. ज्येष्ठ माननीय मंत्री म्हणत आहेत की, *** त्यांनी शब्द मागे घ्यावेत अशी आमची मागणी आहे नाही तर सभागृहाचे कामकाज चालणार नाही. सन्माननीय सदस्यांचा अपमान आम्ही सहन करणार नाही. आमच्या सन्माननीय सदस्यांचा ते अपमान करीत आहेत. *** असे ते कसे म्हणू शकतात ?

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

---

*** आदेशानुसार विलोपित मजकूर

**तालिका सभापती** : ते वक्तव्य तपासून कामकाजातून काढून टाकण्यात येईल. विषय संपला आहे. सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे.

श्री. अनिकेत तटकरे : सभापती महोदय, मी आभारी आहे. आपण मला तिसऱ्यांदा बोलण्याची संधी दिली आहे. ज्येष्ठ निरुपणकार, महाराष्ट्र भूषण, परमपूज्य नानसाहेब धर्माधिकारी यांचे शतक महोत्सवी वर्ष सुरु आहे. मी आपल्या माध्यमातून शासनाला विनंती करीत आहे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते बोलण्यासाठी उभे आहेत. सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांची चर्चा ही राज्य सरकारच्या अर्थसंकल्पातून येणाऱ्या निधीसंदर्भातील असते. मुंबई महानगरपालिका स्वायत्त आहे. तिचा अर्थसंकल्प स्वतंत्र आहे. ते अर्थसंकल्प तयार करतात. त्यांची संपूर्ण छाननी करणारी, ऑडिट करणारी यंत्रणा स्वतंत्र आहे. निधीच्या संदर्भात एखादा उल्लेख केला की, आपल्या अर्थसंकल्पातून हा निधी गेला आणि त्या निधीकरिता एखादी गोष्ट घडली असे मांडले तर एखाद्या मर्यादेपर्यंत ते ठीक आहे.

नंतर श्री. खर्चे

असुधारित प्रत

श्री.दिवाकर रावते....

मुंबई महानगरपालिकेचा अर्थसंकल्प या सभागृहात स्वतंत्रपणे सांगायचा असेल तर या अर्थसंकल्पाचा व त्याचा काही संबंध नाही. माझी अशी विनंती आहे, सन्माननीय सदस्यांनी मुंबई महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पाबाबत ज्या बाबी येथे मांडल्या आहेत. त्या रेकॉर्डवरुन काढून टाकाव्यात.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, सदनाचे ज्येष्ठ सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी कामकाजासंदर्भात भाष्य केले. सन्माननीय सदस्य श्री. राजहंस सिंह यांनी भाषण करतांना बाब क्रमांक व पान क्रमांक व नगर विकास विभागावर बोलतो असे सांगितले. त्या विभागावर निधी खर्च करीत असताना अनावश्यक खर्च कोठे होतो. कारण शेवटी हा नागरिकांच्या करातून पैसा येतो. महानगरपालिकेचा लेखाजोखा ते मांडत होते. आणि भविष्यात त्या ठिकाणी कोणत्या बाबींवर तरतूद झाली नाही यावर ते भाष्य करणार होते. त्यामुळे यामध्ये आपण ॲन्टीसिपेशन करणे अतिशय चुकीचे आहे. सन्माननीय सदस्यांनी नगर विकास विभागाची बाब क्रमांक सांगितली होती. नगर विकास विभागाअंतर्गत मुंबई महानगरपालिका येते. मुंबई महानगरपालिकेत पैशाचा अपव्यय कसा होतो हे शासनाच्या निदर्शनास आणत होते. अनावश्यक खर्च करुन जेथे गरजेचे आहे तेथे करीत नाही हे त्यांना सांगायचे होते. ते मुद्यांवर बोलत होते. त्यामुळे त्यांच्या भाषणातील कोणताही भाग कामकाजातून काढण्यात येऊ नये. असे केले तर त्यांच्यावर अन्याय होईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, यानंतर विरोधी पक्षाचा प्रस्ताव आहे, त्यावर भाषण करतांना त्यांना हे मुद्दे मांडता आले असते. मी पुरवणी मागण्यांबाबत सांगत होतो, महानगरपालिकेमध्ये मी अर्थसंकल्प मांडलेला आहे.

श्री.अनिकेत तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांची मी माफी मागतो. ज्येष्ठ निरुपणकार महाराष्ट्र भूषण परमपूज्य नानासाहेब धर्माधिकारी यांचे शतक महोत्सवी वर्ष आपण साजरे करतो. ३ मार्च पासून त्याचे शतक महोत्सवी वर्ष सुरु झाले आहे.

असुधारित प्रत

श्री.अनिकेत तटकरे....

सभापती महोदय, पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री महोदयांना मी विनंती करतो की, त्यांच्या माध्यमातून परमपूज्य अप्पासाहेब धर्माधिकारी, परमपूज्य संदीप धर्माधिकारी यांनी शतक महोत्सवी वर्ष साजरे करण्याकरिता स्वच्छता मोहिम हाती घेतली आहे. प्रत्येक गावात त्यांनी स्वच्छता कार्यक्रम सुरु केला आहे. प्रत्येक गावात जाऊन आमचे स्त्री सदस्य स्वच्छता करीत आहेत. शासनाला मी विनंती करतो की, शतक महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने जी स्वच्छता मोहिम सुरु केली त्याकरिता शासनाने हातभार लावावा व निधी उपलब्ध करुन द्यावा अशी मी मागणी करतो. परमपूज्य नानासाहेब धर्माधिकारी यांच्या कार्याचा गौरव या निमित्ताने करावा. धन्यवाद.

---------

**तालिका सभापती (श्री. विक्रम काळे)** : आता राष्ट्रवादी, शिवसेना व काँग्रेस पक्षातील सन्माननीय सदस्यांनी भाषणे केली आहेत. आता ॲड.निरंजन डावखरे हे भाषण करतील. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. प्रसाद लाड सभागृहात नाहीत. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे, सन्माननीय सदस्य श्री.गोपिचंद पडळकर व डॉ. रणजित पाटील हे तीन सन्माननीय सदस्य भाषण करतील.

असुधारित प्रत

ॲड. निरंजन डावखरे (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन २०२१-२२ च्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, आपण तालिकेवर बसल्यावर अनेक सन्माननीय सदस्यांना न्याय देत आहात. आपण याच खुर्चीवर विराजमान राहा अशी सर्व सन्माननीय सदस्यांची इच्छा राहील.

सभापती महोदय, ३ मार्च २०२२ पासून अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु झाले आहे. पुरवणी मागण्यांमध्ये पाच विभागांना प्राधान्य देण्यात आले आहे. उद्योग, ऊर्जा कामगार, वित्त विभाग, नगर विकास विभाग, महसूल व वन विभाग. या पुरवणी मागण्यांमध्ये पाहिले तर कोकणावर अन्याय करण्यात आला आहे. सन्माननीय सदस्य श्री. अनिकेत तटकरे यांच्याकडून हा विषय मांडायचा राहून गेला आहे. कोकणाबाबत या शासनाची सावत्र वागणूक दिसून येते. ठाणे येथे सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल आतापर्यंत व्हायला पाहिजे होते. पालघर आणि ठाणे या दोन्ही जिल्ह्यांचा लोड ठाणे येथील हॉस्पीटलवर येतो. सर्पदंश झाला व जीव वाचवायचा असेल तर त्या रुग्णाला जे.जे. हॉस्पीटल व सायन हॉस्पीटलपर्यंत न्यावे लागते. ठाणे शहरातील वाढती लोकसंख्या विचारात घेता ठाणे येथे सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल होणे गरजेचे आहे. पुरवणी मागण्यांमध्ये याबाबत तरतूद असेल असे आम्हाला वाटले होते. रत्नागिरी जिल्ह्यातील मच्छिमार सहकारी संस्थांची देणे प्रलंबित आहेत त्यासाठी अतिरिक्त तरतूद करण्यात आली आहे. त्याप्रमाणे कोकणातील ठाणे,पालघर, रायगड, सिंधुदुर्ग येथील संस्थाचे प्रलंबित देयके आहेत ती तातडीने देण्याची कार्यवाही व्हावी अशी मी मागणी करीत आहे. आपण मला बोलण्याची परवानगी दिली त्याबाबत मी आभार व्यक्त करतो व थांबतो.

-----

असुधारित प्रत

श्री.गोपिचंद पडळकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन २०२१-२२ च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मी आपले मनापासून आभार मानतो. नवीन सन्माननीय सदस्य श्री.राजहंस सिंह त्यांच्या भावना मांडत होते. नगर विकास विभागावर ते बोलत होते. शासनाकडून महानगरपालिकेला निधी देण्यात येतो. काल महानगरपालिकांच्या मुदती संपलेल्या आहेत. या मुदती संपल्यानंतर प्रशासकांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही बाब गंभीर आहे, सन्माननीय सदस्य हे मुंबई महानगरपालिकेबाबत बोलत होते. काल ३९० प्रस्ताव व जवळपास सहा हजार कोटी रुपयांचे ते बजेट आहे. या सहा हजार कोटी रुपयांच्या बजेटच्या कामांना कोणत्याही निविदेशिवाय व स्थायी समितीच्या मान्यतेशिवाय हे टेंडर काढण्यात आले आहे. यामध्ये २० रुपयांची वस्तू १०० रुपयांना घेण्यात आली असून जवळपास सहा हजार कोटी रुपयांच्या बजेटमध्ये दोन हजार कोटी रुपयांचा भ्रष्टाचार करण्याचा प्लॅन असेल व त्यावर आमचे सन्माननीय सदस्य बोलत असतील तर त्यावर आपण आक्षेप घेत असाल तर ही बाब बरोबर नाही.

सभापती महोदय, बाब क्रमांक ५५ पान क्रमांक ५२ लेखाशीर्ष २२२५ वर मी बोलणार आहे. महाराष्ट्रातील धनगर समाजाची आरक्षणाची मागणी होती. एसटीच्या आरक्षणाची अंमलबजावणी झाली पाहिजे. तत्कालीन सरकारने जोपर्यंत आदिवासींच्या योजना लागू होणार नाही तोपर्यंत आदिवासी समाजाला जे मिळते ते धनगर समाजाला देण्याचे मान्य केले. त्यासाठी सन २०१९ च्या अर्थसंकल्पामध्ये १००० कोटी रुपयांची तरतूद केली. सरकारने २२ योजना लागू केल्या आहेत, त्यातील कोणत्याही योजनेवर पैसे खर्च केले नाहीत. धनगर समाजातील मुलांना महाराष्ट्रातील इंग्रजी नामांकित शाळांमध्ये प्रवेश देण्याची योजना यावर्षी राबविली आहे. त्या व्यतिरिक्त कोणतीही योजना राबविण्यात आली नाही. यासाठी सरकारच्या माध्यमातून नियोजन करणे गरजेचे आहे. ७० हजार रुपये मुलांना देण्यात येतात. या राज्यातील नामांकित शाळांमध्ये प्रवेश मिळत नाही. ग्रामीण भागातील शाळेमध्ये १५ ते २० हजार रुपये फी आहे अशा शाळांचा समावेश त्यामध्ये करण्यात आला

असुधारित प्रत

श्री.गोपिचंद पडळकर....

आहे.त्यामुळे यामध्ये मोठा भ्रष्टाचार होण्याची शक्यता आहे. याचा विचार करुन शासनाने यामध्ये बदल करावा.

सभापती महोदय, मेंढपाळाबाबत शासनाने असा निर्णय घेतला आहे की, पावसाळ्याच्या दिवसात चार महिने मेंढपाळांना चराई भत्ता देण्याचे आश्वासन दिले आहे. असे असताना महाराष्ट्रातील मेंढपाळांना महिन्याला सहा हजार रुपये अशा प्रकारे चार महिन्याचे २४ हजार रुपये भत्ता दिलेला नाही. धनगर समाजातील व्यक्तीला घर नाही त्यांना घरकुल बांधण्यासाठी निधी मंजूर केला होता. त्यासंदर्भातील प्रस्ताव आपणाकडे आले. त्यापैकी एकही घरकुल मंजूर झाले नाही. सन २०१९-२०, सन २०२०-२१ व सन २०२१-२२ या तीन वर्षाची भरपाई दिली पाहिजे. कारण मागच्या वर्षीचे बजेट जवळपास पाच लाख कोटी रुपयांच्या वर आहे.

यानंतर श्री.बोरले....

असुधारित प्रत

श्री.गोपिचंद पडळकर......

राज्याचे बजेट ५ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त असताना धनगर समाजाला प्रत्येक वर्षी १ हजार कोटी रुपये दिले जात नाहीत, ही गंभीर बाब आहे. मी शासनाला विनंती करतो की, धनगर समाजाच्या २२ योजना त्वरित लागू कराव्यात. सन २०१९-२० मधील १ हजार कोटी रुपये आणि या वर्षीचे १ हजार कोटी रुपये मंजूर करुन ते या कामावर खर्च करण्यात यावेत, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, मी जलसंपदा विभागाच्या पृष्ठ क्र.१९ वरील बाब क्र.१९ वर बोलणार आहे. माझी जलसंपदा मंत्री महोदयांना विनंती आहे की, आमच्या भागात इंग्रजांनी राजेवाडी तलाव बांधलेला आहे. या तालावामध्ये १ टीएमसी पाणी असते. त्या तलावाचे बॅकवॉटर १८ किलो मीटर मागे गेलेले आहे. आता उरमोडीमधून पाणी येणार असल्यामुळे बारमाही होणार आहे. मागील दोन वर्षे तलावाच्या सांडव्यातून पाणी गेलेले आहे. आता हजारो लोक तेथे पर्यटनासाठी येतात. तेथे जलसंपदा विभागाची जमीन आहे. जलसंपदा विभाग व पर्यटन विभागाने तेथे चांगले रिसॉर्ट तयार करुन बोटींगची सुविधा निर्माण करावी. दुष्काळी पट्ट्यात तेथे चांगले पर्यटन केंद्र विकसित होईल. तसेच, तत्कालीन मुख्यमंत्री स्व.वसंतदादा पाटील यांनी त्यांच्या कार्यकाळात राजेवाडी उजवा कालवा मंजूर करुन त्या कालव्याच्या कामावर लाखो रुपये खर्च केले होते. परंतु आता त्या कालव्याचे काम बंद आहे. त्या कामावर कोणताही खर्च झालेला नाही. सन २०१३ मध्ये मी राजेवाडी कालवा फोडला होता. त्यावेळी कलम ३५३ अनुसार मला जेलमध्ये जावे लागले होते, या गोष्टीचा मला सार्थ अभिमान आहे. शासनाने निधी मंजूर करुन ती योजना लागू करावी, अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, टेंभूचे पाणी आटपाडी तालुक्यात आले ही बाब अतिशय गंभीर आहे. तत्कालीन सरकारने ८१-१९ असा फॉर्म्युला लागू केलेला आहे. शासन ८१ टक्के रक्कम भरते आणि उर्वरित १९ टक्के रक्कम लोकांकडून घ्यावयाची आहे. लोकांनी पैसे भरलेले आहेत तरी सुद्धा पुन्हा पैसे भरावेत अशा चुकीच्या नोटीसा

असुधारित प्रत

श्री.गोपिचंद पडळकर......

देण्यात आलेल्या आहेत. सदर तलावात सन २०१६ मध्ये पाणी आले आणि आपण सन २०१५ पासून पैसे भरण्याची मागणी करीत आहात हे चुकीचे आहे. यामध्ये ज्या अधिकाऱ्याने भ्रष्टाचार केला त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी, अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, मी उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या बाब क्र.४५, पृष्ठ क्र.४२ वर बोलणार आहे. शिवाजी विद्यापीठाचे उपकेंद्र खानापूर तालुक्यातील खानापूर येथे करण्याची मागणी आहे. त्यावेळी तसा प्रस्ताव सादर करण्यात आला होतो. तेथे शंभर एकरचा टेबल प्लॉट आहे. खानापूर हे जिल्ह्यातील इतर तालुक्यांसाठी मध्यवर्ती ठिकाण आहे. शासनाने उप केंद्र मंजूर करुन तत्काळ आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, ऊर्जा विभागाच्या बाब क्र.२२, पृष्ठ क्र.२२ वर मी बोलणार आहे. ६३ केव्हीच्या डीपीवर १०० ते १५० केव्हीचा लोड आहे. त्यामुळे २ तासापेक्षा जास्त वेळ वीज पुरवठा होत नाही. ज्या ठिकाणी अशी परिस्थिती आहे तेथे त्वरित डीपी मंजूर करुन आवश्यक कामांची पूर्तता करण्यात यावी, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, मी सांस्कृतिक कार्य विभागाच्या मागणीवर बोलणार आहे. आटपाडी तालुक्याने महाराष्ट्राच्या भूमीला ग.दी.माडगुळकर, व्यंकटेश माडगुळकर, शंकरराव खरात, ना.स.इनामदार यांच्या सारखे प्रतिभावंत लेखक, कवी दिलेले आहेत. आटपाडी तालुक्यात ग.दि.माडगुळकरांच्या नावाने नाट्गृह, एमपीएससी, युपीएससी परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी लॅब तयार करण्यात येईल अशी घोषणा करण्यात आली होती. परंतु अद्याप कार्यवाही झालेली नाही. शासनाने ही मागणी मान्य करुन त्यासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी माझी मागणी आहे.

श्री.गोपिचंद पडळकर......

सभापती महोदय, मी महिला व बाल विकास विभागाच्या बाब क्र.४७, पृष्ठ क्र.४४ वर बोलणार आहे. माझ्या तालुक्यातील श्रीमती लतादेवी बोराडे ही लढाऊ महिला विधवा महिलांना सन्मान मिळावा यासाठी लढा देत आहे. माझी महिला व बाल विकास मंत्री महोदयांना विनंती आहे की, शासनाने विधवा महिलांना सुवासिनीचा हक्क मिळावा यासाठी कायदा करावा. कारण पतीचे निधन झाल्यानंतर त्यांच्यावर दु:खाचा डोंगर कोसळतो. त्यांना विधवा म्हणून समाजात जीवन जगणे मुश्किल होते, त्यांना पदोपदी अपमान सहन करावा लागतो. श्रीमती लतादेवी बोराडे विधवा महिलांसाठी चांगला लढा देत आहेत. आज जागतिक महिला दिन आहे. शासनाने या संदर्भात योग्य तो निर्णय घ्यावा, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, माननीय पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. माझ्या तालुक्यातील ५४ गावातील पाणी पुरवठा योजनांचे टेंडर झालेले आहेत. पूर्वी जल स्वराज्य, पेयजल, भारत निर्माण योजना राबविण्यात येत होती. शासनाच्या माध्यमातून गावागावांमध्ये पाणी पुरवठा योजना राबविण्यात येते. मी सांगू इच्छितो की, काही गावांनी १६ टक्के, २० टक्के, १५ टक्के बिलो दराने कामे घेतलेली आहेत तर काही गावांनी तीच कामे १५ टक्के, २० टक्के, २५ टक्के अबाऊ दराने घेतलेली आहेत. अशा प्रकारे चुकीच्या मार्गाने निधी खर्च होत असेल तर शासनाने यामध्ये लक्ष घालून ही तफावत दूर करावी. जेणे करुन तो निधी दुसऱ्या गावातील विकास कामासाठी खर्च करता येईल. जत तालुक्यातील ४४ गावांमध्ये शेतीचे व पिण्याचे पाणी मिळत नाही. पंढरपूर येथील चंद्रभागा नदीतून उक्त ४४ गावांसाठी बारमाही पिण्याच्या पाण्याची योजना मंजूर करण्यात यावी. जेणे करुन शेतीसाठी नाही तर पिण्यासाठी पाणी मिळू शकेल. शासानाने हे काम मंजूर करावे, अशी माझी मागणी आहे. मी मागील अधिवेशनात ही मागणी केली होती. परंतु अद्याप ही मागणी मंजूर झालेली नाही.

असुधारित प्रत

श्री.गोपिचंद पडळकर......

सभापती महोदय, मी उद्योग विभागाच्या बाब क्र.२५ व पृष्ठ क्र.२३ या पुरवणी मागणीच्या माध्यमातून सांगू इच्छितो की, आटपाडी तालुक्यातील कामत गावातील शेतकऱ्यांनी ३५० एकर जमीन देण्याचे मान्य केले आहे. त्या दृष्टीने सर्व्हे देखील झालेला आहे. एमआयडीने शासनाकडे परीपूर्ण प्रस्ताव सादर केलेला आहे. शासनाने तो प्रस्ताव मान्य करावा. आटपाडी तालुक्यात एमआयडीसी व्हावी. मंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तराच्या भाषणात या संदर्भात उल्लेख करावा, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानून माझे दोन शब्द संपवितो.

--------

असुधारित प्रत

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

**उप सभापती :** मी सभागृहाला सांगू इच्छिते की, म.वि.प. नियम २६० अन्वये विरोधी पक्षातर्फे देण्यात आलेल्या प्रस्तावावरील चर्चा सायंकाळी ५.३० वाजता सुरु करावयाची आहे. तत्पूर्वी पुरवणी मागण्यांवरील चर्चेला मंत्री महोदयांना उत्तर द्यावयाचे आहे.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदया, पुरवणी मागण्यांवरील मंत्री महोदयांचे उत्तर उद्या घेण्यात यावे.

**उप सभापती** : मघाशी सन्माननीय सदस्य श्री.गोपिचंद पडळकर यांनी उत्तर मिळत नाही असे सांगितले. मंत्री महोदयांना उद्या विधानसभेत कामकाज आहे.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदया, माझे सभापती महोदयांसमवेत बोलणे झालेले आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, आपण उद्या पुरवणी मागण्यांवरील उत्तर घ्यावे. आमची त्यासाठी संमती आहे. मी सायंकाळी ५.३० वाजता म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्तावारील चर्चा सुरु करतो. तत्पूर्वी दोन-तीन सन्माननीय सदस्यांना पुरवणी मागण्यांवर दोन मिनिटे मुद्दे मांडण्याची परवानगी द्यावी.

**उप सभापती** : मंत्री महोदय पुरवणी मागण्यांवरील चर्चेला थोडक्यात उत्तर देणार आहेत.

श्री.गुलाबराव पाटील : सभापती महोदया, पुरवणी मागण्यांवरील चर्चेला एकूण ११ विभागाचे मंत्री उत्तर देणार आहेत. संबंधित विभागाचे मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. मंत्री महोदय थोडक्यात उत्तर देतील. आपण पुरवणी मागण्यांवरील उत्तर पूर्ण करुन घ्यावे, अशी माझी विनंती आहे.

**उप सभापती** : आपण पुरवणी मागण्यांवरील चर्चा संपल्यानंतर मंत्री महोदयांचे उत्तर घेऊ. आता सन्माननीय सदस्य डॉ.रणजित पाटील यांनी पुरवणी मागण्यांवर थोडक्यात आपले म्हणणे मांडावे.

यानंतर श्री.सांगळे......

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदया, आता सन्माननीय सदस्य डॉ.रणजित पाटील भाषण करतील. त्यानंतर मंत्री महोदय श्री.गुलाबराव पाटील यांनी सर्व मंत्री महोदयांच्या वतीने पुरवणी मागण्यांवर एकत्रित उत्तर द्यावे. त्यानंतर सायंकाळी ५.४५ ते ६.०० वाजेपर्यंत आपण प्रस्तावावरील चर्चेला सुरुवात करु.

**उप सभापती :** ठीक आहे. वेळेचे नियोजन कशाप्रकारे करायचे ? याबाबत आपण सर्वांनी ठरवावे.

असुधारित प्रत

डॉ.रणजित पाटील (अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदया, मी सन २०२१-२०२२ च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदया, वैद्यकीय शिक्षण विभागासंबंधी सांगायचे झाल्यास अस्थायी सहाय्यक प्राध्यापकांना शासकीय सेवेत सामावून घेण्यासंबंधी अनेक दिवसांपासून आंदोलन सुरु आहे. यापूर्वीच्या अधिवेशनामध्ये मंत्री महोदयांनी त्यांच्या भाषणामध्ये असे सांगितले होते की, आम्ही त्यांना सामावून घेऊ. सदर डॉक्टरांनी करोना काळात मोठे योगदान दिले होते. एमपीएससीची सर्व भरती बंद असते तेव्हा अस्थायी कर्मचारी नेमले जातात. १० ते १५ वर्षांपासून वैद्यकीय कॉलेजमध्ये काम करणाऱ्या सहाय्यक प्राध्यापकांना अद्यापपर्यंत अस्थायी ठेवण्यात आल्यामुळे सर्व डॉक्टर मंडळी सचिवाकडे गेल्यानंतर त्यावेळी त्यांच्यासमवेत अतिशय गैरवर्तणूक करण्यात आली व त्यांना तेथून बाहेर काढण्यात आले. आज सुध्दा ते आंदोलन करीत आहेत. सभापती महोदया, माझी आपल्याला विनंती आहे की, पुरवणी मागण्यांच्या निमित्ताने शासनाने त्यांना बोलावून त्यांचा प्रश्न मार्गी लावावा. नवीन वैद्यकीय महाविद्यालय सुरु केल्यानंतर माझ्यासह सर्वांना अनुभव येत आहे की, तेथे ज्यावेळी इंडियन मेडीकल कौन्सिलची टीम येते तेव्हा आजुबाजूच्या कॉलेजमधील लोक तेथे प्रतिनियुक्तीवर पाठविले जातात. हा तात्पुरता उपाय असतो. त्यानंतर तेथील सर्व महत्त्वाची पदे पुन्हा रिक्त होतात. त्यामुळे एखादे वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्यासाठी तेथील सर्व पदांची भरती करणे आवश्यक आहे. त्याकरिता वैद्यकीय महाविद्यालय ३ वर्षे विलंबाने सुरु झाल्यास काही हरकत नाही. वैद्यकीय महाविद्यालयामध्ये जोपर्यंत संपूर्ण पदे भरली जात नाहीत तोपर्यंत ते महाविद्यालय सक्षमरित्या सुरु होऊ शकत नाही. मी ही बाब वारंवार मांडत आहे. राज्यात शासनाने १५० कोटी रुपये खर्च करुन राज्यात ४ सुपर स्पेशालिटी रुग्णालय सुरु केली आहेत. अकोल्यासह सर्व सुपर स्पेशालिटी रुग्णालयांमध्ये एमआरआय मशीन व इतर मशीन्स असतील. एका बाजूला अकोला जिल्हयात गरीब लोकांना एमआरआय काढण्यासाठी ५ ते ६ हजार रुपये खर्च करावे लागतात. दुसऱ्या बाजूला २ वर्षांपासून एमआरआय मशीन्स रुग्णालयामध्ये आलेल्या आहेत. मला असे वाटते की, सदर मशीन्स डिफेक्ट लायबिलिटी पिरीयडमधून निघून जातील. त्यानंतर त्यांचा

डॉ.रणजित पाटील......

वापर सुरु केल्यानंतर जास्त कालावधीसाठी उपयोग देखील होणार नाही. भविष्यात अशी परिस्थिती निर्माण होता कामा नये. अमरावती विभागामध्ये अमरावती शहरात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याची मागणी करण्यात आली होती. शासनाने त्याकरिता तत्वत: मान्यता देखील दिली आहे. मी याबाबत शासनाचे आभार मानतो. सभापती महोदय, शासनाने त्या कामाकरिता गती दिली पाहिजे.

सभापती महोदया, जलसंपदा विभाग, पृष्ठ क्रमांक – १३, बाब क्रमांक १९ यासंबंधी मी सदनाला सांगू इच्छितो की, अमरावती विभागातील ५ जिल्हयांमधील उत्तर बाजूचा मोठा भाग खारपाण पट्ट्याचा आहे. तेथे लाईफ लाईन समजली जाणारी पुर्णा नदीवर ५ वर्षांमध्ये साखळी बॅरेजेस तयार झाले असून त्यांचे काम पूर्णत्वास आले आहे. त्यापैकी २-३ बॅरेजेसची कामे पूर्ण झाली आहेत. तेथे पाणी देखील अडविण्यात आलेले आहे. परंतु पूर्ण झालेल्या बॅरेजेसची वितरण प्रणाली अद्याप सुरु झालेली नाही. नाशिकला आर्किटेक्चरल डिझाईनचे डिपार्टमेंट आहे. बंद नाल्यातून वितरण प्रणाली देण्याचे त्यांनी मान्य केलेले आहे. अशा परिस्थितीत २ ते ३ वर्षे पाणी अडवून ते शेतकऱ्यांच्या उपयोगी पडणार नसल्यास ही बाब योग्य नाही. या संदर्भात शासनाने तातडीने काम करावे अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदया, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, पृष्ठ क्रमांक – ३६, बाब क्रमांक ४२ यासंबंधी मी सदनाला सांगू इच्छितो की, सदर खात्यामध्ये ३ वर्षांपासून सुमारे ३ हजार लोक सहाय्यक प्राध्यापकाच्या भरतीसाठी प्रयत्न करीत आहेत. त्यापैकी एक हजार सहाय्यक प्राध्यापक पदांची भरती देखील केलेली आहे. उर्वरित २ हजार उमेदवारांनी नेटसेट व पीएचडी केलेली असून ते सहाय्यक प्राध्यापकांच्या भरतीची वाट बघत आहेत.

सभापती महोदया, शासनाने चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांसाठी सातवा वेतन आयोग लागू केला असला तरी अद्याप त्यांना वेतन आयोगाचा लाभ मिळालेला नाही. या संदर्भात त्यांना लवकरात लवकर सातव्या वेतन आयोगाचा लाभ मिळाला पाहिजे अशी मी शासनाला विनंती करतो.

असुधारित प्रत

डॉ.रणजित पाटील......

सभापती महोदया, प्रत्येक महाविद्यालयांमध्ये जेवढे प्राध्यापक काम करीत असतात, तेवढेच लोक तासिका बेसिसवर काम करीत असतात. परंतु त्यांना अतिशय कमी स्वरुपात मानधन दिले जाते. सभापती महोदया, माझी आपल्या माध्यमातून शासनाला विनंती आहे की, शासनाने यासंबंधी फेरविचार करुन तासिका बेसिसवरील मानधनाची रक्कम वाढवून दिली पाहिजे. अमरावती विभागामधील ५ जिल्हयांकरिता पूर्वीच्या काळी एक विद्यापीठ स्थापन झाले होते. त्या काळात ५ ते ६ जिल्हयांसाठी एक विद्यापीठ असणे ही बाब प्रॅक्टीकली होती. सध्या प्रत्येक जिल्हयांमध्ये मोठी महाविद्यालये निर्माण झालेली असल्यामुळे त्यांचे उपकेंद्र निर्माण होणे गरजेचे झाले आहे. अमरावती विभागामध्ये अशा प्रकारे एक उपकेंद्र झाले पाहिजे. मंत्री महोदय पुरवणी मागण्यांवरील उत्तरामध्ये याबाबत घोषणा करतील अशी मी अपेक्षा करतो.

सभापती महोदया, नगरविकास विभाग, बाब क्रमांक १२, पृष्ठ क्रमांक – १२ संबंधी मी सदनाला सांगू इच्छितो की, अमरावती विभागामध्ये चिखलदरा नावाचे गिरीस्थान आहे. त्याकरिता शासनाने प्लॅनिंग ॲथॉरिटी म्हणून सिडकोला नियुक्त केलेले आहे. तेथील डीपी तयार झाल्यानंतर प्लॅनिंग ॲथॉरिटी म्हणून सिडकोने अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नाही. तेथील स्कायवॉकचे काम देखील रखडलेले आहे. सदर काम नगरविकास विभागामार्फत तातडीने केले जाईल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदया, तालुका मुख्यालयात ग्रामपंचायती होत्या. शासनाने तालुका मुख्यालयातील ग्रामपंचायंतीचे नगरपंचायतींमध्ये रुपांतर केले. तेथे मोठया प्रमाणात टाऊन प्लॅनिंगची पदे भरण्यात आली. ही पदे भरत असताना एक्प्रेस वेच्या मदतीने तेथील सर्व डीपी तयार केले जातील असे अपेक्षित होते. परंतु अद्याप १५० नगरपंचायतींचे डीपी तयार झालेले नाहीत. या संदर्भात एका सन्माननीय सदस्यांनी असे सांगितले होते की, डीपी तयार झाले नाहीत तर तेथील खुल्या भूखंडावर अतिक्रमण केले जाते. परिणामी त्यांचे प्लॅनिंग होत नाही. त्यामुळे सर्व

असुधारित प्रत

डॉ.रणजित पाटील......

नगरपंचायतींच्या डीपीची कामे तातडीने हाती घ्यावीत अशी माझी मंत्री महोदयांना विनंती आहे.

सभापती महोदया, अकोला महानगरपालिकेमध्ये २० ते २५ वर्षांपासून ८ ते १० शिक्षक काम करीत होते. परंतु त्यांच्याकडे पुरेशी शैक्षणिक अर्हता नसल्यामुळे त्यांना कामावरुन काढून टाकण्यात आले. अशा प्रकारे त्यांनी शिक्षण क्षेत्रात २० वर्षे काम केल्यानंतर आता त्यांना सेवेतून काढून टाकण्यात आले. यापूर्वी सदर विषयासंबंधी बैठक घेऊन त्यात असा निर्णय घेतला होता की, साधारणत: त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार त्यांना सेवेत सामावून घेण्यात येईल. सभापती महोदया, माझी आपल्यामार्फत मंत्री महोदयांना विनंती आहे की, अकोला महानगरपालिकेतील संबंधित ६ शिक्षकांना न्याय मिळाला पाहिजे.

सभापती महोदया, उच्च व तंत्र शिक्षण विभागाअंतर्गत एमसीव्हीसीचे शिक्षक काम करीत आहेत. शासनाने तातडीने त्यांना आश्वासित प्रगती योजना लागू करावी. विभाग बदलल्यानंतर सदरहू शिक्षकांना सेवाज्येष्ठतेचा लाभ मिळत नाही. त्यामुळे विभाग बदलल्यानंतर सदरहू शिक्षकांना सेवाज्येष्ठतेचा लाभ मिळावा अशी मी शासनाला विनंती करतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो, धन्यवाद.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्या डॉ.मनिषा कायंदे यांनी पुरवणी मागण्यांवर त्यांचे विचार व्यक्त करण्यासाठी माझ्याकडे इच्छा व्यक्त केली आहे. सदनामध्ये महिला सदस्या अल्पमतात असल्या तरी सदनाने बहुमताने आमचा विचार करावा.

-----------

असुधारित प्रत

डॉ. मनिषा कायंदे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदया, मी सन २०२१-२०२२ च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी उभी आहे. आपण मला पुरवणी मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार व्यक्त करते.

सभापती महोदया, मत्स्य व्यवसाय विभाग, पृष्ठ क्रमांक – ७, बाब क्रमांक -८ संबंधी मी सदनाला सांगू इच्छिते की, रत्नागिरी जिल्हयातील बुरंडी गावामध्ये जेटी नसल्यामुळे मच्छीमार बांधवांना समुद्रामध्ये बोटी नांगराव्या लागतात. भरतीच्या वेळी मच्छीमारांना छातीपर्यंत पाण्यामध्ये जाऊन मासे उतरावे लागतात. त्यामुळे तेथे जेटी बांधण्यात यावी अशी मी शासनाकडे मागणी करीत आहे.

सभापती महोदया, वैद्यकीय शिक्षण विभाग, पृष्ठ क्रमांक – ३६, बाब क्रमांक - ४१ संबंधी मी सदनाला सांगू इच्छिते की, भारतामधून युक्रेनमध्ये वैद्यकीय शिक्षणासाठी गेलेले अनेक विद्यार्थी अडकले होते. त्यावेळी निर्माण झालेली परिस्थिती आपण सर्वांनी पाहिली. त्याबाबत सर्व वर्तमानपत्रांमधून मोठे लेख छापून आले होते. आपण सदर विद्यार्थ्यांना युक्रेनमधून रेस्क्यु करुन आणले हा वेगळा विषय आहे. त्यानंतर भारत आणि युक्रेनमधील वैद्यकीय शिक्षणासंबंधी तुलना होऊ लागली. युक्रेनमध्ये नीट परीक्षा न देता वैद्यकीय शिक्षणासाठी प्रवेश मिळत असल्यामुळे विद्यार्थ्यांना हा मार्ग सोपा वाटतो. या संदर्भात काही महिन्यांपूर्वी माझ्याकडे एक शिक्षक संघटना आली होती. त्यांनी माझ्यासमोर असा विषय उपस्थित केला होता की, युक्रेन व रशियामध्ये विद्यार्थी वैद्यकीय शिक्षण घेण्याकरिता जात असतात. भारतामध्ये खाजगीकरण झाल्यामुळे वैद्यकीय शिक्षण महाग झालेले आहे. परंतु ते किती महाग असावे ? त्यामुळे विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी युक्रेनला जाणे परवडते. तसेच नीट परिक्षेच्या तडाख्यात आपण अडकता कामा नये असे विद्यार्थ्यांना वाटत असते. त्यामुळे आपल्याला ही प्रक्रिया सुलभ करता येईल का ? यापूर्वी गरीब घरातील मुले एमबीबीएस, बीएएमएस, युनानी किंवा होमिओपॅथीचे शिक्षण घेण्यासाठी जात होती.

यानंतर श्री.गागरे....

असुधारित प्रत

डॉ.मनिषा कायंदे .....

मेडीकल शिक्षण हे केवळ इलिट वर्गासाठी राहिले आहे का, उच्चभ्रू लोकांसाठी राहिले आहे का. गरीबांच्या मुलांनी वैद्यकीय शिक्षण घेण्याचा विचारच नये का. अशी परिस्थती दुदैवाने आपल्या देशात व महाराष्ट्रात निर्माण झालेली आहे.

सभापती महोदया, मी दुसऱ्या एका विषयाबाबत सांगते, मंत्री महोदय उपस्थित आहेत, आयुर्वेदीक डॉक्टर, होमीओपॅथी डॉक्टर यांना शासकीय नोकऱ्यामध्ये वेगवेगळया पदांवर सामावले जाते तेव्हा नेहमी दुजाभाव केला जातो, हा दुजाभाव अत्यंत चुकीचा आहे. बीएएमएस डॉक्टरला एक पगार व एमबीबीएस झाला असेल तर वेगळा पगार दिला जातो. म्हणजे तुम्ही या दोन पॅथीची तुलना करु शकत नाही. कोरोना काळात आपण पाहिले की, बीएएमएस व होमीओपॅथीक डॉक्टरांचे मोठे योगदान होते. परंतु त्यांना मानधन देण्यात येते तेव्हा एमबीबीएस नाहीत तर केवळ बीएएमएस असल्याचे पाहिजे जाते. अधिकारी वर्गाकडून किंवा सर्वांकडून बोलले जाते की, केवळ बीएएमएस किंवा केवळ बीएचएमएस हे अत्यंत चुकीचे आहे, कारण या दोन्ही पॅथीची तुलना होऊ शकत नाही म्हणून त्यांची मानसिकता बिघडत चालली आहे. याबाबत आयुर्वेदीक डॉक्टरांकडून आमच्याकडे बरीच निवेदने येत असतात. आता कोरोना काळात आपण पाहिले आहे की, त्या सर्वांनी सेवा दिलेली आहे. हा विषय अत्यंत महत्वाचा आहे. ग्रामीण भागात डॉक्टर का जात नाहीत. हे सर्व शिकून येतात, एमबीबीएस होतात पण ग्रामीण भागात जायला कोणी तयार नाही. केवळ बाँड लिहून दिला आहे तेवढयापुरते जातात. परंतु ग्रामीण भागात आपण बेसीक गरजाही पुरवू शकत नाही. ग्रामीण भागात वैद्यकीय शिक्षणाची कमतरता आहे, म्हणून भोंदू बाबांचे सर्व फोफावत आहे. प्रॉपर क्वॉलीफायीड डॉक्टर तिकडे जात नाहीत. आज ग्रामीण भागात पटकन एखाद्या भोंदू बाबाकडे लोक जातात किंवा तंत्रमंत्र करतात. स्वत:ची तब्येत बिघडवून घेतात व त्यांच्या जिवानिशी जातात. एकंदरीत आपण वैद्यकीय शिक्षणाबाबत खूप विचार केला पाहिजे की, ही परिस्थिती का निर्माण झाली आहे. युक्रेनच्या माध्यमातून आज आपणास हे सर्वांच्या लक्षात आलेले आहे.

सभापती महोदया, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या पान क्रमांक ४२ व बाब क्रमांक ४५ वर मी बोलू इच्छिते. प्राध्यापकांची भरती लवकरात लवकर सुरु व्हावी. ज्या खूप प्रलंबित मागण्या आहेत त्या सर्व शेवटी अर्थ विभागाकडे येऊन थांबतात.

डॉ.मनिषा कायंदे.....

नेट, सेट, पीएचडी धारक १८ हजार उमेदवार तयार आहेत. पण केवळ १० हजार पगारावर ते सीएचबी तत्वावर नोकरी करीत आहेत. सीएचबीचे धोरण आणले पाहिजे. विविध विभागातील कंत्राटी कर्मचा-यांबाबत माननीय विरोधी पक्ष नेते यांनी देखील विषय उपस्थित केला आहे, ते लोक ५-१० हजारावर काम करीत आहेत. हा विषय एकंदरीत राज्याच्या धोरणाशी संबंधित आहे. ते पगार नसून मानधन आहे. मानधनाचा अर्थ ऑनरेरीयम होतो. हे कोणाला तरी मिळायला पाहीजे, ऑनरेरीयम हे ऑनररी पेमेंट आहे. जे सेवा करीत आहेत ते वयाच्या ४५-५० वर्षाला पोहचलेले नाहीत. They should get Honorarium. त्यांना तो पगारच मिळाला पाहिजे. मानधन ही वेगळी गोष्ट आहे. खरे तर मानधन हा शब्दसुध्दा या सिस्टीममधून काढून टाकला पाहिजे अशी माझी मागणी आहे. It shoud be called as salary. पगार कमी असो किंवा जास्त असो. सर्वच खात्यात कंत्राटी कामगार आहेत, ते प्राध्यापक असोत, शिक्षक असोत, अजून शासनाच्या कोणत्याही सेवेत असोत. जीएसटी कर्मचारी जीएसटी भवनात १५-१५ वर्ष १०-१० हजार पगारावर काम करीत आहेत. ते सर्व प्रतिनिधी येतात. त्यांच्याकरीता शासनाने सन्मानपूर्वक एक धोरण शासनाने आणावे. या सर्व कंत्राटी कामगारांचा बेसीक मिनिमम पे काय असला पाहीजे. सन्मानपूर्वक जीवन जगण्यासाठी कोणत्याही माणसाला, कोणत्याही सेवेत आज मुंबईसारख्या शहरात किंवा ग्रामीण भागात किमान २५ हजार रुपये तरी त्याच्या शैक्षणिक पात्रतेनुसार मिळायला पाहिजेत. ही अत्यंत महत्वाची बाब आहे.

सभापती महोदय, उच्च शिक्षणात खूप जिकरीची असलेली व विद्यार्थ्यांना भेडसवणारी गाईडची समस्या व कमतरता आहे. अनेक विद्यार्थी आज पीएचडी च्या प्रतिक्षेत आहेत. गाईडची कमतरता आहे, गाईडच्या नियुक्त्या नाहीत. त्यांच्या आरआरसीच्या मिटींग नाहीत, या सर्व गोष्टी अत्यंत महत्वाच्या आहेत. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल धन्यवाद.

-------

श्री.गुलाबराव पाटील (पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री) : सभापती महोदय, सन २०२१-२०२२ च्या पुरवणी मागण्यांवर शासनाच्या वतीने उत्तर देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, उद्योग, खनिकर्म, मराठी भाषा, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास, उर्जा आणि नवीन व नवीकरणीय उर्जा मंत्री, नगरविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम), इतर मागास बहुजन कल्याण, खार जमिनी विकास, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्री, वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्य, उच्च व तंत्रशिक्षण, पाणीपुरवठा व स्वच्छता, आदिवासी विकास, वस्त्रोद्योग, मत्स्यव्यवसाय, बंदरे, महिला व बाल विकास विभागाच्या मागण्यांवर सन्माननीय सदस्य श्री.प्रविण लटके, श्री.नरेंद्र दराडे, श्री.अमोल मिटकरी, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.नरेंद्र दराडे, श्री.जयंत प्र. पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अनिल तटकरे, श्री.अंबादास दानवे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.अरुण लाड, श्री.सदाभाऊ खोत, श्री.संजय दौंड, श्री.रणजितसिंह मोहिते पाटील, श्री.बाळाराम पाटील, श्री.राजहंस सिंह, श्री.निरंजन डावखरे, श्री.गोपिचंद पडळकर, डॉ.रणजित पाटील, डॉ.मनिषा कायंदे यांनी पुरवणी मागण्यांवर उपयुक्त सूचना केलेल्या आहेत.

सभापती महोदय, मी सभागृहाला खात्री देतो की, ज्या सन्माननीय सदस्यांनी सूचना केलेल्या आहेत त्यांना लेखी उत्तर देण्यात येईल.

सभापती महोदय, मी सभागृहाला विनंती करतो की, ६२५० कोटी ३६ लक्ष ४० हजार रुपयाच्या पुरवणी मागण्यांना सभागृहाने मान्यता द्यावी.

**उप सभापती** : सन २०२१-२०२२ च्या पुरवणी मागण्यावर सभागृहाने विचार केला आहे.

---------

**सभागृहाच्या कामकाजाबाबत**

**उप सभापती** : आता नियम २६० अन्वये प्रस्तावावर चर्चा माननीय विरोधी पक्ष नेते सुरु करतील. मी त्यांना विचारु इच्छिते की, आज हा प्रस्ताव पूर्ण करणार आहात का?

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, हे तुमच्या निर्णयावर अवलंबून आहे. पण आज सदरहू प्रस्ताव पूर्ण व्हावा. सर्व सन्माननीय सदस्यांची या प्रस्तावावर बोलण्याची तयारी आहे.

------

असुधारित प्रत

**पृ. शी.** : राज्यातील कायदा व सुव्यवस्था बिघडलेली असणे,

एसटी कर्मचाऱ्यांचा संप मिटविण्यात सरकारला आलेले अपयश, ओबीसी आरक्षणाशिवाय निवडणुका घेणे, टीईटी व अन्य स्पर्धा परीक्षेत झालेले घोटाळे

**मु. शी.** : राज्यातील कायदा व सुव्यवस्था बिघडलेली असणे,

एसटी कर्मचाऱ्यांचा संप मिटविण्यात सरकारला आलेले अपयश, ओबीसी आरक्षणाशिवाय निवडणुका घेणे, टीईटी व अन्य स्पर्धा परीक्षेत झालेले घोटाळे या विषयावर सर्वश्री प्रविण दरेकर, विजय ऊर्फ भाई गिरकर, प्रसाद लाड, चंद्रशेखर बावनकुळे, सुरेश धस, डॉ.परिणय फुके, सदाभाऊ खोत, विनायक मेटे, डॉ.रणजित पाटील, प्रविण पोटे पाटील, महादेव जानकर, रणजितसिंह मोहिते-पाटील, ॲड निरंजन डावखरे, निलय नाईक, चंदुभाई पटेल, गोपिचंद पडळकर, रमेशदादा पाटील, रामराव पाटील, प्रविण दटके, रामदास आंबटकर, रमेश कराड, अमरीशभाई पटेल, वि.प.स. यांचा प्रस्ताव

श्री. प्रवीण दरेकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.प. नियम २६० अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"१९९३ चा बॉम्बस्फोट व २००८ मधील मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याचे आघात अद्यापही विसरले नसताना दिवसाढवळया खून, बलात्कार, चोऱ्या, दरोड्यामुळे सर्वसामान्य जनता त्रस्त असताना त्यावर कोणताही मार्ग न काढता भ्रष्टाचाऱ्यांना संरक्षण दिल्यामुळे राज्यातील कोट्यवधी जनतेचा कायदा व सुव्यवस्थेवरील उडालेला विश्वास, महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचे जन्मदिनी ५०० नागरिकांपेक्षा अधिकची गर्दी जमवल्यामुळे हजारो शिवभक्तांवर दाखल झालेले गुन्हे व त्याचवेळेस सत्ताधारी पक्षाच्या प्रवक्त्यांच्या पत्रकार परिषदेत १५०० नागरीक उपस्थित असताना एकाही व्यक्तीवर दाखल न

असुधारित प्रत

श्री. प्रवीण दरेकर.....

झालेले गुन्हे, कायद्याचा वापर स्वतःच्या सोयीने केल्याने कोट्यवधी शिवभक्तांमध्ये पसरलेला असंतोष, लोकप्रतिनिधींना गुंडांकडून मिळत असलेल्या धमक्या, राजकीय हस्तक्षेपामुळे बड्या राजकीय नेत्यांविरोधातील गुन्ह्यांच्या तपासात आलेली शिथिलता, हत्या, अपहरण, दरोडे, घरफोड्या यासारख्या गुन्ह्यांना आळा घालण्यात आलेले अपयश, मुंबई, नवी मुंबईसह राज्यातील मोठ्या शहरातील गुन्ह्यात झालेली वाढ, सायबर हल्ल्यांना व गुन्ह्यांना रोखण्यात आलेले अपयश, अंमली पदार्थ, गुटखा व्यापार, जुगार, मटका या अवैध धंद्यात झालेली अपरिमित वाढ, अल्पवयीन मुले, मुली व महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये झालेली वाढ, मृत पूजा चव्हाण आत्महत्या प्रकरणाच्या तपासातील संथगती, डान्सबार, पब, डिस्कोथेक, ऑनलाईन गेमिंग, विशेषत: ऑनलाईन लॉटरीमधील भ्रष्टाचाराला आळा घालण्यात आलेले अपयश, त्यांच्या चालकांना मिळणारे अभय, पोलिसांवर पडणारा ताण व पोलिसांच्या मागण्यांकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, मागासवर्गीय समाजावर होणारे हल्ले व त्यांच्यात वाढलेली असुरक्षिततेची भावना, राजकीय कार्यकर्ते, लोकप्रतिनिधींवर होणारी सुडबुध्दीने कारवाई, राज्याची कायदा व सुव्यवस्था कोलमडल्यामुळे गोरगरीब जनता, महिला व सर्वसामान्यांमध्ये निर्माण झालेले असुरक्षिततेचे व चिडीचे वातावरण, तसेच, एसटी कर्मचाऱ्यांच्या संपाला शंभर दिवसांपेक्षा जास्त कालावधी होऊन देखील संप मिटवण्यात सरकारला आलेले अपयश, शेकडो कर्मचाऱ्यांनी केलेल्या आत्महत्या, मा.न्यायालयाने सरकारवर ओढलेले ताशेरे, संपामुळे राज्यातील ग्रामीण शहरी भागातील प्रवाशांना होत असलेला अतोनात त्रास, एसटी कर्मचारी व कुटुंबीयांमध्ये निर्माण झालेले निराशेचे वातावरण, तसेच, सरकारच्या बेपर्वा धोरणामुळे मराठा व ओबीसी आरक्षण रद्द होणे, इतर मागासवर्ग आयोगाचा अंतरिम अहवाल मा.सर्वोच्च न्यायालयाने फेटाळला असणे, अहवाल फेटाळत असताना न्यायालयाने सांख्यिकी अभ्यास आणि संशोधनाविनाच अंतरिम अहवाल तयार केला असल्याचे, अहवालात इतर मागासवर्गीयांच्या राजकीय प्रतिनिधित्वाबाबत कोणतीही माहिती नसल्याचे, स्थानिक स्वराज्य संस्थानिहाय ओबीसी प्रतिनिधित्वाची माहिती नसल्याचे तसेच कोणत्या कालावधीतील माहितीच्या आधारे हा अहवाल तयार केला याबाबतही स्पष्टता नसल्याचे न्यायालयाने नमूद केले असणे, तसेच, ओबीसी आरक्षणाशिवाय

श्री. प्रवीण दरेकर.....

निवडणुका घेण्याचे आदेश निवडणूक आयोगाला व राज्य सरकारला दिलेले असणे, सरकारच्या अनास्थेमुळे ओबीसी आरक्षण गमावण्याची आलेली वेळ, सुरुवातीपासूनच सरकारी उदासीनतेमुळे मागासवर्ग आयोग स्थापन करण्यात व आयोगाला कर्मचारी व निधी देण्यात सरकारकडून होणारी टाळाटाळ, मराठा व ओबीसी समाजासाठी केलेल्या घोषणांची दोन वर्षात न झालेली अंमलबजावणी, यामुळे या दोन्ही समाजात शासनाबद्दल निर्माण झालेली तीव्र उद्रेकाची भावना, धनगर आरक्षणाच्या प्रश्नाबाबत सरकारकडून कोणतीही कार्यवाही न होणे, संविधानानुसार धर्माच्या आधारे आरक्षण देता येत नसताना, मंत्रिमंडळाचा निर्णय झालेला नसताना मंत्र्यांनी आरक्षण देण्याबाबत सभागृहात केलेली घोषणा व परिणामी नागरिकात निर्माण झालेली संदिग्धतेची भावना, तसेच टीईटी व अन्य स्पर्धा परीक्षेत झालेले घोटाळे, स्पर्धा परीक्षेसाठी सेवा पुरवठादार कंपन्यांची निवड करताना झालेल्या अनियमितता, परिणामी राज्यातील लाखो उमेदवारांची नोकरीची संधी हिरावल्यामुळे त्यांच्यात निर्माण झालेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

सभापती महोदय, महाराष्ट्रातील तीन चार महत्वाच्या मुद्दयांचा अंतर्भाव असलेला हा प्रस्ताव आज चर्चेला आला असून त्यावर विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. कोणत्याही राज्यासाठी अत्यंत महत्वाचा विषय कायदा व सुव्यवस्था असतो. ज्या राज्यातील कायदा व सुव्यवस्था चांगली, ज्या राज्यातील औद्योगिक वातावरण त्याने चांगले राहते. राज्याच्या चांगल्या वातावरणासाठी हा विभाग अत्यंत महत्वाचा आहे म्हणून या चर्चेला अनन्यसाधारण असे महत्व आहे.

**उप सभापती** : मी सरकारला विनंती करीत आहे की, प्रस्तावात ज्या विभागाचा उल्लेख आहे त्या मंत्री महोदयांनी उपस्थित राहावे.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदया, गृह विभागाचे मंत्री महोदय किंवा राज्यमंत्री महोदय सभागृहात उपस्थित दिसत नाही.

**उप सभापती** : सभागृहात उपस्थित मंत्री महोदयांनी माननीय गृह मंत्री किंवा राज्यमंत्री यांना तसा निरोप द्यावा व त्यांना बोलावून घ्यावे.

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, पाच मिनिटांकरीता सभागृह स्थगित करण्यात यावे.

**उप सभापती** : मी आता स्वत: यामध्ये लक्ष घातले आहे.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदया, तुम्ही यामध्ये लक्ष घातल्याने मी आपला आभारी आहे. आपण सभागृहाची गरिमा व प्रतिष्ठा राखण्याचा प्रयत्न केला त्यामुळे मी सभागृहाच्या वतीने आपले मनापासून अभिनंदन करतो.

सभापती महोदया, महाराष्ट्रातील औद्योगीक वातावरण, महिला भगिनींकरीता चांगले, शांततेचे व सुरक्षेचे वातावरण असेल, बाहेरची गुंतवणूक येथे मोठया प्रमाणावर व्हायची असेल तर कायदा व सुव्यवस्था व गृह विभाग हा अत्यंत महत्वाचा आहे.

सभापती महोदय, पोलीस वाईट नाहीत. गेल्या दोन अडीच वर्षांमध्ये या सरकारकडून कायदा व सुव्यवस्था ज्या पध्दतीने हाताळणे गरजेचे होते दुदैवाने ती हाताळली गेली नाही.

यानंतर श्रीमती नाफडे ....

अमुद्रित प्रत

श्री.प्रवीण दरेकर.....

परंतु या सरकारच्या माध्यमातून ज्या पध्दतीने कायदा आणि सुव्यवस्था हाताळायला पाहिजे होती, ती त्या पध्दतीने दुर्दैवाने हाताळली गेली नाही.

सभापती महोदया, पोलीस या ठिकाणी चांगले काम करीत आहेत. महाराष्ट्र पोलीस यांना प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून राष्ट्रपती पदक देऊन गौरविण्यात आलेले आहे. केंद्रीय गृहमंत्रालयाने पुरस्काराकरिता महाराष्ट्रातील पोलीस पथकांची घोषणा केल्यामुळे मला अभिमान वाटत आहे. आपल्या राज्यातील ५१ पोलिसांना हा पुरस्कार मिळालेला आहे. ०४ पोलीस अधिकाऱ्यांना उत्कृष्ट सेवेकरिता राष्ट्रपती विशिष्ट सेवा पदक देऊन गौरविण्यात आलेले आहे. ०७ पोलिसांना शौर्य पदक देऊन गौरविण्यात आलेले आहे. ४० पोलिसांना प्रशंसनीय सेवेकरिता पदक मिळालेले आहे. आपल्या महाराष्ट्राच्या या सभागृहाच्या वतीने पोलीस अधिकारी-कर्मचारी यांचे मी मनापासून अभिनंदन करतो. मी त्यांचे अभिनंदन केल्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते त्यांच्याकडे संशयाने पाहू नका की, केंद्रीय गृहमंत्रालयाने या या पोलिसांचे अभिनंदन केलेले आहे. आपल्याकडे जे जे आपल्याला सल्ला देतात, तुमचे जे चुकीचे काम ऐकत नाही. ज्यांना केंद्र शासन गौरवित करते, त्यांच्यावर आपण बारीक लक्ष ठेवून असता, हे पोलीस प्रशासनाकरिता योग्य नाही. मागील अधिवेशनात मी कायदा व सुव्यवस्थेचे अनेक प्रश्न मांडले होते. गृह राज्यमंत्री महोदयांनी देखील चांगल्या प्रकारचे उत्तर दिले होते. त्यांनी राजकीय भाषण देखील केले होते. त्यावेळी माझ्या काही महत्त्वाच्या प्रश्नांना उत्तरे आली नव्हती. सभापती महोदया, मी याकरिता आपल्याकडे विनंती करीत आहे. आपण या सभागृहाची गरिमा राखण्याचा सातत्याने प्रयत्न करत असता.

सभापती महोदया, अलिकडच्या काळात एक सोपी टुम निघालेली आहे. कोणत्याही प्रकारची काही गोष्ट कुठे घडली की, ईडी आणि केंद्राच्या नावाने बोटे मोडली जातात. राज्यातील जनतेला या सभागृहाच्या माध्यमातून हा विषय कळला पाहिजे. हा राजकीय विषय नाही, तरीही याबाबतची माहिती पटलावर येणे आवश्यक आहे.

श्री.प्रवीण दरेकर......

जे जे गुन्हे झालेले आहेत, तेथे भारतीय जनता पार्टीचा कुठेही संबंध नाही, हे अधोरेखित करण्याचा प्रयत्न मी करत आहे. एका सन्माननीय सदस्यांचे प्रकरण झाले, महाराष्ट्राने त्या ठिकाणी पाहिलेले आहे. १९९३ मध्ये मुंबईतील बॉम्बस्फोटाची आठवण होता आजही मुंबईकराच्या काळजाचा थरकाप उडतो. या स्फोटामध्ये ३५७ लोकांचे मृत्यू झाले होते. ९०० च्या आसपास लोक या स्फोटामध्ये जखमी झाले होते. कोटयवधी रुपयांचे नुकसान मुंबई शहरात झाले होते. अशा वेळी तत्कालीन सरकारचे दुर्लक्ष झाल्यामुळे बॉम्बस्फोटातील आरोपी दाऊद इब्राहिम कासकर मुंबई सोडून पाकिस्तानमध्ये पळून जाऊ शकला. याच आरोपीने सन २००८ मध्ये मुंबईवर परत हल्ला केला. दिनांक २६ नोव्हेंबर,२००८ ही तारीख राष्ट्रीय भावना असणारा देशातील कोणताही व्यक्ती विसरु शकत नाही. त्यावेळी देखील १६० लोकांचे बळी या स्फोटामध्ये गेले होते. या सगळयामागे मास्टरमाईंड कोण होते, ते जगासमोर आलेले आहे. अशा प्रकारची माहिती आली आणि काही गोष्टी उघड होणार असतील, यामुळे कोणाचा संबंध प्रस्थापित होत असेल, त्याकरिता जर कोणाला अटक झाली असेल तर विरोधाचे कारण काय आहे, हेच समजत नाही. आपल्या मंत्रिमंडळात ती व्यक्ती आहे, म्हणून आपण बाजू घेत आहात का आपण कोणाची बाजू घेत आहात, टेरर फंडींगच्या संशयाने या प्रकरणात पाहिले जात आहे. अंडरवर्ल्डच्या मदतीने जमीन बळकाविलेली आहे, बनावट कागदपत्रे याबाबत केलेली आहेत. या ठिकाणी आम्ही "नवाब मलिक".....सॉरी...मी नाव घेत नाही. त्याकरिता आपण म्हटले की, "कोर्टात जाऊ शकतो". त्यांची जी कारवाई झालेली आहे. ती कारवाई कोर्टाच्या आदेशाप्रमाणेच झालेली आहे. भारतीय जनता पक्षाने, ईडी आणि अन्य केंद्रीय यंत्रणा असतील त्यांनी ती कारवाई कोर्टाच्या आदेशानेच केलेली आहे. केंद्रीय एजन्सी सुडबुध्दीने वागत आहेत, या आरोपात काडीचेही तथ्य नाही. मला आश्चर्य वाटते की, याकरिता सरकार आंदोलनाला बसले हाते. दस्तुरखुद्द राज्याचे उप मुख्यमंत्री, गृहमंत्री महोदय, अर्ध मंत्रीमंडळ त्या ठिकाणी महात्मा

श्री.प्रवीण दरेकर......

गांधीजी यांच्या पुतळ्यासमोर आंदोलनाकरिता बसले होते. अशा प्रकारच्या आरोपीच्या समर्थनार्थ आंदोलनाकरिता अर्ध मंत्रिमंडळ बसले होते. महात्मा गांधी आयुष्यभर अंहिसेचे पुजारी म्हणून काम करीत राहिले होते. महात्मा गांधींजींनी कोणत्याही प्रकारची हिंसा केली नाही. या महापुरुषाच्या पुतळ्यासमोर महाविकास आघाडीचे सरकार आंदोलन करीत होते. बॉम्बस्फोटातील आरोपींनी मुंबई उध्वस्त केली, शेकडो लोकांचे प्राण घेतले. आतंकवादी, बॉम्बस्फोटातील आरोपी जे जेलमध्ये आहेत, ज्यांना आजन्म तुरुंगवास झाला, त्यांच्याशी संबंध प्रस्थापित झाले म्हणून ज्यांना कोर्टाच्या आदेशाने अटक झालेली आहे, त्यांच्या रक्षणार्थ जर सरकार पुढे येत असेल याच्यापेक्षा मोठी महाराष्ट्राची अधोगती कधीच आम्ही पाहिलेली नाही. सरकार कोणाचे समर्थन करत आहे ? राजकारणात आणि पक्षात मतभेद असू शकतात. परंतु ज्यावेळी राष्ट्राच्या सुरक्षेचा प्रश्न येतो, राष्ट्रभक्तीचा प्रश्न येतो, देशभक्तीचा प्रश्न येतो, त्यावेळी पक्षाची लेबलं बाजूला सारुन विचार करणे आवश्यक आहे. त्यावेळी देखील अयोग्य पाठराखण करणे बरोबर नाही. महात्मा गांधीजी जर आज असते तर त्यांनी अशा लोकांना कठोरात कठोर शिक्षा करा, अशा प्रकारची भूमिका निश्चितच घेतली असती. सन्माननीय माजी गृहमंत्री यांच्याबाबत तक्रार कोणी केली ? यामध्ये भारतीय जनता पार्टीचा काय संबंध आहे ? त्या ठिकाणी त्यांच्याच काळातील पोलीस आयुक्तांनी खंडणीची तक्रार केलेली आहे. त्यांनीच गैरमार्गाने नियुक्त केलेल्या वाजे सारख्या अधिकाऱ्याने घडवून आणलेले ॲण्टालिया प्रकरण, मनसुख हिरेन हत्या प्रकरण जे होते, ते समोर आणलेले आहे. त्यात माजी गृहमंत्री महोदयांचे नाव घेतले गेले. त्यामुळे आज त्यांना या सर्व गोष्टींना सामोरे जावे लागत आहे. कोणीही काहीही केले तरी न्यायालय निष्पक्ष असते. न्यायालयाला तथ्य वाटले म्हणून अशा प्रकारची कारवाई झालेली आहे. यामध्ये काय भाजपचा संबंध आहे ? म्हणजे त्या ठिकाणी केंद्रीय यंत्रणांना बदनाम करायचे आणि आपला फोकस दुसरी कडे न्यायचा, अशा प्रकारचे प्लानिंग या सरकारचे असल्याचे सातत्याने दिसत आहे. त्यापेक्षा लोकाभिमुख कारभार केला तर बरे होईल.

श्री.प्रवीण दरेकर......

मंत्रीमंडळातील सत्तेचा वापर बिल्डरच्या हिताचे निर्णय घेण्याकरिता, वसूली करण्यासाठी, स्वत:च्या आमदारांचे दंड माफ करण्यासाठी करणे योग्य नाही. आपण जर तसे काही केले नाही तर केंद्रीय यंत्रणा आपल्याला काहीही करु शकत नाही आणि करणारही नाही. यंत्रणेचा गैरवापर केला जात आहे, असा आरोप केला जात आहे. श्री.संजय राठोड यांच्या बाबत गुन्हाच दाखल झालेला नाही. गैरवापर करण्याचा काय प्रश्न येतो ? पोलिसांचा दबाव असून देखील हा गुन्हा दाखल केलेला नाही. कोणत्या बेसवर आपण आरोप करीत आहात, हेही महत्त्वाचे आहे. ज्यावेळी केंद्रीय तपास यंत्रणांवर अशा प्रकारचे आरोप करत असताना एक बोट केंद्रीय तपास यंत्रणांकडे दाखवित असताना महाराष्ट्रातील पोलीस बळाचा वापर करुन आपण नेमके काय करत आहात, याचा देखील अंतर्मुख होऊन विचार करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदया, आपल्या राज्यात देशाचे केंद्रीय मंत्री माननीय श्री.नारायण राणे हे आहेत, त्यांनी मुख्यमंत्री महोदयांबाबत वक्तव्य केले, त्यांना तत्काळ अटक केली. अनेक ठिकाणी त्यांच्यावर अनेक गुन्हे दाखल केले गेले. परंतु या राज्याचे अल्पसंख्याक मंत्री यांनी माननीय श्री.किरिट सोमैय्या यांना आयटम गर्ल म्हटले होते.

यानंतर श्री.सोनावणे.......

असुधारित प्रत

श्री. प्रवीण दरेकर........

त्यांच्या विरोधात कोणत्याही प्रकारची कारवाई केलेली नाही. हे आक्षेपार्ह वाक्य आहे की नाही ? आज जागतिक महिला दिवस आहे. काही प्रवक्त्यांनी शब्दप्रयोग केलेला असून, मी त्याचा पुनरुच्चार या ठिकाणी करणार नाही. महिला भगिनी आणि केंद्र शासनाच्या प्रती आदर व्यक्त केला पाहिजे. माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी साहेबांनासुध्दा मी शिव्या देऊ शकतो अशा प्रकारचे वक्तव्य करणाऱ्या लोकांच्या विरोधात कारवाई केलेली नाही. एक पक्षाच्या नेत्याने मी त्यांना मारु शकतो, शिव्या देऊ शकतो, अशा प्रकारचे वक्तव्य केले होते. माननीय गृह राज्यमंत्री महोदयांनी त्यांच्या विरोधात गुन्हा का दाखल केला नाही ? त्यांच्या विरोधात कारवाई का केली नाही याचे उत्तर माननीय गृह राज्यमंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तराच्या भाषणातून आम्हाला दिले पाहिजे. आपले सरकार आहे म्हणून आपली नेतेमंडळी काही बोलू शकतात काय असा माझा प्रश्न आहे. अशा नेते मंडळींना आपण सरंक्षण दिलेले आहे. केंद्रीय तपास यंत्रणांचा गैर वापर केला जातो अशा प्रकारचा उल्लेख केला जातो. माननीय गृहनिर्माण मंत्री महोदयांच्या बाबतीत जगजाहीर ज्युनियर इंजिनिअर तनमुनसरेला आणले आणि मारहाण केली होती. यासंदर्भात आम्ही तक्रार केली होती काय ? माननीय न्यायालयाने एफआयआर दाखल करुन त्यांच्या विरोधात कारवाई करण्याबाबत सांगितले होते. अशा वेळी भारतीय जनता पार्टीचा कोठे संबंध आला असा माझा प्रश्न आहे.

सभापती महोदया, आज महिला दिवस आहे. आज महिलांवरील अत्याचाराच्या प्रमाणात लक्षणीय वाढ झाल्याचे दिसून येत आहे. महिलांवरील अत्याचाराचे राजकीय गुन्ह्येगारीचे प्रतिबींब दिसून येत आहे. चौथे महिला धोरण लवकरच आणले जाणार आहे. माननीय महिला व बालविकास मंत्री यांनी प्रतापगडावर जाऊन शिवप्रतीमेला पुष्पहार अर्पण केला होता. मी त्यांचे अभिनंदन करतो. त्यांचा छत्रपती शिवाजी महाराजांवर नितांत आदर होता. आज राज्यात महिला भगिनी सुरक्षित आहेत काय ? कार्यकर्त्यांकडून महिलांवर अत्याचार केला

जात आहे, त्यांची अब्रु लुटली जात आहे. अशा लोकांना गृह विभाग पाठीशी घालण्याचा प्रयत्न करीत आहेत. पत्रकारपरिषदेत संबंधित महिला भगिनींना शिव्या

श्री. प्रवीण दरेकर........

दिल्या जात आहेत. अशी छत्रपती शिवाजी महाराजांची नीती होती काय ? आपण अशा वेळी सिलेक्टीव्ह कारवाया कशासाठी करतो असा माझा प्रश्न आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे शौर्यासाठी ओळखले जायचे तसे औदार्य छत्रपतींचे ओळखले जात होते. याची इतिहासात अनेक उदाहरणे मिळतील. त्या काळात स्त्रीयांना कैद करण्यास बंदी होती. उमरखिंडीच्या लढाईत रायबागीन विरोधात होती. पराभव झाल्यानंतर त्यांना पकडून आल्यानंतर शिवाजी महाराजांनी तीचा आदर आणि सत्कार करुन तीला तीच्या छावनीत सुरक्षित सोडले होते. असा शिवाजी महाराजांचा महिलांप्रती आदर होता. बेलवडीच्या किल्लेदार सावित्रीबाई देसाई या विरुध्द बाजूला उभ्या होत्या. पण त्यांचा अपमान करणाऱ्या स्वत:च्या सरदारांना शिवरायांनी शिक्षा केली होती. राजकीय संघर्षात महिलांचा अनादार होणार नाही याची दक्षता शिवाजी महाराजांनी घेतली होती. युध्दात केसरसिंग मरण पावला. पण त्यांच्या आईचा आणि पत्नीचा सत्कार करुन, त्यांना पालखीत बसवून त्यांच्या गावी सुखरुप नेण्याचे औदार्य शिवाजी महाराजांनी दाखविले होते. राजकीय विरोधकांमध्ये आई, मुलाचा, पत्नीचा, बहिनीचा आदर आणि सन्मान, संरक्षण करण्याचे शिवाजी महाराजांचे धोरण होते. संभाजीनगर, औरंगाबाद, सटाणा या ठिकाणी माननीय केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांच्या हस्ते एका शाखेचे उद्घाटन झाले होते. त्या कार्यक्रमासाठी सत्ताधारी पक्षातील सन्माननीय सदस्य उपस्थित होते. त्यांच्या चुलत भावाची पत्नी श्रीमती जयश्री दिलीप बोरमारे यांनी माननीय केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भागवत कराड व माजी नगराध्यक्ष श्री. दिनेश परदेशी यांचा सत्कार केला होता. हा राग मनात धरुन आमदारांनी आणि त्यांच्या कुटुंबीयांनी श्रीमती जयश्री दिलीप बोरमारे यांना लाथाबुक्क्यांनी जबर मारहाण केली आणि शिवीगाळ केली होती. तसेच त्यांना जीवे मारण्याची धमकीही दिली होती. हा छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श घेऊन आपण पुढे चाललो आहोत काय ? दहा जणांविरुध्द वैजापूर पोलीस

स्टेशनममध्ये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. गुन्हा दाखल केला पण कारवाई काय केली असा माझा प्रश्न आहे. माननीय गृहराज्यमंत्री सभागृहात मोबाईलवर बोलत आहेत. विरोधी पक्षनेत्यांचे भाषण सुरु आहे. यावरुन ते किती गांभीर्य आहे हे

श्री. प्रवीण दरेकर........

दिसून येत आहे. मी जी उदाहरणे देत आहेत, त्याकडे माननीय गृह राज्यमंत्री महोदयांना जाणीवपूर्वक दुलक्ष करीत आहेत. त्यांना अटक केली नाही. ऊलट मारहाण झालेल्या महिलेच्या विरोधात अॅट्रोसिटीचा गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. एकीकडे छत्रपती शिवाजी महाराजांचे धोरण आणि दुसरीकडे महिलेला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली जात आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी महिलांची बेअब्रु करणाऱ्या लोकांचा कडेलोट केला होता. महिलेला मारहाण करणाऱ्याला ताबडतोब गजाआड करायला हवे होते. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांचे आपण नाव घेऊ शकतो काय ? छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरणी महिला धोरण ठेऊन काय उपयोग झाला असा माझा प्रश्न आहे. महिलेला न्याय द्यावा, अशी माझी कळकळीची विनंती आहे. मी कोणत्याही पक्षाचे नाव घेणार नाही. पुण्यातील सत्ताधारी पक्षातील एक नेत्याच्या विरोधात शिवाजीनगर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल झाला होता. माननीय उप सभापती महोदया या देखील पुण्याच्याच आहेत. २४ वर्षाच्या मुलीला लग्नाचे आमिष दाखवून बलात्कार केला होता. गर्भवती झाल्यावर तीला जीवेमारण्याची धमकी दिली होती. त्या महिलेला जबरदस्तीने गर्भपात करण्यास भाग पाडले होते हे मला सांगताना अतिशय दु:ख होत आहे. त्यावेळी शक्ती कायदा करताना सरकाराने झिरो टॉलरन्सची हमी दिली होती. कायदा कितीही कठोर असला तरी त्याची अंमलबजावणी करणाऱ्यांच्या इच्छा शक्तीवर त्याचे यश अवलंबून असते. संबंधित नेत्याच्या विरोधात गुन्हा दाखल केला पण त्याला अटक का केली नाही असा माझा प्रश्न आहे. अशा प्रकरणात आरोपीला पुरावे मिटविण्याची संधी मिळणार नाही अशी कायद्यात तरतूद केली. मग पोलिसांनी कोणाच्या दबावापुढे अटक टाळली असा माझा प्रश्न आहे. महिलांचा अपमान करणाऱ्या स्वत:च्या सरदारांनासुध्दा छत्रपती शिवाजी महाराजांनी शिक्षा केली होती.

तुम्ही तुमच्या सरदारांविरोधात शिक्षा करण्याचे धाडस दाखविणार काय असा माझा प्रश्न आहे.

श्री. प्रवीण दरेकर........

सभापती महोदया, मी यापूर्वी सभागृहात वसईतील पापडी बाजारात आदिवासी महिला भगिनींना पोलिसांनी अमानुष मारहाण केली होती. दिनांक ४ जानेवारीला त्यासंदर्भात संबंधित मंत्री महोदयांना आणि विभागाला पत्र दिले होते. परंतु, आजतागायत मारहाण करणाऱ्या पोलिसांच्या विरोधात कोणतीही कारवाई झालेली नाही. मग अशा वेळी महिला धोरणाच्या गप्पा का मारता असा माझा प्रश्न आहे. शिवचरणी महिला धोरण का अर्पण केले जाते ?

सभापती महोदया, गृह विभागाने शिवजयंतीचा प्रस्ताव माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे पाठविला होता. आदरणीय मुख्यमंत्री महोदयांनी शिवज्योत दौडीत २०० आणि जन्मोष्ठोव सोहळयाकरिता ५०० जणांना परवानगी दिली होती. पण त्यांना परवागी दिली काय असा माझा प्रश्न आहे. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी हा प्रस्ताव मान्य केला होता. पक्षाच्या कार्यालयात पत्रकारपरिषद झाली त्यासाठी दीड हजार लोक उपस्थित होती शिवाजी महाराजांच्या सोहळयासाठी नियमांचे बंधन आणि आपल्या पत्रकारपरिषदेला नियमांचे उल्लंघन असा कायदा एका राज्यात दोन न्याय देणारा असू शकत नाही.

यानंतर श्री. बोर्डे....

श्री.प्रवीण दरेकर....

सभापती महोदया, हे सरकार कशाप्रकारे आकसाने वागते हे साक्रीतील घटनेवरुन दिसून येईल. मी स्वत: साक्रीला गेलो होतो. साक्री येथे एका महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला. आमच्या संवेदना त्या महिलेसोबत आहेत. परंतु त्या महिलेच्या मृत्यूचे भांडवल करुन साक्री नगर पंचायतीमध्ये ४० वर्षांची सत्ता उलथावून भारतीय जनता पक्षाला यश मिळाले म्हणून भाजपाच्या कार्यकर्त्याांना त्या मृत्यूच्या प्रकरणात गोवले गेले. माझा पोलिसांच्या तपासावर आक्षेप नाही. या गुन्ह्याची सखोल चौकशी करण्यास माझी काही हरकत नाही. परंतु अशाप्रकारे सूडभावनेने वागणे योग्य नाही.

सभापती महोदया, छत्रपती शिवाजी महाराजांचे आपण सर्वजण नाव घेतो. परंतु सांगली जिल्ह्यातील जत येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयाच्या बाबतीत राजकारण करण्यात आले. १९६२ साली तत्कालीन संस्थानिक डफडे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा तेथे बसविला होता. १६ वर्षांपूर्वी वाहनाच्या धडकेत त्या पुतळयाला तडा गेल्यामुळे तो पुतळा काढण्यात आला होता. त्या ठिकाणी नवीन पुतळा पुन:स्थापित केला जात होता. सर्व लोकांनी पुतळा समितीच्या अध्यक्ष पदी जगताप नावाच्या व्यक्तीची निवड केली. परंतु यामुळे स्थानिक आमदारांचा इगो दुखावला गेला. त्यांनी उलट विचारणा केली की, छत्रपतींचा पुतळा असला तरी काय झाले ?

श्री.सदाभाऊ खोत : सभापती महोदया, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांचे प्रस्तावावरील भाषण सुरु असताना सभागृहात एकही कॅबिनेट मंत्री उपस्थित नाहीत. तसेच सचिव दर्जाचे अधिकारी सुद्धा गॅलरीमध्ये नाहीत. मला वाटते या सरकारला महाराष्ट्रातील जनतेच्या प्रश्नांच्या बाबतीत अजिबात गांभीर्य दिसत नाही.

श्री.शंभुराज देसाई : सभापती महोदया, आतापर्यंत माननीय कृषी मंत्री सभागृहात उपस्थित होते. ते पाच मिनिटांसाठी सभागृहाच्या बाहेर गेले आहेत. आम्ही दोघेही माननीय विरोधी पक्ष नेत्यांच्या भााषणातील मुद्दे टिपून घेत आहोत.

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदया, आपल्या दोघांच्या प्रामाणिकतेवर माझी शंका नाही. परंतु सरकार म्हणून या गोष्टींकडे जे लक्ष पाहिजे ते दुर्दैवाने दिसत नाही. माननीय सभापती यांनी स्वत: या बाबत भावना व्यक्त केली आणि ती बाब सरकारसाठी लांच्छनास्पद आहे. पण या विषयाचे गांभीर्य सरकारला दिसत नाही.

सभापती महोदया, जत मतदारसंघाचे आमदार श्री.विक्रम सावंत यांना मान दिला नाही म्हणून त्यांनी छत्रपतींचा पुतळा बसविण्याच्या कामामध्ये व्यत्यय आणला. वास्तविक पाहता लोकप्रतिनिधी म्हणून कायदा व सुव्यवस्था सांभाळण्याची त्यांची जबाबदारी होती. परंतु त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना सांगून छत्रपतींच्या पुतळ्यामध्ये व्यत्यय निर्माण केला व या विषयात पक्षीय राजकारण आणले. मला वाटते आपल्या राजकारणातून छत्रपती सुद्धा सुटत नाहीत.

सभापती महोदया, राज्यातील वाढत्या गुन्हेगारीबाबत मी मागील भाषणात सांगितले होते. त्यानंतर दोन वर्षात राज्यातील गुन्हेगारीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. मुंबई, नवी मुंबईतील गुन्हेगारीची आकडेवारी माझ्याकडे आहे. त्यावरुन आपल्या लक्षात येईल की, हे सरकार राज्यामध्ये कायदा व सुव्यवस्था राखण्यात कशाप्रकारे अपयशी ठरले आहे.

सभापती महोदया, २०२० मध्ये आयपीसी अंतर्गत ३,९४,०१७ गुन्हे दाखल झाले होते. या बाबतीत महाराष्ट्र देशात दुसऱ्या क्रमांकावर आहे. राज्याच्या दृष्टीने ही अभिमानाची बाब नाही. मुळात ही आकडेवारी सांगताना आम्हाला आनंद वाटत नसून, उलट शरम वाटत आहे. आम्ही ही आकडेवारी सांगितली तर आपण म्हणता की, अशा प्रकारची आकडेवारी सांगून एकप्रकारे महाराष्ट्राची इभ्रत काढत आहात. आम्ही जर आकडेवारी सांगू नये असे आपल्याला वाटत असेल तर आपण या गुन्ह्यांची संख्या कमी करावी. महिलांच्या विनयभंगाचे ९,९६५ गुन्हे दाखल असून देशात महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर आहे. लैंगिक अत्याचाराची २,८३३ गुन्हे दाखल असून महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर आहे. मानवी तस्करीची १५४ गुन्हे दाखल असून महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आहे. बलात्काराची २,०६१ गुन्हे असून महाराष्ट्र देशात तिसऱ्या क्रमांकावर आहे. सामाजिक शांतता भंग करण्याच्या घटना १०,६९५

श्री.प्रवीण दरेकर....

असून महाराष्ट्र देशात पहिल्या स्थानावर आहे. डकैती, दरोड्याच्या ४७३ घटना घडल्या असून महाराष्ट्र देशात पहिल्या स्थानावर आहे.

सभापती महोदया, देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईतील गुन्हेगारीची आकडेवारी सांगतो. २०१८ मध्ये दाखल झालेले गुन्हे ३३,१८२ होते, २०१९ मध्ये ४१,९५१, २०२० मध्ये ५१,०६८ आणि २०२१ मध्ये ६४,६५६ गुन्हे दाखल आहेत. ही वाढती आकडेवारी काय दर्शविते ? २०२१ मध्ये मुंबईतील दखलपात्र गुन्ह्यांची संख्या २६ टक्क्यांनी वाढली. हत्येच्या गुन्ह्यांची टक्केवारी १४८ वरुन १९२ टक्क्यांवर गेली आहे. महिला व मुलांवरील गुन्ह्यात २१ टक्क्यांनी वाढ झाली आहे. लैंगिक शोषणाच्या गुन्ह्यांमध्ये ५९ टक्क्यांनी वाढ झाली आहे. बलात्काराच्या गुन्ह्यांत १५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. तसेच सायबर गुन्ह्यांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. वर्षभरात २,८०० हून अधिक सायबर गुन्ह्यांची नोंद झाली आहे. तसेच मालमत्ता विषयक गुन्ह्यांमध्ये २० टक्क्यांनी वाढ झाली आहे.

सभापती महोदया, पोलीस आयुक्तांनी गुन्ह्यांत वाढ होण्यामागे कोरोनाचे कारण दिले. परंतु हे कारण न पटणारे आहे. मागील वर्षी टाळेबंदी असल्यामुळे मागील वर्षातील आकडेवारीची या वर्षाच्या आकडेवारीशी तुलना करु नका असे पोलीस आयुक्तांनी सांगितले होते. परंतु एक कारण न पटणारे आहे. २०२० प्रमाणे २०२१ च्या सुरुवातीला मुंबईत निर्बंध होते. २०२० च्या जानेवारी ते एप्रिल या चार महिन्यांची आकडेवारी पाहिली तर २०२१ च्या चार महिन्यात हत्येचा प्रयत्न, जबरी चोरी, बलात्कार, घरफोडी, वाहनचोरी इत्यादी सर्वच गुन्ह्यांत वाढ झालेली आहे. चोरीच्या एकूण गुन्ह्यांपैकी केवळ ४० टक्के गुन्ह्यांचा तपास लावण्यात पोलिसांना यश आले. २०२१ मध्ये ४,५३४ चोरीच्या गुन्ह्यांची नोंद झालेली असताना त्यापैकी केवळ ८७० गुन्ह्यांचा तपास लागला. मोटार वाहन चोरीचा तपास दर ४७ टक्के आहे. याचाच अर्थ ५३ टक्के गुन्ह्यांचा तपासच लागलेला नाही. ३,२८२ वाहने

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर....

चोरीला गेली, परंतु त्यापैकी केवळ १,५९९ वाहने परत मिळविली. ही सर्व आकडेवारी आश्चर्य वाढविणारी आहे.

सभापती महोदया, २०१९ मध्ये २३६ बारवर कारवाई करण्यात आली. २०२० मध्ये ५१ आणि २०२१ मध्ये ७१ बारवर कारवाई करण्यात आली. दरवर्षी कारवाई करण्याचे प्रमाण वाढत आहे. २०१९ मध्ये ५१, २०२० मध्ये ६५ आणि २०२१ मध्ये ११७ पब व हुक्कापार्लरवर कारवाई करण्यात आली. पब, हुक्कापार्लर आणि डान्सबार हे मुंबईतील उपनगरात आजही सर्रास सुरु आहेत. आपल्याला पाहिजे असेल तर मी माहिती देईन. आपण त्या ठिकाणी व्हीजीट द्यावी. आपण ज्यावेळी व्हीजीट देणार असाल त्या दिवशी ते तयारीत असतात. कारण आपलेच पोलीस त्यांना निरोप देतात. त्यामुळे केवळ दाखविण्यासाठी गुन्हे दाखल केले जातात, असे मला वाटते. मला आजही आर.आर.पाटील साहेबांची आठवण येते. चांगल्याला चांगलेच बोलले पाहिजे. राज्यात डान्सबार सुरु असताना त्यांनी डान्सबार बंद करण्याचा धाडसी निर्णय घेतला. डान्सबार बंद करु नयेत म्हणून मोठमोठ्या लोकांनी त्यांना आमिषे, प्रलोभने दिली असणार, परंतु आर.आर.पाटील साहेबांनी विचार केला असावा की, डान्सबारमुळे महिलांची घरेच्या घरे उद्ध्वस्त होत आहेत, तरुण पिढी उद्ध्वस्त होत असल्यामुळे त्यांनी डान्सबार बंद करण्याचा निर्णय केला. माझा सांगण्याचा हेतू असा आहे की, राज्यकर्त्यांचे काम अशा प्रकारचे असावयास पाहिजे. ते कोणत्याही पक्षाचे असले तरी त्यांच्या कामातून दीर्घकाळ त्यांची आठवण समाजाला आणि आपल्याला येत राहीली पाहिजे.

सभापती महोदया, देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत आज महिला सुरक्षित आहेत काय ? गेल्या वर्षी मुंबईत महिला आणि मुलींवर ८८८ बलात्काराच्या आणि २,०७६ छेडछाडीच्या घटना घडल्या. दररोज दोन मुली व महिलांवर बलात्कार आणि ६९ विनयभंगाच्या घटना घडत आहेत. या बाबी मांडण्यास मला शरम वाटते. पोलिसांनी मुक्तपणे कायदा व सुव्यवस्था राखण्याची आवश्यकता आहे.

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर....

त्यांना जोखड बांधून, बेड्या घालून या सर्व प्रकारांवर नियंत्रण आणण्यास सांगितले तर ते नियंत्रण आणू शकत नाहीत. त्यांना बेड्या न घालता खुल्या वातावरणात मुक्तपणे काम करण्याची मोकळीक द्यावी.

सभापती महोदया, मी ऑपरेशन मुस्कानबद्दल मंत्री महोदयांचे आणि मुंबई पोलिसांचे अभिनंदन करतो. आपण या माध्यमातून हरविलेल्या मुलांना शोधण्याच्या बाबतीत अतिशय उत्तम काम करीत आहात. आपण हरविलेल्या मुलांचा शोध घेऊन त्यांच्या पालकांना स्वाधीन करीत आहात. २०१५ ते २०२१ या कालावधीत आपण १५ विशेष मोहिमा राबविल्या. त्यातून आतापर्यंत ३,२८२ मुले, मुली, महिला, पुरुष यांचा शोध घेतला.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत

श्री. प्रवीण दरेकर ....

त्या कुटुंबांच्या आयुष्यात आनंद निर्माण करण्याचा अत्यंत प्रामाणिक प्रयत्न केला त्याबद्दल मी पोलिसांचे अभिनंदन करतो, माननीय गृहमंत्र्यांचे देखील मनापासून अभिनंदन करतो. पोलिसांवर कशाप्रकारे महाविकास आघाडी सरकाचा दबाव आहे हे २-४ उदाहरणावरुन मी सांगतो. मुंबई पोलिसांचा सन २०२१ चा वार्षिक अहवाल पाहिला तर तेथे काही महत्त्वाच्या ५ गोष्टींचा उल्लेख आहे, त्यामध्ये पहिले उत्तरप्रदेशच्या एटीएसने मौलाना कलिम सिद्दीकींना अटक केल्यामुळे आणि सौदी सरकारने मक्का, मदिना शहरात चित्रपट सुरु केल्यामुळे मुंबईत निदर्शने झाली असे आहे. पोलिसांच्या रिपोर्टमध्ये मोर्चा, आंदोलनांचे घटनाक्रम असतात. दुसरे मुस्लिम आरक्षणासाठी रझा अकादमी, एमआयएम व वंचित बहुजन आघाडीने निदर्शने केली असे आहे. तिसरे महम्मद पैगंबर बिल मंजूर करण्याची मागणी केली असे आहे. चौथे केंद्र सरकारने लागू केलेल्या तीन कृषी कायद्यांविरुध्द किसानबाग, किसान अलायन्स मोर्चा व संघटनांनी निदर्शने केली असे आहे. पाचवे महम्मद पैगंबरांबद्दल आक्षेपार्ह लिखाण करणाऱ्याविरोधात कारवाईचा पाठपुरावा करण्यासाठी तेहफूज ए नामुस ए रिसालत बोर्डाची स्थापना करण्यात आली असे आहे. या अहवालात दखल घेतली आहे. त्याच्या खाली कॅप्शनमध्ये कृषी कायद्याविरोधात किसान मोर्च्याचे ४ फोटो छापलेले आहेत.

सभापती महोदया, महाविकास आघाडीने आयोजित केलेला महाराष्ट्र बंद, कृषी कायद्याविरोधात वंचितचा मोर्चा, सीएए, एनआरसी विरोधात मुंबईत धरणा आंदोलन. माझा मुंबई पोलिसांना किंबहुना सरकारला थेट प्रश्न आहेत की, महम्मद पैगंबर बिल मंजूर करण्याची मागणी केली, ही कायदा व सुव्यवस्थेची घटना आहे. हजारो मागण्या रोज सरकारकडे येत असतात. मग त्याचा उल्लेख का केला नाही ? दुसऱ्या प्रकरणात तसेच आहे. बिअर बार, हॉटेल, मॉल सुरु करणाऱ्या सरकारने मंदिरे उघडावीत या मागणीसाठी भाजपने मुंबईत आंदोलन केले. म्हणजे हीच निदर्शने झाली नाहीत. मी यादी देतो. सर्वांना लोकल प्रवासाची मूभा द्यावी यासाठी भाजपने

श्री. प्रवीण दरेकर ....

आंदोलन केले. मजूर, शेतकरी, छोटा विक्रेता, रिक्षाचालक अशा सर्व लहान घटकांना कोरोनाचे पॅकेज द्यावे म्हणून मुंबईत मोठे आंदोलन झाले. वेबसिरिज तांडाविरोधात मोठे आंदोलन झाले. वाढीव वीज बिलाविरोधात निदर्शने झाली. वर्षभरात झालेल्या हजारो निदर्शनांची यादी मी आपल्याला देऊ शकतो. मग काही विशिष्ट आंदोलनांचा उल्लेख सन २०२१ च्या वार्षिक अहवालात करण्यामागचे कारण काय ते समजण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदया, राज्यामध्ये भ्रष्टाचाराने कळस गाठलेला आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिलेल्या भ्रष्टाचाराच्या आकडेवारीनुसार माहिती आहे. मी जे सर्व बोलत आहे ते आरटीआयखाली माझ्या कार्यालयातून अधिकृतपणे माहिती आणूनच बोलत आहे. सन २०२० च्या तुलनेत सन २०२१ मध्ये राज्यातील भ्रष्टाचाराशी संबंधित प्रकरणांमध्ये १६ टक्क्यांहून अधिक वाढ झालेली आहे. सरकारी अधिकाऱ्यांविरुध्द सापळ्याची प्रकरणे वाढलेली आहेत. भ्रष्टाचाराच्या प्रकरणांत महसूल व पोलीस पहिल्या दोन स्थानांवर आहेत. सन २०२० मध्ये नोंदविलेल्या ६६३ प्रकरणांच्या तुलनेत गेल्या वर्षी भ्रष्टाचाराशी संबंधित ७७३ प्रकरणे नोंदविण्यात आली. सन २०२१ मध्ये महसूल भूमी अभिलेख आणि नोंदणी विभागातील अधिकाऱ्यांचा समावेश असलेली १७८ प्रकरणे आहेत. पोलीस विभागातील १७३ प्रकरणे आहेत. लाचखोरीच्या प्रकरणांमध्ये ५०-७० लाख रुपयांची लाच महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांच्या संबंधित घेतली होती, त्यानंतर ५७ लाख रुपयांची लाच पोलीस अधिकाऱ्यांच्या संबंधित होती, ३६ लाख रुपयांची लाच महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांच्या संबंधित होती. माझी आपल्याकडे मागणी आहे. राजकीय व्यक्तींना निवडणुकीच्या तोंडावर मालमत्तांचा तपशील वेबसाईटवर टाकावा लागतो. आयएएस, आयपीएस अधिकाऱ्यांच्या मालमत्तांचा तपशील देखील वेबसाईटवर प्रसिध्द केला जातो. हा महत्त्वाचा विषय आहे. राज्य शासनाच्या अधिकाऱ्यांच्या तपशील मात्र बंद लिफाफ्यात घेता. मात्र तो कुठेही जाहीर केला जात

श्री. प्रवीण दरेकर ....

नाही. भ्रष्टाचार कमी करायचा असेल तर राज्यातील सर्व वर्ग एक आणि त्यावरील सर्व शासकीय अधिकाऱ्यांच्या, त्यांच्या कुटुंबाच्या मालमत्तांचा तपशील वेबसाईटवर टाकण्याचे, प्रकाशित करण्याचे बंधन घालावे आणि उत्तरात ते आपण कराल अशी अपेक्षा करतो.

सभापती महोदया, ड्रग्ज तस्करी वाढली आहे. मागच्या अधिवेशनात मी अंमली पदार्थांच्या तस्करी संदर्भात तपशीलवार बोललो होतो. मी गांभीर्य लक्षात येण्यासाठी मुंबई पोलिसांच्या अहवालातील एक आकडेवारी देतो. अंमली पदार्थांचा राज्याला, आर्थिक राजधानी मुंबईला कसा विळखा पडला आहे हे यातून स्पष्ट होईल. गांजा, हेरॉईन, चरस, कोकेन, एमडी असा जप्त केलेला माल सन २०१९ ला ६९ कोटी रुपयांचा होता. सन २०२० ला २८ कोटी रुपयांचा होता. सन२०२१ ला १५० कोटी रुपयांच्या वर गेला आहे. अंमली पदार्थांचा आकडा वाढतच चालला आहे. ३ वर्षांत दुपटीपेक्षा जास्त वाढ झाली आहे. हा पकडलेला माल आहे. राज्यभर अंमली पदार्थांचे एक मोठे रॅकेट व्यसन लावत आहे. ड्रग्ज तस्करी टोळींमध्ये युध्द सुरु आहेत.

सभापती महोदया, आपण पोलिसांच्या घरांची घोषणा केली आहे. राज्यातील दीड लाख पोलीस घरांपासून वंचित आहेत. मागच्या सरकारच्या काळात आणि या सरकरच्या काळात किती घरांची निर्मिती झाली ते मी सरकारला सांगतो. संपूर्ण राज्यात सन २०१९ पूर्वी सुरु झालेली कामे ५१३६ होती, सन २०१९ नंतर १५५४ होती. सन २०१९ पूर्वी सुरु झालेल्या ४६०० घरांचा ताबा फक्त पोलिसांना देण्यात आला. घोषणा झाल्या. सन २०२१ च्या जून महिन्यात माननीय नगरविकास मंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी घोषणा केली की, पोलिसांना त्यांच्या हक्काची घरे मिळवून देण्यासाठी नगरविकास विभाग विशेष धोरण करेल. मात्र त्याचे काय झाले ? तुम्ही धोरण करण्यासाठी १० महिने घेणार असाल तर पोलिसांना कधी घरे मिळणार आहेत ? माननीय गृहमंत्री श्री. दिलीप वळसे-पाटील यांनी दिनांक २५ जानेवारी,

श्री. प्रवीण दरेकर ....

२०२२ ला घोषणा केली की, राज्यातील पोलिसांसाठी १ लाख निवासस्थाने बांधण्याचे आमचे लक्ष्य आहे. सरकार अस्तित्वात येऊन २ वर्षांचा काळ उलटून गेला आहे. मात्र तरी सरकार फक्त घोषणा करीत आहे.

सभापती महोदया, अजुनही खंडणी वसुली सुरुच आहे. मुंबादेवी परिसरात अंगडीयाचे व्यवसाय आहेत. त्यांना इंकम टॅक्सची भीती दाखवून पोलीस अधिकारी तेथे खंडणी वसुली करीत होते. अंगडीया असोसिएशनने तक्रर केल्यानंतर तुम्हाला कारवाई करणे भाग पडले. पण त्यातील पोलीस निरीक्षक श्री. ओम वंगाटे अजुनही फरार आहे. फरार आहे की तुम्ही फरार दाखविले आहे ? यांना लगाम घालण्याची अत्यंत आवश्यकता आहे. गुन्हेगारांना अभय, राजकीय सुडासाठी पोलिसांचा वापर केला जात आहे. मी मागे ऑनलाईन गेमसंदर्भात सांगितले. परंतु त्यांच्यावर कारवाई झाली नाही. मी त्यावर सविस्तर बोलत नाही. आपण वक्फ बोर्डाच्या मालमत्तांबाबत एसआयटी नेमावी, जेणेकरुन तेथे ज्या वक्फ बोर्डाच्या जागा हडप केल्या आहेत त्यांची सत्य स्थिती समोर येईल.

सभापती महोदया, बदल्यांच्या संदर्भात अत्यंत वाईट पध्दतीने चर्चा होत आहे. आपल्यालाही कल्पना असेल की, मंत्रालयामध्ये काही लोक बदल्यांची यादी फोडली आणि ठरल्याप्रमाणे बदली केली असे दाखविण्यासाठी पैसे घेतलेल्यांची यादी फोडली का असा प्रश्न समोर आला आहे. माननीय गृहमंत्र्यांनी यादी फुटल्याप्रकरणी चौकशीचे आदेश दिले. परंतु चौकशी पूर्ण झाली का, त्यातून काय निष्पन्न केले याची माहिती सभागृहाला मिळण्याची आवश्यकता आहे. मी टीका करीत असताना काही प्रश्न आपल्यासमोर मांडत आहे. कष्ट करणारा पोलीस बांधव आहे. परिसरातील महिला भगिनींच्या व्यथा मी आपल्यासमोर मांडत आहे.

नंतर श्री. खर्चे ....

श्री.प्रवीण दरेकर....

पोलीस भरतीच्या अनेक घोषणा झाल्या आहेत. पोलीस भरती कशामध्ये अडकली आहे, राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये पोलिसांची पदे रिक्त आहेत. ही रिक्त पदे भरण्यासाठी कोणते नियोजन आहे यांचे उत्तर मंत्री महोदयांनी उत्तराच्या भाषणात द्यावे. पोलीस दलात ८७४७ पदे रिक्त आहेत. सर्वात जास्त म्हणजे ७२३४ रिक्त पदे पोलीस कॉन्स्टेबलची आहेत. ही पदे भरली तर सर्व साधारण मुले व मुलींना यातून रोजगार मिळेल. रिक्त पदे कधी भरली जातील याचे उत्तर मिळाले पाहिजे. पोलिसांच्या कामाच्या वेळा कमी करा. नागपूर, औरंगाबाद येथील महिला पोलिसांना ८ तास ड्यूटी देण्याचे आदेश काढले. राज्यातील सर्व महिला व पुरुष यांच्याबाबत हे धोरण स्वीकारले पाहिजे. याबाबत शासनाची नेमकी काय भूमिका आहे. ते कळायला पाहिजे. पोलीस अधिकारी व कर्मचारी १२ ते २४ तास ड्यूटी करतात. त्यांना ओव्हरटाईम देण्याचा निर्णय का घेण्यात येत नाही. राज्यात अनेक सण उत्सवात पोलीस बंदोबस्त करीत असतात. या कामासाठी त्यांना अतिरिक्त भत्ता का देण्यात येत नाही ? १२ तासांपेक्षा जास्त काम केले तर महिन्याला १३०० ते १५०० रुपये देण्यात येतात. म्हणजे एका दिवसाला ३० ते ३५ रुपये देण्यात येतात. आपण कोणत्या जमान्यात आहोत. चहा व नास्ता करायचा असला तरी १०० रुपये लागतात. त्यामुळे ३० ते ३५ रुपयांत काहीही होत नाही त्यामुळे या रकमेत वाढ करावी अशी मी मागणी करतो.

सभापती महोदया, अनुकंपा तत्वावरील नियुक्त्या कधी करण्यात येणार आहेत. पोलीस बंधू व भगिनी कर्तव्यावर असताना मृत्यू पावले आहेत, त्यांचे वारस आज नियुक्तीच्या प्रतिक्षेत आहेत. गृह मंत्री महोदयांना या सामान्य माणसांच्या फाईलला हात लावण्यास कधी वेळ मिळणार ? कामाच्या ताणामुळे पोलीस बंधू भगिनींना ब्लड प्रशेर व मधुमेह या आजारांनी ग्रासले आहे. सेवेत असताना त्यांना पोलीस कुटुंब कल्याण आरोग्य योजनेचा लाभ मिळतो. ते सेवानिवृत्त झाल्यावर त्यांना लाभ मिळत नाही. निवृत्तीच्या वेळी त्यांना मदतीची गरज असते. सेवानिवृत्तीनंतर मोफत उपचार मिळण्यासाठी सरकारने मेडीक्लेम इन्शुरन्सची

श्री.प्रवीण दरेकर....

पोलिसांसाठी सोय करावी अशी माझी मागणी आहे. कायदा व सुव्यवस्थेचा विषय मांडत असताना या सर्व बाबींकडे सरकारने लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदया, आज महाराष्ट्रात एक ज्वलंत विषय निर्माण झालेला आहे. त्यासाठी सन्माननीय सदस्य श्री. सदाभाऊ खोत व सन्माननीय सदस्य श्री. गोपिचंद पडळकर यांनी पहिल्या दिवसापासून अतिशय संवेदनशीलतेने एस.टी.कर्मचाऱ्यांच्या आंदोलनात भाग घेतला होता. विरोधी पक्षाच्या प्रस्तावात परिवहन विभाग एस.टी.कर्मचाऱ्यांना न्याय देण्यासाठी मी जाणीवपूर्वक घेतला आहे. दुर्दैव असे आहे की, परिवहन मंत्री व राज्यमंत्री येथे नाहीत. माजी परिवहन मंत्री सभागृहात आहेत. जो काम करणारा माणूस आहे त्यांना मंत्रीपद नाही. जे सत्तेत आहेत त्यांना या लोकांसाठी वेळ नाही. त्याबाबत मी निषेध व खंत व्यक्त करतो. विरोधी पक्षाचा प्रस्ताव आहे त्यामध्ये एस.टी. कर्मचाऱ्यांचा ज्वलंत विषय त्यात अंतर्भूत आहे. याबाबत त्यांना थोडी जनाची किंवा मनाची असती....

श्री.शंभुराज देसाई : सभापती महोदया, हाच विषय खालच्या सभागृहात सुरु आहे. त्यामुळे परिवहन मंत्री खालच्या सभागृहात आहेत. माननीय विरोधी पक्ष नेते श्री. देवेंद्र फडणवीस खालच्या सभागृहात भाषण करीत आहेत.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदया, आम्हाला मान्य आहे की, परिवहन मंत्री खालच्या सभागृहात आहेत परंतु या खात्याचे राज्यमंत्री तरी सभागृहात उपस्थित असायला पाहिजेत. आम्हाला राज्यमंत्री महोदय येथे उपस्थित असले तरी चालू शकते. ठीक आहे, सरकार म्हणून आम्ही आपल्यासमोर विषय मांडतो. आम्ही समजून घेतो आम्हाला काही नाही, परंतु एस.टी. कर्मचाऱ्यांबाबत सरकार किती संवेदनशील आहे हे राज्यातील जनता पाहते आहे. आम्हाला पर्याय नसल्यामुळे आम्ही समजून घेऊ.

सभापती महोदया, एस.टी. ही ग्रामीण भागाची जीवनवाहिनी आहे. ६० टक्के जनता एस.टी.बस वर अवलंबून आहे. महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातील चांद्या पासून

श्री.प्रवीण दरेकर....

बांद्यापर्यंत व डोंगर वस्त्यांवर सेवा देणारी एस.टी. एकमेवर सरकारी यंत्रणा आहे. गाव तेथे एस.टी. हा विश्वास एस.टी.महामंडळाने निर्माण केला आहे. नैसर्गिक आपत्ती व कोविड काळात समर्पित भावनेने या सर्व कर्मचाऱ्यांनी सेवा बजावली आहे हे आपण पाहिले आहे. जीवाची जोखीम पत्करुन कर्मचाऱ्यांनी पाच लाखापेक्षा जास्त लोकांना परराज्यातील सीमेपर्यंत पोहचविले आहे. मी एका एस.टी.कंडक्टरचा मुलगा आहे. एस.टी. कर्मचाऱ्यांच्या भावना व समस्या मला माहिती आहेत. माझ्याकडे एस.टी.वाहक व चालकांचा वावर होता. मी त्यांना जवळून पाहिले आहे. त्यामुळे या विषयाच्या संवेदना माझ्या अत्यंत तीव्र आहेत. संपातील कर्मचाऱ्यांची काय परिस्थिती आहे. कर्मचाऱ्यांना अत्यल्प पगार आहे तो वेळेवर मिळत नाही. अनेक सुविधांचा अभाव आहे. आतापर्यंत अनेक कर्मचाऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. १०० दिवसांपेक्षा जास्त दिवस संप सुरु आहे. सरकारला आजही तोडगा काढण्यात यश आले नाही. त्यामुळे रोज आत्महत्या होत आहेत. तोडगा काढण्याऐवजी सरकार त्यांच्या जखमेवर मीठ चोळत आहे हे जुलमी सरकार आहे. त्यांना निलंबित करण्यात येते. कामावरुन काढून टाकण्यात येत आहे. नोटीसा पाठवून मेस्मा सारखा कठोर कायदा लावण्याची धमकी प्रसार माध्यमातून परिवहन मंत्री देत आहेत. परिवहन मंत्री हे त्यांचे पालक आहेत, कर्मचारी ही त्यांची बालके आहेत, त्यांना आपुलकीने समजावणे व सेवेत आणणे हे करण्याऐवजी दरडावून सांगत आहेत. यावरुन कारभार करण्याची सरकारची मानसिकता काय आहे ते महाराष्ट्रातील जनतेला कळून येते. त्यामुळे एस.टी.सेवा सुरु होऊ शकली नाही. सरकारने कंत्राटी चालक भरण्याचा निर्णय घेतला. त्यांना प्रतिसाद मिळाला नाही. फक्त ५२ कंत्राटी चालक व १७०० कंत्राटी वाहक मिळाले. कंत्राटी पध्दतीने एस.टी.ची सेवा आपणाला चालविता येणार नाही. हे सरकारने लक्षात घ्यावे. ८२ हजारांपैकी ५४ हजार कर्मचारी आजही संपात आहेत, कामावर आले असे खोटे चित्र दाखविण्याचा प्रयत्न करीत आहेत. १६ हजार बसगाड्या असताना तीन ते साडेतीन हजार बसगाड्या धावत आहेत. त्यामुळे प्रवाशांचे आजही हाल सुरु आहे. सकाळी या विषयाबाबत लक्षवेधी सूचना किंवा तारांकित प्रश्न होता. एस.टी.च्या अहवालाचे काय करणार आहात अशी मी विचारणा

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर....

केली आहे. सभापती महोदय श्री.रामराजे निंबाळकर साहेबांचे मी आभार मानतो. सकाळी त्यांनी सरकारला असे निर्देश दिले की, अहवाल सभागृहासमोर आणा व त्याबाबत लवकरात लवकर बैठक घ्या. एस.टी. कर्मचाऱ्यांच्या संवेदना समजून घेतल्या त्याबाबत मी सभापती महोदयांचे अभिनंदन करतो व कृतज्ञता व्यक्त करतो. सरकारला संवेदना नाहीत. सरकारच्या संवेदना मेलेल्या आहेत. माननीय सभापतींनी संवेदना दाखविल्यामुळे आमच्या मनात कोठे तरी आशा शिल्लक आहे. समितीने जो अहवाल दिला तो संदिग्ध स्वरुपाचा व कोणतीही ठोस उपाययोजना न सूचविणारा आहे असे आम्हाला समजते. या सभागृहाच्या पटलावर अहवाल सादर केल्यावर ते स्वीकारावयाचा किंवर फेटाळावयाचा अधिकार सभागृहाचा आहे. हा अहवाल पटलावर ठेवण्यात येईल तेव्हा त्याची चिरफाड करण्याचे काम आम्ही केल्याशिवाय राहणार नाही. मंत्री महोदयांवर पत्रा चाळीसंदर्भात कमिशन ऑफ इन्क्वायरी ॲक्ट नुसार चौकशी झाली. या आयोगाने मंत्री महोदयांना दोषी ठरविले. कमिशन ऑफ इन्क्वायरी ॲक्ट चा अहवाल मंत्री महोदयांना वाचविण्यासाठी सभागृहाने फेटाळल्याचे उदाहरण आहे. भ्रष्टाचारांना वाचविण्यासाठी सरकार अहवाल फेटाळू शकते. तर मग कर्मचाऱ्यांच्या भविष्यासाठी राज्य सरकारला अहवाल फेटाळावा लागला तर तो सभागृहात फेटाळू.

या नंतर श्री.बोरले....

श्री.प्रवीण दरेकर..........

विलिनीकरण अवघड असेल तर विलिनीकरण सदृश फायदे द्यावेत, सवलती द्याव्यात. विलिनीकरणामळे जे लाभ मिळतात ते देण्यासाठी कोणता तरी मार्ग काढण्यात यावा. आज प्रवाशांचे हाल होत आहेत. कर्मचारी आत्महत्या करीत आहेत. सरकार ताठर भूमिका घेत आहे. मग कसा काय मार्ग निघू शकतो ? आपल्याला यातून सुवर्णमध्य काढण्याची आवश्यकता आहेत.

सभापती महोदय, एसटी महामंडळाची आर्थिक स्थिती का ढासळली ? नियोजनाचा अभाव असल्यामुळे एसटी महामंडळासमोर आर्थिक अडचण निर्माण होते आणि त्याचा परिणाम कर्मचाऱ्यांवर सुद्धा होतो. महामंडळाच्या भ्रष्ट कारभारामुळे मोठ्या प्रमाणावर संचित तोटा वाढलेला आहे. खाजगी बस वाहतुकीमुळे एसटी बस वाहतुकीवर मर्यादा आलेल्या आहेत. टायर, मोल्डिंग, सुटे पार्ट खरेदी इत्यादींमध्ये मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झालेला आहे. तत्कालीन सरकारच्या काळात माननीय श्री.दिवाकर रावते साहेब परिवहन मंत्री होते. मी आपल्याला धन्यवाद देतो. आपल्या कार्यकाळात मालमत्ता विकास धोरण तयार करण्यात आले. परंतु त्याची योग्य पद्धतीने अंमलबाजवणी झाली नाही. नवीन बस गाड्यांची खरेदी करण्यात आली नाही. मी टीका करतो, परंतु पर्याय सुद्धा सूचवितो. मी या निमित्ताने काही पर्याय सूचवित आहे. एसटी महामंडळाला दररोज १२ लाख लिटर इंधनाची आवश्यकता आहे. मी सन २०२० मधील आकडेवारी देत आहे. एसटी महामंडळाचा एकूण खर्च ८८४० कोटी रुपये असून त्यापैकी ३० टक्के म्हणजे २६५२ कोटी रुपये इंधनावर खर्च होतात. राज्य शासनाकडून डिझेलवर २१ टक्के व्हॅट आकारण्यात येतो. व्हॅट केंद्र शासनाच्या अखत्यारीत नाही. हा राज्य शासनाच्या अखत्यारीतील विषय आहे. एसटी महामंडळाला व्हॅटच्या माध्यमातून ८६५ कोटी ९२ लाख रुपये द्यावे लागतात. शासनाने महामंडळाला व्हॅटमधून सूट द्यावी. जेणे करुन महामंडळावरील आर्थिक भार कमी होईल. आपण बेकायदा बांधकामांवर लावण्यात आलेला कोट्यवधी रुपयांचा दंड स्वत:च्या पक्षाच्या आमदारांसाठी माफ

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर..........

करु शकता ? मग एसटी कर्मचाऱ्यांच्या भल्यासाठी व्हॅट माफ करावा. राज्य शासनाकडून डिझेलवर प्रती लिटर ३ रुपये सेस आकारला जातो. महामंडळाला सेसच्या माध्यमातून १३१ कोटी रुपये भरावे लागतात. शासनाला सेस पूर्णपणे माफ करणे शक्य आहे. संपूर्ण भारतात हा खूप गंभीर विषय आहे. ६ टक्के प्रवासी कर आकारण्यात येतो. परंतु महाराष्ट्र राज्यात १७.५० टक्के प्रवासी कर आकारला जातो. एसटी महामंडळाच्या एकूण खर्चात कराचा बोजा ११.७ टक्के आहे. महामंडळाला १३४ कोटी रुपये कर भरावा लागतो. महामंडळासाठी प्रवासी कराचा दर ६ टक्के केल्यास महामंडळाची ५०० कोटी रुपयांची बचत होईल. व्हॅट, सेस, कर अशा बचतीच्या योजना मी सांगितलेल्या आहे. एसटी महामंडळ सामाजिक बांधिलकीच्या हेतूने सेवा देत असल्यामुळे एसटी बसेससाठी टोल माफी द्यावी. महामंडळाची टोल माफीच्या माध्यमातून २०० कोटी रुपये बचत होईल.

सभापती महोदय, भारनियमनाचे प्रमाण व्यस्त असलेल्या मार्गांवर फेऱ्यांची संख्या मर्यादित करण्याचे अधिकार आगार व्यवस्थापकांना देण्यात यावेत. जेणे करुन त्या मार्गावरुन होणारे नुकसान कमी करता येईल. प्रवासी भाड्यात वाढ वा कपात करण्याच्या प्रस्तावावर निर्णय घेण्यात यावा. तत्कालीन सरकारच्या काळात सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे ऊर्जा मंत्री होते. ऊर्जा विभागाकडे विद्युत नियामक प्राधिकरण आहे. त्याप्रमाणे परिवहन नियामक मंडळ स्थापन करता येईल काय यासाठी प्रयत्न करण्यात यावा. सन १९९६ मध्ये उच्च न्यायालयाने दिलेल्या खाजगी वाहतुकदारांचे बस थांबे, कार्यालये महामंडळाच्या आवारापासून २०० मीटरच्या पलीकडे असावीत या आदेशाचे तंतोतंत पालन करण्यासाठी शासनाने विशेष यंत्रणा निर्माण करावी. मालमत्तांचा विकास करुन त्यातून भाडे मिळवावे. जेणे करुन उत्पन्नाचे नवीन स्त्रोत निर्माण होतील. विजेवर चालणाऱ्या नवीन बसेसची खरेदी करण्यात यावी. प्रवाशांना आकर्षित करावे. आपण प्रमुख खरेदी व इतर गोष्टींमध्ये होणारा भ्रष्टाचार थांबवू शकता.

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर..........

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्याने दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम आणि किमान मूलभूत सुविधांची तरतूद हे सूत्र स्वीकारले आहे. सन २०११-१२ मधील आकडेवारीनुसार राज्यात दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्या १७.३५ टक्के होती. आता त्यामध्ये किमान १० टक्क्यांची वाढ झाली असावी. म्हणजे ३० टक्के लोकसंख्या दारिद्र्य रेषेखाली आहे. दारिद्र्य रेषेखालील लोक ग्रामीण, दुर्गम व डोंगराळ भागात राहतात. आपण जोपर्यंत त्यांना दारिद्र्य रेषेच्या बाहेर आणत नाही तोपर्यंत एसटी सेवेची आवश्यकता आहे. म्हणजे ३० टक्के लोकसंख्या एसटीवर अवलंबून आहे. त्यामुळे शासनाने पालकत्वाच्या भूमिकेतून ही जबाबदारी स्वीकारली पाहिजे. खाजगी बस कंपन्या सेवा देत नाहीत. त्यामुळे एसटी हा एकमेव पर्याय आहे. कोरोना महामारीच्या काळात रेल्वे सेवा बंद असताना सरकार हक्काने एसटी महामंडळाची सेवा घेते. एसटी बसेसवर केवळ शिवशाही लिहून किंवा बसेसला भगवा रंग देऊन शिवशाही अवतरणार नाही तर शिवशाहीमध्ये रयतेचे संरक्षण केले पाहिजे. एसटी कर्मचारी व जनता राज्यातील रयत आहे. शासनाने त्यांची जबाबदारी घेतली पाहिजे. आपण समितीचा अहवाल फेटाळून न्यायालयाला सांगावे की, आम्ही सरकार म्हणून जबाबदारी स्वीकारत आहोत आणि अपवादात्मक स्थिती म्हणून विलिनीकरण सदृश शंभर टक्के लाभ द्यावेत तरच तुम्हाला एसटी बसेसवर शिवशाही लिहिण्याचा नैतिक अधिकार आहे.

सभापती महोदय, एसटी महामंडळातील जवळपास ९० कर्मचाऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. ब्रम्हपुरी येथे श्री. सत्यजीत ठाकूर नावाच्या कर्मचाऱ्याने आत्हत्या केली. त्यांच्या घरातील विजेचे कनेक्शन तोडण्यात आले. किराना दुकानदार व इतर लोक पैशांचा तगादा लावत होते. त्यांनी दोन मुल, एक मुलगी, पत्नी व वृद्ध आई-वडील यांची विवंचना समोर ठेऊन आत्महत्या केली. कोल्हापूर येथील श्री.तानाजी मल्हारी वायदंडे यांच्या हाती कारणे दाखवा नोटीस मिळाली. त्यामुळे त्यांनी आत्महत्या करण्याचा मार्ग स्वीकारला. उस्मानाबाद येथील श्री.हनुमंत

श्री.प्रवीण दरेकर..........

आकोसकर यांना आर्थिक अडचणीमुळे मृत्यूला कवटाळणे योग्य वाटले. सांगवी येथील श्री.जय बजरंग सरवदे यांना पत्नी व तीन मुलांचा उदरनिर्वाह कसा भागवावा या विवंचनेन आत्महत्येचा मार्ग स्वीकारणे सोपे वाटले. बुलडाणा येथील श्री.विशाल अंबलकर यांना माझे निलंबन होईल या भीतीमुळे हृदय विकाराचा झटका येऊन त्यांचा मृत्यू झाला. सोलापूर येथील श्री.तुकाराम माळी या कर्मचाऱ्याच्या मुलाने आर्थिक विवंचनेतून आत्महत्या केली. आणखी किती बळी जाणार आहेत ? रोज एक-दोन एसटी कर्मचारी आत्महत्या करीत आहेत. एसटी कर्मचारी रोज शासनाकडे आशेने बघत आहेत. आम्हाला सकाळी किंवा रात्री फोन येतो की, तुम्ही एसटी महामंडळातील कर्मचाऱ्यांचे प्रश्न मांडावेत. माझे एसटी बरोबर वेगळे नाते असल्यामुळे मला एसटी कर्मचाऱ्यांचे फोन येतात. एसटी कर्मचाऱ्यांच्या व्यथा ऐकून मी अस्वस्थ होतो. मी विरोधी पक्षनेता म्हणून सांगत नाही तर माझ्या भावना अनावर होतात. मला सकाळी एका कर्मचाऱ्याने फोन करुन सांगितले की, मी विष प्राषण करुन आत्महत्या करणार आहे. आपण शासनाला काही तरी मार्ग काढण्यास सांगावे. ठीक आहे, विलिनीकरण नाही, आपण मध्यम मार्ग काढला. परंतु एसटी कर्मचाऱ्यांचे मृत्यू होणार नाहीत याची काळजी घ्यावी. आपली मुले, मुलगी, नातेवाईक याच मातीतील हाडामांसाची लोक आहेत. मग अशा वेळी छत्रपतींचे नाव सांगणाऱ्यांच्या संवेदना गोठल्या असतील तर आपल्याला छत्रपतींचे नाव घेण्याचा कोणता अधिकार आहे, असा प्रश्न माझ्या समोर निर्माण झालेला आहे.

सभापती महोदय, विविध विभागांच्या परीक्षेत घोटाळे झालेले आहेत. तरुण देशाचे भविष्य आहे. आज तरुणांसमोर रोजगाराचा प्रश्न आहे. आपण जी परीक्षा भ्रष्टाचाराच्या आरोपात बरबटली नाही अशा एका तरी परीक्षेचे नाव सांगावे. विरोधी पक्षनेता म्हणून मला अनेक लोक भेटतात. ग्रामीण भागातील तरुण भेटल्यानंतर अनेक गोष्टी प्रकर्षाने समोर येतात.

यानंतर श्री.सांगळे......

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर.....

सरकारच्या भ्रष्टाचारामुळे तरुणाई कशा प्रकारे तरुणाई व्यथित झाली आहे हे मी अतिशय जवळून पाहिले आहे. सभापती महोदया, न्यास कम्युनिकेशन ही संस्था अपात्र असताना सदर संस्थेला आरोग्य विभागाची भरती करण्यासाठी पात्र का केले ? आम्ही हा प्रश्न अनेक दिवसांपासून शासनाला विचारत आहोत. परंतु आम्हाला त्याबाबत कोणतेही उत्तर देण्यात आले नाही. आम्ही सरकार असल्यामुळे आमचे कोणी काही करणार नाही अशी शासनाकडून भूमिका घेतली जाते. न्यास कम्युनिकेशन संस्थेमार्फत करण्यात आलेल्या आरोग्य विभागाच्या भरतीमध्ये कशाप्रकारे अनागोंदी झाली हे सर्वांनी पाहिले आहे. त्या संदर्भात कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. तसेच या बाबतीत संबंधितांवर कारवाई का करण्यात आली नाही ? आम्हाला त्याचे कोणतेही कारण समजले नाही. मी याबाबत तपशीलवार बोलणार नाही. आरोग्य विभागातील "क" वर्गाच्या भरतीकरिता १५ लाख रुपये तर "ड" वर्गाच्या भरतीसाठी ८ लाख रुपयांचे रेट कार्ड होते. सदर रक्कम कोणाच्या खात्यामध्ये गेली याचा काही तपास लागला आहे का ? आपल्याकडे पोलीस खाते असल्यामुळे शासनाने याबाबत सोक्षमोक्ष लावला पाहिजे. सभापती महोदया, म्हातारी मेल्याचे दु:ख नाही, काळ सोकावता कामा नये. आपण एका भरतीमध्ये त्यांना डांबले असते तर दुसऱ्या वेळी अशा प्रकारे काम करण्यास कोणी धजावले नसते. जीए सॉफ्टवेअरमधील प्रितेश देखमुख यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली ? म्हाडा भरतीमधील झालेल्या घोटाळयांमधील दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली ? पोलीस भरती घोटाळयामधील तपास कोणत्या स्टेजपर्यंत आला आहे ? आम्ही या सर्व प्रश्नांची उत्तरे कधी पासून शोधत आहोत. परंतु सरकार या सर्व प्रकरणांमध्ये वेळकाढूपणाचे धोरण स्वीकारत आहे. सभापती महोदया, या सर्व घोटाळयांचे धागेदारे मंत्रालयापर्यंत असल्याचा संशय आहे. म्हणून त्यांना संरक्षण देण्याचे काम केले जात आहे. या सर्व परिस्थितीमध्ये तरुणाई उद्ध्वस्त झाली आहे. आई वडिलांचे पांग भेडण्यासाठी सर्वसामान्य व शेतकऱ्यांची मुले शहरामध्ये येऊन अभ्यास करीत असतात. परंतु परीक्षेला जाते वेळी शासनाकडून वेगळाच फतवा काढला जातो. परिणामी शासनाच्या एका आदेशामुळे त्यांच्या आयुष्याचे स्वप्न

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर.....

चक्काचूर होते. त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. आज शेतकरी, एसटी कर्मचारी तसेच विद्यार्थी आत्महत्या करीत आहेत. शासनाला आणखी किती आत्महत्या हव्या आहेत ?

सभापती महोदया, मी प्रस्तावामधील शेवटच्या विषयावर बोलणार आहे. शासनाने आरक्षणासंबंधी घेतलेल्या भूमिका आपण सर्वांनी पाहिल्या आहेत. तत्कालीन मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांनी कायद्याच्या चौकटीत राहून सर्व प्रक्रिया पूर्ण करुन राज्याला मराठा आरक्षण दिले. तसेच आपण दिलेले मराठा आरक्षण सर्वोच्च न्यायालयात फेटाळले जाणार नाही याबाबत त्यांनी जातीने दक्षता घेतली. दिनांक ५ मे, २०२१ रोजी सर्वोच्च न्यायालयाने मराठा आरक्षणाला स्थगिती दिली. जवळपास एक वर्ष उलटून गेले तरी शासनाने यासंबंधी कोणतीही कार्यवाही केली नाही. शासन आरक्षण टिकवू शकले नाही व त्या संदर्भात आपली बाजू न्यायालयात मांडू शकले नाही. तसेच त्यांनी कोर्टात कागदपत्रे दिली नाहीत. शासनाने भोसले समितीच्या अहवालावर कोणतीही कार्यवाही केली नाही. न्यायमुर्ती श्री.दिलीप भोसले यांच्या समितीचा अहवाल शासनाकडे सादर करण्यात आला. त्यात समितीने असे सुचविले होते की, आयोगाच्या अहवालातील त्रुटी दूर करुन पुन्हा मागासवर्ग आयोग स्थापन करावा. परंतु शासनाने या संदर्भात कोणतीही कार्यवाही केली नाही. न्यायमुर्तींचा अहवाल शोकेसमध्ये ठेवण्यासाठी आहे का ? माननीय मुख्यमंत्री यांनी दिनांक २६ फेब्रुवारी, २०२२ रोजी बैठक घेतली व मागासवर्ग आयोग नेमण्याची घोषणा केली. सभापती महोदया, मराठा आरक्षण रद्द होऊन १० महिने उलटून गेले आहेत. सदर कालावधीमध्ये सकल मराठा मोर्चाचे प्रतिनिधी, विरोधी पक्षाचे प्रतिनिधी तसेच ज्येष्ठ वकील असो, सर्वांनी मागासवर्ग आयोग नेमण्यासंबंधी शासनाकडे आग्रह केला होता. परंतु शासनाने आरक्षणाचे राजकारण केले. शासनाने १० महिन्यांपूर्वी मागासवर्ग आयोग नेमण्याचा निर्णय घेतला असता तर आतापर्यंत आयोगाचा अहवाल प्राप्त होऊ शकला असता व त्यानंतर आपल्याला सर्वोच्च न्यायालयासमोर जाता आले असते. परंतु राज्य

असुधारित प्रत

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर.....

शासनाने हेतुपुरस्सर आरक्षणाचे राजकारण केले व कोणताही संबंध नसताना केंद्र शासनाला यामध्ये गोवण्यात आले. तसेच या बाबतीत माननीय राज्यपालांची भेट घेण्याचे नाटक करण्यात आले. शासनाला उशीरा मागासवर्ग आयोग नेमण्याचे शहाणपण सुचले. या संदर्भात उपोषण व मोर्चे काढल्यानंतर शासन त्यावर मलमपट्टी करण्याचे काम करीत आहे. निरगुडे आयोगाकडे ओबीसी आरक्षणाचे प्रकरण आहे. अशा प्रकारे शासनाला दोन आयोग नेमता येतात का ? अशा प्रकारची वेगळी चर्चा सुरु झाली आहे. शासनाने ओबीसी आयोगाची घोषणा केल्यानंतर त्यासाठी कर्मचारी व निधी देण्यासाठी शासनाला एक वर्ष लागले. तशा प्रकारे सदर मागासवर्ग आयोगाची गत करु नये. सभापती महोदया, आम्हाला देखील आरक्षण समजते. ही बाब न्यायप्रविष्ट आहे. परंतु तोपर्यंत आपल्याला सवलती मिळत होत्या. शासनाने अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ सक्षम केले आहे का ? सदर महामंडळाचा कारभार पूर्णपणे ठप्प झाला आहे. महामंडळाला कर्जाचे व्याज देण्यासाठी देखील शासनाकडून निधी दिला जात नाही. शासनाकडून दारु उद्योगाला सवलती दिल्या जातात. परंतु महामंडळाला ५०० कोटी रुपयांचा निधी देण्याकरिता शासनाचा हात आखडतो. आपल्या पक्षाचे झेंडे उचलण्यासाठी तसेच आपल्यासाठी घोषणा देण्यासाठी मराठा समाजाची लोक पाहिजेत. परंतु गरीब समाजाच्या मुलांसाठी महामंडळाला ५०० कोटी रुपयांचा निधी देण्याचे औदार्य शासनामध्ये नाही. त्यामुळे मराठा समाजासंबंधी शासनाला पुतना मावशीचे प्रेम असल्याचे दिसून येत आहे. १० लाख रुपयांची कर्ज मर्यादा २५ लाख रुपयांपर्यंत वाढविली जाईल असे शासनाने आश्वासन दिले होते. परंतु शासनाने सदर आश्वासनाचे पालन केले नाही. शासनाने महामंडळाला ४०० कोटी रुपयांचे भाग भांडवल जाहीर केले. परंतु शासनाने महामंडळाला ५० कोटी रुपयांपेक्षा जास्त भाग भांडवल दिले नाही. तसेच २ वर्षांच्या काळात तुम्ही महामंडळाकरिता सदस्य, सदस्य सचिव देऊ शकला नाहीत. अशा प्रकारे महामंडळ लंगडे करण्याचा तुमचा डाव मराठा समाजाने ओळखला आहे. माननीय मुख्यमंत्री यांनी दिनांक २६ फेब्रुवारी, २०२२ रोजी बैठक घेऊन यासंबंधी आढावा घेतला. तसेच यासंबंधी शासनाने घेतलेल्या निर्णयाची

श्री.प्रवीण दरेकर.....

अंमलबजावणी करण्यासाठी सह सचिवांची नेमणूक केली जाणार आहे. तत्कालीन मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांनी घेतलेल्या निर्णयांची शासनाने २ वर्षांमध्ये व्यवस्थितपणे अंमलबजावणी केली असती तर मराठा समाजाचा रोष कमी झाला असता. परंतु २ वर्षानंतर शासनाला यासंबंधी जाग आली. त्यामुळे २ वर्षे सरकार झोपले होते का ? मराठा आरक्षणाला स्थगिती मिळण्यापूर्वी मराठा समाजातील ज्या उमेदवारांची निवड झाली होती त्यांना नियुक्ती देण्यात आल्या नाहीत. त्यांनी कोणते पाप केले, त्यांची काय चूक होती ? न्यायालयाने देखील याबाबत आडकाठी केली नसताना त्यांना नियुक्ती का दिल्या जात नाहीत ? असा आपल्या माध्यमातून शासनाला माझा प्रश्न आहे. शासनाकडून मराठा समाजातील उमेदवारांना नियुक्ती देण्याऐवजी समाज-समाजामध्ये भांडण लावण्याचे काम केले जात आहे. आता ईडब्ल्यूएसचा पर्याय देण्यात आला. परंतु अनेकांनी सांगितले की, या माध्यमातून दिलेल्या नियुक्त्या कोर्टात अडकतील. ही बाब शक्य होणार नाही. मी देखील यापूर्वीच्या दोन्ही अधिवेशनामध्ये ईएसबीसी, एसईबीसी व ईडब्ल्यूएससंबंधी वाद निर्माण होतील. ही बाब मी शासनाच्या निदर्शनास आणून दिली होती. परंतु शासन यातून मार्ग काढण्यास तयार नाही. शासनाला माहीत आहे की, अशा प्रकारे वाद होत राहिले तर आपले आसन स्थीर राहील.

सभापती महोदया, सध्या सारथीची काय अवस्था आहे ? सत्तेवर आल्यानंतर सारथीची चौकशी सुरु करुन त्यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्यात आले. ही गोष्ट मराठा समाज कधीही विसरणार नाही. आपण सारथी संस्थेची स्वायत्तता घालविण्याचे काम करीत आहात. सारथीला निधी दिला जात नाही. सारथीला निधी मिळू नये, मराठा समाजाच्या मुलांसाठी कोणताही चांगला उपक्रम सुरु होऊ नये यासाठी सारथीच्या विकासाचा आराखडा तयार करण्याची नवीन टूम काढण्यात आली आहे. जेणेकरुन आराखडा तयार करण्यामध्ये २ ते ५ वर्षे काढायची व पुढचे पुढे बघू. अशा प्रकारे शासनाने अतिशय उत्तम निती स्वीकारली आहे. सारथी संस्थेचे महसुली विभागनिहाय कार्यालये स्थापन करण्याची शासनाकडून घोषणा करण्यात

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर.....

आली. या संदर्भात सारथी संस्थेची विभागनिहाय किती कार्यालये सुरु झाली ? याबाबत मंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तरामध्ये सदनाला माहिती दिली पाहिजे. कोल्हापूर येथे सारथीचे उपकेंद्र सुरु केले. परंतु शासनाने त्याकरिता कर्मचारी व जागा उपलब्ध करुन दिली नाही. सभापती महोदया, कोटयवधी रुपयांचा दंड माफ करण्यासंबंधीचा विषय थेट मंत्रिमंडळासमोर आणला जातो व दंड माफ केला जातो. याउलट शासनाकडून सारथीकरिता निधी दिला जात नाही. सारथीच्या विभागीय केंद्रासाठी भूखंडाचे प्रस्ताव थंड बासनात पडून आहेत. या संदर्भात महसूल मंत्री तसेच उप समितीचे अध्यक्ष माननीय मंत्री श्री.अशोक चव्हाण यांच्याकडे वेळ नाही. तसेच माननीय मुख्यमंत्री यांच्या प्रकृतीमुळे मी काही बोलू शकत नाही. थोडक्यात सरकार नावाची संस्था आज बंद पडल्याचे चित्र दिसून येत आहे. सारथी संस्थेमधील रिक्त पदे भरण्यासाठी २ वर्षांपासून पाठपुरावा सुरु आहे. त्यानंतर २७३ रिक्त पदे भरण्यासंबंधी एक महिन्यात भरती प्रक्रिया केली जाईल अशी शासनाने घोषणा केली. परंतु शासनाकडून त्यासंबंधी अंमलबजावणी केली जाईल यावर कोणाचाही विश्वास नाही.

सभापती महोदया, राज्यातील वसतिगृहांची देखील हीच अवस्था आहे. प्रत्येक जिल्हयांमध्ये वसतिगृहे सुरु होणार होती. त्याकरिता शासनाकडे जागेचे प्रस्ताव पाठविण्यात आले होते. परंतु त्याकरिता शासनाकडे वेळ उपलब्ध नाही.

यानंतर श्री.गागरे.....

श्री.प्रवीण दरेकर....

मंत्री महोदयांनी २३ वसतिगृहांची यादी जाहीर देखील केली. तसेच दिनांक १५ ऑगस्ट रोजी १४ वसतिगृहांचे उदघाटन करणार असल्याची घोषणा केली होती. ठाणे येथील वसतिगृहाचे त्यांनी उदघाटन केले. त्यानंतर उर्वरित १३ वसतिगृहांचे घोडे कुठे पेंड खात बसले ? वसतिगृहांचे प्रस्ताव मंत्रालयात प्रलंबित का आहेत ? उत्तर प्रदेशमध्ये घडलेल्या घटनेकरिता बंद पाळण्यासाठी आपल्याकडे वेळ आहे. दहशतवादी कारवायांमध्ये संबंध असणाऱ्याच्या विरोधात आंदोलन करण्यासाठी मंत्रिमंडळाला वेळ आहे. परंतु मराठा समाजाच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यासाठी शासनाकडे वेळ नाही. आत्महत्याग्रस्त मराठा तरुणांच्या वारसाला नोकरी देणे, तसेच तुम्ही मराठा समाजाला आरक्षण देऊ शकला नाही, ते टिकवू शकला नाही. परिणामी मराठा समाजातील मुलांना आत्महत्या करावी लागली. शासनाने त्यांच्या वारसांना नोकरी देण्याची घोषणा केली. परंतु आजपर्यंत शासनाने त्या संदर्भात किती वारसांना नोकऱ्या दिल्या आहेत ? मराठा समाजाला काही देण्यासाठी आपला हात का आखडतो ? मराठा समाजातील आंदोलनात शहीद झालेल्या लोकांच्या वारसांना नोकऱ्या देण्यात आल्या नाहीत. मराठा आंदोलनाच्या आंदोलनात मृत्युमुखी पडलेल्या १८ नागरिकांच्या वारसांना शासकीय सेवेत घेण्याची मागणी करण्यात आली होती. त्या संदर्भात त्यांच्यासमोर एसटी महामंडळामध्ये नोकरी देण्याचा प्रस्ताव ठेवला होता. त्यामुळे त्यांना कधी पर्यंत नोकरीमध्ये घेणार आहात ? अशा प्रकारे महामंडळाकडे निधी नसताना त्यांच्याकडे नोकरीवर ठेवण्याचा प्रस्ताव दिला जात आहे. सभापती महोदया, माझ्या शासनाकडे अशा मागण्या आहेत की, शासनाने मागासवर्ग आयोग नेमण्याची घोषणा केली असल्यामुळे शासनाने त्यासंबंधी तातडीने शासन निर्णय काढावा. त्याकरिता शासनाने निधी, कर्मचारी व कार्यालय उपलब्ध करुन द्यावे. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळावर तातडीने संचालक व सदस्यांची नेमणूक करावी. शासनाने सदरहू महामंडळाकरिता ४०० कोटी रुपयांचे भाग भांडवल देण्याची घोषणा केली होती. ती किमान ८०० कोटी रुपयांपर्यंत वाढविण्याचे शासनाने सौजन्य दाखवावे. शासनाने महामंडळाला एक महिन्याच्या आत भाग भांडवलाची रक्कम वितरित करावी. शासनाने महामंडळाकरिता २५ लाख

श्री.प्रवीण दरेकर....

रुपयांची कर्ज मर्यादा जाहीर केली होती. त्यात चांगले व्यवसाय होऊ शकतील. त्यामुळे त्याबाबत २५ लाख रुपये करावेत. कायदा रद्द होण्यापूर्वी नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांना एक महिन्याच्या आत नियुक्ती द्यावी. सारथी विकास आरखडयाचे काम एक महिन्यामध्ये पूर्ण करुन सारथी संस्थेला शासनाने भरीव निधी द्यावा. सारथीची विभागवार कार्यालये एक महिन्यामध्ये स्थापन करुन त्यांच्या कार्यालयाकरिता जागा, कर्मचारी व निधी उपलब्ध करुन द्यावा. तसेच शासनाने घोषित केल्याप्रमाणे दोन महिन्यांच्या आत २३ वसतिगृहे सुरु करावीत.

सभापती महोदया, महाविकास आघाडीला मराठा समाजाबाबत काही देणेघेणे नाही. शासनाकडून यासंबंधी फक्त भूलथापा दिल्या जात आहेत. तसेच मोठमोठया आरक्षणाची व सवलतीची गाजरे दिली जात आहेत. सभापती महोदया, या सदनामध्ये मुस्लीम आरक्षणासंबंधी मंत्री महोदयांनी घोषणा केली होती. त्यावर राज्य सरकारकडून कोणतेही उत्तर देण्यात आलेले नाही. सदनाच्या माध्यमातून आम्हाला याबाबतची माहिती मिळाली पाहिजे. मुस्लीम समाजामध्ये आरक्षणासंबंधी संभ्रम निर्माण झाला आहे. सदनामध्ये मुस्लीम आरक्षण जाहीर केले असल्यामुळे त्याबाबतची भूमिका शासनाने जाहीर करावी. ओबीसी आरक्षणाची तशाच प्रकारे हत्या करण्यात आली. याबाबत सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे तपशीलवार बोलतील. धनगर आरक्षणाबाबत शासन एक शब्दही उच्चारण्यास तयार नाही. तत्कालीन मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या शासनाने धनगर समाजाचा अभ्यास करण्यासाठी टीस संस्थेला काम दिले होते. सदर संस्थेने याबाबत अभ्यास करुन शासनाकडे अहवाल सादर केला होता. परंतु त्या अहवालाकडे बघण्यास शासनाकडे वेळ नाही. धनगर समाजाचे आरक्षण मिळेपर्यंत तत्कालीन मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या शासनाने त्यांच्याकरिता काही योजना सुरु केल्या होत्या. तसेच त्याकरिता तत्कालीन शासनाने एक हजार कोटी रुपयांची तरतूद देखील केली होती. परंतु सरकारने त्यांच्याकरिता सदर निधी दिला नाही व त्यांच्याकरिता दिलेल्या सर्व योजना बासनात गुंडाळल्या. आजच्या चर्चेच्या

श्री.प्रवीण दरेकर....

माध्यमातून धनगर आरक्षणासंबंधी शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली व यापुढे काय करणार आहे ? याबाबत महाराष्ट्रातील गरीब, उपेक्षित आदिवासी धनगर समाजाचे अधिवेशनाकडे लक्ष लागलेले आहे. तत्कालीन मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या काळात धनगर समाजासाठी ज्या योजना सुरु केल्या होत्या त्यापैकी महाविकास आघाडीच्या शासनाने किती योजना सुरु केल्या व किती योजनांवर खर्च केल्या ? याबाबत महाराष्ट्रातील समाज बांधवांना उत्तर मिळाले पाहिजे. धनगर आरक्षण हा तुमचा प्राधान्याचा विषय नसल्याने तुम्ही तसे ठामपणे सांगावे. आम्ही आपल्याकडून त्याबाबत कोणतीही अपेक्षा करणार नाही. धनगर समाजाला आपले आरक्षण कसे मिळवायचे याकरिता धनगर समाज भक्कम आहे. परंतु याबाबत शासनाने आपली भूमिका स्पष्ट करणे अत्यावश्यक आहे. सभापती महोदया, या प्रस्तावाच्या माध्यमातून शासनाने राज्यातील कायदा व सुव्यवस्थेकडे लक्ष द्यावे. एसटी कर्मचाऱ्यांकरिता शासनाने कोणत्याही परिस्थितीत तोडगा काढण्यासाठी समन्वय साधून वाटेल ते करावे. एसटी कर्मचाऱ्यांच्या आत्महत्या होता कामा नये. तसेच त्यांना कामावर घेतले पाहिजे. राज्यात पुन्हा भरतीच्या ठिकाणी घोटाळे होणार नाहीत. तसेच राज्यातील कोणताही तरुण निराश होणार नाही, आत्महत्या करणार नाही याची शासनाने काळजी घ्यावी. तसेच शासनाने आरक्षणाच्या बाबतीत सकारात्मक भूमिका घ्यावी. विरोधी पक्ष आपल्या सोबत आहे. सरकार हे कोणत्या पक्षाचे नसते, राज्याचे व जनतेच्या हिताचे असते. आपण याचे भान ठेवले पाहिजे. आपण छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेऊन राज्यकारभार करीत असतो. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांना आपला आदर्श वाटेल अशा प्रकारची कृती आपल्याकडून व्हावी अशी मी आपल्याकडून अपेक्षा करतो व याच ठिकाणी थांबतो, धन्यवाद. जय हिंद ! जय महाराष्ट्र ! भारत माता की जय!

(प्रस्ताव प्रस्तुत झाला.)

-------------

असुधारित प्रत

**पृ.शी.** : विनियोजन विधेयक

L. A. BILL NO. VII OF 2022

(A BILL TO AUTHORISE PAYMENT AND APPROPRIATION OF CERTAIN FURTHER SUMS FROM AND OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE FOR THE SERVICES AND PURPOSES OF THE YEAR ENDING ON THE THIRTY-FIRST DAY OF MARCH 2022.)

श्री.शंभुराज देसाई ( वित्त राज्यमंत्री ) :सभापती महोदय, महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक - ७, दिनांक ३१ मार्च, २०२२ रोजी संपणाऱ्या वर्षाच्या कामांसाठी राज्याच्या एकत्रित निधीतून आणखी विवक्षित रकमा देणे व त्यांचे विनियोजन करणे यांस अधिकृत मंजुरी देण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असतांना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २०७, खंड (१) द्वारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधानपरिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडश: सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

(खंड २ व ३, अनुसूची, खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

असुधारित प्रत

**उप सभापती** : ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, कोणत्याही शिफारशीशिवाय हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात य‍ेत आहे.

-------

असुधारित प्रत

## सभागृहाच्या कामकाजासंबंधी

**उप सभापती** : सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. बुधवार, दिनांक ९ मार्च, २०२२ रोजी सभागृहाची विशेष बैठक सकाळी १०.०० ते ११.४५ या वेळेत भरेल. या विशेष बैठकीत नियम २६० अन्वये प्रस्तावावर चर्चा होईल. ज्यांची नावे आलेली आहेत त्यांना या प्रस्तावावर बोलण्याची संधी देण्यात येईल, परंतु वेळेची मर्यादा आपण सर्वांनी पाळली तर चांगले होईल. त्यानंतर दुपारी १२.०० वाजता सभागृहाची नियमित बैठक भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी ६ वाजून ५ मिनिटांनी, बुधवार, दिनांक ९ मार्च, २०२२ च्या सकाळी १०.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-------

असुधारित प्रत